# काळांतील निवडक निबंध

भाग १

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



BK-0006694

शि. म. परांजपे

य. गो. जोशी प्रकाशन, पुणे.

३२५
७३६०३
२८।२।
निबंध।
१८८१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३६०३ वि: निबंध
क्रमांक १८८१ नों: दि: २८-२-८१

# काळांतील निवडक निबंध

## भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६६९४

शिवराम महादेव परांजपे

महामहो … पोतदार

REFBK-0006694

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्ध योजना
१९७०

पुनर्मुद्रण २७ सप्टेंबर १९४६

किंमत

कागदी बांधणी २ रुपये ] [ कापडी बांधणी ३॥ रुपये

प्रकाशक

बळवंत गोपाळ जोशी,

६२३/१५ सदाशिव, पुणें २.

या पुस्तकाचे पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे, रुपांतराचें, वगैरे सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकाकडे आहेत. या पुस्तकांतील उतारे घेणें झाल्यास प्रकाशकाच्या परवानगीशिवाय घेऊं नयेत.

मुद्रक

व्यंकटेश राघवेंद्र शिंगरे

हिंदुराष्ट्र मुद्रणालय,

१४०८, कसबा, पुणें २.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | काळ ... ... ... ... | १ |
| २ | गरिबांची उपासमार ... ... ... | ६ |
| ३ | संपत्तीचा दुरुपयोग ... ... ... | १५ |
| ४ | राजे, सरदार, दरबार, पदव्या इत्यादिकांचा पूर्वाश्रमींचा इतिहास | १९ |
| ५ | आम्ही ... ... ... ... | २५ |
| ६ | हिंदुधर्म आणि खिस्ती धर्म ... ... ... | ३१ |
| ७ | राज्य कशानें मोडकळीस येते ? ... ... | ३७ |
| ८ | ,, ,, ,, ,, नं. २ ... ... | ४१ |
| ९ | ,, ,, ,, ,, नं. ३ ... ... | ४७ |
| १० | ,, ,, ,, ,, नं. ४, ... ... | ५१ |
| ११ | वर्तमानपत्रांचा प्रसार ... ... ... | ५६ |
| १२ | मराठी भाषेची लेखनपद्धति ... ... ... | ६४ |
| १३ | तरवारीचा हक्क ... ... ... ... | ७० |
| १४ | चित्रें ... ... ... ... ... | ७५ |
| १५ | राज्यापहार आणि न्याय ... ... ... | ८० |
| १६ | ,, ,, ,, नं. २ ... ... | ८५ |
| १७ | ,, ,, ,, नं. ३ ... ... | ९१ |
| १८ | तिबेट आणि नीतिशास्त्र ... ... ... | ९६ |
| १९ | समजूत ... ... ... ... | १०१ |
| २० | आयांकरितां गाणे ... ... ... ... | १०६ |
| २१ | संवाद ... ... ... ... | १०८ |
| २२ | एका सोमयज्ञाची हकीकत ... ... ... | १११ |
| २३ | भोंवरीचें फूल ... ... ... ... | ११४ |
| २४ | एका पूजेच्या गणपतीचें पत्र ... ... ... | ११६ |
| २५ | अहाहा, मला दारू पितां येत असती तर किती बरें झाले असतें ! | ११८ |
| २६ | झोंपेतील देखावा ... ... ... ... | १२१ |
| २७ | काळ वाङ्मयाचा प्रभाव, पार्श्वभूमि आणि पूर्वेतिहास | १२३ |

# प्रकाशकाचें निवेदन

युद्धजन्य परिस्थितीमुळें कांहीं दिवस प्रकाशनाचा धंदा स्थगित करावयाचा असें ठरवून मी प्रकाशित केलेली पुस्तकें ग्राहकांना व विक्रेत्यांना सवलतीच्या दरानें विकून टाकली. आतां कांहीं दिवस तरी वाचावे, लिहावें असे मी ठरविलें होतें. धंद्याचा व्याप मागें नसल्यामुळें मी जरा आनंदांत व उत्साहांत होतो. अशी विश्रांति फक्त पांच दिवसच मिळाली. तोंच काळांतील निवडक निबंधावरील बंदी उठल्याचें जाहीर झाले. आपल्या सरकारनें आपलें वाङ्मय बंधमुक्त करून स्वदेशाला बंधमुक्त करण्याचा मुहूर्त केला. कै. शिवरामपंताच्या वाङ्मयाचा मी चहाता असल्यामुळें हे ग्रंथ प्रकाशनास मिळविण्याची मी खटपट केली व ती यशस्वी झाली.

कै. शिवरामपंताचे चिरंजीव श्री. विनायकराव आणि नातू श्री. वामनराव व वासुदेवराव यांनीं हे प्रकाशन मजकडे देऊन आमचा पूर्वीचा ऋणानुबंध दृढ केला व त्यांनींच मला पुन्हा या प्रकाशनाच्या व्यापांत घातले.

सध्या प्रकाशनाच्या धंद्याची परिस्थिती फार चमत्कारिक आहे. एक वेळ चांगलें वाङ्मय लिहितां येईल पण ते छापण्यासाठीं कागद व छापखाना मिळविणें सध्याच्या काळांत जवळ जवळ अशक्य होऊन बसलें आहे. काळ्या बाजाराचा धुमाकूळ सर्वत्र चालू असला तरी कांहीं माझ्या बद्दलच्या आपुलकीमुळें व कांहीं कै. शिवरामपंताच्या पुण्याईनें या मार्गांचा अवलंब न करतां मला कागद व छापखाने मिळाले आणि म्हणूनच शिवरामपंताच्या वाङ्मयाची अकराही पुस्तकें मला आज वेळेवर प्रसिद्ध करतां येत आहेत.

या अकरा पुस्तकांची किंमत पूर्वीच्या किंमतीच्या मानानें फार जास्त दिसेल. पण छपाईचे दर तिपटीचें व कागदाचे दर चौपटीचें झाले आहेत. तरी पुस्तकांच्या बाजारांतील चालू किंमतीशीं तुलना केली असतां या संग्रहाची किंमत वाजवी आहे असें ग्राहकांना दिसून येईल अशी माझी अपेक्षा आहे.

## प्रकाशकाचें निवेदन

लेखन व प्रकाशन यांच्या निमित्तानें विद्वानांशी माझा थोडाबहुत परिचय आहे यामुळें व विषयाचें महत्त्व माहीत असल्यामुळें प्रत्येक भागाला विद्वान् साहित्यिकांच्या प्रस्तावना मला मिळवितां आल्या. अनुभव म्हणून नमूद करून ठेवावेसें वाटते कीं या पुस्तकाला कागद मिळविण्याला जितका त्रास झाला – प्रस्तावना मिळविण्याकरितां बिलकूल त्रास झालाच नाहीं ! यामुळें एक प्रकारचा अलौकिक आनंद वाटला कीं, व्यापारी परिस्थितीनें ताळ सोडला असला तरी जीविताची शाश्वतमुल्यें अशाही स्थितीत स्वयंभू आणि जाग्यावर आहेत आणि म्हणूनच - अशाही दिवसांत या प्रकाशना-सारखीं अवजड कामें अंगावर घेण्यास दिक्कत वाटत नाहीं !

माझे स्नेही व ऋणानुबंधी महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार, श्री. ज. स. करंदीकर, श्री. आचार्य काका कालेलकर; आचार्य. शं. द. जावडेकर, श्री. शि. ल. करंदीकर, प्रा. शं. दा. पेंडसे, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. न. र. फाटक, श्री. श्री. शं. नवरे, श्री. त्र्यं. र. देवगिरीकर व श्री. स. आ. जोगळेकर यांनीं प्रत्येक भागास तत्परतेनें प्रस्तावना लिहून दिल्या. तसेंच वामनराव परांजपे यांनीं 'काळ' वाङ्मयाचा प्रभाव, पार्श्वभूमि आणि पूर्वेतिहास लिहून दिला व अशा तऱ्हेनें या निबंध संग्रहाची उपयुक्तता वृद्धिंगत केली याबद्दल सर्वांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. काळांतील निबंधास टीपा लिहिण्याचे काम माझे स्नेही श्री. स. आ. जोगळेकर यांनीं केलें आहे. शक्य तितक्या आटोपशीर व अगदीं जरूर तेथेंच टीपा याव्यात असें आम्हीं उभयतांनीं ठरविलें होते. प्रासंगिक मजकुराचा खुलासा आणखी कांहीं ठिकाणीं जरूर होता तेथें तो देता आला नाहीं कारण 'काळ' च्या अंकांचे संग्रह पुष्कळ खटपट करूनही समग्र उपलब्ध झाले नाहींत.

या अकरा पुस्तकांची छपाई पुण्यांतील राजगुरु प्रेस, आदर्श प्रेस, लोकसंग्रह प्रेस, टीचर्स प्रेस, अग्रणी मुद्रणालय व हिंदुराष्ट्र मुद्रणालय यांत झाली आहे व या सर्व छापखान्यांनीं केवळ गिऱ्हाईक म्हणून नव्हे तर कांहीं तरी भावनेनें या छपाईचा बोजा पत्करला याबद्दल माझे स्नेही श्री. गानु, शं. दा. चितळे, श्री. दि. दा. गांगल, श्री. न. शं. कुलकर्णी, श्री, आबा सरदेशपांडे, अमरेंद्र गाडगीळ, श्री. शिंगरे, व तांबोळी आर्ट पेपर छपाई बालोद्यानचें सहस्त्रबुद्धे यांनीं पत्करली. मुखपृष्ट श्री. बाबुराव

# प्रकाशकाचें निवेदन

गुर्जर, भारत प्रिंटिंग प्रेस यांनीं तयार करून दिली श्री. मोघे यांनीं ब्लॉक्स-बद्दल मेहनत घेतली. जे. विनायक आणि कंपनीचे श्री. जोग यांनीं बायंडिंगला हातभार लावला. प्रा. चिं. ग. कर्वे, प्रा. शं. दा. चितळे, श्री. ना. के. महाजन, श्री. चिं. य. मराठे यांनीं मुद्रितें तपासण्यास हातभार लावला तेव्हां या सर्व मित्रांचें व माझे सहकारी श्री. रा. शं. पटवर्धन व छापखान्यांतील कामगारांचे मनःपूर्वक आभार मानतो. आणखीही अनेकांनीं अनेक तऱ्हेनें साह्य केले आहे त्यांचा नामानिर्देश झाला नसला तरी त्यांची मला जाणीव आहे.

ही अकरा पुस्तकें मला एका वेळीं प्रसिद्ध करतां आली याचें महत्त्वाचें श्रेय पेपर कंट्रोलर मुंबई यांस आहे. या अकरा पुस्तकाकरितां–स्वतंत्र परवानगी मिळाल्यामुळेंच हे ग्रंथ आज व एका दिवशीं प्रसिद्ध होत आहेत.

प्रकाशनाच्या कांहीं नव्या नव्या कल्पना आणि स्वतंत्र मासिकाचें संपादन अशी अनेक मनोराज्ये माझ्या मनांत आहेत, पण परिस्थितीनें ते जेव्हां शक्य होईल तेव्हां–तोपर्यंत कांहीं दिवस धंदा स्थगित करणें आहे असें नाममात्र म्हणतो.

य. गो. जोशी प्रकाशन कार्यालय
६२३।१५ सदाशिव पुणें २.

यशवंत गोपाळ जोशी

# य. गो. जोशी–प्रकाशन, पुणें.

## वाद-विवेचन-माला

| | | |
|---|---|---|
| १ सुलभ समाज | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| २ फॅसिझम् | ,, ,, | १–०–० |
| ३ साम्राज्यशाही | ना. ग. गोरे | १–०–० |
| ४ अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| ५ लोकशाही | आचार्य जावडेकर | १–८–० |
| ६ मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| ७ विश्व–कुटुंबवाद | ना. ग. गोरे | १–८–० |
| ८ ईश्वर–वाद | आचार्य दांडेकर | १–८–० |
| ९ गांधी–वाद | आचार्य जावडेकर | १–८–० |
| १० राष्ट्र–वाद | कोल्हटकर | २–०–० |
| ११ जडवाद | तर्कतार्थ जोशी | १–४–० |
| १२ हिंदुत्वाद | ज. स. करंदीकर | २–८–० |
| १३ मार्क्सचा कॅपिटल सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | १०–०–० |

या तेरा पुस्तकांत वाद–विवेचन–माला पूर्ण होते.

या आवृत्तीची सोल एजन्सीः—**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, गिरगांव मुंबई,** यांजकडे दिली आहे, तरी ग्राहकांनीं व पुस्तक विक्रेत्यांनीं पुस्तकें त्यांजकडून परस्पर मागवावीत.

# आभार प्रदर्शन

मी त्या वेळीं दहा अकरा वर्षांचा असेन. आज त्या गोष्टीला चांगलीं पस्तीस छत्तीस वर्षे झालीं आहेत. पण त्या वेळच्या एका भीषण प्रसंगाची माझी आठवण अजून बुजालेली नाहीं. आम्ही त्या वेळीं नदी कांठच्या कोनकरांच्या वाड्यांत रहात होतों. काळांतील निवडक निबंधांना बंदी झालेली होती; आणि दुसऱ्या दिवशीं आमच्याकडे असलेल्या निबंधांच्या पुस्तकांसाठीं झडती येणार होती. पण शक्य झालें, तर तीं पुस्तकें भलत्या हातांत पडूं नयेत, म्हणून आदल्या रात्रीं त्या पुस्तकांची विल्हेवाट लावली जात होती. ती रात्र काळोखाची होती. कोनकरांच्या वाड्याच्या पहिल्या चौकभर शेकोटया पेटल्या होत्या; आणि काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकें आणि सुटे फॉर्म त्या शेकोटयांतून जाळले जात होते. एका तपाच्या साहित्यसेवेचें हवन चाललें होतें. त्या वेळचा अण्णांचा चेहरा दुःखपूर्ण आणि गंभीर होता. त्यांच्या तोंडून एक शब्दहि बाहेर पडत नव्हता. त्या रात्रीं ते निश्चल बसून होते. पण त्यांच्या अंतरात्म्यांत केवढा डोंब पेटला असेल, केवढा कोलाहल चालला असेल, केवढी आग भडकली असेल, याची कल्पनाच करावी लागेल. त्या आर्चीनें त्यांचे अश्रु अटून गेले होते. निवडक निबंधांतून अग्नीच्या ज्वाळा निघत असतांना त्यांच्या हृदयांतूनहि तितक्याच लाल क्रोधाच्या ज्वाळा निघत होत्या. त्यांच्या जळणाऱ्या ग्रंथां-तील आणि डोक्यांतील ठिणग्या एकदमच बाहेर पडत होत्या. होतां होतां सर्व पुस्तकें भस्मसात् झालीं आणि बाहेर लागलेली आग विझून गेली. पण त्यानंतर अखेरपर्यंत आण्णांच्या अंतर्यामांतील क्रोधांगार तसेच धुमसत राहिले होते. तो प्रसंग आज मनःचक्षूंपुढें आल्याशिवाय रहात नाहीं.

हें सरकारनें जप्त केलेलें वाङ्मय, हें अग्नीत भस्मसात् झालेलें वाङ्मय, हें गेलीं तीन तपें बंदींत अडकून पडलेलें वाङ्मय, हें माशानें गिळलेलें माणिक, 'सर्वे यस्य वशादगात्स्मृतिपथं' अशा कालाच्या कपाटांतून गडप

## आभार प्रदर्शन

झालेलें हें वाङ्मय, ज्यांच्या सद्धेतूनें आणि सदिच्छेनें रसिक वाचकांना परत पहावयाला मिळत आहे, त्या मुंबई प्रांतांतील आपल्या काँग्रेस सरकारला शतशः धन्यवाद ! आण्णांच्या त्रस्त आत्म्याला आज खरी शांती मिळाली असेल. भगिरथाच्या प्रयत्नानें त्यांचें पूर्वज उद्धरून गेले. काँग्रेस सरकारच्या या सत्कृत्यानें शिवरामपंतांचा आत्मा सुखावला असेल ! आपल्या काँग्रेस सरकाराकडून अशींच लोकहिताचीं कामें अधिकाधिक होवोत !

काळांतील निवडक निबंधांवरलि बंदी उठविण्याचें काम लेखणीच्या एका फटकाऱ्यानें केलें. पण ते निबंध लोकांपर्यंत नेऊन पोंचविण्याचें अवघड काम श्री. य. गो. जोशी यानीं केलें, त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे. बंदींतून सुटलेल्या या निबंधांबद्दल श्री. जोशी यांनीं जी आस्था, आवड आणि अहमहमिका दाखविली, त्यामुळेंच हें प्रकाशनाचें काम त्यांचें गळयांत पडलें. हें प्रकाशनाचें काम श्री. जोशी यांनीं मोठ्या जाणिवेनें आणि जबाबदारीनें केलें आहे. त्यांचें चीज झाल्याशिवाय खास रहाणार नाहीं.

हें जनतेसाठीं लिहिलेलें वाङ्मय, जनताजनार्दनाचे स्वाधीन करण्याचें कामीं नांवापुरता तरी कां होईना, आमचा थोडासा हातभार लागला आहे; आम्हांला ही गोष्ट केवळ सद्भाग्याची आणि अभिमानाचीं वाटते, म्हणूनच आत्मप्रौढीचा दोष पत्करून सुध्दां नमुद करावीशी वाटते. ज्यांच्या-ज्यांच्यामुळें हा योग आला, त्या सर्वांचेंच मानावे तितके आभार थोडेच आहेत.

**विनायक शिवराम परांजपे**

एकंदर चालू महर्गतेमुळें 'काळांतील निवडक निबंधाचीं' पुस्तकें जितक्या किंमतीत द्यावयाची माझी इच्छा होती तितक्या किंमतीत देतां आलीं नाहींत याकरितां काळांतील निवडक निबंधाच्या ग्राहकांकरितां मी कांहीं सवलती देण्याचें ठरविलें आहे.

सवलत नंबर

## (१) श्री ज्ञानेश्वरी-

संपादक: वि. का. राजवाडे

१२५ पानांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना व कठीण शब्दांच्या कोशासह. ज्या पोथीवरून ही ज्ञानेश्वरी छापली आहे ती पोथी होयसळवंशीय जयंतपाळाचा गुरु-मुकुंदराज याची होय. ही पोथी शके १२१२ ते शके १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिलेली आहे. म्हणजे ती थेट श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वेळची आहे असें म्हणतां येईल. लोकमान्य टिळक आपल्या अभिप्रायांत म्हणतात. "प्रस्तुतची ज्ञानेश्वरी म्हणजे खुद्द नेवाशास ज्ञानेश्वरांनीं भाषेच्या ज्या स्वरूपांत ती सांगितली त्याच स्वरूपांत तंतोतंत छापलेला हा महाराष्ट्र वाङ्मयांतील बहुमोल ग्रंथ होय." पृष्ठ संख्या ९०० चे वर. किंमत ५ रुपये.

## (२) हिंदूंचे समाज रचनाशास्त्र-

लेखक : समाज-शास्त्रज्ञ गो. म. जोशी,

पृष्ठसंख्या ४५०, किंमत ५ रुपये.

आजच्या खळबळीच्या काळांत जगांतील सर्व समाज-रचना कोलमडून पडत आहेत. अशा वेळीं आपली समाज-रचना काय होती. कशी असावी या दृष्टीनें लिहिलेला अभ्यासपूर्ण ग्रंथ.

(३) — काळकर्ते —

# शिवरामपंत परांजपे यांचे चरित्र

लेखक—**वामन कृष्ण परांजपे** बी. ए. एल्. एल्. बी.

प्रस्तावना—**गंगाधरराव देशपांडे.**

पृष्ठसंख्या ३२० तीनरंगी कव्हर. आंत आर्टपेपरवरील १० चित्रें. किंमत ५ रुपये.

शिवरामपंतांच्याच नातवांनीं लिहिलेलें हें चरित्र असून त्यांवर सर्व वृत्तपत्रांचे सुंदर अभिप्राय आलेले आहेत.

···चरित्र अत्यंत चित्तवेधक आणि काळकर्त्यांची जणूं काय मूर्ति पुढें आणून उभे करणारें असें झालें आहे.

—**केसरी**

···या सर्व लोकोत्तर गुणवत्तेचें यथार्थ वर्णन सरस भाषाशैलीनें चरित्रलेखकानें केलेले असल्यानें हा चरित्रग्रंथ मननीय व मार्गदर्शक झाला आहे.

—**लोकशक्ति**

···वर्णनशैली आणि वक्रोक्ति—व्याजोक्ति हे वाङ्मयगुण आजोबा-प्रमाणेंच लेखकाच्या अंगीं उतरले आहेत, असें या पुस्तकावरून स्पष्टच दिसून येतें.

—**मनोहर**

···येवढेंच नव्हे, तर मराठीच्या चरित्र वाङ्मयांत एका मूल्य-वान् ग्रंथाची भर घातली आहे.

—**विविध-वृत्त**

वामनरावांची लेखणी या चरित्रांत मोठ्या सफाईनें चाललेली दिसते.

—**प्रो० माटे**

···जीवन वृत्तांची सुंदर गुंफण.

—**नवाकाळ**

# (४) महाराष्ट्र शब्दकोश

संपादक—य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, आबा चांदोरकर,
चिं. शं. दातार

मराठीच्या उगमापासून आजतागायत प्रचारांत असलेले व नसलेले सर्व शब्द यांत आहेत. शब्दांचे विविध काळांतील अर्थ उदाहरणांसहित दिले आहेत. चिकित्सापूर्वक भाषेचा अभ्यास करणारांस व ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम, रामदास इत्यादि जुनें वाङ्मय वाचणारांस अत्यंत आवश्यक.

**महाराष्ट्र शब्दकोशांत**—एक लाखावर म्हणजे सुमारें १,१२,१२९ शब्द, वाक्प्रचार व अनेक अर्थप्रकाशक अवतरणें आलेलीं आहेत. महाराष्ट्र शब्दकोशाचे १ ते ७ भाग असून त्या सात विभागांत मिळून १ कोशरचनाशास्त्र व कोशवाङ्मय, २ भाषाशास्त्र व जगांतील भाषा, ३ महाराष्ट्र देश, जनता व भाषा, ४ मराठी भाषेची उत्पत्ति, ५ मराठी भाषेची वाढ, ६ मराठी भाषेचें व्याकरण व शब्दसिद्धी अशा मौलिक प्रस्तावना जोडल्या आहेत.

**सरकारची मंजुरी**—ऑर्डर नं. S, C, S, 66 ता. १५।२।१९३३ या अन्वयें मुंबई सरकारनें हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेजें व ग्रंथालयें याकरितां त्याचप्रमाणें ऑर्डर नं. ७३७६।३ ता. १।७।१९३४ अन्वयें मध्यप्रांत, वऱ्हाड मध्यप्रांतांतील हायस्कूल्स, नॉर्मल स्कूल्स व प्राथमिक शाळा याकरितां महाराष्ट्र शब्दकोश घ्यावयास मंजुरी दिली आहे.

**महाराष्ट्र-शब्द-कोश भाग ७ प्रत्येकीं १० रुपये प्रमाणें किंमत ७० रुपये.** संपूर्ण कापडी बांधणी.

ज्ञानकोश—आज दुर्मिळ झाला—शब्दकोशही त्याच मार्गावर आहे ! आपण आपणाकरितां—आपल्या भावी पिढीकरितां शब्दकोश संग्रही ठेवणें अवश्य आहे ! वकील वर्गास धंद्याच्या दृष्टीनें हा कोश फार उपयोगी पडतो.

याच भागांत अपूर्व सवलतीचे कुपन घातले आहे त्या कुपनवर आपले नांव व पत्ता भरून पाठविल्यास आपणांस खालील सवलतीनें हे ग्रंथ पाठवूं.

(१) १ शिवरामपंत परांजपे यांचे चरित्र. २ राजवाडे ज्ञानेश्वरी. ३ हिंदूंचे समाजरचना शास्त्र ही प्रत्येकीं पांच रुपये किंमतींची पुस्तकें यांतील आपणांस कोणतेही एक पुस्तक हवे असल्यास आपणांकडून फक्त ४॥ रुपयांची मनीआर्डर येतांच आमचे खर्चानें पाठवूं.

(२) वरील तीन पुस्तकापैकीं कोणतीही दोन पुस्तकें आपणांस हवी असल्यास आपणांकडून फक्त साडे आठ रुपयांची मनीआर्डर आल्यास आपणांस आमचें खर्चानें पाठवूं.

(३) ही तीनही पुस्तकें आपणांस हवी असल्यास आपणांकडून फक्त अकरा रुपये मनीआर्डरीनें येतांच आमचे खर्चानें पाठवूं. मनीआर्डर पाठवितांना या पुस्कांतील सवलतीचे कूपन भरून आमचेकडे आले तरच या सवलती मिळूं शकतील.

# महाराष्ट्र शब्दकोश—

फक्त तीस रुपये मनीआर्डरीनें व सोबतचे कुपन आपणांकडून भरून येतांच टूपे पार्सलनें शब्दकोश आपणांकडे रवाना होईल.

*ह्या सवलती डिसेंबर १९४६ अखेरपर्यंतच चालू रहातील.

*सर्व पुस्तकें अगदीं थोडी राहिली आहेत. तेंव्हां या दुर्मिळ सवलतीचा त्वरित फायदा घेणें अवश्य आहे.

पुस्कांतील अपूर्व सवलतीचे कूपनवर आमचें प्रकाशन कार्यालयाचा खरी शिक्का मारलेला आहे. असेच कूपन फक्त सवलतीचें कूपन म्हणून स्वीकारलें जाईल.

व्यवस्थापक—**य. गो. जोशी, प्रकाशन कार्यालय**

६२३/१५ सदाशिव, पुणें २

## अपूर्व सवलतीचें कुपन

नांव ______________________

पत्ता ______________________

रेल्वे स्टेशन ______________________

सही ______________________

१. महाराष्ट्र शब्दकोशाकरितां तीस रुपयांचीं मनीआर्डर केली आहे.

२. शि. म. परांजपे चरित्र, राजवाडे ज्ञानेश्वरी, हिंदूंचें समाजरचनाशास्त्र या तीन पुस्तकांकरितां अकरा रुपयांची मनीआर्डर केली आहे.

३. राजवाडे ज्ञानेश्वरी, शि. म. परांजपे चरित्र. हिंदूंचे समाजरचनाशास्त्र या दोन पुस्तकांकरितां साडे आठ रुपयांची मनीआर्डर केली आहे.

४. राजवाडे ज्ञानेश्वरी, शि. म. परांजपे चरित्र, हिंदूंचे समाजरचनाशास्त्र या एका पुस्तकाकरितां ४।। रुपयांची मनीआर्डर केली आहे.

* नं. ३ मधील नको असलेलें एक पुस्तक व नं. ४ मधील नको असलेलीं दोन पुस्तकें खोडावी.

शिवराम महादेव परांजपे यांची

# ग्रंथ संपत्ति

## राजकीय वाङ्मय

काळांतील निवडक निबंध भाग दहा

'स्वराज्यां'तील निवडक निबंध भाग पहिला

## साहित्य-विषयक

साहित्य-संग्रह भाग १

,, २

,, ३

## नाटकें

१ संगीत कादंबरी

२ मानाजीराव

३ भीमराव

४ रामदेवराव

५ पहिला पांडव

६ संगीत मिराबाई

*७ महाराष्ट्र-लक्ष्मी

*८ राजसिंह आणि पद्मिनी

## कादंबऱ्या

गोविंदाची गोष्ट

विंध्याचल

---

*हीं दोन नाटकें सन १८९८ च्या सुमारास लिहिलेलीं होतीं. परंतु तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळें सरकारनें बंद पाडलीं असतीं, म्हणून रंगभूमीवर आलीं नाहींत. हीं दोनही नाटकें अनुपलब्ध आहेत.

## काव्य

१ अहिल्या-जार

## शास्त्रीय

१ तर्कसंग्रह-दीपिका

२ तर्कभाषा

३ अर्थसंग्रह

## ऐतिहासिक

मराठ्यांच्या लढायांचा इतिहास

## संपादित

मामिनीविलास

प्रसन्नराघव

प्रतिमा

## स्फुट-लेखन

१ सूर्याच्या गैरसोई (एक गद्यकाव्य)

२ मोरोपंतांच्या आर्याभारताला प्रस्तावना

याखेरीज मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले राजकीय, साहित्य-विषयक, व्युत्पत्तिविषयक वगैरे अनेक स्फुट लेख.

याखेरीज रूसोचें राजनीतिशास्त्र नांवाचा ग्रंथ रचावयाचा होता. परंतु त्याचें फक्त पहिलेंच प्रकरण लिहून होऊन तें १९२८ मध्यें रत्नाकर मासिकांत प्रसिद्ध झालें आहे म्हणून हा ग्रंथ वरील यादींत समाविष्ट केलेला नाहीं.

वा. कृ. परांजपे

अनुक्रम ........................ दि: ........................

# ‘काळा’चीं दहा वर्षे

केसरी पत्रानें महाराष्ट्रांत एका नव्या युगाला आरंभ केला. आणि तोच मान आगरकरांच्या सुधारक पत्रालाही दिला पाहिजे. केसरी पत्र इ० स० १८८१ सालीं निघालें आणि त्यानंतर आठ नऊ वर्षांनीं सुधारकाचा जन्म झाला. सुधारकाचा जोम त्याचे जनक आगरकर यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १८९५ पर्यंत कायम राहिला आणि केसरींतून आगरकर विभक्त झाल्यावर आणि टिळकांच्याकडे केसरीचें सर्व कर्तृत्व आल्यावर टिळकांनीं प्रतिदिनीं केसरीला नवा जोम प्राप्त करून दिला. येणेंप्रमाणें केसरी आणि सुधारक या दोन वर्तमानपत्रांनीं अवघ्या पंधरा वर्षांत महाराष्ट्रीय लोकांच्या मनावर विलक्षण पकड बसविली आणि लोकशिक्षणाचें नवें युग निर्माण केलें.

लोकशिक्षणाचें एक प्रमुख साधन म्हणून आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावानें टिळक आणि आगरकर यांनीं या ‘चौथ्या सत्ते’चा जो विलक्षण उत्कर्ष केला, त्या उत्कर्षाचा पुढील टप्पा यशस्वी रीतीनें गांठण्याचें कार्य शिवराम महादेव परांजपे यांच्या काळ पत्रानें केलें. किंबहुना केसरी आणि सुधारक या पत्रांनीं दाखविलेल्या दिशेनेंच परंतु एका अत्यंत अभिनव अशा दिशेकडे काळाच्या द्वारें शिवरामपंतांनीं जनतेचें लक्ष लाविलें. याचाच अर्थ असा कीं काळ पत्रानें महाराष्ट्रांत, नव्हे, कदाचित् अखिल भरतखंडांत एका नव्या क्रांतीचें बीजारोपणच केलें.

‘८० ते ९५’ या पंधरा वर्षांत केसरी आणि सुधारक यांनीं लोकांना आपल्या राजकीय व सामाजिक परिस्थितीची जाणीव करून देऊन, आपल्या उन्नतीसाठीं विचार करण्यास आणि त्या अनुरोधानें कांहीं धडपड अथवा हालचाल करण्यास शिकविलें. आपली सर्व विद्वत्ता आणि बुद्धिबळ टिळक आणि आगरकर या असामान्य कोटींतील थोर पुरुषांनीं या कामीं खर्च केलें आणि महाराष्ट्रांत नवी जागृती आणि नवा उत्साह निर्माण केला. आपल्या समाजांतील दोषांवर आगरकर यांनीं आपल्या तीक्ष्ण लेखणीनें प्रभावी प्रहार केले तर टिळकांनीं राजकीय सत्ता आधीं हातीं घेतल्याशिवाय

आपली दुःस्थिती नष्ट होणार नाहीं आणि आपले सुधारणेचे प्रयत्नही यशस्वी होणार नाहींत असा प्रचार आणि शिकवण आपल्या बुद्धिचापल्यानें केसरींतून जनतेला दिली. सोमवारचा सुधारक व मंगळवारचा केसरी यांच्या आपसांत चाललेल्या झकडीमुळें लोकमतांत नवी खळबळ नित्य निर्माण होत गेली आणि जिकडे तिकडे मोठ्या अटीतटीनें 'आधीं सत्ता मिळाली पाहिजे,'— 'नव्हे' आधीं सुधारणा केली पाहिजे;' अशा प्रकारचे वादविवाद व मतप्रचार लोक जोरजोराने करू लागले. दर आठवड्यास याप्रमाणें धुमधडाक्यानें चाललेल्या या झगड्यांत टिळकांनी आणि त्यांच्या केसरीनें आपला पगडा जनमतावर अधिक मजबूत असा बसविला आणि आगरकरांच्या मृत्यूच्या आधीं कांहीं थोड्या दिवसापूर्वी सुरू झालेल्या गणेशोत्सवाचें संवर्धन करून आणि पुढें त्यांत शिवाजी उत्सवाचीं भर घालून टिळकांनीं आपलें कार्य जोराने पुढें रेटलें.

अशा परिस्थितींत देशावर एक नवीनच आपत्ती ओढवली. प्लेग या नांवाच्या महाभयंकर रोगाचें विलक्षण संहारकांड सुरू झालें आणि सारा जन-समाज भयानें ग्रस्त झाला. त्यांतच दुष्काळाची भर पडली. सरकारनें या नवीन संकटावर केलेल्या उपाययोजनांनीं लोकांतील असंतोष अधिकच वाढला आणि अखेर संतप्त झालेल्या आणि राजकीय सत्ताप्राप्तिविषयीं आतुर झालेल्या चाफेकर तरुण मंडळानें रँड साहेबाचा बळी घेतला ! सर्वत्र मोठी खळबळ उडाली ! 'पुण्याचे ब्राम्हण' चेचून काढले पाहिजेत, एक तोफ लावून सारें पुणें उडवून देऊं, असे त्वेषाचे उद्गार इंग्रज अधिकारी काढूं लागले आणि या सर्वांचें मूळ असलेला हा बाळ गंगाधर टिळक त्यांना नकोसा झाला. शिवाजीचे पोवाडे गाणाऱ्या आणि राजकीय सत्ता हातीं घेण्या-विषयीं लोकांना सतत प्रोत्साहित करणाऱ्या या लोकप्रिय पुढाऱ्यावर राज-द्रोहाचा आरोप ठेवून आणि त्याला दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा फर्मावून सरकारानें आपलें उग्र स्वरूप प्रकट केलें.

जनतेचे कंठमणी बनलेले टिळक याप्रमाणें तुरुगांत खडी फोडीत असतांना आणि बेमालूम सांधेजोड करणारे त्यांचे तरुण सहकारी केळकर आणि खाडिलकर हे केसरीची ध्वजा न डगमगतां पुढें फडकावीत असतांना टिळक आगरकर प्रभृतींच्या न्यू इंग्लिश स्कुलांमधून आणि फर्ग्युसन कॉले-

जांतून आपलें शिक्षण पूर्ण केलेल्या शिवरामपंत परांजपे, विश्वनाथपंत राजवाडे प्रभृति नव्या तरुणांची पिढी पुढें येऊं लागली. पुण्यांत न्यू इंग्लिश स्कूल-च्याही पूर्वी स्थापन झालेल्या भावे शाळेच्या चालकांनीं काढलेल्या महाराष्ट्र कॉलेज या नव्या संस्थेंत शिवरामपंत हे एक अध्यापक होते. नटेशराव द्रविड, अच्युतराव साठे वगैरे मंडळी त्यांची जोडीदार होतीं. टिळकांनीं सुरू केलेले गणेश उत्सव व शिवाजी उत्सव यांतून तरुण शिवरामपंत प्रवचनें आणि पुराणें सांगूं लागले होते. त्यांच्या वक्तृत्वाचा आणि प्रतिपादनाचा थाट अत्यंत अभिनव आणि मोहक असा होता. कॉलेजमध्यें शिकवावें आणि बाहेर आपल्या प्रभावी वाणीनें लोक–जागृती करावी, एवढ्यानेंच शिवरामपंतांच्या तळमळणाऱ्या मनाचें समाधान झालें नाहीं; तर आपल्या गुरूनें ज्या प्रमाणें वर्तमानपत्राच्या द्वारां आपल्या विजेसारख्या लेखणीची चमक लोकांना दाखवून दिपवून टाकलें, तेंच मोहनास्त्र आपणही चालवावें असा निर्धार करून 'काळकर्ते' ह्मणून शिवरामपंतांनीं इ. स. १८९८ च्या चैत्र शुद्ध प्रतिपदेस आपल्या 'काळ' वर्तमानपत्राची मुहूर्तमेढ रोविली.

पण काळ हा कांहीं केसरी किंवा सुधारक यांची एक नक्कल म्हणून शिवरामपंतांनीं काढला नाहीं. 'काळा'ची मांडणी सर्वस्वीं अभिनव अशीच होती. मुंबई इलाख्यांत सरकारी बाजूचें 'टाईम्स' नांवाचें प्रख्यात पत्र इंग्रजींत निघत असे आणि याच नांवाचें एक जगविख्यात पत्र लंडन येथेंही निघत असे. काळ हा शब्द अर्थाच्या दृष्टीनें पाहिला तर टाइम्स या शब्दाच्या अर्थाशीं जुळणारा आहे आणि सरकारच्या बाजूनें हीं इंग्रजी वर्तमानपत्रें जें वजन उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असत त्याला लोकांच्या बाजूनें तोडीस तोड करण्याचा एखादा सूक्ष्म हेतू 'काळ' हें नांव आपल्या पत्रास देतानां शिवरामपंतांच्या मनांत आला असेल असें म्हणण्यांत, निदान अशी कल्पना करण्यांत, कांहीं चूक होईल असें वाटत नाहीं. 'काळ' या शब्दाला मराठीमध्यें आणखी एक फार समर्पक अर्थ चिकटलेला आहे. 'तो अमक्याचा काळ आहे,' अशा वाक्यांतून 'काळ'–काल,–यम,–मरणे,–नाश, यांची भयानक सूचना मराठी वाचकांच्या मनांत तात्काळ उभी राहिल्यावांचून राहात नाहीं. आपलें काळ हें वर्तमानपत्र इंग्रजांचा काळ आहे, अशा प्रकारचा एक सूक्ष्म परंतु मार्मिक ध्वनी या सुंदर नांवांतून कोणाही मराठी

वाचकाला सहज प्रतीत झाल्यावांचून राहात नाहीं. केसरी म्हणजे सिंह हाही भय आणि दरारा उत्पन्न करणारा आहे. पण काळ म्हणजे प्रत्यक्ष यमच; मृत्युदेवच तो. केसरी हें काळाचें साधन होय अशा प्रकारचा विचार केला असतांना आपल्या पत्राला ' काळ ' हें नांव ठेवण्यांत शिवरामपंतांनीं आपल्या भेदक आणि शोधक बुद्धीची मोठीच बहारदार चमक लोकांच्या प्रत्ययाला आणून दिली असली पाहिजे यांत शंका नाहीं. दर मंगळवारीं केसरी गर्जना करी आणि सारा महाराष्ट्र दणाणून सोडी तर प्रत्येक शुक्रवारीं " काळ ' आपले सूक्ष्मपाश सर्वत्र प्रसृत करीत असे. मंगळवार आणि शुक्रवार हे दोन्हीही महाराष्ट्राचे आदि दैवत जें श्रीभवानी देवी तिचे नेमलेले वार होत. अशा दोन्ही शुभ दिवशीं आपल्या प्रभावी लेखणीचा मारा टिळक आणि परांजपे यांच्यासारखे असामान्य वीर ज्यावेळीं करीत होते, त्यावेळीं सारा महाराष्ट्र त्यांच्या प्रभावानें कसा भारला गेला असेल याची कल्पनाच केलेली बरी.

तसें म्हटलें तर काळ म्हणजे एक चार पानांचा कागद होता. कांहीं जाहिराती, थोड्याशा बातम्या यांना दिलेली जागा वगळली तर बाकीचा बराचसा मजकूर प्रायः संपादक शिवरामपंत परांजपे यांचाच असे. देशांमध्यें सतत ज्या घडामोडी चालू असत, प्रजेचीं जीं लहान मोठीं गाऱ्हाणीं असत, त्या घडामोडींची माहिती देणें आणि तीं गाऱ्हाणीं वेशीवर जागरूक रीतीनें टांगणें हें काम टिळकांचा केसरी मोठ्या दक्षतेनें आणि निर्भयतेनें करीत असे. निराळया शब्दांत तेंच काम करण्यानें येणारा बेचवपणा शिवरामपंताच्या प्रकृतीला कधींच रुचण्यासारखा नव्हता. त्यांच्या मनासमोर कांहीं निश्चित ध्येय होतें. कांहीं नवे विचार त्यांस लोकांच्या मनावर ठसवावयाचे होते. लोकांचीं मनें आणि मतें त्यांस निश्चितपणें आपल्या मतांच्या वळणावर न्यावयाचीं होतीं. आणि एवढ्याचसाठीं त्यांनीं आपलें 'काळ' वर्तमानपत्र चालविलें होतें.

'काळ' १८९८ त निघाला आणि १९०८ त काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांच्यावर राजद्रोहाचा खटला होऊन ते तुरुंगांत जाईपर्यंत तो त्यांनीं एकनिष्ठपणें चालविला. या अवघ्या दहा वर्षांत काळाच्या द्वारें शिवरामपंतांनीं आपल्या मनाशीं योजलेले हेतू पुष्कळ अशांनीं सिद्धीला नेले आणि

काळाच्या विचारसरणीची छाप अखिल महाराष्ट्रावर व विशेषतः त्यांतील तरुण पिढीवर निश्चितपणें पाडली.

साधारणपणें परांजपे हे टिळकांचे शिष्य म्हणूनच महाराष्ट्रांत वावरले. टिळकांनीं सुरू केलेल्या उत्सवादिकांतून आणि सभांतून व्याख्यानें आणि प्रवचनें देणें आणि स्थूलमानानें त्यांच्या प्रेरणेनें चाललेल्या चळवळींना प्रोत्साहन देणें ही शिवरामपंतांची सार्वजनिक भूमिका होती आणि ती त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणें पाळली. मात्र विचाराच्या दृष्टीनें टिळकांच्याच धोरणाच्या रस्त्यानें परंतु फार पुढल्या मुक्कामावर त्यांनीं लोकांची दृष्टि खेचून नेण्याचें कार्य मोठ्या सफाईनें सिद्धीस नेलें. काळ पत्राच्या जन्मापूर्वी टिळकांनीं परकीय इंग्रज सरकारावर, त्यांच्या धोरणावर आणि राज्यपद्धतीवर जी कडक परंतु कायदेशीर टीका सतत चालविली होती, ती अर्थातच सरकारला असह्य होऊन त्यानें टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला याचा उल्लेख मागें केलाच आहे. या खटल्यानें वर्तमानपत्रकारांवर आपला दरारा बसावा आणि सार्वजनिक चळवळ दडपून टाकावी असा सरकारचा हेतु होता हें उघड आहे. परंतु टिळकांनीं तुरुंगाची वाट पत्करून धैर्याचा, कर्तव्यतत्परतेचा आणि आत्मकष्टाचा नवीनच मार्ग लोकांस आचरून दाखविला आणि त्यामुळें सार्वजनिक कार्यकर्त्यांना एक नवा आणि स्पृहणीय आदर्श मिळाला. या खटल्यांत इंग्रज सरकारच्या ( क्रिमिनल प्रोसीजर कोड ) गुन्ह्यांच्या कायद्याच्या नियमावळींतील राजद्रोह विषयक १२४ कलमाचा जो खल देशांत झाला आणि या खटल्याचें जें फल लोकांच्या दृष्टीस पडलें त्यामुळें एक प्रकारची सावधगिरी आणि एक प्रकारचा मानसिक असंतोष आणि त्वेष निरनिराळ्या मराठी वर्तमानपत्रांनीं आपल्या व्यवहारांत आपापल्या प्रकृतिधर्माप्रमाणें प्रकट केला असला तर त्यांत नवल नाहीं. या प्रकरणीं गुराखी पत्राचे संपादक आणि प्रकाशक यांची उडालेली घांदल न. चिं. केळकर यांनीं आपल्या टिळक चरित्रांत वर्णन केली आहे. काळ पत्राचा जन्म १२४ व्या कलमाची भयसूचक घंटा चोहींकडे निनादून जाऊन भ्रमानें निद्रिस्त असलेल्या जनतेस आपल्या सिंहनादानें जागृत करणाऱ्या केसरीलाही प्रतिबंधांत कोंडून ठेवलें असतांनाच झाला. आणि ज्या निर्भयतेनें शिवरामपंतांनीं आपल्या लेखणीची फेंक केली तिचा आणि भोंवतालच्या

परिस्थितीचा विचार केला असता आपल्या मनाला वाटणारें आश्चर्य आणि आदर हे दोन्हीही दुणावल्याशिवाय राहत नाहींत.

शिवरामपंतांच्या तेजस्वी लेखणींतून निघालेल्या दीर्घ आणि स्फुट अशा अनेकविध लेखांनीं भरलेला साप्ताहिक काळ दहा वर्षें चालला. केसरी-प्रभृति वर्तमान पत्रांत एक अग्रलेख आणि त्याच्या शेजारीं 'पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना' असा संपादकीय मजकूर नियमें करून येत असे. शिवरामपंतांनी आपल्या काळ पत्रांत हा नियम मधून मधून चालविला आणि मधून मधून मोडला. अग्रलेखासाठीं एखादा विषय योजून आणि त्याला समर्पक मथळा देऊन ते तो पुरा करीत आणि जोडीला 'पत्रकर्त्यांचे स्फुट विचार' वाचकांस सादर करीत. परंतु पुष्कळ वेळां कसलाही मथळा न देता किंवा स्फुट विचार असेंही न म्हणतां ते एकदमच आपल्या मनांतील विचार क्रमशः आपल्या वाचकांस अग्रलेखांचे जागीं सादर करीत असत. हे असें नांव न दिलेले स्फुट विचार किंवा तसें नांव देऊन लिहलेले स्फुट विचार किंवा मथळा घालून लिहिलेले अग्रलेख, किंवा अन्य रीतीनें अग्र-लेखांच्या जोडीला नांव देऊन लिहिलेले लेख अशा विविध प्रकारांनीं शिवरामपंत आपले काळ वर्तमानपत्र वर्षंदर्शी आपल्या लेखणीच्या विलासानें व्यापून टाकीत. या सर्व लेखांचें वाचन आणि मनन केलें असतां त्यांतून शिवरामपंतांची एक प्रबल विचारधारा स्पष्टपणें वहात असलेली आपल्या प्रत्ययास येते. ही विचारधारा म्हटली म्हणजे—आपला देश आपण स्वतंत्र केला पाहिजे, आपल्या गुलामगिरीचे पाश आपण तोडून टाकले पाहिजेत, बेहिमतीचे आणि नेभळटपणाचे विचार आणि भावना आपण गाडून टाकल्या पाहिजेत, आपल्या पराक्रमी पूर्वजांचें स्मरण जागृत ठेऊन आपण त्यांच्या कीर्तीला साजेल असे सवाई विक्रम करून दाखविले पाहिजेत, आपसांतील दुही, जी आपल्या नाशाला आणि गुलामगिरीला कारण झाली आहे ती नष्ट केली पाहिजे, किरकोळ सुधारणांच्या मागें लागून आपण आपली फसगत करून घेतां कामा नये, आपला राजकीय मोक्ष जगांतील इतर लोकांनीं ज्या मार्गानें मिळविला त्याच मार्गानें आपणांलाही मिळवावा लागणार आणि म्हणून आपणांलाही तशीच तयारी करावी लागेल, आपल्या मनांत क्रांती होईल, आणि जगाच्या इतिहासांतील खरें मर्म आपल्या ध्यानीं येईल

असेच उपाय आपण योजिले पाहिजेत, इंग्रजांनीं दिलेलीं पोकळ आश्वासनें आणि केलेलीं गुळचट भाषणें यांनीं आपली फसगत होऊं देतां कामा नये, गुलामी स्थितीचा आपणांस वीट आला पाहिजे आणि तिटकारा वाटला पाहिजे—येणेंप्रमाणें थोडक्यांत वर्णन करतां येईल. आणि या विचारांतील निरनिराळ्या पैलूंचें पोषण शिवरामपंत दर आठवड्यास घोळून घोळून परंतु प्रतीक्षणीं अभिनव आणि मोहक वाटेल अशा पद्धतीनें करीत असत.

इतर वर्तमानपत्रांप्रमाणें भोंवती चाललेल्या अनेकविध घडामोडींचा परामर्ष घेण्याचें काम हें ते प्रमुखत्वानें आपलें काम समजत नसत. तर वर वर्णन केलेले विचार नि भावना जेणें करून लोकांच्या मनांत ठसवितां येतील अशा प्रकारच्याच घडामोडी अगर विषय चतुरपणानें निवडून काढून, त्यांची मांडणी ते करीत असत. वाचकांच्या मनाला आपल्या गुलामगिरीची सतत टोंचणी लागेल आणि त्यांतून मुक्त होण्याचे विचारचक्र त्यांच्या डोक्यांत फिरूं लागेल या धोरणानें शिवरामपंत आपली लेखणी चालवीत.

शिवरामपंताचे हें सर्व लेख-भांडार काळजीपूर्वक वाचणारांच्या ध्यानांत त्यांचें आद्वितीयत्त्व आल्याशिवाय राहाणार नाहीं. सतत दहा वर्षे आपल्या वाचकांना आपल्या विचारधारेंत वर्धमान उत्साहानें सतत डुंबत ठेवणें हीं त्यांच्या लेखणीची कामगिरी असामान्य कोटीची म्हणावी लागेल. अवघ्या भारतवर्षांत या कामागिरीला तोड सापडणार नाहीं. शिवरामपंतांच्या काळांत तर नाहींच नाहीं ! त्यांच्या भोंवतालच्या परिस्थितींत जागरूक इंग्रज सरकाराच्यासमोर बिनधोकपणाने आणि सफाईने स्वातंत्र्याचा असा कुशल पुरस्कार करणारा वक्ता आणि लेखक उभ्या हिंदुस्थानांत दुसरा कोणी असल्याचें आम्हांस माहीत नाहीं. आट्यापाट्याच्या खेळांत ज्याप्रमाणें विलक्षण चपळाईनें मार न खाता पाट्या ओलांडीत जाऊन एखादा कुशल खेळाडू लोण पोहोचवितो, त्याप्रमाणें इंग्रज सरकारच्या कायद्याच्या बंदोबस्ताच्या पाट्या सफाईने ओलांडून आपल्या अंगास स्पर्श होऊ न देता शिवरामपंतांनी निर्भेळ स्वातंत्र्याच्या प्रसाराचें लोण महाराष्ट्राच्या मैदानावर सर्वांसमक्ष पोहोंचवून दाखविलें, ही त्यांची कामगिरी केव्हांही अविस्मरणीय अशीच ठरेल. स्वातंत्र्यार्थ धडपडणाऱ्या गुलाम राष्ट्रांतील अनेक लेखकांनी आणि वक्त्यांनी केलेल्या स्फूर्तिदायक वाक्पाटवाचे मनोवेधक इतिहास प्रसिद्ध आहेत. परंतु मराठी

भाषेत अवघ्या दहा वर्षांत शिवरामपंतांनी केलेल्या पद्धतीची कामगिरी अन्य कोणी तशा प्रकारें तडीस नेल्याचें उदाहरण मिळणें दुरापास्त आहे. असा शिवरामपंती स्वातंत्र्य वाङ्मयाचा अतुल महिमा आहे. वर्णन करून किंवा भाष्य करून तो प्रकट करून दाखविणें कठीण आहे. तद्रूपतेने त्यांच्या वाङ्मयाचें मनसोक्त अवगाहन करणें हाच त्यांतील रसास्वाद मनमुराद लुटण्याचा एकमेव मार्ग आहे. शिवरामपंताच्या हृदयांत निर्भय देशभक्ती थयथय नाचत होती. कवींची उदात्त प्रतिभा त्यांना लीलेने वश होती. न्याय, मीमांसा इत्यादि संस्कृत शास्त्रांतील पांडित्य, इंग्रजी वाङ्मय आणि इतिहास यांच्या दृढ अभ्यासानें संपादन केलेली स्फूर्ती आणि नव विचार यांचा भरपूर साठा त्यांच्यापाशीं होता. उपहासानें प्रतीपक्षाचे पाणी पाणी करण्याच्या कलेंत तर त्यांच्या कोणीच हात धरणारा नव्हता. भावनेचें उत्थान करण्याची त्यांच्या अंगीं जबरदस्त शक्ती होती. अशा अधिकाराचा आणि योग्यतेचा स्वातंत्र्याचा उद्गाता महाराष्ट्राला लाभला हें त्याचें महत्भाग्य होय.

काळांत शिवरामपंतांनी लहानमोठे सुमारे एक हजार लेख लिहिले असतील आणि 'काळांतील निवडक निबंध' म्हणून जीं दहा पुस्तकें त्यांनीं प्रसिद्ध केलीं त्यांत त्यांपैकीं सुमारें दोनशें ते सव्वादोनशें लेख प्रसिद्ध झाले आहेत. म्हणजे त्यांच्या काळांतील लेखनापैकीं सुमारें चौथा हिस्सा आपणांसमोर आहे आणि सुमारें तीस पस्तीस वर्षांच्या बंदिवासानंतर हे त्यांचे लेख पुनर्मुद्रित होऊन आपणांस वाचण्यास मिळण्याचा सुप्रसंग आला आहे. या दहाही भागांतील दोनशें सव्वादोनशें लेखांची ठोकळ वर्गवारी केल्यास त्यांतील एक भाग स्वित्झर्लंड, आयर्लंड आणि इटलीसारख्या पारतंत्र्याच्या मगरमिठींत सांपडलेल्या देशांनीं गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतंत्रतेच्या प्रकाशांत येण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांना अनुलक्षून लिहिलेल्या लेखांचा आपणांस करतां येईल. तिबेट, चीन आणि हिंदुस्थान अथवा दक्षिण आफ्रिका वगैरे स्थळीं परकीयांनीं जीं आक्रमणें चालविलीं होतीं आणि दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्यासाठीं जे राजकीय लपंडाव खेळले जात होते त्यांस अनुलक्षून लिहिलेल्या लेखांचा गट हा दुसरा भाग आपणांस करतां येईल. तिसरा भाग असा करतां येईल कीं त्यांत शिवाजी महाराजांनीं स्थापिलेल्या मराठी स्वराज्याच्या खटपटीला अनुलक्षून लिहिलेले लेख

समाविष्ट करतां येतील. पारतंत्र्याच्या काळांत परतंत्र प्रजेचें शोषण सतत चालू असतें आणि या सुलतानींत दुष्काळासारख्या अस्मानीची भर पडली म्हणजे जो कहर होतो त्याच्या वर्णनानें दगडांचींसुद्धां अंतःकरणें शतशः विदीर्ण होतील आजचे बंगालचे भूकबळी कोणाच्या अंतःकरणाला घरें पाडीत नाहींत ? शिवरामपंतांचा 'काळ' अशा दुष्काळांतच जन्माला आला होता आणि या दुष्काळांत सद्विचारांच्या आणि सद्विकारांच्या भीषण दुष्काळाची काळवंडून टाकणारी छाया सर्वत्र पसरली होती. लोकांच्या हृदयावर आपल्या लेखणीचे तीव्र घण मारून त्यांतून निघणाऱ्या ठिणग्यांनीं शिवरामपंतांनीं या दाट अंधःकारांत प्रकाश दाखविला. दुष्काळावर आणि उपासमारीवर कळवळणाऱ्या अंतःकरणानें लिहिलेले आणि हृदय पिळवटून टाकणारे या दहा भागांत आलेले त्यांचे लेख हा त्यांचा चौथा गट होय. स्वातंत्र्याची ईर्षा मनांत उत्पन्न करण्याऐवजीं सबूरीच्या गोष्टी सांगणारे, आपल्या समाजांतील दोषांचा पाढा वाचणारे आणि निःशस्त्र व निर्बल झालेल्या समाजाच्या दोषाविष्करणानें त्यांच्या दुःखावर डागण्या देणारे असे जे कित्येक आमच्यांतील पुढारी आणि त्यांच्या संस्था आणि खटपटी असत त्यांचा तीव्र उपहास करण्यासाठीं लिहिलेल्या लेखांचा पांचवा गट करतां येईल. रुचिपालटासाठीं म्हणून लिहिलेल्या उरल्यासुरल्या लेखांचा सहावा गट होऊं शकेल.

या दहा भागांतून आलेले लेख हे त्या त्या वर्षांतील काळांत आलेल्या लेखांतून वर्षवार निवडून छापले असल्यामुळें साहाजिकपणेंच त्यांची वांटणी विषयवार झालेली नाहीं. सर्व प्रकारच्या लेखांची प्रत्येक भागांत गल्लत झाली आहे. शिवरामपंतांच्या कारकीर्दीतील मूळ 'काळ' पत्राच्या संपूर्ण फायली प्रयत्न करूनही अद्याप हातीं आल्या नाहींत. दहा भागांत शिवरामपंतांनीं समाविष्ट न केलेले असे अनेक सुंदर लेख या फायलींतून त्या मिळतील त्या वेळेस आपणास निवडून काढतां येतील आणि मग अशा सर्व लेखांचे विषयवार विभाग करून ते प्रसिद्ध केल्यास आपणांस शिवरामपंतांचे एकेका विषयावरील विचार एकत्र वाचावयास सांपडतील. असा सुप्रसंग लवकरच येईल अशी आम्ही आशा करतों.

शिवरामपंतांचा प्रत्येक लेख म्हणजे अखंड पाषाणाच्या घडीव मूर्ती-

सारखा आहे. त्याचे हात, पाय, मान, नाक, तोंड निरनिराळे तोडून दाखविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांतील सौंदर्य आणि भावनेचा डौल नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. तो अखंडच वाचला पाहिजे, तरच त्याची रुची आपणास यथार्थपणें चाखतां येईल. पृथक्करण करण्याच्या प्रयत्न केल्यास मूळांतील मौजेचे आविष्करण यथोचितपणें करतां येणार नाहीं. असे आहे तरी त्यांचा या दहा भागांत समाविष्ट न केलेला आणि आज विशेष प्रसंगोचित वाटणारा असा एक नमुनेदार लेख येथें सादर करुन त्याचें मर्म विशद करण्याचा आणि शिवरामपंतांच्या लेखन-शैलीचा आविष्कार करण्याचा अल्पसा प्रयत्न येथें करू.

**काळ, ता. ८ एप्रिल १९०४,** [लेखाला मथळा नाहीं.]

मुंबईत ताबुदाच्या सणांत मुसलमान मुसलमानांमध्यें जो दंगा झाला त्याची हकीगत आम्ही मागील अंकीं दिलेलीच आहे. त्या नंतरची पुढील हकीगत म्हणजे मुंबईच्या दंग्याची नसून मुंबईच्या शांततेची होय. या आठवड्यांतील प्रश्न दंगा कसा झाला, हा नाहीं. तो गेल्या आठवड्याचा प्रश्न होता. या आठवड्यांतील प्रश्न दंगा कसा शांत झाला हा होय. व याच प्रश्नाकडे आपण क्षणभर वळू. परिणामाचा विस्तार हा नेहमी कारणाच्या महत्त्वावर अवलंबून असतो. आणि कर्तबगारीची मर्यादाही अंतःकरणांतील महत्वाकांक्षेच्या मानानें नियमित झालेली असते. मुसलमानांनीं प्रथमतः दंग्याला सुरवात केली तेव्हां त्यांच्या मनांत काय होतें? त्यांनीं आपल्या मशिदीपुढें वाद्यें वाजविलीं तर, आपण त्यांच्या मशिदीपुढें वाद्यें वाजवूं एवढीच क्षुद्र कल्पना मनांत होती. व ती कल्पना जशी क्षुद्र होती तशी तिला फळेंही क्षुद्र आलीं व तीं क्षुद्र वेळेंपर्यंतच टिकलीं. बोहरी लोकांच्या मशिदीपुढें आपण वाद्यें वाजवावयाची, ही सुनी लोकाची महत्त्वाकांक्षा होती आणि त्याप्रमाणें एक दिवस ताशाच्या कातड्यावर वेताच्या काठ्या पडून तांब्याच्या भांड्यांमधून एकदां आवाज निघाला! जेवढें मनांत असतें, तेवढेंच हात करतात. दंगेवाल्या लोकांच्या मनांमध्यें थोड्याच गोष्टी असल्याकारणानें त्यांचा दंगाही थोड्याच वेळांत आटोपला. आपण एखादें महत् कृत्य हातीं घेत आहोंत आणि तें आपण वर्षाचे ३६५ दिवस एकसारखें चालवूं असे

दंगा करणाऱ्या मुसलमानांपैकी एकाच्याही मनांत नव्हतें. मग तो दंगा एका आठवड्याचे मुदतींतच थांबला याबद्दल आश्चर्य तें काय? आणि जो दंगा स्वाभाविक रीतीनें बंद पडावयाचा होता तो शांत केल्याबद्दल मुंबईच्या पोलीस कमिशनर साहेबांचे तरी आभार कसले मानावयाचे? एकादा दंगा लवकर थांबणें किंवा पुष्कळ दिवस चालणें या गोष्टी अंशतः कित्येक बाह्य कारणांवर कधीं कधीं अवलंबून रहातात. परंतु मुख्यत्वेंकरून अंतःकरणांतील महत्त्वाकांक्षा हे दंग्याचा विस्तार किंवा संकोच करणारें प्रधान कारण असतें. कांहीं शतकांपूर्वी इंग्रज लोक हिंदुस्थानांत आले आणि त्यांनीं येथें एक प्रकारचा दंगा सुरू केला. तो दंगा ताबडतोब न मिटतां अजूनपर्यंतही चालू आहे व याच्यापुढेही कित्येक वर्षेंपर्यंत कदाचित् चालेल. पण याचें कारण काय? मोहरमचा सण दहा दिवस आहे. तेवढे दहा दिवसपर्यंत आपण कांहीं तरी मजा करूं असल्या क्षुद्र कल्पनेनें प्रेरित होऊन ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर हिंदुस्थानांत आलेले नव्हते. त्यांनीं जें काम मनांत योजिलें होतें, तें दहा दिवसांचें किंवा दहा वर्षांचें नसून त्याच्यापेक्षां फार मोठ्या विस्ताराचें होतें. ताबूत थंडे होईपर्यंत दंगा करून नंतर लगेच दुसऱ्या दिवशीं आपल्या दुकानाच्या फळया उघडून साहेबांनीं तयार केलेला माल लोकांना विकण्याची किंवा साहेबाकडे बटलरचें काम करण्याकरतां जाण्याची त्यांना घाई नव्हती. कांहीं शतकेंही लागलीं तरी हरकत नाहीं, परंतु सगळया हिंदुस्थानचें राज्य हळुं हळुं आपल्या हस्तगत करून घ्यावयाचे ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती आणि त्याप्रमाणें त्या महत्त्वाकांक्षेचे परिणाम घडून आलेले आहेत व त्यामुळें हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं सुमारें दोन शतकांपूर्वी जो दंगा सुरू केला, तो दंगा "हिंदुस्थानांतील इंग्लिशांचें राज्य" इतक्या मोठ्या बहुमानाच्या पदवीला आज मितीला चढला आहे. वस्तुतः पाहिलें असतां मूळचे सगळेच दंगे. मुसलमानांच्या दंग्यांत आणि इंग्लिशांच्या दंग्यांत फारसा फरक नाहीं. कांहीं तरी कुरापत काढायची आणि मारामारीला सुरवात करावयाची ही जी हल्लीं मुसलमानांची दंग्याची पद्धत आहे, तीच पूर्वीं इंग्रजांचीही होती.

आमच्या मशिदीपुढें वाद्यें वाजविलीं ही जशी क्षुल्लक सबब आहे तितक्याच क्षुल्लक सबबी उकरून काढून इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतील नेटिव्ह राजांशीं मारामाऱ्या केलेल्या आहेत. परंतु असल्या मारामाऱ्यांचें पर्यवसान मुसलमान

लोक आपसांतीलच एकमेकांचीं डोकीं फोडण्यांत करितात व इंग्लिशांनीं हिंदुस्थानचें राज्य जिंकून घेण्यांमध्यें केलें आहे एवढाच काय तो दोहोंमध्यें फरक ! बाकी बहुतेक सर्व बाबतींमध्यें हे सगळे दंगेच होत. परंतु असले दंगे फारच फैलावले व त्यांचा विस्तार फारच वाढला म्हणजे त्यांना दंगे हें नांव देण्याची लोकांनाच लाज वाटूं लागते व ते त्यांना राज्य असें म्हणूं लागतात, व कोणत्याही दंग्यापासून झाले नाहीं असें कल्याण या इंग्लिशांच्या दंग्यापासून हिंदुस्थानांतील लोकांना हल्लीं प्राप्त होत आहे. त्यामुळें त्यांनीं त्याला राज्य हें दिलेले नांव किती यथार्थ आहे, याची कोणालाही सहज कल्पना करतां येईल. व त्यांच्या अंतःकरणामध्यें इंग्लिशांबद्दल जी राजनिष्ठा वास करीत आहे, तिजवरून पाहिलें असतां इंग्लिशांच्या या दंग्याची येथील लोकांना किती अभिरुची आणि प्रीति आहे, हेंही व्यक्त होईल. खुद्द मुसलमानांचा धर्मसंस्थापक जो महंमद त्यानेंही सातव्या शतकांत अरबस्थानांत कांहीं थोड्याशा निराळ्या धर्तीवर दंगे सुरू केले होते. व हल्लींच्या महमदी धर्माचा जो विस्तीर्ण फैलाव झालेला आहे, तो त्याचेंच फळ होय. महंमदाच्या दंग्याचा इतका फैलाव कां झाला आणि महंमदाच्या हल्लीच्या अनुयायांच्या दंग्याचा तसा सुपरिणाम कां होत नाहीं असा जर कोणी प्रश्न विचारील, तर या सगळ्या गोष्टींचें कारण त्या त्या गोष्टींच्या उत्पादकांच्या अंतःकरणांतील महत्वाकांक्षेमध्यें त्याला सांपडेल. मी नवीन धर्म स्थापन करीन, परमेश्वरानें माझ्या मनांत संचार केला आहे, त्यानें आपली इच्छा परिपूर्ण करण्यासाठींच मला या जगामध्यें धाडिलें आहे, व त्याचा हुकूम मी बजावीत आहे, अशा प्रकारच्या उदात्त कल्पनांनीं, दैविक विचारांनीं आणि सात्विक मनोवृत्तींनीं महंमदाचें अंतःकरण उचंबळून गेलें होतें. आणि त्यामुळें त्याच्या दंग्याचा इतका चांगला परिणाम झाला. आपल्या शिवाजीनेंही कांहीं शतकांपूर्वीं अशाच प्रकारचे दंगे केले होते. असले सगळे हे वास्तविक दंगेच असतात. हें वर स्पष्ट सांगितलेलेंच आहे. परंतु स्थितिमानानें या दंग्यांच्या नांवामध्यें फरक पडत असतो. इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील दंग्यांना हल्लीं जें स्वरूप आलेलें आहे, तें पाहून आपण त्याला राज्य असें म्हणूं लागलों आहों. आतां इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील दंग्यांना त्यांच्या खऱ्या नांवानें कोणी हाक मारली असतां इंग्लिशांना कधीं कधीं रागही येतो. परंतु असाच राग

दुसऱ्यांनाही येत असेल ही कल्पना त्यांच्या मनाला कधीं शिवलेली सुद्धां नसल्या कारणानें शिवाजी महाराजाच्या सुव्यवस्थित राज्यपद्धतील दंगे आणि खुद्द शिवाजीला दंगेखोर अशी नांवें देण्याला ते यत्किंचितही मागें-पुढें पहात नाहींत. असो, त्यांचा मोठेपणा त्यांच्यापाशीं. आपला तूर्त प्रश्न एवढाच आहे कीं, शिवाजीनें जे दंगे आरंभिले ते त्या वेळच्या एखाद्या पोलिस कमिशनरच्या दबकावणीनें बंद कां पडले नाहींत, आणि त्यांना इतकीं चांगलीं फळें कां प्राप्त झालीं ? या प्रश्नाचें उत्तरही शिवाजीच्या विचारांमध्येंच शोधून पाहिलें पाहिजे, म्हणजे ते आपल्याला बरोबर कळेल. महाराष्ट्र हा मराठ्यांचा देश, तेथें मी मराठ्यांचें स्वराज्य स्थापन करीन, मी त्या देशांतील गोब्राह्मणाचा प्रतिपाळ करीन, आणि त्यांच्यावर धार्मिक आणि राजकीय बाबतींत जो जुलूम होत आहे त्यांतून सोडवून मी त्याना स्वतंत्र करीन, असले शिवाजीचे विचार होते, ही त्याची महत्त्वांकांक्षा होती व ह्या ज्वाळांनीं त्याचें अंतःकरण रात्रंदिवस पेटलेलें होतें ! ज्या दंग्याच्या पायाशीं असली पवित्र, मंगल, आणि शुभकारक मनोवृत्ति, त्याच्या शेवटावर स्वतंत्रतेचीं गोड फळें निर्माण झालीच पाहिजेत ! असो. येथपर्यंत आपण ज्या कांहीं प्रख्यांत दंग्यांचें परीक्षण केलें, त्यावरून एवढें म्हणण्याला कांहीं हरकत नाहीं कीं, दंग्याची किंमत त्यांच्या हेतूवरून ठरविली जाते, व जेथें हेतु चांगले, तेथें बहुधा फळही चांगलेंच येतें. इतिहासानें मागील दंग्यांचीं जीं उदाहरणें हल्लींच्या वाचकांच्या नजरेसमोर आणून मांडली आहेत, त्या बहुतेकांतून उदात्तच हेतु दृष्टीस पडतात. परंतु वर्तमान कालाकडे पाहिलें तर, क्षुद्र हेतु, क्षुल्लक कल्पना आणि तिरस्करणीय महत्त्वाकांक्षा यांचाच दंगा उसळलेला दृष्टोत्पत्तीस येतो. आणि म्हणूनच एकादा पोलीस कमिशनर किंवा पांचपन्नास लष्करी लोक या दरिद्री मनोविकारांच्या जंतूंनीं उत्पन्न केलेले दंगे मोडून टाकूं शकतात. क्षुद्र हेतूचा दंगा, पाहिजे तो क्षुद्र शक्तीचा प्राणी एका क्षणांत जागच्या जागीं दाबून टाकूं शकेल. लहान मन हें एखाद्या ढेकणांप्रमाणें पाहिजे तो आपल्या चिमटींत धरून चिरडून टाकूं शकतो; परंतु विस्तीर्ण मन, अवाढव्य कल्पना, उदात्त हेतु, दैविक महत्त्वाकांक्षा, अचाट बुद्धी, अतुल पराक्रम, आणि जोमाची कर्तबगारी हीं सगळ्या जगाला थक्क करून सोडतात. सर्वांच्या अंतःकरणांत त्यांच्याबद्दल आश्चर्य,

कौतुक आणि प्रेम उत्पन्न होतें, सर्व दुष्ट लोकांची अक्कल त्यांच्यापुढें गुंग होतें, सर्व जुलमाची त्यांच्या भयानें पांचावर धारण बसते, सर्व अन्यायमूलक सामर्थ्य त्यांच्यापुढें डळमळूं लागते, सर्व लुच्चेगिऱ्या त्यांच्यापुढें आपलें खरें स्वरूप आविष्कृत करितात, आणि सर्व शत्रू एखाद्या पशूप्रमाणें दातीं तृण धरून त्यांना शरण येतात, व अखेरीस या ईश्वरी गुणांचा सर्वत्र विजय होतो. देशबांधवहो, असले गुण आपल्या अंतःकरणांत उत्पन्न झाले पाहिजेत !"

लेखाचा विषय वरवर पाहिला तर मुसलमानांतील शिया आणि सुनी यांच्यांत झालेला दंगा हा आहे. दंगा शांत झाल्यावर त्याची मीमांसा करण्याचा उद्देश मनांत धरून शिवरामपंतांची लेखणी चालू लागतें न लागते तोंच, एखादे विमान ज्याप्रमाणें भूमीला थोडें खरचटून एकदम अंतराळांत उड्डाण करतें त्याप्रमाणें त्या दंग्याच्या मीमांसेचा तंतू हाताशीं धरून, त्यांच्या प्रतिभेनें एकदम उड्डाण केलें आहे, असा चमत्कार आपणास येथें आढळून येतो. दंगा करणारांच्या मनांत काय होतें असा प्रश्न विचारून दंगा करण्याचे हेतु क्षुद्र असतील तर त्याला क्षुद्रच फळें येतील आणि ते क्षुद्र वेळेपर्यंत टिकून शांत होतील असें सांगून, मोठ्या महत्त्वाकांक्षेनें दीर्घकाळपर्यंत चालविलेल्या दंग्याला सहजच मोठी वजनदारी प्राप्त होईल; सबब करावयाचा तर तसा दंगा करावा असें सुचविलें आहे. आणि दृष्टांतादाखल असा प्रश्न केला आहे कीं, इंग्लिशांनीं तरी हिंदुस्थानांत जें केलें तो एक प्रकारचा दंगाच नव्हे काय ! पण त्यांनीं तो सतत चालविला. तेव्हां त्या मूळच्या दंग्याला 'राज्य' असें प्रतिष्ठित नांव प्राप्त झालें आणि तें आम्हां लोकांनाही कितो तरी मानवलें आहे. महंमद पैगंबर यानें तरी दुसरें काय केलें ? दंगाच केला. पण त्याच्या बुडाशीं महत्त्वाकांक्षा होती; उदात्त कल्पना, दैविक विचार व सात्विक मनोवृत्ती होत्या. म्हणूनच त्याला मोठें यश मिळविता आलें. आणि आपल्या शिवाजीनें तरी काय केलें ? दंगेच केले. परंतु ते स्वातंत्र्यासाठीं आणि स्वराज्यासाठीं केले. अशा शिवाजीला दंगेखोर इंग्रजांनींच दंगेखोर म्हणून दूषणें द्यावीं यांत काय अर्थ ? तात्पर्य. दंग्यांपेक्षां दंग्यांच्या मागील हेतू पाहूनच दंग्यांची किंमत ठरविली पाहिजे. उदात्त हेतु आणि अवाढव्य कल्पना जर एखाद्या दंग्याच्या बुडाशीं असतील तर अखेरीस अशा ईश्वरी गुणांचा सर्वत्र विजय होतो असें प्रति-

पादन करून शिवरामपंत म्हणतात—"देशबांधवहो, असले गुण आपल्या अंगांत उत्पन्न झाले पाहिजेत."

या एवढ्याशा लहान लेखांत मुसलमानांच्या दंग्यांपासून निघून शिवरामपंतांची लेखणी इंग्रजांचें साम्राज्य, महंमदी सत्तेचा फैलाव आणि शिवाजीचें स्वराज्य एवढ्या सर्वांतून झपाट्यानें भ्रमण करून आली आहे. आणि भिकार फळें देणाऱ्या क्षुद्र दंग्यांच्या ऐवजीं विशाल, चिरंतन फळें देणाऱ्या स्वराज्य व स्वातंत्र्यस्थापक दंग्यांच्या विषयीं वाचकांच्या मनांत अनुकूल प्रेरणेचे धक्के देऊन विराम पावली आहे. ही अशी मीमांसा त्यांच्या लेखांतून वारंवार केलेली आढळते आणि वरवर सारख्या दिसणाऱ्या आणि म्हणून प्रथम प्रथम तरी दंगा, या एकाच शब्दानें संबोधिल्या जाणाऱ्या परंतु हेतु भिन्नतेस्तव भिन्न परिणामाला पोहोंचणाऱ्या अतएव श्रेष्ठ कनिष्ठपणाच्या भिन्न कोटींत दाखल होणाऱ्या घटनेची मोठी मार्मिक आणि सूचक मीमांसा शिवरामपंतानीं केली आहे. तर्काची कुऱ्हाड चालवूनही त्यांची नाजुक मीमांसा रक्तबंबाळ करणारा अत्यंत अरसिक ठरल्याशिवाय राहाणार नाहीं. या लेखांतील प्रत्येक वाक्याच्या मागें शिवरामपंतांचे स्वदेश प्रेम आणि स्वातंत्र्योत्सुकता भरल्या डोळ्यानें वाचकांकडे पहात आहे आणि त्याला वश करित आहे असा अनुभव आपणाला आल्याशिवाय राहाणार नाहीं. आपण हात लावला तर आपल्या हाताला या लेखांतील खडबडीत शब्द लागतील; पण या शब्दांना छायेप्रमाणें चिकटून उभ्या असणाऱ्या भावना दिसतील पण हातास लागणार नाहींत; कळतील पण पकडता येणार नाहींत; अशी यांतील जादूगिरी आहे. अशी जादूगिरी तुम्हांला अन्यत्र कोठेंहि आढळणार नाहीं. तुम्हीं या लेखांच्या, त्यांतील शब्दांच्या जों जों निकट जाल, तों तों ते शब्द नाहींसे होऊन त्याच्यामागें उभ्या असलेल्या त्या भावनांशी तुम्हीं एकरूप व्हाल आणि त्यांत विरून जाल. हीच शिवरामपंतांची किमया, त्यांची लेखनशैली, आणि हेंच त्याचें पृथक्करण.

# पहिल्या भागाचा परामर्ष

काळ पत्रांतील निवडक निबंध भाग पहिला हें पुस्तक काळ कर्त्यांच्या परवानगीनें रा. आत्माराम रामजी जगताप यांनीं शारदाक्रीडन छापखान्याचे मालक रा. मोरेश्वर रामचंद्र काळे यांच्याकडे छापून इ. स. १९०० (३० जून रोजीं) सालीं प्रसिद्ध केलें. बारीक छपाईच्या १४० पानांच्या या पुस्तकाची किंमत अवघी आठ आणे होती. मालकानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेवले आहेत असा शेरा यावर आहे. आणि बाळकृष्ण नारायण फाटक कमिशन एजंट मुंबई यांचा छाप प्रत्येक प्रतीवर आहे, कारण पुढें दिल्याप्रमाणें सूचना पुस्तकांत छापली आहे. (ज्या पुस्तकावर बाळकृष्ण नारायण फाटक यांच्या नांवाचा छाप नसेल ते पुस्तक चोरीचे समजावे.) यावरून या आवृत्तीच्या विक्रीचा हक्क कमिशन एजंट रा. फाटक यांनीं घेतला असावा असें दिसतें.

काळ पत्र पहिल्या वर्षी गोंधळेकरांच्या जगद्धितेच्छु छापखान्यांत छापलें जात असे. परंतु काळाची बाधा कदाचित् आपणालाही होईल या भयानें जगद्धितेच्छु कर्त्यांनीं आपला पाय मागें घेतला तेव्हां शिवरामपंतांनी आपला स्वतःचा मनोहर नांवाचा छापखाना घालून ते 'काळ' त्यांत छापूं लागले. मग काळांतील निवडक निबंधांचे प्रसिद्ध झालेले पुढील नऊ भाग वेळोवेळीं स्वतः शिवरामपंतांनीं छापून प्रसिद्ध केले. पैकीं दुसरा भाग स. १९०३ मध्यें प्रसिद्ध झाला. सात, आठ, नऊ आणि दहा हे भाग अनुक्रमें १९०५, १९०६, १९०७, १९०८ या सालीं प्रसिद्ध झालेले आहेत. या भागांतील छपाई दु–रकानी आहे. त्यावरून काळांत आलेले लेख तेव्हांच निवडून व त्याच जुळाईचा उपयोग करून हे भाग तयार झालेले दिसतात. १९०३ सालीं दुसरा भाग छापल्यानंतर असे भाग प्रतिवर्षी छापण्याचें काम मागें पडलें असावें असें दिसतें आणि १९०५

सालापासून या कामाची उठावणी झाली आणि सात, आठ, नऊ, दहा हे भाग छापून होत असतांनाच मागील शिल्लक पडलेल्या तिसऱ्या, चौथ्या, पांचव्या व सहाव्या वर्षांतील लेख निवडून पुन्हां छापून घेऊन आणि त्यांचे भाग क्रमशः तिसरा १९०५ मध्यें, चौथा १९०६ मध्यें, पांचवा १९०७ मध्यें आणि सहावा १९०८ मध्यें याप्रमाणें एकरकानी छपाई करून छापण्यांत आलेले दिसतात. येणेंप्रमाणें या दहा भागांच्या छपाईची कथा आहे.

फार पूर्वी केसरीतील निवडक निबंधांचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं पण त्या नंतर ती प्रथा कांहीं पुढें चालू राहिली नाहीं. काळानें मात्र दहाही वर्षांच्या निवडक निबंधांची पुस्तकें काढण्याचें धाडस केलें. केसरी नंतर काळाला लाभली एवढी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याही पत्राच्या वांट्याला आली नाहीं. शेवटीं शेवटीं काळाचे वर्गणीदार सोळा हजारापर्यंत गेले. आणि क्षणभर काळ केसरीलाही मागें टाकतों कीं काय अशी चर्चा त्यावेळीं तरुण मंडळींत असल्याचें आम्हास प्रत्यक्ष माहीत आहे.

काळाच्या लेखाची तरुण पिढीवर अशी मोहनी पडली होती कीं जागजागीं स्थापन झालेल्या तरुणांच्या मंडळांत काळांतील लेखांचे मिटक्या मारून नियमानें वाचन होत असल्याचें आम्ही प्रत्यक्ष अनुभवलें आहे.

शिवरामपंत हे पट्टीचे वक्ते होते आणि त्यांच्या मोहक भाषणाची छाप तरुण पिढीवर इतकी पडली होती कीं बाकीचे सारे वक्ते त्यांच्यापुढें फिके पडत. लेखणीसारखाच त्यांच्या वाणीचा थाटही सर्वांआगळा होता. त्यांचीं वाक्यें तोंडानें उच्चारली जात तेव्हां ती दिसण्याला अगदी साधी दिसत. परंतु आपल्या आवाजाच्या आरोह आणि अवरोह यांच्या पेरणीनें या बाह्यतः शुष्क दिसणाऱ्या शब्दावलींत विविध भावनांचे जे रस कांठोकांठ भरलेले असत ते ज्यांनीं ती भाषणें शिवरामपंतांच्या मुखांतून प्रत्यक्ष ऐकलीं तेच जाणूं शकत. हीं भाषणें ज्यांनीं ऐकली आणि जे रोज ऐकत होते त्यांना त्या वेळच्या काळांतील लेखांचा रसास्वाद जितक्या मनमुराद व सहजतेनें घेता येत होता, तसा तो आतां शिवरामपंतांच्या पश्चात् कोणालाही आणि केव्हांही मिळणार नाहीं. आपल्या भाषणांत ज्या प्रकारचे आरोह व अवरोह शिवरामपंत योजीत त्याच प्रकारचे आरोह अवरोह त्यांच्या लेखांतील वाक्यांना

आणि शब्दांना लाऊन ते वाचावे लागतात, तेव्हांच त्यांतील खरी मौज आणि मर्म भरपूर लुटावयास सांपडते. आणि हें वैभव तेच भोगूं शकतात कीं जे शिवरामपंतांच्या भाषण-गंगेंत प्रत्यही स्नात होत असत. त्या वेळच्या त्या आम्हां लोकांना काळाच्या लेखांतील छापलेल्या शब्दांच्या आणि वाक्यांच्या रांगांच्या फटींफटींतून शिवरामपंतांची ती मनोहर आणि मोहक मूर्ती अद्यापही दृष्टीस पडल्याचा भास होतो आणि लेखणीला वाणीची साथ मिळाल्यामुळें येणारा जिवंतपणा अनुभवावयास सांपडतो.

अशा या 'काळांतील निवडक निबंध' याच्या पहिल्या भागांत १८९८-९९ सालीं लिहिलेल्या सव्वीस लेखांचा समावेश झाला आहे. पहिल्या सलामीच्या लेखाचा विषय प्रत्यक्ष 'काळ' हा आहे, तर सव्वीसाव्या लेखाचा विषय 'झोंपेंतील देखावा' आहे काळाचें परमेश्वरसदृश व्यापक स्वरूप या लेखांत शिवरामपंतांनीं उभें केलें आहे. इकडे शिवरामपंतांनीं काळानें भूतकाळांत पाहिलेल्या एकामागून एक गोष्टी वाचकांस दाखवीत जों जों पुढें चलावे, तों तों वाचकांच्या अंतःकरणांतील भावनांचे पडद्यामागून पडदे खुले व्हावे, त्याच्या कानाला काळानें त्वेषानें उच्चारलेलें 'सूड सूड' असे शब्द ऐकूं येऊन त्यांच्याही मुखांतून ते शब्द नकळत बाहेर पडावेत, जुलमी राजाला सिंहासनावरून खालीं ओढणारा काळ त्यांना प्रत्यक्ष दिसावा असे काळाचे कधींही न विसरून जाणारें चित्र शिवरामपंतांनीं उभें केलें आहे. या नमुन्याचा लेख मराठी वाचकांनीं तरी हाच पहिल्यानें वाचला असेल असें आम्हांस वाटतें. आणि या लेखकाचे लेख पुन्हां आपणास वाचावयास मिळावे म्हणून त्यांच्या मनाला कसा चटका लागला असेल याची आपणांस कल्पना येते. 'गरिबांची उपासमार' आणि 'संपत्तीचा दुरुपयोग' असल्या लेखांतून इकडे भुकेनें तडफडणारे जीव तर तिकडे मेजवान्या झोडणारे श्रीमंत, हा समाजांतील विषमतेचा प्रकार शिवरामपंतांनीं आपल्या विदारक लेखणीनें उघड केलेला दिसतो. या भागांत अथवा दुसऱ्या कित्येक भागांत आलेल्या कांहीं कांहीं लेखांवरून शिवरामपंतांच्या मनावर युरोपांत हळुहळु प्रसार पावत चाललेल्या 'सोशॅलिझमच्या नव्या मताचा पगडा बसलेला दिसतो. त्या काळीं हिंडमन्, केरहार्डी सारखे इंग्रज आणि पं. शामजी कृष्णवर्मासारखे हिंदी गृहस्थ या मतांचा प्रसार करतांना आढळतात आणि शिवराम-

पंतांच्या बुद्धीवर या तत्त्वज्ञानाची थोडी बहुत छाप पडलेली स्पष्ट दिसून येते. हाही प्रकार मराठी गृष्टीस अभिनव असाच होता. 'राज्य कशानें मोडकळीस येते', या विषयावर एकंदर चार लेख या भागांत आलेले आहेत. होता होई तों राजानें ज्ञानाचा प्रसार होऊं देऊ नये, आपणांहून कोणाला वरचढ होऊं देऊं नये, हमकरेसो कायदा हें तत्त्व अमलांत आणावें, धर्मांचे बंड वाढू देऊं नये, शिपायांचा पगार कधींही तुंबवूं नये, असल्या प्रकारचे विचार वरून साळसूद परंतु आंतून उपरोधिक अशा आपल्या विशिष्ट पद्धतीनें शिवरामपंतांनीं मांडले आहेत. राजे लोकांना दिलेल्या पदव्यांची मीमांसाही एका लेखांत करण्यांत आलेली आहे. नवीन राज्यें स्थापन करणारे आणि दरवडेखोर हे मूळचे एकच कसे हें आपलें आवडतें तत्त्व या लेखांतही काळकर्त्यांनीं विशद केलें आहे. आम्ही वर जो एक नवीन उतारा दिलेला आहे त्यांतही हेंच प्रतिपादन आलेलें आहे हें चाणाक्ष वाचकांस सांगावयास नकोच. 'राज्यापहार आणि न्याय,' यावर तीन लेख आहेत. राज्यापहार म्हणजे चोरीचें भारदस्त स्वरूप ही मांडणी या लेखमालेंत मोठ्या भेदक पद्धतीनें केली आहे. हे सर्व लेख स्वराज्य गमावलेल्या हिंदुस्थानांत तेथील लोकांसाठीं लिहिले आहेत, हें लक्षांत घेतले म्हणजे हिंदी वाचकांवर त्यांचा कोणता परिणाम उतरत असेल हें निराळें फोडून सांगण्याची गरज नाहीं. असा परिणाम करण्यांत त्या काळीं काळकर्त्यांचा हात धरणारा कोणीही नव्हता. पण काळकर्ते अशाच तऱ्हेनें लिहीत कीं, त्यांना धरण्याकरतां शिवशिवणारे हात त्यांना कधींही पकडू शकत नसत. तिबेट आणि नीतिशास्त्र हाही लेख राज्यापहार विषयक लेखांच्या वर्गांतच बसण्यासारखा आहे. शिवरामपंतांचा विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणेंच खिस्ती मिशनऱ्यांवर फार कटाक्ष होता आणि त्याहीपेक्षां एतद्देशीय सुधारकांवर त्यांचा तीव्रतर कटाक्ष होता. 'हिंदुधर्म आणि खिस्तीधर्म' या लेखांत काळकर्त्यांनीं सुधारकांच्या मतावर अशी टीका केली आहे कीं, आमच्या लोकांतील दुष्काळांतील उपासमारीनें पीडिलेल्या गरिबांना खिस्ती करण्यास प्रतिबंध करण्याचे उपाय वास्तविक सरकारानेंच योजावयास पाहिजेत. धोंडो केशव कर्वे प्रभृति जे कार्यकर्ते सुधारक फंड जमवून अशा कामीं खटपट करण्याच्या प्रवृत्तीचे होते, त्यांना कांहीं काळकर्त्यांनीं मनापासून यश चिंतिलें

नाहीं. सरकार जर आमच्यापासून घेतलेल्या करांच्या पैशावर चालतें तर प्रजेवर फंड देण्याची पाळीच कां यावी ? असा युक्तिवाद या लेखांत करण्यांत आला आहे. एका पूजेच्या गणपतीचें पत्र हें सुधारकांतील तसल्याच जातीच्या लेखाला यथा यक्षस्तथा बलिः या जातीचें कुचेष्टेचें उत्तर आहे. सुधारक म्हणजे दारू पिणारे वगैरे ठराविक फटकारे या लेखांत ओढलेले दिसून येतात. कायमचें स्थान देण्याच्या लायकीचा हा लेख नाहीं 'अहाहा मला दारू पितां येत असती तर किती बरें झालें असतें' हा लेखही मागच्या लेखाच्या तोडीलाच बसविला पाहिजे. परंतु एका सोमयज्ञाची हकीगत हा लेख तसाच सुधारकांच्या उपहासानें भरलेला असला तरी वाङ्मयाच्या दृष्टीनें आणि त्यांमुळें घटकाभर, राग आला तरी राग विसरून वाचावासा वाटावा, इतका चटकदार उतरला आहे. 'एका वर्तमानपत्राचा प्रसार' या लेखांत लोकशिक्षणाचें साधन म्हणून वर्तमानपत्रें वाचून दाखविण्याची योजना झाली पाहिजे अशी सूचना मांडण्यांत आली आहे. मराठी भाषेची लेखनपद्धती यांत शुद्धलेखन सुधारणेचा साने-हतवळणे प्रभृतींनीं जो प्रयत्न केला त्यावर थोडी प्रतिकूल टीका करण्यांत आली आहे. काळकर्त्यांची विद्वत्ता व अधिकार या लेखांत चांगल्या प्रकारें दिसून येतो. 'तलवारीचा हक्क' या लेखांत राइट ऑफ कॉंक्वेस्टचा तोंडपुज्या लोकांनीं उभारलेला असला बागुलबोवा हुसकून लावण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. 'चित्रें' हा एक अत्यंत वाचनीय लेख असून देवळांतूनसुद्धां साहेबांचीं चित्रें लावून जी विटंबना आपल्या समाजांत चालू आहे तिचा योग्य निषेध केला आहे नि असें विचारिलें आहे कीं मन उदात्त करणें हा जर चित्रांचा एक उपयोग असेल तर साहेब खुर्चीवर बसलेले व आपण त्यांच्या खुर्चीमागें उभे राहिलेले अशा चित्रानें मन उदात्त कसलें होणार. आमच्या विवेकशून्यतेवर ओढलेला हा कोरडा मननीय आहे यात शंका नाहीं. 'समजूत' या लेखांत पोलीसी समजुतीचा समाचार घेण्यांत आला आहे. 'आयांकरता गाणें' यांत पेशवाईच्या अखेरच्या एका देशाभिमानी वृद्ध बाईची अख्याइका गाण्यांत गुंफली आहे. संवाद ही एका धर्माभिमानी बंगाली मुलाची गोष्ट म्हणून लिहिली आहे. 'भोंवरीचें फूल' या लहानशा लेखांत ज्ञानापेक्षां अज्ञान कसें बरें असा विचार गोविला असून त्याचाच विस्तार 'डेक्कन कॉलेज पाहून केशवरावांच्या मनांत सुचलेले विचार'

या नामांकित लेखांत आलेला पुढील एका भागांत आढळून येईल. 'आम्ही' या लेखांत आम्ही शब्दाच्या व्युत्पत्तीच्या काथ्याकुटापासून सुरुवात करून आम्ही शब्दाच्या निरनिराळ्या उपयोगाचें मनोरंजक वर्णन केलें आहे. शेवटचा लेख 'झोपेंतील देखावा' हा असून तें एक स्वप्न आहे. या स्वप्नांत धवल-कुसुमावती अर्थात ब्रिटानिया आणि हेमवती म्हणजे अर्थात आपली भरत-भूमि या दोन स्त्रियांमधील संवाद आणून धवलकुसुमावती हेमवतीवर कसा जुलूम करीत आहे याचें दिग्दर्शन केलें आहे. येणेंप्रमाणें या सव्वीस लेखांचा थोडक्यांत परामर्ष घेतला आहे.

पुणें<br>
ता. १५-८-४६

—दत्तो वामन पोतदार

या पुस्तकांतील

# हिंदुधर्म आणि ख्रिस्तीधर्म

## या लेखांक नं. ६ मधील

### सिन्नर प्रकरणाबद्दल खालील माहिती नंतर हाती आली

१८९८ सालीं सिन्नरला दंगा झाला. दंग्यांत डॉक्टर ग्विथरचा तंबू जाळण्यांत आला आणि राजे व हॉस्पिटल यांचे खून झाले. हॉस्पिटल असिस्टंटच्या बायकोला दरमहा चार रुपये पेन्शन देण्यांत आले व राजे यांच्या वारसाला थोडी जास्त रक्कम द्यावी अशी शिफारस करण्यांत आली. ग्विथरला त्याच्या सामानसुमानाच्या नुकसानीबद्दल अठराशें रुपये देण्यांत आले. याच सुमारास सरकारनें रँड व आयर्स्ट यांच्या खुनाच्या चौकशी-साठीं बातमीदारांना बाक्षिसें म्हणून हजारों रुपये खर्च केला होता.



' काळ कर्ते ' शि. म. परांजपे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ........ दि: ........
नोंद ........ नोंद दि: ........
६६१४



काळ : अग्रलेख : ता. २५।३।१८९८

सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चंद्रबिम्बाननाः ॥
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते वन्दिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥ १ ॥

एखादें कार्य झालेलें असतें, होणार असतें, किंवा होत असतें. झालेलें असतें तें पूर्वी, होणार असतें तें मग, आणि होत असतें तें हल्लीं. ह्यापैकीं कार्य होत असतें त्यांतील कांहीं भाग झालेला असतो व कांहीं भाग होणार असतो. उदाहरणार्थ, एखाद्या पुस्तकाचीं कांहीं पानें छापून तयार झालेलीं असतात व कांहीं छापून तयार व्हावयाचीं असतात. अशा स्थितींत जें पुस्तक असतें तें छापून होत आहे असें म्हणण्याचा परिपाठ आहे. परंतु जें कार्य पूर्ण होण्याला अवश्य लागणाऱ्या गोष्टींपैकीं अगदीं शेवटची गोष्ट देखील घडून गेलेली असते, तें कार्य झालेलें आहे; आणि जें कार्य पूर्ण होण्याला अवश्य लागणाऱ्या गोष्टींपैकीं अगदीं प्रथमच्या गोष्टीला देखील सुरुवात झालेली नसते, तें कार्य होणार आहे, असें म्हणण्याचा परिपाठ आहे. ह्याच विस्तृत रीतीनें स्पष्ट करून सांगितलेल्या वरील कल्पना भूत, भविष्य, आणि वर्तमान ह्या तीन शब्दांनीं आपण नेहमीं व्यक्त करून दाखवीत असतों. पण जितके अशा रीतीनें आपल्या कल्पना व्यक्त करतात तितक्या सर्वांनाच त्यांचा अर्थ काय, त्या कशा अस्तित्वांत आल्या, त्या कोणच्या मुख्य मूळ कल्पनेवर अवलंबून आहेत, इत्यादि प्रश्नांची माहिती असते असें नाहीं. धूर पाहिला म्हणजे तेथें आग आहे हें पुष्कळांना समजतें; पण ह्यावरून त्यांनीं

तर्कशास्त्रांतील प्रमेयांचें अध्ययन केलेलें असतें असें नाहीं. त्यांतलाच वरील प्रकार आहे. पण ह्या गोष्टी थोड्यांना माहीत असतात; म्हणून त्यांचा त्या मानानें जास्तीच ऊहापोह झाला पाहिजे. पूर्वी, पुढें, हल्लीं इत्यादि व्यवहार जे आपण नेहमीं करतों त्या सर्वांला आधारभूत जी कांहीं कल्पना तिलाच आपण काळ असें म्हणतों. काळ हा पदार्थ डोळ्यानें दिसण्यासारखा नाहीं; किंवा स्पर्शानें जाणतां येण्यासारखा नाहीं. तरी पण तो डोळ्याला दिसत नाहीं किंवा हाताला लागत नाहीं म्हणून त्याचें अस्तित्वच नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कारण ज्ञानाचीं द्वारें अनेक आहेत. जें प्रत्यक्ष दिसत नाहीं तें कदाचित् अनुमानानें सिद्ध होत असतें आणि प्रस्तुत विषयाची स्थिति अशीच आहे. काल, आज, उद्यां, पूर्वी, हल्लीं, पुढें इत्यादि व्यवहार काळ म्हणून कांहीं पदार्थ नसता तर आपणाला करतांच आला नसता. आंब्याचें झाड नसलें तर त्याजवरील फळ खावयाला मिळणें जसें अशक्य तसेंच काळ हा पदार्थ अस्तित्वांत नसता तर पूर्वीचा काळ, हल्लींचा काळ, पुढचा काळ असले प्रयोग जे आपण पावलोपावलीं करतों ते करतां आले नसते. पण ज्या अर्थी ते करतां येतात, त्या अर्थी काळाचें अस्तित्व कबूल करणें भाग आहे. ह्या काळाला आदि आणि अंत हे मुळींच नाहींत. ज्याप्रमाणें सूर्य पूर्वेकडील क्षितिजावर आल्यापासून पश्चिमेकडील क्षितिजाच्या खालीं जाईपर्यंतच काय तो आपल्याला दिसतो, त्याच्या आधींच्या आणि नंतरच्या स्थितीबद्दल आपल्याला कांहींच कळत नाहीं, त्याप्रमाणें काळाचादेखील कांहीं भाग मात्र जाणतां येतो; आणि त्याच्या आधींचा भाग आणि नंतरचा भाग ह्यांविषयीं मनुष्याचें पूर्ण अज्ञान असतें. पृथ्वीच्या पृष्ठभागावर उभ्या राहिलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें आपल्या पायांखालील जमिनीच्या पोटांत काय आहे आणि आपल्या डोक्यावरील आकाशाच्या पोकळींत काय आहे हें समजत नाहीं, त्याप्रमाणेंच काळाच्या आद्य आणि अंत्य स्थितीचा विचार करूं लागलें म्हणजे मनाची अवस्था होऊन जाते. होकायंत्र बिघडून जाऊन वादळांत सांपडलेलें गलबत, चोहोंकडून धुक्यानें वेढून गेल्यामुळें वाट चुकलेला वाटसरू आणि काळाच्या आनंत्याचें मोजमाप काढणारा तत्त्ववेत्ता ह्यांना फार झालें तर आपल्या पुढली चार हात जागा आणि मागली चार हात जागा एवढेंच काय तें दिसत असतें. इतिहासाच्या साधनानें काळाच्या उगमाकडे

आणि ज्योतिःशास्त्राच्या साधनानें काळाच्या मुखाकडे जाण्याविषयीं मनुष्याचे सतत प्रयत्न चालले आहेत. पण त्यांना कितीसें यश आलें आहे ? उपलब्ध साधनांपैकीं अतिशय प्राचीन असे जे वेद त्यांच्या कालमानाविषयींच्या वादाच्या भानगडींत न पडतां स्थूल मानानें वेद सहा हजार वर्षांचे जुने आहेत असें कांहींच्या मताप्रमाणें घटकाभर मानलें तरी काय ? सहा हजार वर्षांपासूनच काळाला सुरवात झाली असें त्यावरून कोणाला म्हणतां येणार आहे ? किंवा आजपासून पुढें सहा हजार वर्षांनीं ग्रहांची स्थिति अमुक अमुक होईल, त्यांचीं अमुक अमुक फळें येतील, हें जरी कळलें तरी काय ? त्या मुदतीच्या पुढें काळाची गति खुंटणार असें कोणा ज्योतिष्याला सांगतां येणार आहे ? सारांश, परमेश्वराप्रमाणेंच काळ हा आद्यंतरहित आहे, आणि आदि व अंत ह्यांनीं विरहित हा काळ असल्यामुळें परंपरेनें ह्याच्याही अंगांत पुष्कळ विलक्षण शक्तींचा समावेश झालेला आहे. परमेश्वर हें सगळ्यांचें मुख्य कारण आहे. आणि काळ उपाधीभूत आहे. काळ हा जसा अनादि आणि अनंत आहे तसाच तो सर्व ठिकाणीं आणि सर्व वेळीं असतो. म्हणून जगांत आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्या सर्व काळानें पाहिल्या आहेत, व यापुढें ज्या ज्या गोष्टी घडून येणार असतील त्याही सर्व काळाला पहावयाला सांपडतील. अशा प्रकारचें काळाचें भव्य, उदात्त, गंभीर, आणि अतर्क्य स्वरूप लक्षांत आणलें म्हणजे कांहीं कांहीं तत्त्ववेत्ते काळ हें निराळें द्रव्य न मानतां त्याचें परमेश्वराशीं तादात्म्य मानितात तें किती यथार्थ आहे हें चांगलें लक्षांत येईल. आणि त्याच तत्त्वाला अनुसरून थोड्याशा लाक्षणिक रीतीनें बोलावयाचें म्हटलें तर आजपर्यंतच्या सर्व अनंत गोष्टी काळानें केलेल्या आणि पाहिलेल्या आहेत असें म्हणण्याला हरकत नाहीं. मध्य आफ्रिकेंत आणि राजपुतान्यांत हत्तींच्या अंगा एवढाल्या समुद्राच्या लाटा उसळतांना आणि त्यावरून हत्तीच्यापेक्षां दसपटीनें मोठीं अशीं गलबतें फिरतांना यानें पाहिलीं असलीं पाहिजेत. हिमालय पर्वताच्या जागीं डोळे फिरून जातील इतके खोल खळगे आणि अटलांटिक महासागराच्या जागीं मेघमंडळांत घुसणारीं पर्वतशिखरें कदाचित् यानें पाहिलीं असतील. ईजिप्त देशांतील उंच उंच मनोरे बांधलेले आणि जमिनदोस्त झालेले यानें पाहिले आहेत. बॅबिलो-

नच्या कळसाचें काम चाललें असतां दररोज वाढत वाढत तो अगदीं स्वर्गलोकाजवळ जाऊन ठेपलेला यानें पाहिला आहे व त्याच्या पूर्वीचे सारे लोक एक भाषा बोलत होते तीं यानें ऐकिली आहे. निनेव्ही, केरो, सिरिया पॅलेस्टाईन इत्यादि शहरांचा आणि देशांचा उत्कर्ष आणि अपकर्ष दोन्ही यानें पाहिलेले आहेत. रोमचें राज्य उभारलेलें आणि मोडलेलें दोन्ही यानें पाहिलीं आहेत. यानें घोड्यांना आणि पर्वतांना पंख असलेलें पाहिले आहेत यानें समुद्राचें गोडें पाणी प्राशन केलें आहे. अर्जुनाच्या एका बाणापासून हजारों बाण उत्पन्न होत आणि रावणाला दहा तोंडें होतीं ह्या सर्व गोष्टी याला थोतांड वाटत नाहींत. ह्यानें ऋषींना ऋग्वेदांतील सूक्तें रचित बसलेले असतांना पाहिलें आहे. यानें विश्वामित्र आणि वसिष्ठ यांच्या भांडणाला काय काय कारणें झालीं तीं लक्ष्यांत ठेविलीं आहेत. यानें आजपर्यंत कैक राजांचीं राज्यें, गर्विष्ठांचा गर्व, धनाढ्यांचें धन, बलाढ्यांचें बल, आणि मस्तवालांची मस्ती हीं लयाला गेलेलीं पाहिलीं आहेत आणि यापुढें पाहील. एजिस, टार्क्विनस, नीरो यांनीं गरिबांवर पुष्कळ जुलूम केला. पण अखेरीस याच्या पुढें त्यांचा जुलूम चालेनासा झाला. अलेक्झँडर आणि जूलिअस सीझर यांनीं आपल्या सैन्यानें साऱ्या शत्रूंना जेरीस आणलें, पण जेव्हां याच्याशीं लढाई करण्याचा प्रसंग आला तेव्हां तेच उलटे जेरीस आले. सालोमन आणि मार्कस ऑरेलिअस हे राजे मोठे शहाणे होऊन गेले, पण ह्याच्यापुढें त्यांचें शहाणपण चालेना. गरीब लोक जुलुमानें गांजून, भुकेनें व्याकूळ होऊन, उन्हानें करपून, किंवा थंडीनें गारठून गुडघ्यांत डोकें घालून डोळ्यांतून टिपें टाकीत बसत तेव्हां खऱ्या मित्राप्रमाणें चार युक्तीच्या गोष्टी सांगून हाच त्यांच्या मनाला धीर देत असे. लढाईत पराभव पावून जिवंत शत्रूच्या हातीं सांपडलेल्या राजांकडून रोमन बादशहा रोम शहरांतून आपले विजयरथ ओढवीत असत त्या वेळीं त्या गुलाम राजांना किंवा राजकीय गुलामांना शत्रूचें वैभव आणि आपली विपत्ति सहन करण्याचें सामर्थ्य खऱ्या शूराप्रमाणें हाच त्यांच्या डोळ्यांपुढें येऊन देत असे. ल्युक्रेशिआवर टार्क्विनसनें जुलूम केला, रावणानें सीतेला चोरून नेलें आणि दुःशासनानें द्रौपदीला भर सभेंत नग्न करण्याचा प्रयत्न केला, त्या वेळीं ब्रुटसच्या, रामाच्या आणि भीमाच्याही

आधीं मोठ्यानें गर्जना करून 'सूड ! सूड !' हे शब्द हाच ओरडला. दैत्यांनीं रसातळाला पोचविलेल्या वेदांचा प्रचार यानेंच फिरून सुरू केला. हिरण्यकशिपूचें पोट यानेंच फोडिलें. बळीचें डोकें यानेंच ठेचलें. आणि रावणाचे गळेही यानेंच कापिले. जेव्हां जगांत अनाचार अतिशय वाढला तेव्हां लोकानुग्रहासाठीं शुक्राचार्य, नारदमुनि, साक्रेतीस, गौतमबुद्ध, जीजस ख्राइस्ट इत्यादि महात्म्यांना यानेंच लोकांपुढें आणून ठेविलें. असे मोठमोठे उपकार यानेंच जगावर केले आहेत व पुढेंही याचे हातून होतील. वास्तविक पाहतां उत्पत्ति, स्थिति आणि लय ह्या तिहींला हाच कारणीभूत आहे. अशा दृष्टीनें पाहिलें असतां ब्रह्मा, विष्णू आणि शिव ह्या तिन्ही देवतांचा हा एकवटलेला अवतार आहे. वास्तविक हा त्रिमूर्तिमय असून कधीं कधीं फक्त शिवाची आणि ह्याची एकरूपता आहे असें वर्णन करण्यांत येतें. पण हे भ्रममूलक आहे. दूरदर्शी राजकारणी पुरुषाप्रमाणें यानें पुढें काय काय गोष्टी करावयाच्या तें सुद्धां सर्व ठरवून टाकलें आहे. कोणते किल्ले निरुपयोगी म्हणून पाडून टाकायचें आणि कोणते नवीन बांधावयाचे, कोणत्या भरभराट संपलेल्या शहराची जागा रानें लावण्यासाठीं मोकळी करून द्यावयाची आणि कोणत्या रानांतली जागा साफ करवून नवीन शहरें वसवावयाचीं, कोणत्या राजांना तक्तावरून खालीं ओढावयाचें आणि कोणाला नेऊन तेथें बसवावयाचें, कोणत्या लोकांच्या गळ्यांत विजयश्रीकडून माळा घालावयाच्या आणि कोणाच्या पायांत गुलामगिरीच्या बिड्या अडकवावयाच्या, हें सर्व यानें कायम करून ठेविलें आहे. आणखी हजारों वर्षांनंतरचाही पृथ्वीच्या पृष्ठभागावरील राष्ट्रांचा नकाशा यानें कुशल चितार्‍याप्रमाणें सर्व रंगवून तयार केलेला आहे. हिरवा, पिवळा, तांबडा, निळा, पांढरा हे निरनिराळे रंग कोठकोठें कसे भरायचे याचा यानें कधींच निकाल लावून टाकिलेला आहे. अशा प्रकारची व्यापक कल्पना काळ हा शब्द उच्चारला म्हणजे मनांत येते. आणि हाच काळ शब्दाचा मूळचा अर्थ. पण शब्दांच्या अर्थाची मर्यादा प्रसंगविशेषीं कमी किंवा जास्ती होत असते. इंग्रजींत 'टाइम्स' हा शब्द कांहीं विवक्षित पत्राचें नांव म्हणून उपयोगांत आणलेला आढळतो. मूळचा 'काळ' आणि 'टाइम्स' या दोन्ही शब्दांचा अर्थ जवळजवळ एकच आहे. परंतु 'टाइम्स' या शब्दाच्या

अर्थविस्ताराला मर्यादित करून ज्याप्रमाणें वर्तमानपत्राच्या नांवासाठीं त्याचा उपयोग इंग्रजींत केलेला आहे त्याचप्रमाणें 'काळ' या शब्दाचा अर्थ संकुचित करून वर्तमानपत्राच्या नांवासाठीं त्याचा मराठींत उपयोग करण्यास कांहीं हरकत आहे असें नाहीं.

---

## गरिबांची उपासमार : : २

देशांत संपत्ति नाहीं म्हणून देश भिकार होऊं शकतो किंवा देशांत संपत्ति असूनही तिची योग्य वांटणी झालेली नसली म्हणजे देश भिकार होतो, उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडील देश, मध्य आफ्रिकेंतील देश आणि समुद्रांतील कांहीं कांहीं खडकाळ बेटें येथें खरोखरच संपत्ति नसल्यामुळें ते प्रदेश कंगाल अवस्थेंत पडलेले आहेत, परंतु पृथ्वीच्या पाठीवर कांहीं असे हतभाग्य देश आहेत कीं, तेथें अपरंपार संपत्ति असूनही भिकार देशांत त्यांचा पहिला नंबर लावण्याची पाळी येते. महिन्यांतून पंधरा दिवस अहोरात्र जागून, भ्रमण करून आणि श्रम करून चंद्रानें अमृताचा सांठा आपले पाशी जमवून ठेवावा आणि देवांनीं दुसऱ्या पंधरवड्यांत चंद्रानें जमवून ठेविलेलें अमृत खाऊन फस्त करावें आणि क्षयरोगानें ग्रस्त झालेल्या चंद्राच्या हातापायांच्या काड्या करून सोडाव्या, हा प्रकार स्वर्गलोकांतदेखील दिसून येतो. हाय ! हाय ! अधाशीपणानें आणि खादाडपणानें देवांनादेखील सोडलें नाहीं. आणि दुबळयानें जमविलेल्या अन्नावर बलाढ्यांनीं धाड घालण्याची वहिवाट आकाशांतदेखील चालू आहे, मग माणसांना कशाला हांसलें

पाहिजे? आकाशांत जर अशा गोष्टी चालतात तर मग त्या जमिनीवर झाल्या तर त्यांत नवल तें काय? चंद्राच्या सारखीच पुष्कळ देशांतील लोकांची स्थिति होते. त्या देशांतून अनिवार संपत्ति असते. परंतु तिचा दुरुपयोग असतो. ह्यामुळें लाखो लोकांना उपाशी मरावें लागतें. शेतें चांगली पिकलेलीं असतात, आणि त्यांची राखण करणारा शेतकरी भुकेनें तळमळत असतो. गलबतावर धान्याच्या पोत्यांचें ढीगच ढीग पडलेले असतात आणि ती पोतीं वाहणाऱ्या हमालाच्या पोटांत भुकेनें काहूर उसळून टाकिलेले असतें. ह्या सगळ्याचें कारण काय? असें कशानें होतें? ह्याचें उत्तर संपत्तीची वांटणी बरोबर होत नाहीं हें होय. आधीं सगळ्यांची पोटें भरल्यावांचून आपला पैसा चैनबाजींत उधळून टाकण्याचा कोणालाही आधिकार नाहीं आणि जो असें करतो तो परमेश्वराची आज्ञा मोडतो आणि हातांत शस्त्र घेतल्यावांचूनही शेंकडो गरिबांचे खून करतो. आणि असले खून करणारे जागोजाग किती तरी लोक सांपडतात. हे जरी फांशीं गेले नाहींत तरी त्यांच्या अधाशीपणामुळें सदोष मनुष्यवध झाले नाहींत असें कोण म्हणूं शकेल? दुष्काळांत अशा प्रकारचे खून आतिशय होतात. पण त्यांबद्दल जबाबदार कोण? जे श्रीमंत खून करतात तेच न्यायासनावर बसून शिक्षा देणार, मग आपणच आपल्याला फांशीची शिक्षा करून घेणारा न्यायप्रिय मनुष्य या जगांत कोण सांपडणार? दुष्काळ ईश्वरी क्षोभामुळेंच पडतो असें नाहीं. तर श्रीमंतांचा खादाडपणा आणि हावरेपणा हेही पुष्कळ अंशांनीं त्याला कारणीभूत होतात. यंदांच्या अवर्षणामुळें हा भयंकर दुष्काळ आपल्यावर येऊन पडला आहे अशा डोळ्यांत टिपें आणून कंठ सद्गदित करून पण एकीकडे अजीर्णाची ढेंकर देत श्रीमंत लोक गरिबांना बाता मारीत असतात. पण श्रीमंतांनीं गरीबांची दरसाल घरें धुऊन नेऊन आपलीं घरें भरून ठेविली नसतीं तर हा एक वर्षी पाऊस न पडल्याबरोबर उपाशीं मरण्याचा प्रसंग गरिबांवर खास आला नसता. श्रीमंत आपले अवगुण झांकण्यासाठीं देवावर दोषदेखील लादण्याला मागेंपुढें पहात नाहींत, व त्यासाठीं ते वाटतील तशा युक्त्या करितात. आपला देश दिवसेंदिवस सधन होत चालला आहे अशा कल्पना लोकांच्या मनांत भरवून देण्याचा त्यांचा नेहमीं प्रयत्न चालला असतो. ह्यासाठीं किती कोष्टकें तयार

होत असतात, किती आंकडे भरण्यांत येत असतात, आणि किती कागद खर्च होत असतात ह्याची गणती नाहीं. गरीब लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं किती कारकून लोकांना आपली डोळेफोड करून घ्यावी लागत आहे! आणि अर्धपोटीं तळमळत पडणाऱ्या लोकांना आपला देश उत्तरोत्तर सधन होत चालला आहे. हें निदान समाधान तरी वाटण्यासाठीं जगांत किती नोकर लोकांच्या माना टिपणें लिहून लिहून दुखूं लागल्या असतील! ठीक आहे. श्रीमंतांनों, चालूं द्या हे उद्योग. तुमचे धंदे फार स्तुत्य आहेत. पहा ह्याच्या योगानें गरीब लोक फसले तर. नाहींतर दुसरी युक्ति. पण अशा युक्त्या किती चालणार आणि त्या मनुष्यापुढें चालल्या तरी देवापुढें कशा चालतील! देव तुमच्या कागदावर काय लिहिलेलें आहे हें पहात बसणार नाहीं. तो तुमच्या अंतःकरणांत काय लिहिलें आहे तें पाहील. आणि त्याच्यापासून तुम्ही आपलें अंतःकरण कसें दडवून ठेवाल? आणि मनुष्येंदेखील तुमच्या ह्या आंकड्यांनीं आणि वितंडवादांनीं फसतीलच असें नाहीं. पुष्कळ लोकांना तुमचे आंकडे बिकडे कांहीं समजत नाहींत. पण आपण उपाशीं मरतों आहों एवढें मात्र समजतें. खोल गेलेले डोळे, खळगे पडलेले गाल, आणि भाकाळ्या पडलेलीं पोटें हीं तुमच्या जुलमाची रात्रंदिवस साक्ष देत असता ह्यांच्या पुढें तुमच्या आंकड्यांचें काय तेज पडणारें आहे? तुमचे आंकडे खरेच आहेत असें घटकाभर मानलें तरी गरिबांची उपासमार आणि दुर्दशा हे चालते बोलते आणि साऱ्यांना दिसणारे आणि समजणारे जे आंकडे तुमच्या कागाळ्या लोकांच्या नजरेस आणून देत आहेत, ते खोटे कोणाच्यानें म्हणवणार आहेत? धांवतां धांवतांदेखील वाचतां येण्यासारखे हे आंकडे साऱ्या जगभर रस्त्यांतून उघडे पडलेले आणि झोंपड्यांतून कण्हत असलेले पाहून कोण शहाणा तुमच्या आंकड्यांवर विश्वास ठेवणार आहे? इतके लोक उपाशी मरत असतांना तुम्ही म्हणतां आपलें राष्ट्र अधिक श्रीमंत होत चाललें आहे हें कोणाला खरें वाटणार? तुमच्या पेट्यांतून पैसे फार झाले आहेत हें राष्ट्राच्या श्रीमंतीचें लक्षण होय असें तुम्हीं समजत असाल तर खुशाल समजा. पण साधारण लोक असें समजत नाहींत व श्रीमंत होत चाललेल्या राष्ट्रांत राहून उपाशीं मरण्यांत त्यांना मोठा अभिमान वाटतो असेंही नाहीं. तसेंच हल्लीं जगांतील राष्ट्रांतून धर्मशिक्षणा-

कडे विशेष लक्ष दिलें जात असल्यामुळें लोकांची धर्मश्रद्धा विशेष वाढली आहे असेंही प्रतिपादन करण्यांत येत असतें. पण आपल्या भोंवती हजारों लोक अन्नासाठीं पटापट प्राण टाकीत असतांनाही ज्यांच्या घृतकल्यांत आणि मधुकल्यांत तिळमात्र कमी होतां कामा नये असे लोक ज्या राष्ट्रांत आहेत तें राष्ट्र धार्मिक आहे असें कोण म्हणेल ? धर्मासाठीं लढाया करून लोकांचे गळे कापले आणि राज्यांचा स्वाहाकार केला म्हणजे राष्ट्र धार्मिक होतें असें नाहीं. गगनचुंबित शिखरांचीं देवालयें आणि प्रार्थनालयें बांधलीं म्हणजे राष्ट्र धार्मिक होतें असें नव्हे. धर्माधिकाऱ्यांना मोठमोठे पगार देत असलें म्हणजे राष्ट्रांतील धार्मिकपणा वाढतो असें नव्हे. किंवा इतर धर्मांतील मनुष्य-कोटी सोडून ख्रिस्ताच्या कळपांतील मेंढरें होऊन राहणारांची संख्या अधिक वाढली म्हणजे राष्ट्रांतील धार्मिकपणा वाढला असें नाहीं. गरिबांची सोय जेथें लागत नाहीं त्या राष्ट्रांत कसला धार्मिकपणा आला आहे ? गरिबांची उपासमार झाल्यानें राष्ट्राला एक विशेष महत्त्वाचा तोटा सोसावा लागतो व तिकडे श्रीमंत लोकांचें बहुधा लक्ष जात नाहीं. सरकार देशाचें रक्षण करण्या-साठीं लाखों रुपये खर्च करीत असतें, समुद्रावर आरमार ठेवितें, आणि जमिनीवर किल्ले बांधितें. पण हीं सर्व संरक्षणाचीं साधनें दारिद्र्यानें गांजलेल्या देशांत निष्फळ आहेत. नुसत्या आरमारांत आणि किल्ल्यांत कांहीं शक्ति नसते. शक्ति मनुष्याच्या अंगात असते. त्या आरमारावरील किंवा किल्ल्यातील शिपाई जर सशक्त असतील तर त्या राष्ट्राला खरी मजबुती. नाहीं तर त्याचें संरक्षण व्हावें कसें ? पण जे पुढें शिपाईगिरीचीं कामें करणार तेच गरिबांचे मुलगे जर लहानपणीं अन्नासाठीं वाळलेलें असले तर पुढें राष्ट्राचा पाया त्यांच्या मनगटावर डळमळल्याशिवाय उभा रहावा कसा ? सरकारच्या पल-टणींत गेल्यावर पोटभर खायला मिळेल हें खरें. तरी पण हाडापेरांची वाढ लहानपणीं अन्नाच्या अभावामुळें खुंटली असली तर मग तसल्या कमकुवत आणि पोंचट शिपायांचा काय उपयोग ? तेव्हां सरहद्दीवरील सुरक्षितपणा-साठीं तिजोऱ्या रिकाम्या करणारांनीं आपल्या राष्ट्रांतील गरिबांना पोटभर खायला मिळते किंवा नाहीं इकडे विशेष लक्ष दिल्यास त्यापासून परिणामीं अधिक फायदा होण्याचा संभव आहे.

गरीब लोकांना पोटभर खावयाला मिळत नाहीं म्हणून त्यांची उपासमार होते

वगैरे गोष्टींचें विवेचन मागील अंकीं केलेंच आहे. पण श्रीमंतांच्या अधाशीपणा-मुळें गरिबांची फक्त शारिरिकच उपासमार होती तर त्यांतही फारसें कांहीं नव्हतें. परंतु ह्याच्याहीपेक्षां भयंकर परिणाम गरिबांना सोसावे लागतात. शरीराची उपासमार झालेली एक वेळ चालेल. पण मनाला अवश्य लागणारें शिक्षण त्यांना मिळणें फार जरूर आहे. पण तें मिळतें आहे कोठें ? गरीब लोक अशिक्षित आणि उपाशीं रहात असतांही आपल्या पेट्या पैशांनीं भरून ठेवणाऱ्या श्रीमंतांना आपल्या डोक्यावर काय काय जबाबदारी आहे हें मुळींच समजत नसतें, व तिकडे ते कधीं लक्षही देत नाहींत. आणि यदाकदाचित् चुकून त्यांचें लक्ष ह्या प्रश्नाकडे गेलेंच तरी त्यांचा उद्दामपणाचा जबाब तयार असतोच. गरिबानें काम करावें आणि आपलें पोट भरावें. त्यानें दिवसभर काम केलें तरी त्याला दीड आण्याची मजुरी कोणीही देईल. आणि दीड आणा कांहीं थोडा झाला नाहीं. थोडा झाला नाहीं खराच ! गरिबाला नाच तमाशे, दारूबाजी, रंडीबाजी, असल्या गोष्टींत पैसे उधळावयाचे नसतात. म्हणून तो कसा तरी तेवढ्यांत आपला उदरनिर्वाह करील, ही गोष्ट वेगळी. पण आपल्याला बरोबर पांच हजारांचें पेनशन मिळावें किंवा हुंडणावळीच्या दरांत फेरफार झाल्याबरोबर आपणाला कॉंपेन्सेशन मिळावें म्हणून धडपड करणाऱ्या लोकांनीं जर असें म्हटलें तर तें किती सयुक्तिक आहे बरें ? ज्यांना रोज शंभर रुपये पगार मिळत असूनही तेवढा रोजच्या खर्चाला पुरत नाहीं त्यांनीं ‘ दीड आणा कांहीं थोडा झाला नाहीं ’ असे म्हणणें अगदीं विसंगत दिसतें. संपत्तीच्या मदांत श्रीमंत मनुष्य पाहिजे तसें बोलतो. परंतु तो असा विचार करीत नाहीं कीं, दीड आण्याच्या पैशांत त्या गरिबानें काय करावें, त्यानें काय खावें, आणि आपल्या बायकांमुलांना काय खायला द्यावें ? त्याला कांहीं कपडालत्ता नको काय ? तो त्यानें कशांतून करावा ? तो कधीं आजारी पडला आणि त्या दिवशीं त्याला दीड आणाच कां होईना पण तोही मिळाला नाहीं तर मग त्यानें काय खावें ? औषधाला पैसा लागला तर त्यानें कोठला आणावा ? ह्या प्रसंगा-साठीं त्याला कांहीं संचय करून ठेवणें जरूर नाहीं काय ? पण दीड आण्याच्या पैशांतून हें सगळें व्हावें कसें ? तरी पण श्रीमंत मनुष्य म्हणतच असतो कीं, दीड आणा कांहीं थोडा झाला नाहीं. पण श्रीमंतापाशीं पैसा

असला म्हणजे अक्कल असतेच असें नाहीं. श्रीमंतांचें दुसरें असें एक म्हणणें असतें कीं, लोक गरीब होतात ते आपल्या अंगच्या दुर्गुणांमुळें होतात. परंतु असल्या प्रकारच्या सर्व म्हणण्यांतली खुबी अशी असते कीं, कोणीकडून तरी गरिबाला एकादा पैसा दान करण्याचा प्रसंग आपणावर गुदरला असतां त्यांतून निसटून जाण्याकरितां ह्या युक्त्या योजिलेल्या असतात. कारण, आपल्या अंगच्या कोणत्याही दुर्गुणाशिवाय केवळ दुर्दैवानें गरीब झालेले जे लोक आहेत त्यांची ह्या श्रीमंत उदार महात्म्यांनीं आणि कर्णाच्या पुतळ्यांनीं आजपर्यंत काय दाद लाविली आहे ? कसें तरी करून आपलें कर्तव्य टाळून मोकळें व्हावयाचें हा सारा उद्देश असतो. व त्या उद्देशाप्रमाणें हातून कृति घडते. सारांश गरीब लोकांना अधिक गरीब करण्यापेक्षां इतर कामांत श्रीमंत लोकांकडून फारशी मदत होते असें नाहीं. दीड आण्यांत गरिबाचे पोट भरत नाहीं हें तर आहेच. परंतु ह्याच्याहीपेक्षां अतिशय वाईट गोष्ट वर सांगितलेली ही होय कीं, गरिबांना अवश्य लागणारें मानासिक शिक्षणही मिळत नाहीं. त्यामुळें पुष्कळ वेळां गरीब लोकांच्या हातून अन्याय घडतात. अन्यायाचा परिणाम वाईट ही गोष्ट शिक्षणाच्या अभावामुळें त्यांच्या मनावर बिंबलेली नसते. व दुपारची वेळ आली म्हणजे घरांत अन्न खावयाला नसतें अशा प्रसंगीं मध्यान्ह काळची भूक माध्यान्ह रात्रीच्या धाडसानें शांत करण्यापेक्षां त्यांना दुसरा मार्गच दिसत नाहीं. व ते गरीब लोक दारिद्र्यानें इतके गांजलेले असतात कीं, त्यांच्या मनांतील तुरुंगाची भीति अगदीं नाहींशी होऊन गेलेली असते. तुरुंगाच्या बाहेर राहून उपभोगण्यासारखें सुख जगांत त्यांच्यासाठीं कांहीं उरलेलें नसतें. श्रीमंत लोकांनीं त्यांच्या पुढील अन्न ओढून नेल्यामुळें त्यांचीं बायकापोरें उपाशीं मरून गेलीं असल्याकारणानें मागचा कांहीं पाश उरलेला नाहीं हें पाहून गरीब लोक मोठ्या आनंदानें तुरुंगांत जायला तयार होतात. त्यांना घरीं उपाशीं मरावें लागतें. पण तुरुंगांत दोन तरी भाकऱ्या मिळतात. ज्या वितभर घरांत शंभर ठिकाणीं गळत असावयाचें आणि ज्याच्या फाटक्या कुडांनीं थंडीवाऱ्याचें निवारण व्हावयाचें नाहीं ? अशा खोपटापेक्षां तुरुंग कोणाला चांगला वाटणार नाहीं ? अहाहा ! धन्य आहे त्या श्रीमंत लोकांची, की ज्यांच्या कृतीनें गरिबांनां तुरुंग-

देखील प्रिय वाटूं लागलें. कित्येक देशांतील सरकारें गुन्हे ज्या प्रमाणानें अधिक वाढतील त्या त्याप्रमाणें पोलिसचे शिपाई अधिक वाढवीत असतात, परंतु गुन्हे वाढण्याचें कारण काय ह्या प्रश्नाचा विचार करण्याकडे कोणीही लक्ष्य देत नाहीं. नवीन पोलीस ठेवून जो खर्च वाढतो तो फिरून लोकांच्याच डोक्यावर बसतो. त्यामुळें लोक अधिकाअधिकच भिकारी होत जातात. आणि सकृतदर्शनीं गुन्हे बंद करण्यासाठीं म्हणून जो उपाय योजण्यांत आलेला असतो त्याच्याच योगानें अंशतः तरी गुन्हे वाढले जातात ह्यांत संशय नाहीं. पोलीस आणि पोलिसांवरील वरिष्ठ अधिकारी ह्यांच्या पगारांत जे पैसे खर्च होतात त्यांतला कांहीं भाग जे केवळ पोटासाठीं गुन्हे करितात अशा गरिबांच्या उदरनिर्वाहासाठीं खर्च केला तर एकंदरींत किती फायदेशीर होणार आहे ? गुन्हा करावयाला लावून शिक्षा देण्यापेक्षां गुन्हा न होऊं देणें हें अधिक चांगलें. जेथें आपल्या पोटच्या पोराला पोटभर खायला घालावयाला जवळ अन्न नसल्यामुळें आई आपल्या मुलाचा जीव घेण्याला उद्युक्त होते व अशा वेळींही त्या आईला तिच्या कर्माबद्दल शिक्षा होते, तेथें त्या न्यायाची तारीफ करावी किंवा तेथील श्रीमंत लोकांच्या सदयतेची तारीफ करावी हें सांगणें कठीण आहे. सारांश, गरिबांनीं अन्याय केला म्हणजे त्याला शासन करण्याकडे श्रीमंतांची जितकी प्रवृत्ति असते तितकी अन्यायाचें कारण जी गरीबी तें काढून टाकण्याकडे नसते. व याचें कारणही अगदीं साधें आहे. शिक्षा भोगावयाची असते दुसऱ्याला. ती तो भोगीना खुशाल बापडा ! पण त्याची गरीबी काढून टाकावयाची म्हटलें म्हणजे आपली पिशवी होणार रिकामी. एवढें कोणी सांगितलें आहे ? तेवढ्याच पैशांत वाटेल तितकी दारू पितां येईल, वाटेल तितके नाचतमाशे करितां येतील, वाटेल त्या मनुष्याला संतुष्ट करण्याइतका लांच देतां येईल, किंवा वाटेल ती पदवी विकत घेतां येईल, अशा विचारांच्या गर्दीत गरिबांच्या दैन्यावस्थेची दाद कसली लागते ? पण नेहमींच असें करणें चांगलें नाहीं. गरीब लोकांना पोटापुरतें खायला मिळेल आणि जरूर लागणारें शिक्षण मिळेल इतकी तरी व्यवस्था श्रीमंतांकडून होणें इष्ट आहे. कांहीं देशांतून सरकारमार्फत गरिबांसाठीं शाळा घालण्यांत आल्या आहेत हें खरें, पण नुसत्या शाळा घालूनही कांहीं उपयोग नाहीं. शरिराचें पोषण करणारें अन्न

त्यांना मिळाल्यावाचून मनाचें पोषण करणारी विद्या त्यांना कशी गोड लागणार? कित्येक खेड्यांतून उपाशी मरणाऱ्या लोकांच्या शिक्षणासाठीं शाळेच्या इमारती ब्रेच पैसे खर्च करून बांधलेल्या असतात. व फारशीं मुलें जमलीं नाहींत तरी आपल्या कारखान्यांतून तयार होऊन शिल्लक पड-ल्यामुळें गंज चढलेल्यांपैकीं एकेक मास्तरही त्या खेड्यावर लादण्यांत येतो. पण त्या खेड्यांतील लोकांचे जीव वांचावे ह्याबद्दल तेथें ज्यांनीं शाळा बांधल्या त्यांनीं काय व्यवस्था केली आहे? दुपारच्या वेळीं घांसभर अन्न देण्याची सरकारानें तेथें कांहीं सोय केली आहे काय? शाळेंतील मुलें जर अर्धपोटीं किंवा अगदीं उपाशी शाळेंत येतील तर मास्तर त्यांना काय शिकवील? व मास्तरचा उपदेश मुलांच्या मनांवर काय ठसणार? मुलांच्या हातांपायांत शक्ति नसेल तर मास्तरच्या शिकविण्यानें मुलांच्या मेंदूत शक्ति कोणीकडून येणार? तेव्हां खेड्याखेड्यांतून शाळा बांधूं लाग-ण्याच्यापूर्वी त्या त्या खेड्यांतील लोक उपाशीं मरत नाहींत हें पहाणें फार जरूरीचें आहे. गरीब लोकांसंबंधानें आणखीही अशी गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते की, त्यांच्यापैकीं ब्रेंच लोक नेहमी आजारी असतात. व याबद्दलसुद्धां त्यांनीं श्रीमंत लोकांच्याच अधाशीपणाचे आभार मानले पाहिजेत. श्रीमंतांना सशक्त करण्यासाठीं गरिबांना अशक्त रहावें लागते. श्रीमंतांचा घष्टपुष्टपणा हा गरिबांच्या क्षीणतेचें कारण आहे. आपल्या जवळचें चांगलें चांगलें अन्न श्रीमंतांच्या भरीस घालून गरिबांना वाईट साईट कसलें तरी अन्न खावें लागतें. आपल्या शेतांत पिकविलेले आंबेमोहोराचे तांदूळ श्रीमंतांनीं उचलून नेले म्हणजे गरिबांस कित्येक प्रसंगीं झाडांची मुळें, कांदे वगैरे पदार्थांवर आपली उपजीविका करावी लागते. ह्याचा परिणाम असा होतो कीं, त्या लोकांची प्रकृति बिघडून ते वरचेवर आजारी पडतात. अशा वेळीं श्रीमंतांनीं त्यांना मदत करणें जरूर आहे. परंतु श्रीमंतापाशीं मदत मागितली असतां त्यांची ठरा-विक उत्तरें लागलींच पुढें येतात. कोणी गरीब आजारी असेल तर त्याच्यासाठीं दवाखानें बांधून ठेवले आहेत तेथें जावें. आणि आपल्यापाशीं खावयाला कांहीं नसलें तर तेथें जाऊन मरावें. आमचा त्यांच्याशीं काय संबंध! तो आजारी पडला म्हणून आम्हाला त्याचा त्रास कशाला पाहिजे?

अशा बेपरवाईचे जबाब पुष्कळ वेळां ऐकण्यांत येतात. हेंही चांगलें नव्हे. श्रीमंतांनो, आजारी पडलेला आणि उपाशी मरत असलेला गरीब मनुष्य हा तुमचा एक भाऊच आहे. तुम्हांला श्रीमंत करण्यासाठीं तो गरीब झाला आहे. तुम्हांला बलिष्ठ करण्यासाठीं तो दुबळा झाला आहे. त्याचे पैसे तुमच्या खजिन्यांत आहेत. तुमचा त्याचा कांहीं संबंध नाहीं असें म्हणूं नका. असें म्हणून चालावयाचें नाहीं. तुम्हीं म्हटलें तरी देव हें तुमचें म्हणणें ऐकणार नाहीं. तुमचा आणि गरिबांचा संबंध आहे किंवा नाहीं हें तुम्हीच आपल्या मनांत उमजा. गरिबांनीं पुढें येऊन आपला संबंध सिद्ध करून दाखविण्याची वाट पाहूं नका. गरिबांना देवाचें मोठें पाठबळ आहे. गरिबांपासून लुबाडून घेतलेल्या द्रव्यांतूनच हजारों रुपये खर्च करून तयार केलेल्या तुमच्या बागबगीच्यांतून गरिबांना जाण्याची बंदी असली तरी परमेश्वराच्या ह्या सृष्टिरूप बागेंतील सर्व चमत्कार पाहण्याला गरिबांना परवानगी आहे. तुमचे मौल्यवान आणि सुंदर दिवे गरिबांना न मिळोत, पण तुमच्या दिव्यापेक्षां शतपटीनें अधिक चांगले असे सूर्य, चंद्र, नक्षत्रे हे दिवे देवानें गरिबांच्या तेलाचा खर्च न होतां त्यांना उजेड मिळावा म्हणून मुद्दाम निर्माण केलेले आहेत. गरिबांना देवाचा आधार इहलोकीं व परलोकीं सारखाच आहे. प्रश्न काय तो तुमच्याबद्दलच. आपल्या जवळच्या संपत्तीचे ढीग पाहून तुम्हांला वाटतें कीं आपण मोठे परमेश्वराच्या मर्जीतले आहो, परंतु हा सर्व भ्रम आहे, हे सर्व लॅझॅरसच्या गोष्टीवरून अगदीं स्पष्ट होते. पूर्वी कोणी एक अतिशय श्रीमंत मनुष्य होऊन गेला. तो दररोज अंगावर रेशमी वस्त्रें घेत असे आणि पंचपक्वान्नीं जेवण जेवीत असे व त्याचे दाराशीं एक लॅझॅरस नांवाचा भिकारी पडलेला असे. पुढें लॅझॅरस मरण पावला तेव्हां देवदूतांनीं त्याला स्वर्गलोकांत अब्रहामजवळ नेलें व तो श्रीमंत मनुष्य मेला तो नरकांतील अग्निकुंडांत जाऊन पडला. तेथे त्यानें डोळे उघडून पाहिलें तों लॅझॅरस अब्रहामच्या जवळ बसलेला त्याला दिसला. तेव्हां तो श्रीमंत ओरडून म्हणाला, हे अब्रहाम, त्या लॅझॅरसला इकडे धाड म्हणजे तो मला एक घोटभर पाणी तरी पाजील; माझी जीभ ह्या आगीनें अगदीं करपून गेली आहे. तेव्हां अब्रहाम म्हणाला, ह्या लोकांतील मनुष्यांना नरकलोकांत येतां यावयाचें नाहीं. तूं मृत्युलोकीं कर्में केलीं

आहेस त्याचें फळ तुला भोगिलें पाहिजे. तेव्हां तो श्रीमंत म्हणाला, बरें तर आतां निदान माझ्यासारखें वागलें तर मेल्यानंतर काय दुःखें भोगावी लागतात हें कळविण्याकरितां लॅझरसला मृत्युलोकीं जाऊंदे तेथें माझे आणखी पांच भाऊ आहेत. परंतु अब्रहामनें ती गोष्ट कबूल केली नाहीं. पण ती स्थिति सांगण्याकरितां अब्रहामनें लॅझरसला त्या वेळीं जरी खालीं येऊं दिलें नाहीं तरी अझून लॅझरस जर वर असेल आणि अब्रहाम त्याला परवानगी देईल तर फार चांगलें होईल. कारण, त्या श्रीमंत मनुष्याचे त्या वेळीं फक्त पांचच भाऊ होते. परंतु इल्लीं त्याच्या भावांची संख्या अतिशय वाढली आहे.

---

# संपत्तीचा दुरुपयोग : : : ३

जगांतील लोकसंख्येच्या मानानें श्रीमंत आणि गरीब यांचें प्रमाण पाहिलें तर ह्यांच्या आकड्यांत विलक्षण प्रकारची तफावत दृष्टीस पडते. शेंकडा पांच लोकांना वेळेला सुग्रास अन्न खावयास मिळालें तर बाकीच्या पंचाण्णवांस पोटाला चिमटा घेऊन ऊपाशीं रहावें लागतें. दहा जणांना पोटभर अन्न व वस्त्र मिळालें तर त्यांच्या दसपट लोकांना वेळेला घांसभर अन्न मिळविण्यासाठीं दारोदार फिरावें लागतें, व थंडीवाऱ्यांत उघडें पडावें लागतें. मोठमोठ्या शहरांतून आपण अतिशय विस्तीर्ण आणि उंच अशा इमारती अनेक पहातो हें खरें पण ज्यांना मुळींच घरदार नाहीं असें किती लोक पृथ्वीच्या पाठीवर सांपडतील? दहा पांच ठिकाणीं पंचपक्वानांच्या मेजवान्या चालल्या असतां शेंकडों ठिकाणीं मुलेंमाणसें भुकेनें तडफडत असलेलीं दृष्टीस पडतात.

असें कां हों ? ह्याचें कारण काय असावें? हा सृष्टिरचनेंतच कांहीं दोष आहे किंवा आपमतलबी, स्वार्थसाधु, आणि धनलोभी अशा कांहीं माणसांच्या डावपेंचांचा, युक्त्यांचा, लबाड्यांचा हा परिणाम आहे ? देवाच्या वरी पक्षपांत नाहीं, देवाला सगळीं माणसें सारखीं. कोणी वेळेला दहा दहा रूपयांचा खाना खावा आणि गरीब प्रजेनें आपले पोट बांधून आठ आठ दिवस उपास काढावे आणिं अखेरीस अन्नासाठीं व्याकुळ होऊन प्राण सोडावे इतका पक्षपांत करण्याचे देवाला खरोखर कांहीं कारण नाहीं. कांहीं लोकांनीं आपले कोट, झगे, पाटलोणी आणि टोप्या ह्यांच्यासाठी दरमहा शेंकडों रूपये खर्च करावे आणि कांहीं गरिबांनां ॲडम आणि ईव्ह ह्यांच्या पातकामुळें जो शरीराचा भाग झांकणें अवश्य वाटूं लागले तो झांकण्यापुरत्या चिंध्या देखील उभ्या वर्षांत मिळूं नयेत इतके खरोखर देवाचे अंतःकरण कठोर नाहीं. ही सारी मनुष्याची कर्तबगारी आहे. खाण्यापिण्याचे पदार्थ उत्पन्न करुन देवानें मनुष्यें आणि जनावरे ह्यांना एकदमच पृथ्वीच्या पाठीवर सोडून दिले. दोघेही प्रथम सारख्या स्थितींतच होते. परंतु मनुष्याच्या अंगांत दूरदर्शीपणाचा गुण असल्यामुळें दोघांच्या स्थितींत आज मितीला किती फरक पडला आहे पहा ! रानांत जोपर्यंत गवत आहे तोपर्यंत सगळ्यांची पोटे सारखीं भरतात; आणि नदींत जोपर्यंत पाणी आहे तोपर्यंत सगळ्यांची तृषा एकसारखीच शांत होत आहे. जनांवरांत एक श्रीमंत जनावर—दुसरे दरिद्री जनावर असा भेद नाहीं. त्यांच्यात भिक्षा मागण्याची चाल नाहीं. एकानें दुसऱ्याच्या दारापुढें जाऊन मी उपाशी मरतों आहे असें रडगाणें गाण्याचा या जनावरांना कधींहीं प्रसंग येत नाहीं. असलें प्रसंग मनुष्यावर येतात ह्याबद्दल त्यानें आपल्या दूरदर्शी पणाचे आभार मानले पाहिजेत. हा अमुल्य गूण जनावरांच्या अंगीं नसल्यामुळें दारिद्र्यांतील मजेचा अनुभव घेण्याचें दुर्दैवानें त्यांच्या कपाळीं कधींही येत नाहीं. मनुष्य दूरदर्शी असल्यामुळे आपले पोट भरलें तर रात्रीं कसें भरेल एवढयावर तो संतुष्ट राहूं शकत नाहीं. दुपारी पोट भरलें तर रात्रीं कसें भरेल हा विचार त्याला कधींही सोडीत नाहीं. हा विचार अल्प प्रमाणावर असतो तेव्हां ह्यांत गर्हणीय असें कांहींच नसतें, हें कोणालाहीं कबुल केले पाहिजे. पण हा विचार जसजसा वाढत जातो तसतशी मनुष्याच्या अंगच्या क्रूरपणाची, निर्दयपणाची, आणि लबाडपणाची कमाल

होऊन जाते. ह्या दूरदर्शीपणानें मनुष्याच्या पोटांत संचय करण्याची बुद्धि उत्पन्न होते. आणि ही बुद्धि संपत्तीच्या दुरुपयोगाला पुष्कळ अंशी कारणीभूत होते. जनावरें जेथें जातील तेथें त्यांचीं अन्नाचीं कोठारें भरलेलीं असतात. परंतु मनुष्याला तीं आधींपासून भरून ठेवणें जरूर आहेसें वाटतें. आज अन्न मिळालें म्हणजे उद्यां मिळण्याची तजवीज मनुष्य करतो. ह्या महिन्याला मिळालें म्हणजे तेवढयानें संतुष्ट न होऊन तो पुढल्या महिन्याची तरतूद करतो. ज्याला ह्या वर्षाची काळजी नाहीं तो पुढच्या वर्षाची बेगमी करूं पाहत असतो. आणि आपण मरेपर्यंत आपल्या पोटापाण्याची आपल्याला ददात नाही असें जरी असलें तरी मनुष्य आपल्या मुलांबाळांसाठीं संचय करून ठेवीत असतो. एका पिढीला पुरण्यासारखें द्रव्य जवळ साचले तरी तृप्ति न होऊन तें सात पिढ्या कसें पुरेल ह्या विवंचनेंत तो पडतो. आणि खऱ्या खोट्या मार्गानें कसें तरी करून तो आपल्या सात पिढ्यांना पुरे इतकी संपत्ति गोळा करून ठेवितो. परंतु ह्याचा परिणाम असा होतो कीं, ह्या श्रीमंताचे अजून जन्मास न आलेले मुलगे, नातु, पणतु, खापरपणतु, आणि ह्या खापरपणतूंचे नातु, पणतु, ह्यांना आजपासून पुढें शंभर वर्षांनीं मजा मारतां यावी आणि चैनबाजी करतां यावी म्हणून आतां जन्मास येऊन चुकलेल्या हजारों माणसांना उपाशी मरावें लागतें. संग्रह करण्याची मनुष्याची हाव कधीं कधीं इतकी दुरापास्त होते कीं, एखाद्या म्युनिसिपालिटींतील झाडूप्रमाणें साऱ्या जगांतील केरकचरा झाडून गोळा करून आपल्या घरच्या कचऱ्याच्या पेटींत ( हिला तो कधीं भुयार म्हणतो, कधीं तळघर म्हणतो अलीकडे तो हिला सेफ असें म्हणूं लागला आहे ) आणून सांठविल्याशिवाय त्याला आपलें कर्तव्यकर्म आपण केलें असें वाटत नाहीं. काय हा हाव ! काय हा अधाशीपणा ! आणि कांय ही दुसऱ्यांच्या सुखदुःखाबद्दल अनास्था ! इतकी संपत्तीची हाव धरणारांच्या मनांत सदसद्विचार कोठून राहणार ! एकेक जण बसल्या बैठकीला शंभर शंभर रुपयांच्या दारूच्या बाटल्या रिकाम्या करून टाकतो, जणुं काय जगांत भुकेनें तळमळत पडलेला कोणी माणूस नाहींच. कोणी हजारों रुपये किंमतीचा झगा नेसतात किंवा शाल पांघरतात, जणूं काय जगांत थंडीनें हातपाय वांकडे झालेला कोणी मनुष्यच नाहीं. हस्तिदंती दांडा सोन्यानें मढवून त्यावर हिरे बसविलेली छत्री कोणी आपल्या एकट्याच्या हातांत धरतो, जणूं काय जगांत सूर्याच्या

तापामें करपणारा आणि पोळणारा कोणी मनुष्य नाहींच. कोट्यवधि रुपये खर्च करून कोणी आठ आठ मजली मनोरे बांधतात. जणूं काय जगांतील साऱ्या गरीब लोकांना राहण्याला झोपड्या आहेतच. कोणी दरमहा हजारों रुपये पगार उचलतात. जणूं काय खाजिन्यांत रुपये शिल्लक राहिले तर त्यांचा गरीबांना फायदा करून देतां येणारच नाहीं. कधीं कधीं हजारों गरीबांची हजारों दिवस पुरणारी अन्नसामुग्री कोणी हौशी स्त्री आपल्या बोटावरच्या अंगठींतच ठेवून देते व कधीं कोणी पुरुष आपल्या रत्नजडित घड्याळांत गुंतवून टाकतो. येथून तेथें चार पावलें जावयाचें झालें तरी कांहींजणांचें गाडीशिवाय चालत नाहीं, जणूं काय जगांत कोणी लंगडे नाहींतच आणि असले तर ते हेच. श्रीमंत आपल्या गाडीच्या घोड्याला जी किंमत देतात तिच्यांत पंचवीस कुटुंबें एक वर्षभर चांगलीं पोसलीं जातील. आणि दुष्काळांत या गांवांहून त्या गांवीं देखरेख करण्याकरितां फिरणाऱ्या श्रीमंतांच्या घोड्यांना जितके हरभरे चारण्यांत येतात तितक्यांत दुष्काळामुळें मरणाऱ्या माणसांपैकीं निम्मीं माणसें वांचलीं असतीं. आणि प्लेगमध्यें श्रीमंत लोकांनीं फोटो काढण्यांत आणि पानसुपाऱ्या खाण्यांत जितके पैसे उडवले तेवढ्यांत प्लेगच्या अवश्यक अंदाधुंदींत अनाथांचें झालेलें नुकसान भरून आलें असतें. कित्येक श्रीमंत लोक आपल्या बागेंतील झाडांवरच अतोनात पैसा खर्च करतात, जणूं काय मनुष्य प्राण्यांच्या सर्व गरजा भागून गेल्या आहेत. कोणी रानांतल्या जनावरांना विकत घेण्यासाठीं आणि पोसण्यासाठीं इतका द्रव्याचा व्यय करतात कीं, जन्मांतरीं ह्यांचें त्यांचें सजातीयत्व होतें कीं काय असा गरीबांना भास होऊन आपण ह्यांच्यापासून भिन्न जातीचे असे मनुष्य प्राणी उत्पन्न झालों म्हणून आपली हे वास्तपुस्त घेत नाहींत असें पाहून त्यांना फार वाईट वाटतें. श्रीमंत मनुष्याची एक रंडी दररोज निदान पन्नास भिकाऱ्यांना उपाशी मारते, व त्याचा कुळुंगा कुत्रा आणि खुषमस्कऱ्या हे दोघे मिळून निदान पंचवीसजणांना तरी भीक मागावयाला लावतात. कोणी श्रीमंत मोठ्या खर्चानें आपल्या बागेंत माकडें आणवून त्यांची चेष्टा पाहून आनंद मानीत असतात, जणूं काय गरीबांच्या दृष्टीनें यांची कृति ही माकडचेष्टा नव्हेच. श्रीमंताच्या घरची एक मेजवानी आणि नाच किंवा बैठक म्हटली म्हणजे हजार गरीब शेतकऱ्यांच्या शेतावर दहा वर्षें पाऊस न पडल्या-

सारखेंच आहे. काय हा खादाडपणा आणि काय हा राक्षसीपणा ! जिच्यांत शंभर गरीबांचें चांगलें जेवण होईल अशी दहा पंधरा रुपयांची रक्कम ज्यांच्या वेळेच्या जेवणाला खर्च होते असे श्रीमंत जर कोणी आढळतात तर शंभरांचें अन्न एकेकटे खाणारे बकासुरासारखे राक्षस पूर्वी मात्र होऊन गेलें असें म्हटलें असतां कसें बरोबर होईल ? ह्या श्रीमंतांच्या चैनबाजीनें लढाई नसतांनाही देश ओसाड पडतात, दुष्काळ नसतांनाही गरीब उपाशी राहतात आणि रोग नसतांनाही माणसें मरतात. साऱ्या जगातील संपत्ति आपल्या नाकांतील नथींत किंवा गळ्यांतील हिऱ्यांत लटकवून ठेवणें चांगलें नाहीं. गरीबांच्या मुलाबाळांचा सणावारांच्या दिवशीचा देखील आनंद आपल्या खजिन्यांत कोंडून ठेवणें चांगलें नाहीं. परमेश्वरानें जमीन कितीही सुपीक केली असली, इंद्रानें कितीही वेळच्या वेळीं पाहिजे तसा पाऊस पाडला असला आणि सूर्यानें हवें तसतसें ऊन पाडलें असलें तरी अखेरीस आपल्या जुलमी व कधींही न भरणाऱ्या पावड्यानें गरीबांना कफल्लक करून सोडणें चांगलें नाहीं. सर्वांला मर्यादा आहे, तशीच गरीबांच्या सोशिकपणालाही मर्यादा आहे हें कोणी विसरतां कामा नये.

---

## राजे, सरदार, दरबार, पदव्या इत्यादिकांचा पूर्वाश्रमींचा इतिहास : : : ४

तारीख २४ मे रोजीं आपल्या परम पूज्य आणि आपल्याला परम प्रिय अशा व्हिक्टोरिया महाराणी साहेब यांचा जन्म झाला म्हणून मे महिन्याची २४ वी तारीख ही साऱ्या वर्षांत अतिशय पवित्र म्हणून मानण्यांत येते. त्याप्रमाणें यंदाच्याही या पवित्र दिवशीं जेथें जेथें महाराणीचें राज्य आहे तेथें

तेथें त्या दिवशीं कांहीं तरी समारंभ करण्यांत आला असला पाहिजे. त्याचप्रमाणें पुण्यांतही तो दिवस यथासांग रीतीनें साजरा करण्यांत आला हें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या हकीकतीवरून वाचकांना कळलेंच आहे. आजकालचा आपल्या इकडच्या वर्तमानपत्रांतील मुख्य विषय म्हटला म्हणजे राणीचा जन्म, त्या दिवशींचा दरबार, आणि त्या दिवशीं दिलेल्या पदव्या हा होय. दरबारांतील ना. क्रोसाहेब यांचें भाषण आणि जन्मदिवसानिमित्त दिलेल्या पदव्या ह्यांच्याबद्दल आम्हीं आपलें मत मागच्या अंकीं दिलेंच आहे, तरी पण दरबार आणि पदव्या ह्यांचें पावलोंपावलीं आणि सर्वतोमुखीं चर्वितचर्वण होत असलेलें पाहून किंचित् दुसऱ्या बाजूला कांहीं वेळ लक्ष जाणें अगदीं साहजिक आहे. एखाद्या रस्त्यानें पुष्कळ लोकांच्या झुंडींच्या झुंडी चालल्या असल्या म्हणजे त्याच गर्दींतून अडखळत व मुंगीच्या पावलाप्रमाणें हळूहळू चालत जाणें फारसें न आवडून दुसऱ्या एखाद्या निवान्त वाटेनें जाऊन तेथली स्थिति काय आहे हें बारीक दृष्टीनें अवलोकन करण्याकडे कधीं कधीं मनुष्याच्या मनाचा कल असतो असें आपण पुष्कळ वेळां पाहतों. याच तत्त्वांचा अंगीकार करून आम्ही आज राजे, सरदार, दरबार, पदव्या इत्यादिकांचा पूर्वाश्रमींचा इतिहास काय आहे याचें विवेचन करण्याचें योजिलें आहे. आपल्या भाषेंत अशी एक म्हण आहे कीं नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ हीं शोधण्याच्या भरीस कोणीं पडूं नये. हाच सिद्धान्त पुष्कळ अंशीं राजांच्या मुळालाही लागू पडण्यासारखा आहे. जिच्या मुखापाशीं एका कांठावर उभें राहिलें तर दुसऱ्या कांठावरील मनुष्य देखील दिसावयाचें नाहीं, आणि जिच्या मधील जलस्पर्शानें अनंत प्राण्यांचें अनंत जन्मींचें पातक नष्ट व्हावयाचें त्याच नदीच्या उगमाशीं जाऊन पाहिलें तर तेथें आपल्याला काय दिसतें बरें ? तेथें ढोपरभरसुद्धां पाणी नसतें आणि जर कांहीं असलें तर गांवांतलीं पोरें आणि गुरें हीं त्या पुढें पवित्र होणाऱ्या पाण्याचा अति वाईट उपयोग करीत असतात. बहुतेक राजांचीही अशीच अवस्था असते. राजे कसे उत्पन्न होतात हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. इतिहासाच्या परिशीलनावरून असें दिसून येईल कीं, बरेच राजे राजाच्या पोटीं जन्मास येतात म्हणून राज्यपदारूढ होतात, हा एक वर्ग झाला. राजास मुलगा नसला तर मुलीला राज्य मिळणें किंवा मुलीच्या नवऱ्याला मिळणें किंवा दत्तकसंबंधानें

दुसऱ्याच कोणाला तरी मिळणें, वगैरे प्रकार स्थूलमानानें पाहिले असतां ह्याच वर्गांत घालणें इष्ट आहे. हा स्वाभाविक क्रमानें राज्य मिळण्याचा आणि राजा होण्याचा मार्ग होय. परंतु ह्याच्याशिवाय दुसऱ्या एका मार्गानें लोक राजे बनत असतात असें इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें. तो दुसरा मार्ग म्हणजे बलात्काराचा होय. हैदरच्या मागून श्रीरंगपट्टणच्या गादीवर टिपू बसला हें पहिल्या वर्गांतील उदाहरण होय. पण हैदर श्रीरंगपट्टणच्या गादीवर बसला हें दुसऱ्या वर्गांतील उदाहरण होय. जूलियस सीझरच्या मागून आगस्टस रोमच्या गादीवर बसला हें पहिल्या वर्गांतील उदाहरण होय. पण सीझर रोमच्या गादीवर बसला हें एका दृष्टीनें दुसऱ्याच वर्गांतील उदाहरण होय. येथें बलात्कार या शब्दानें अयोग्य, अन्याय्य आणि स्वाभाविक आणि जन्मसिद्ध हक्काशिवाय इतर सर्व उपायांचा आम्हीं निर्देश केला आहे हें कोणी विसरतां कामा नये. कोणी लढाई करून दुसऱ्याचें राज्य घेतो, कोणी दुसऱ्या राजाला विष घालून मारतो आणि आपण राज्य बळकावितो, कोणी दोघांच्यांत कलह उत्पन्न करून आपण तिऱ्हाईत-पणाचें सोंग घेऊन इसापनीतींतील माकडाप्रमाणें भांडणाऱ्यांसाठीं दोन्ही करवंट्या नीट जपून ठेवून त्यांच्यांतील खोबरें तेवढें आपण खाऊन टाकितो, कोणी आपल्या गुप्त कारस्थानांनीं दुसऱ्या राजाच्या पायाखालील जमीन पोखरून ठेवून त्याला एकदम खड्ड्यांत पाडवून आपण सिंहासनारूढ होतो; कित्येक बदफैली राजस्त्रियांना वश करून घेऊन आपलें कार्य साधतात. असें हे राजे होण्याचे अनेक डावपेंच आहेत, अनेक युक्त्या आहेत आणि कोटय-वधि कपटमार्ग आहेत. ह्या सर्वांनाच बलात्कार हा शब्द लागू पडतो असें नाहीं, हें आम्हांसही कबूल आहे. तरी पण राजकारस्थानी पुरुषांच्या कृष्ण कृति इतक्या निरनिराळ्या तऱ्हेच्या आहेत कीं, त्या सगळ्यांना लागू पडणारा असा एक शब्द कोणत्याही भाषेंत सांपडणें फार कठीण आहे. असो. हे राजा होण्याचे दोन प्रकार झाले; परंतु यांतही सूक्ष्म रीतीनें विचार केला तर असें दिसून येईल कीं, हे दोन प्रकार म्हणजे मूळचा एकच प्रकार होय. राजाच्या पोटीं जन्मास आल्यामुळें जो राजा होतो त्याची गोष्ट घटकाभर आपण सोडून देऊं, आणि असा विचार करूं कीं, त्याच्याच वंशांतील अगदीं प्रथम ज्यानें राज्य संपादन केलें त्यानें तें कोणत्या रीतीनें

संपादन केलें असावें. हरिश्चंद्रानें विश्वामित्राला राज्य दान केलें त्याप्रमाणें यांना कोणी केलेलें नाहीं हें खास आहे. मग ह्यांच्यापाशीं एवढें डबोलें आलें कोठून ? अर्थात् ' विना परस्वहरणान्न कश्चित्स्यान्महाधनः ' हा लौकिक न्याय येथेंही पूर्णपणें लागू पडतो. द्रव्य काय आणि राज्य काय दुसऱ्याचें अन्यायानें लुबाडून घेतल्यावांचून कसें प्राप्त होणार ? व ज्याच्या-वर आपलें स्वत्व नाहीं असा कोणताही जिन्नस मालकाच्या परवानगीवांचून आपण घेतला तर न्यायाच्या दृष्टीनें ही चोरी होते. व अशा प्रकारचे चोर जगांत पुष्कळ आहेत. चोरी केल्याबद्दल तुरुंगांत शिक्षा भोगीत पडलेले तेवढेंच काय ते चोर, असें ज्याला वाटतें त्याला जगांतील अर्धा अधिक भाग अजून पाहावयाचा आहे असें म्हटलें पाहिजे. कारण, चोर नेहमीं तुरुंगांतच नसून ते कधीं कधीं मोठमोठाल्या राजवाड्यांतून राहत असतात. मोठाल्या अधिकारारूढ झालेले असतात, सिंहासनावर बसलेले असतात, फार काय जे बारीक सारीक चोऱ्या करतात त्यांना तुरुंगांत कोंडून टाकण्यासाठीं ते स्वतः न्यायासनावरही बसलेले असतात. इतिहासावरून असें दिसून येईल कीं, अगदीं नवीन राज्यें ज्यांनीं संपादन केलीं ते मूळचे चोर, दरवडेखोर आणि बंडखोर होते. घराची भिंत फोडून चोरी केली म्हणजेच चोरी होते असें नाहीं. चोऱ्या करून श्रीमंत झाल्यावर लोक अशा मनुष्यांना उघडपणें चोर असें म्हणत नाहींत, तर ते त्यांना निर-निराळ्या नांवांनीं हांका मारतात. व अतिशय चोऱ्या करून अतिशय श्रीमंत जो होतो त्याला लोक राजा असें म्हणूं लागतात. व अशा रीतीनें राजा ह्या नांवाखालतीं मोडणाऱ्या चोरांपैकीं जो बाकीच्यांवर आपला दाब राखतो आणि ज्याच्या अंगांत पाहिजे त्या राजांची पाहिजे त्या वेळीं चोरी करण्याचें सामर्थ्य येतें, त्याला लोक सार्वभौम असें म्हणतात. हे सर्व शिष्टा-चाराचे प्रकार आहेत. व मनुष्याच्या पोटांतील घाण झांकून ठेवण्यासाठीं जशी त्याच्या अंगावर गौरवर्णाची कातडी जरूर आहे, त्याप्रमाणेंच मनुष्यांचीं घाणेरडीं आणि अनन्वित कर्में झांकून ठेवण्यासाठीं चांगल्या गोंडस शब्दांची फार आवश्यकता आहे. सार्वभौम ह्या चार अक्षरांच्या शब्दानें जगांतील किती दुर्गुणांवर पांघरूण घातलें आहे ह्याची कोणाला तरी कल्पना आहे काय ? चक्रवर्तित्वाच्या सफेती देणाऱ्या कुंचल्यानें कितीकांच्या तोंडावरील काळे डाग

झांकून टाकिले आहेत ! राजा ह्या शब्दानें किती दरवडेखोरांची तुरुंगांत जाण्याची पाळी चुकविली आहे ! आणि या शब्दानें किती चोरांना उजळ माथ्यानें दिवसाढवळ्या लोकांचीं घरें फोडतां येतात. हें कोणाच्या लक्षांत आलेलें आहे काय ? राजांना चांगल्या सैन्यापेक्षां चांगल्या शब्दांपासूनच जास्त फायदा झालेला आहे. पुढील राजे धर्मशास्त्राप्रमाणें आपला राज्य-कारभार कदाचित् चालवीत असतील. परंतु राजकुळांतील आदिपुरुषांच्या हकीकतींत कांहीं तरी काळेंबेरें असतेंच. 'Violence and ability made the first masters, laws have made the present,' हें जें एका ग्रंथकाराचें म्हणणें आहे तें कांहीं खोटें नव्हे. परंतु दरवडे घालून श्रीमंत होण्याची कल्पना जरी एकाच्या डोक्यांत आली, तरी ती एकाच्यानें शेवटास जात नाहीं. त्याला दुसऱ्याची मदत घेणें जरूर असतें. म्हणून तो मुख्य दरवडेखोर आपल्याभोंवतीं कांहीं साथीदार जमवतो व दरवडा घालून लूट आणल्यानंतर तो त्यांतला कांहीं भाग आपल्या प्रत्येक साथीदाराला देतो. हेच साथीदार पुढें काहीं काळानें सरदार बनतात. रोमन राजे आपल्या शत्रूचा सत्यनाश केल्यानंतर आपल्या शिपायांना शत्रूच्या राज्यांत वसाहती करून राहण्याला मुबलक जागा देत असत. वुइलियम दि कॉंकरर ह्यानें हेस्टिंग्सच्या लढाईंत इंग्लंड देश काबीज करून घेतल्यानंतर, आपल्या बरो-बरच्या लोकांना त्यांतील मुलूख तोडून दिले. व दिल्लीच्या बादशहांनीं बंगाल, गुजराथ, दक्षिण वगैरे प्रदेश जिंकून त्या त्या ठिकाणची सत्ता कोणा तरी आपल्या साथीदारांच्या हातीं दिलेली इतिहासांतून आढळते. अशा रीतीनें साथीदारांचे सरदार बनलेले लोक पुष्कळ असतात. व अगदीं प्राथमिक स्थितींत हे दरवडेखोरांचे नाईक आणि त्यांचे साथीदार ह्यांचा दरबार म्हटला म्हणजे अमावास्येच्या भर काळोखांत, ऐन मध्यरात्रीं कोठें तरी रानांत किंवा डोंगराच्या गुहेंत किंवा एखाद्या स्मशानांत भरावयाचा. सत-रंज्या, गालिचे आणि रुजामे ह्यांचें काम त्या वेळीं फाटक्या घोंगड्याच कर-तात. तेव्हां खुर्च्या, टेबलें, मेजें अथवा सिंहासनें कांहीं नसतात. एखादा दगड पाडून त्यावर चोरांचा नाईक बसतो आणि त्याचे साथीदार धुरळ्यांत किंवा चिखलांत उजवी मांडी मोडून वीरासन घालून बसतात. हा भावी राजांचा प्राथमिक दरबार आणि तो मूळच्या दरवडेखोरांचा हल्लीं पूर्णावस्थेस

आलेला दरबार ह्यांच्यांत किती तरी फरक आहे ! असो. आतां आपण पद्यांच्या पूर्वपीठिकेकडे वळूं. दरवडेखोरांचा नाईक आपल्या साथीदारांसह कोठें दरवडा घालून आल्यानंतर आपल्या गुप्त ठिकाणीं सगळ्या साथीदारांना एकत्र जमवितो आणि पुढील दरवड्यांत त्यांनीं मागच्यापेक्षां अधिक क्रूरपणा, उग्रपणा आणि भयंकरपणा दाखवावा म्हणून त्यांना तो खूप चढवून ठेवीत असतो. ही पुढील नीच कृत्याकरितां आगाऊ दिलेली लांच आहे. पुढें बेफाम होऊन पाहिजे त्या कर्माला तयार करणारा हा प्रत्यक्ष दारूचा घोट होय. अशा रीतीनें प्राथमिक अवस्थेमध्यें ज्या संस्था असतात त्यांचें रूपांतर होत होत व त्यांतील बऱ्याच बाह्य वाईट गोष्टी नाहींशा होत होत अखेरीस त्या संस्था किती तरी रमणीय आणि मनोवेधक स्वरूपानें लोकांच्या नजरेपुढें आलेल्या आहेत हें पाहिलें म्हणजे खरोखर कोणालाही आश्चर्य आणि समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. वाईट वस्तूंवर पांघरूण घालून त्या चांगल्या आहेत असें लोकांत भासविणें हेंच खरोखर मनुष्याला शक्य असें ह्या जगांत त्यांचें कर्तव्यकर्म आहे. दुर्गुण मुळींच नाहींसे झाले तर सोन्यापेक्षां पिवळें, पण तसें जमलें नाहीं तर निदान ते दुर्गुण नाहींत तर सद्‌गुण आहेत असा आभास तरी उत्पन्न करून सोडणें फार जरूर आहे. ज्याप्रमाणें पितळेच्या भांड्यावर सोन्याचा मुलामा करण्याची युक्ति शोधून काढलेली असल्यामुळें गरीबांना समाधान होतें, त्याचप्रमाणें दुर्गुणांवर सद्‌गुणांचा मुलामा करण्याची ही युक्ति ज्या महात्म्या रसायनशास्त्रवेत्त्यानें काढली असेल त्याचे ह्या दुर्गुणपरिप्लुत जगावर किती उपकार झाले आहेत हें कोणालाही सांगतां येणार नाहीं. मनुष्याच्या आणि विशेषेंकरून राजांच्या सुखासाठीं जगांत जितक्या युक्त्या निघतील तितक्या हव्याच आहेत. परंतु सगळ्यांतील चतुष्टयाचा पूर्वाश्रमीचा इतिहास ऐकून एखादा गांवढळ चोर जर असें म्हणेल कीं, 'राज्ञो यदि न पापं स्याद्दस्युनामपि नो भवेत्' तर त्याचें म्हणणें त्याचे पूर्वाश्रमीचे सगोत्र आणि सजातीय, ऊर्फ राजे, बिलकुल ऐकणार नाहींत. कारण त्यांनीं आपल्यापेक्षां इतरांनीं चोरी करूं नये या सद्धेतूनें असें एक धर्मशास्त्र बनवून ठेविलें आहे कीं, 'सर्वं पापं धर्मरूपे स्थितमाश्रय भेदतः'. दुसऱ्याचें द्रव्य राजानें हरण केलें असतां तें पाप नाहीं असा त्याचा तात्प-

यांथें आहे. जणूं काय देवाच्या मनातून दुसऱ्याचें वित्त हरण झालेंच पाहिजे होतें; आणि हें असलें महत्त्वाचें चोरीचें काम दुसऱ्या कोणाला शिताफीनें करितां येणार नाहीं, म्हणून तें फक्त राजानेंच करावें असें जणूं काय देवानेंच ठरविलें आहे. असो. बाल्यावस्थेंतील बरेचसे दोष वार्धक्यांत नाहींसे झाले तरी कांहीं वाईट नाहीं. करून करून भागल्यावर तरी देवपूजेला लागणारीं माणसें जगांत फार कोठें सांपडतात! तरुणपणांत नानाप्रकारचे ढंग करणारांनीं पांढरे केस झाल्यावरही तेच ढंग चालविले असते तर त्यांचें कोणी काय केलें असतें? तेव्हां राजे, सरकारें, दरबार आणि पदव्या ह्यांच्या पूर्वाश्रमीच्या स्वरूपाहून चतुर्थाश्रमांतील त्यांचें स्वरूप फारच प्रशंसनीय झालें आहे ही आनंदाची गोष्ट होय. इतकेंच नव्हे, तर मुळाशी कांहीं असलें तरी नदी आणि ऋषि ह्यांच्याप्रमाणें ह्या संस्थाही अतिशय पवित्र झाल्या आहेत हेंही फार चांगलें आहे. व हें पाहून प्रत्येकाला आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. व ह्या सगळ्याचें श्रेय पृथ्वीच्या पाठीवर जे चांगले राजे होऊन गेले किंवा हल्लीं आहेत त्यांच्याकडेच आहे. अशा चांगल्या राजांत आमच्या महाराणी साहेबांची अग्रभागीं स्थापना करणें योग्य आहे. म्हणून त्यांना परमेश्वरानें दीर्घ आयुष्य द्यावें अशी प्रार्थना करून आम्ही आपला हा लेख संपवितों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 73603 दि: 10/9/61
क्रमांक 9559 नोंद दि. 25-2-09

# आम्ही : : : ५

'आम्ही' या शब्दाचा इतिहास मोठा विलक्षण आहे. पण जसा त्या शब्दाचा इतिहास विलक्षण आहे तसाच, किंबहुना त्याहून जास्ती विलक्षण इतिहास त्या शब्दाच्या अर्थाचा आहे. मराठी भाषेंतील शब्द बहुधा

संस्कृत भाषेंतून निघालेले असतात. त्याप्रमाणेंच आम्ही ह्या शब्दाची अवस्था आहे. आम्हीं ह्या अर्थाचा संस्कृत भाषेंतील शब्द म्हटला म्हणजे 'वयम्' हा होय. परंतु मराठींतील आम्ही हा शब्द 'वयम्' ह्यापासून निघालेला नाहीं. तर 'वयम्' ह्याचें षष्ठीचें रूप जें 'अस्माकम्' त्यापासून ह्याची उत्पत्ति आहे. प्राकृतांत 'अस्माकम्' ह्याचें रूप 'अम्हाणं असें होतें. ह्यापैकीं 'णं' हा षष्ठीच्या अनेकवचनाचा प्रत्यय होय. तो काढून टाकिला असतां बाकी जें शब्दस्वरूप राहतें त्यांत आणि मराठींतील प्रथमपुरुषवाचक अनेकवचनी सर्वनामांत पुष्कळ साम्य आहे; व त्यावरून पाहतां मराठींतल्या शब्दाचें शुद्ध स्वरूप 'अम्ही' असेंच असलें पाहिजे. परंतु कधीं कधीं 'आम्ही' हेंही स्वरूप शुद्ध असें मानलें जातें. पुढील जोडाक्षरांतील जोर कमी करून मागील अक्षर दीर्घ करण्याचा एक नेहमीं-चाच प्रघात आहे व त्याचेंच हें उदाहरण असलें पाहिजे. किंवा 'आम्ही' ह्याची उत्पत्ति 'अम्हाणं' ह्यापासून न मानतां प्रत्यक्ष 'अस्मत्' ह्यापासूनच मानली तरी संभवण्यासारखी आहे, व ती वास्तविक तशीच आहे. परंतु पहिल्या व्युत्पत्तीनें प्राकृत आणि मराठी ह्यांचा संबंध चट्कन् लक्षांत येण्या-सारखा असल्यामुळें तिचेंच दिग्दर्शन आम्ही विशेष रीतीनें केलें आहे. 'मया ह्यापासून 'म्यां' मी आणि 'अम्हाणं' पासून 'आम्ही' ह्यांची उत्पत्ति झालेली पाहून तर आश्चर्य वाटेलच; पण ह्याच्यापेक्षां विशेष आश्चर्य 'आम्ही' ह्या शब्दांच्या अर्थापासून वाटण्याचा संभव आहे. प्रथमपुरुषी अनेकवचनीं 'आम्ही' ह्याचा उपयोग करावा असा व्याकरणांतील सामान्य नियम आहे. परंतु इंग्रजी व्याकरणांतून असा एक विशेष नियम आढळतो कीं, वर्तमानपत्रकर्ते आणि राजे ह्यांनीं आपल्या स्वतःबद्दल बोलत असतांना अनेक वचनाचा उपयोग केला असतां हरकत नाहीं. एवढ्या बाबतींत तरी निदान वर्तमानपत्रकर्ते आणि राजे ह्यांचे हक्क सारखे आहेत, ही एक समाधान मानण्यासारखीच गोष्ट आहे असें म्हटलें पाहिजे. जुलूम करणारे आणि सोसणारे हे दोघेही येथें एकाच योग्यतेचे बनतात, सिंहासन आणि टेबल हीं सारख्याच उंचीवर येऊन बसतात, व राजवाडा आणि तुरुंग ह्या दोघांना ह्यापासून साधारण सुख प्राप्त होऊं शकतें. वर्तमानपत्रकर्त्यांचीं राजानें कितीही तोंडें बंद केलीं तरी त्यांनीं आपणा एकट्याबद्दलही 'आम्ही' म्हणून म्हणण्याचें कोणा-

त्यानें बंद करवणार आहे ? हा पत्राकर्त्यांचा हक्क आहे. लोकांचे शेंकडों हक्क सरकारनें बुडविले किंवा तारले तरी आपल्या पदवीला सरकार धक्का लावण्यास धजणार नाहीं, अशी वर्तमानपत्रकारांची बहुधा खात्री असते. आणि ' आई भीक मागूं देईना आणि बाप खायला घालीना' अशी ज्यांची स्थिति आहे, ज्यांच्या तृतीय पंथी मताची लोकांतही टवाळी होते आणि सरकारांतही स्तुति होत नाहीं अशा पत्राकारांना हा 'आम्ही' या अनेकवचनी नांवाखालीं उपदेश करून समाधान मानून घेण्याचा जो मार्ग आहे तो सरकार होतां होईल तों बंद करणार नाहीं अशी पुष्कळांना फार उमेद आहे. न्याय मागणारे आणि अन्याय करणारे, बडबड करून रहस्यस्फोट करणारे आणि गप्प बसून आपला डाव साधून घेणारे, ह्या उभयतांतील हा सारखेपणाचा अंश चिरकाल टिको म्हणजे झालें. पण पत्रकर्ते जेव्हां 'आम्ही' ह्या शब्दाचा उपयोग करतात तेव्हां ते आपल्यांत आपल्यासारखींच ज्यांचीं मतें आहेत त्यांचाही समावेश करतात असें मानून कांहीं तरी समाधान करून घेतां येण्यासारखें आहे. परंतु जेव्हां राजे लोक आपल्या एकट्याच्याच बद्दल 'आम्ही' 'आम्ही' असें म्हणून घेत असतात तेंव्हा लहान मुलांनाही आपलें हंसूं आवरण्याला मोठे प्रयास पडत असतील. कोण हा उद्दामपणा ! आणि कोण हा गर्विष्ठपणा ! जणूं काय राजा झालें म्हणजे शिष्टाचाराची आणि सभ्यपणाची रीत त्यानें सोडलीच पाहिजे. आपल्या एकट्याबद्दलच बोलत असतां राजानें स्वतःला 'आम्ही' 'आम्ही' असें म्हणवून घेतलें तर तें मोठेसें चांगलें दिसत नाहीं. बहुमानार्थी अनेकवचनाचा उपयोग करण्याचा प्रघात आहे हें कबूल आहे. परंतु बहुमान म्हणजे तो दुसऱ्यांनीं आपणास दिला पाहिजे. आणि तरच त्यांत कांहीं अर्थ आहे. आपणच आपल्याला ' आम्ही ' ' आम्ही ' म्हटल्यानें मोठेपणा येतो असें नाहीं. तेव्हां राजांनीं दुसऱ्यांकडून बहुमान मिळवावा व आपण आपल्याबद्दल बोलतांना ' आम्ही ' ह्याचा उपयोग न करावा ह्यांतच काय ती मजा आहे. नाहीं तर आपण आपल्याला ' आम्ही ' ' आम्ही ' असें म्हणवून घ्यावें आणि दुसऱ्यांनीं आपणाला अरे तुरे करावें यांत काय हंशील आहे ? पण फक्त राजेच ' आम्ही ' हा शब्द स्वतःबद्दल बहुमानार्थी वापरतात असें नाहीं; तर त्यांच्या बायका, त्यांचे मुलगे, त्यांचे श्रीमंत आश्रित, त्यांचे हुजरे आणि घोडेवालेसुद्धां हा व्याकरणांतील आणि

व्यवहारांतील साधा नियम विसरून जाऊन एखादा व्याकरण शिकणारा लहान मुलगा देखील ज्या चुका करणार नाहीं त्या चुका आपल्या बोलण्यात करतात. शुद्ध कसें बोलावें आणि शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें असें म्हणतात, पण हें कोणाला समजतें हा मोठा प्रश्न आहे. साधारण व्यवहारावरून असें दिसतें कीं, शुद्ध कसें बोलावें आणि शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें राजादिकांशिवाय इतर गोरगरीबांना मात्र समजतें. राजांचे स्वतःला लागू करण्यापुरते कायदे तेवढे जसे निराळे तसेच त्यांच्या स्वतःकरितां त्यांचें व्याकरणही निराळेंच असलें पाहिजे असें दिसतें. राजघराण्यांतील एकाद्या शेंबड्या पोरानेंही नेहमीं आपल्याबद्दल ‘ आम्ही ’ ‘ आम्ही ’ असें म्हणावें हें मोठें हास्यास्पद आहे. जणूं काय त्या राजघराण्यांतील कोषांत ‘ मी ’ हा शब्दच मुळीं दिलेला नाहीं. राजाविषयीं पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांचें असें मत आहे कीं, राजा हा प्रजेनें आपलें काम योग्य रीतीनें आणि ठरवून दिलेल्या कायद्याप्रमाणें करण्याकरितां नेमलेला आपला एक अतिशय उत्तम प्रतीचा आणि फार मोठा असा चाकर होय. ह्या तत्त्वाच्या दृष्टीनें पाहिलें असतां राजा आणि प्रजा ह्यांच्या समाजांत सर्व प्रजाजनांनीं साध्या एकेरी आणि एकवचनी अशा ‘ मी ’ या सर्वनामानें व्यवहार करावा आणि राजानें मात्र आपणाबद्दल आपणच बहुमान दाखविण्यासाठीं ‘ आम्ही ’ ‘ आम्ही ’ असें करीत बसावें म्हणजे खरोखर धन्याचें नांव गण्या आणि चाकराचें नांव रुद्राजीबुवा, किंवा मिया मूठभर आणि दाढी हातभर, अशांतलीच स्थिति होते. सारांश, राजांच्या व्याकरणांत प्रथमपुरुषाला एकवचन नाहीं. व त्यांच्यासाठीं जें व्याकरण लिहावयाचें त्यांत धातु चालवून दाखवितांना ‘ मी करितों ’ ‘ मी जातों ’ इत्यादि एकवचनीं रूपें देण्याचें कांहीं कारण नाहीं.

असो. आतां ‘ आम्ही ’ या शब्दाचा लोकांनीं कसा उपयोग करावा ह्याच्याबद्दल थोडेंसें विवेचन करून हा लेख आटपूं. वरील विचार सर्व पत्रकर्ते आणि राजे ह्यांना सारखाच लागू आहे. आतां एखाद्या राष्ट्रांत एखादी सार्वजनिक गोष्ट झाली तर ती कोणी केली म्हणून म्हटलें असतां योग्य होईल ह्या प्रश्नाचा आपण विचार करूं. उदाहरणार्थ, कोणी एका राष्ट्रानें एखादी लढाई जिंकली, तर आतां ही लढाई कोणी जिंकली म्हणून म्हणा-

वयाचें ? ' ही लढाई आम्हीं जिंकली ' असें म्हणण्याचा कोणाला अधिकार आहे ? वरील वाक्यांतील ' आम्ही ' ह्या शब्दानें कोणकोणत्या व्यक्तींचा निर्देश होतो व त्या शब्दानें लोकांचाही निर्देश होईल किंवा नाहीं, हे प्रश्न हल्लीं आपलेपुढें आहेत. म्हणजे पर्यायानें म्हटलें तर ' आम्ही ' ह्या शब्दाचा अर्थ काय हा जो आपला मूळचा प्रश्न तोच अन्यरूपानें आपले पुढें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां ह्या प्रश्नाचें उत्तर ज्या राष्ट्रांत जी राज्यपद्धति सुरू असेल त्यावर पुष्कळ अंशीं मुख्यत्वेंकरून अवलंबून राहील. प्रजासत्ताक राज्य असेल तर मग ' आम्हीं लढाई जिंकली ' म्हणजे अर्थात् लोकांनींच जिंकली असाच अर्थबोध होतो व त्याबद्दल मोठासा वादही नाहीं. परंतु जेथें बड्या लोकांची सत्ता असते तेथें बडे लोक लढाईतील यशाचा वांटा आपलेकडेसच ओढून घेत असतात. व हीच गोष्ट अनियंत्रित सत्ताधारी राजांनाही लागू पडते. बडे लोक किंवा अनियंत्रित राजे हे असे म्हणत असतात कीं अमुक अमुक लढाई जी जिंकली ती आम्हीं जिंकली. परंतु हें म्हणणें खरें नाहीं. दुसऱ्याच्या डोक्यावर तोफेचे गोळे येऊन फुटत असतां, शत्रूच्या प्रहारांनीं हातपाय तुटून जाऊन दुसरें समरभूमीवर मरणोन्मुख होऊन कण्हत पडले असतां, शत्रूला गांठण्यासाठीं उपाशी तर उपाशी, थंडीवाऱ्यांतून तर थंडीवाऱ्यांतून दुसरे एका दिवसांत चाळीस चाळीस कोसांची मजल मारीत असतां, मऊ बिच्छान्यावर लोळणाऱ्यांनीं ' आम्हीं लढाई जिंकली, ' म्हणून म्हणावें हें खरोखर हास्यास्पद आहे. हा मोठा कृतघ्नपणा आहे ! हा अनावर आपलपोटेपणा आहे ! ही अकृतज्ञपणाची कमाल आहे ! पण ह्यावर कोणी असें म्हणेल कीं, बडे लोक किंवा अनियंत्रित राजे हे शिपायांना पगाराच्या रूपानें पैसे देतात आणि त्यांच्यापासून त्यांचा विजय विकत घेतात म्हणून त्या विजयावरील शिपायांची सर्व प्रकारची स्वत्वनिवृत्ति होऊन तो विजय पूर्णपणें बडे लोक किंवा राजे ह्यांच्या मालकीचा होतो. हें कबूल आहे, व विचारांतीं हेंच सयुक्तिक आहे असें दिसून येतें. परंतु ज्यांनीं आपले प्राण खर्च केले त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावून आपले पैसे खर्च करणारांनाच सारा यशाचा वांटा द्यावयाचा असें तत्त्व जर तुम्हीं कबूल केलें तर मग तुम्हांला येथेंच थांबतां येणार नाहीं. कारण ज्याचे पैसे

त्यानें लढाई जिंकली असेंच म्हणावयाचें असेल तर मग बडे लोक आणि राजे ह्यांच्यापाशीं तरी पैसे आले कोठून? लोकांनीं कर दिले तेच पैसे ह्यांच्यापाशीं जमलेले कीं नाहीं? मग ज्याचे पैसे त्याचें यश असें जर आहे तर वास्तविक लोकांचे पैसे आहेत तेव्हां लढाईही लोकांनींच जिंकली असें होतें. आणि हेंच खरें आहे. कारण उपाध्याय रुद्राचे आवर्तन करतो खरें; परंतु यजमान दक्षिणा देतो आणि त्याचें कर्तृत्व त्याजपासून विकत घेतो. कारण पुण्यफलप्राप्ति ही कर्तृत्वजन्यच असली पाहिजे. नाहीं तर कांहीं न करतानासुद्धां पुण्यप्राप्ति होऊं लागेल आणि दगड व झाडें हींच अतिशय पुण्यवान् होऊं लागतील. आपण पैसे देऊन सुतार, गवंडी, गडी वगैरे ठेवून घर बांधतों आणि कोणी विचारलें 'हें घर कोणी बांधिलें हो' तर आपण सांगतों 'आम्हीं बांधिले' त्याचप्रमाणें लढाईची गोष्ट आहे, सारांश, ज्याचे पैसे तो ती गोष्ट करतो हाच सिद्धान्त खरा आहे. एवढा वेळपर्यंत सामान्य उदाहरणें आपण घेतलीं; आतां आपल्या हिंदुस्थानाबद्दल चार शब्द लिहून हा लेख समाप्त करूं. इंग्रज सरकारानीं मेहेरबानीनें लोकनियुक्त सभासद आपल्या कौन्सिलांत नेमले आहेत. व त्याच्यापुढें आपण कराच्या रूपानें दिलेल्या पैशाचा व्यय कसा करावयचा हें मांडलें जात आहे. तेव्हां आपल्याला सांगून सवरून आपल्या पैशाचा व्यय करून जीं कामें करण्यांत येतात तीं सर्व आपण केलीं असें म्हणण्याला कांहीं हरकत नाहीं. सरहद्दीवरील लढाईत जर आपलेंच सर्व पैसे खर्च झाले आहेत व इंग्लंडानें कांहींसुद्धां पैसे दिले नाहींत, तर वरील तर्कशास्त्राप्रमाणें त्यांत जें यश आलें तें अर्थात् आम्हांलाच. जर कायदेकौन्सिलांतील सभासदांना आम्ही कराच्या रूपानें जे पैसे देतो त्यांतूनच पगार मिळत आहेत तर मग ते जे कायदे करतात ते आम्हीच करतों असें झाले नाहीं काय? व हाच न्याय इतर बाबतींतही लागू करतां येण्यासारखा आहे. असो. येणेंप्रमाणें आपण 'आम्ही' ह्या शब्दाच्या लाक्षणिक अर्थांपैकीं कांहींचें विवेचन केलें त्यावरून नेहमींच्या उपयोगांत देखील किती विलक्षण तऱ्हेचे अर्थ असतात हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

---

# हिंदु धर्म आणि ख्रिस्ती धर्म : : : ६

★ पंडिता रमाबाई शारदासदनासाठीं मदत मिळविण्याकरितां अमेरिकेंत गेल्या होत्या. तेथें त्यांनीं व्याख्यानें देऊन या संस्थेकरतां व दुष्काळपीडितांकरितां पुष्कळ मदत मिळविली, प्लेग व दुष्काळ ह्या दैवी आपत्ति हिंदुस्थानांत सर्वांनाच जाणवल्या; बाप्तिस्म्याचें संकट यांच्या भरीला आलें व तें हिंदूंनाच विशेष जाणवलें.पंडिता बाईंच्या अमेरिकेंतील संतापजनक टीकेवर केसरींतही या सुमारास कडक लेख आहे.

हिंदु धर्मांतील लोकांची संख्या पुष्कळ असल्यामुळें आपल्या देशाला हिंदुस्थान हें नांव पूर्वींपासून पडलेलें आहे. परंतु ख्रिस्ती लोकांचा हिंदु लोकांना बाटविण्याचा झपाटा जर असाच जोरानें चालला तर थोड्याच अवकाशांत हिंदुस्थान ह्याच्या ऐवजीं ख्रिस्तिस्थान असेंच नांव ह्या देशाला देण्याचा प्रसंग येईल. कारण, आपल्या धर्मावर ख्रिस्ती धर्माचे छापे चोहों-बाजूंनीं येऊन पडत आहेत. व त्यापासून आपलें संरक्षण करून घेण्याला आमचेपाशीं कांहीं साधन नाहीं. कारण, पुष्कळ शहाणे शहाणे लोकांचें असें मत आहे कीं, ह्या कामाला पैसा पाहिजे. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं दहा हजारांचा फंड उभा केला असला तर आपल्यालांही तसाच फंड उभा केला पाहिजे. पण आपण तर पडलों गरीब. अन्नाला महाग झालेल्या लोकांच्या हातून असले फंड कसे उभारले जाणार ? पैसे मिळाले आणि फंड तयार झाला व त्या योगानें हिंदुधर्मांतले लोक हिंदुधर्मांतच राहिले तर ते कोणाला नको आहेत असें नाहीं. परंतु बहुतेकांच्या अनुभवावरून ही गोष्ट सिद्ध झाल्यासारखी आहे कीं, पैसे जमा होत नाहींत व निरनिराळ्या लोकांच्या मताप्रमाणें ह्यांचीं निरनिराळीं कारणें असतील. परंतु लोकांच्या अंगांत

बिलकुल त्राण उरलें नाहीं हेंच ह्याचें मुख्य कारण होय असें आम्हास वाटतें. कांहीं पत्रकार असे हुषार आहेत कीं, कोणतीही अडचण आली तरी तिच्या कारणांचा सारासार विचार न करितां एकदम फंड जमत नाहीं म्हणून ते ओरड सुरू करतात. खिस्ती लोक आपल्याला बाटवतात; ठीक आहे. तर मग जमवा आपला फंड आणि पाठवा त्यांच्यासारखे आपले धर्मशिक्षक. मि. रँड आणि आयर्स्ट यांच्या बायकांना सरकार चांगलें पेन्शन देतें. व सिन्नरच्या दंग्यांत प्राणास मुकलेल्या इसमांच्या बायकापोरांना सात-आठ रुपयांचेंच पेन्शन देणार. ठीक आहे, तर मग जमवा आपला फंड. (ह्या कामाला फंड कांहीं फार नको, आठ हजार रुपये असला म्हणजे बस आहे. रक्कम जमल्यावर कोठें ठेवावी ह्याची पंचाईत असेल तर आमच्या सन लाइफ अॅशुअरन्स कंपनींत ठेवा.) आणि दादाभाईनीं किंवा वेडरबर्न साहेबांनीं हिंदुस्थानांतल्या गरीबीचें वर्णन केलें म्हणजे हेच लोक त्याचे सूर ओढीत असतात. तेव्हां अशा दुतोंड्यांना काय ह्मणावें ? रा. धोंडोपंत कर्वे इतके दिवस फंड उभा करतां करतां दमले, आतां त्यानां चांगला जोडीदार मिळाला आहे असें ऐकतों. तेव्हां आतां किती मोठा फंड उभा होतो हें पाहावयाचें आहे. देव करो आणि फंड जमून आमच्या विधवा निदान उघड उघड तरी खिस्ती होण्याच्या बंद होवोत हेंच सर्वांचें देवापाशीं मागणें आहे. हिंदुस्थानांतील लोक गरीब आहेत हें कारण फंड जमा न होण्याला आहेच, पण लोकांच्या अंगांत पैसे देण्याचें सामर्थ्य आहे असें जरी घटकाभर मानलें तरी त्यांनीं गैरवाजवी कामाला पैसे काय म्हणून खर्च करावे ? मि. राजे आणि हॉस्पिटल असिस्टंट हे सिन्नरच्या दंग्यांत मारले गेले तेव्हां त्यांच्या बायकामुलांना पेन्शन देण्याचें काम सरकारचें आहे. आम्ही सरकारला जो कर देत असतों तो या व दुसऱ्या कामांकरितांच देत असतों. त्यांतून त्यांनीं आपल्या चाकरींत ज्यांचे बळी पडले त्यांच्या वंशजांना, नव्हे नव्हे, हल्लींच्या रीतीप्रमाणें बायकांमुलांना तरी योग्य पेन्शन दिलें पाहिजे. इकडे सरकारला कर द्यायचे ते द्यायचेच आणि शिवाय सरकारनें योग्य माणसांना योग्य पेन्शन दिलें नाहीं तर आपण फंड जमवून अप्रत्यक्ष रीतीनें दुसरा कर आपल्या डोक्यावर बसवून घ्यावयाचा हें कोठलें शहाणपण असेल तें असो. सुधारककारांनीं आपल्या शिपायापाशीं एक रुपया

दिला आणि त्याला सांगितलें कीं ह्यांतले चार आणे 'अ' ला दे, आठ आणे 'ब'ला दे, आणि बाकीचे चार आणे 'क'ला दे, आणि त्यानें त्यांपैकीं 'क'ला कांहींच दिलें नाहीं; तर ते पैसे सुधारककार 'क'ला त्या शिपायाकडून देववतील किंवा आपल्या खिशांतुन देतील? सुधारककारांचें कांहीं सांगवत नाहीं, पण दुसरा कोणीही इतका खुळसट मनुष्य सांपडणार नाही कीं जो आपल्या पदरचे पैसे देईल. पण सुधारककारदेखील जर एखाद्या शहाण्या माणसांप्रमाणें आपल्या पदरचे चार आणे देणार नाहींत तर मग ह्यांचें पत्र म्हणजे ब्रह्मवाक्य म्हणून मानणाऱ्या आपल्या वर्गणीदारांना अशा नुकसानांत घालणें ह्यांना योग्य आहे काय? आपण जी गोष्ट करावयाची नाहीं ती करण्याला दुसऱ्याला प्रवृत्त करणें म्हणजे त्यांना फसविणें आहे. लोक वर्तमानपत्राची वर्गणी चांगली सल्ला मिळावी म्हणून भरीत असतात, फसून जाण्यासाठीं नव्हे. दुष्काळाच्या वेळचीही फंडाची ओरड अशाच प्रकारची होय. दुष्काळांत सरकारला गरिबांच्या पोटासाठीं खर्च करतां यावा म्हणून आम्ही सर्व मिळून इन्‌कमटॅक्सच्या रूपानें सरकारला कोट्यवधि रुपये देतों. तरी फिरून दुष्काळ आला म्हणजे फंडाची ओरड त्याच्याबरोबर आलीच. आणि त्या वेळीं लोकांनीं फंड जमा केला नाहीं तर मग खिस्त्यांनीं उपाशी मरणारीं माणसें आणि पोरकी पोरें ह्यांना बाटविलें तर त्याचें सगळें खापर लोकांच्याच डोक्यावर फोडलें पाहिजे; जणूं काय सरकारनें जमल्यास त्यांचे जीव तेवढे वांचवावे पण जिवापेक्षां अधिक मौल्यवान जो त्यांचा धर्म त्याबद्दल सरकारवर कांहींच जबाबदारी नाहीं. सारांश, आपण पडलों गरीब, आणि हल्लींच्या काळांत तर फंडावांचून पानसुद्धां हालत नाहीं. तेव्हां आतां करायचें कसें? जर हिंदूंना हिंदुधर्मांत राहावयाचें असेल तर त्यांना त्या सर्व शक्तिमान् फंडावांचून दुसरें कांहीं गत्यंतर आहे कीं नाहीं? खिस्तीलोक पैसे देऊन गरिबांना बाटवतात. तर मग आपण त्यांना पैसे देऊन आपल्या धर्मांत राखून ठेवलें पाहिजे. खिस्ती लोक आपल्या धर्माचा उपदेश करून लोकांना बाटवतात. तर मग आपण आपल्या हिंदुधर्माचा उपदेश केला पाहिजे. रस्त्याच्या एका बाजूला पाद्री उपदेशक उभा राहिला कीं दुसऱ्या बाजूला लागलाच आपला उपदेशक तयार पाहिजे. अशा प्रकारची मोठी घातुक विचारसरणी अलीकडे उत्पन्न

झालेली आहे, आणि खिस्ती लोकांच्यापेक्षां हिनेंच आमचा अधिक नाश केला आहे. कारण, असल्या हेतुवादानें आपला पाया लटपटीत होतो. आणि आजपर्यंत बाप्तिस्म्याच्या विरुद्ध ज्या चळवळी झाल्या त्यांत हिंदु लोकांना यश आलें नाहीं ह्याचें कारणही हेंच आहे. व्यापारांत फ्री ट्रेड आणि प्रोटेक्शन हीं दोन तत्त्वें फार महत्त्वाचीं आहेत; व तींच तत्त्वें धर्मातही असणें जरूर आहे. ज्यांना धर्मांतर करण्याची मुभा आहे त्यांच्यापुढें फ्री ट्रेडच्या तत्त्वावर खिस्त्यांनीं आपल्या धर्माची प्रौढी खुशाल गावी, परंतु ज्यांच्या धर्मसमजुतीप्रमाणें धर्मांतर करणें युक्त नाहीं त्यांच्यासंबंधानें प्रोटेक्शनचेंच तत्त्व अमलांत आणणें जरूर आहे. ज्यांचा एकमेकांत मिसमिळा चालतो त्यांनीं कुराण किंवा बायबल ह्यांपैकीं पाहिजे तें पाहिजे त्या दिवशीं हातांत घ्यावें किंवा टाकावें.परंतु ज्यांच्या मताप्रमाणें धर्मांतर करणें निषिद्ध म्हणून मानलें जातें त्यांच्यापुढें त्यांना बाटविण्याच्या इराद्यानें त्यांच्या देवाची निंदा आणि खिस्ती धर्माची प्रशंसा करणें ह्या गोष्टी दोषार्ह आहेत. व अशा गोष्टी तर प्रत्यहीं होत असतात. हिंदु लोकांच्या भरवस्तींत येऊन मिशनरी लोक त्यांच्या देवतांचा उपहास करीत असतात. नाशिक, पंढरपूर इत्यादि हिंदूंच्या पवित्र ठिकाणीं जेव्हां जेव्हां यात्रा जमते तेव्हां तेव्हां मिशनरी लोकही तेथें हटकून जमतातच. ह्या यात्रांतून उचल्यांचा आणि भामट्यांचा सुळसुळाट असतो व ते जर कोणाचे खिसे कातरतांना आढळले तर पोलीस त्यांचे हाल केल्यावांचून कधीं राहत नाहींत; परंतु पाहू गेलें तर ते बिचारे काय चोरतात ? रुपया; दोन रुपये, फार झाले तर दहा रुपये. परंतु हजारों रुपये खर्च केलें असतांही परत न मिळणारा असा हिंदुधर्म जे कोणीं एखाद्या भोळसर गरिबापासून हिरावून नेतात त्यांना पोलिसानें काय करावें हें आम्हांस समजत नाहीं. सरकार कोणाच्या धर्मांत हात घालीत नाहीं हें चांगलें आहे खरें. परंतु आमच्या हिंदुधर्माला एवढेंच पुरेसें नाहीं. त्याला सरकारापासून मिळणाऱ्या संरक्षणाची अपेक्षा आहे. धर्मस्वातंत्र्याची कल्पना फार चांगली आहे, परंतु तिचा अनुभव घेण्याचें हिंदूंच्या कपाळीं नाहीं त्याला काय करावयाचें ? तेव्हां या बाबतींत आपल्याला अवश्य-तेवढें संरक्षण सरकारकडून होणें हें त्यांचें कर्तव्यकर्म आहे. अशा ठिकाणीं 'नरो वा कुंजरो वा' करून चालावयाचें नाहीं. आम्ही कोणाच्याच धर्मांत हात घालीत नाहीं, खिस्त्यांना वाटलें तर ते आपल्या

धर्माचा उपदेश करतील व तुम्हांला वाटलें तर तुम्ही ख्रिस्ती धर्माचा अंगीकार करा. असें म्हणून हा वाद मिटावयाचा नाहीं. हिंदूंचा व्यापार आणि धर्म हीं दोन्ही दुर्बल अवस्थेंत आहेत. ह्यासाठीं त्यांचें संरक्षण करण्याचीच पद्धत येथें सुरू ठेविली पाहिजे. व्यापारांत जसें फ्रीट्रेडचे तत्त्व हिंदुस्थानला घातुक आहे तसेंच धर्मस्वातंत्र्याचे तत्त्व हिंदुस्थानला अपायकारक आहे. एका धन्यापाशीं मांजर आणि पोपट असे दोन प्राणी असले व त्याला ते दोघेही आवडते असलें तरी त्यानें त्यांना एकमेकांपासून दूरच ठेविलें पाहिजे. मी दोघांना सारखेंच स्वातंत्र्य देईन मग त्याचा उपयोग ते वाटेल तसा करोत, असें धनी ह्मणू लागला तर कसे चालेल? कारण देणाराने जरी सारखें स्वातंत्र्य दिलें तरी पंख कातरुन कोंडून ठेवलेला पोपट त्या स्वातंत्र्याचा काय उपयोग करणार? मांजर मात्र त्या स्वातंत्र्यानें त्या पोपटावर झडप घालून त्याला गट्ट करून टाकील. अशा ठिकाणीं सारखें स्वातंत्र्य देण्यांत कांहींच मतलब नाहीं. मांजराला स्वातंत्र्य हवें असेल, परंतु पोपटाला तरी निदान अधिक सुरक्षितपणा पाहिजे असतो. दुसऱ्यांना आपल्या धर्मांत ओढून आणिलें म्हणजे आपल्याला पुण्य लागतें अशी ख्रिस्ती धर्माची कल्पना आहे, आणि आपला धर्म सोडून आपण दुसऱ्या धर्मांत गेलों तर पाप लागेल अशी हिंदुधर्माची कल्पना आहे. असल्या दोन्ही धर्मांचे लोक एकमेकांच्या जवळ आले व त्यांना कोणी नियामक नसला तर त्याचा परिणाम काय होईल? एक म्हणणार मी तुला बाटवणार व दुसरा म्हणणार मी बाटून नरकांत पडण्याला खुषी नाहीं. ह्या दोन्ही मतांतून तडजोड निघण्यासारखा कांहींच मार्ग नाहीं. येथेंच दोन पक्षांमध्यें विरोध उत्पन्न होतो व हा विरोध कधींही नाहींसा होण्यासारखा नाहीं. तेव्हां अशा बाबतींत दुसऱ्याच्या वाटेस न जाणारा असा निरुपद्रवी जो धर्म असेल त्याचें संरक्षण अवश्य झालें पाहिजे. आम्ही सर्वांना सारखें धर्मस्वातंत्र्य देतों ह्या प्रौढींत शहाणपणाचा अंश फार कमी आहे. एखाद्या धष्टपुष्टाला आणि रोगग्रस्ताला सारखेंच पंचपक्वान्नांनीं जेवण्यास सांगणारा वैद्य आपल्या कलेंत फारच थोडें नैपुण्य दाखवितो. बरें, ख्रिस्ती लोकांनां तरी हिंदु लोकांना बाटविण्याचा अधिकार कोठून मिळतो? राजानें सर्वांना धर्मस्वातंत्र्य दिलें आहे ही गोष्ट वेगळी. परंतु लोकांना बाटविण्याची ही कल्पना

पाद्र्यांच्या डोक्यांत कोठून आली? ह्याचें उत्तर असें कीं, तुम्ही धर्मप्रसार करा अशी आकाशांतील बापानें त्यांना आज्ञा केली आहे. ठीक आहे. परंतु आकाशांतील बापानें आज्ञा केली आहे एवढ्यावरून हिंदूंना बाटविण्याचें काम न्यायाचें आहे असें ठरत नाहीं. उद्यां एखाद्याचा बाप असें सांगेल कीं, बाळ्या, जा आणि लोकांचीं घरें लुटून आण. आणि अशी आपल्या बाबांची आज्ञा ऐकून त्या बाबांचा बाळ्या जर लोकांच्या घरांवर धाड घालावयाला जाईल, तर कोणत्याही देशांतील पीनल कोड तें त्याचें कर्म न्यायाचें आहे असें ठरवूं देणार नाहीं. परंतु असल्या कोटिक्रमावर सुधारक-कारांचें असें म्हणणें आहे कीं 'सरकारला लोकांच्या धर्मस्वातंत्र्यावर अम्मल चालविण्यास सांगणें हें या काळांत किती विलक्षण आहे!' सुधारककारांना ख्रिस्त्यांच्या धर्मस्वातंत्र्याची केवढी कींव येते आणि आपलें धर्मस्वातंत्र्य पावलों-पावलीं नष्ट होत चाललें आहे त्याचें त्यांना कांहींच वाटत नाहीं हें किती विलक्षण आहे! ज्याला कांहीं स्वतःचा म्हणून धर्म आहे त्याच्या मनांत दुसऱ्यांबद्दल एवढी कळकळ आणि आपल्याबद्दल एवढी अनास्था कधींही असणार नाहीं. तसेंच सुधारककार म्हणतात 'ही गोष्ट किती विलक्षण आहे!' पण सुधारककार, आपल्या धर्माचें रक्षण करण्याचे योग्य आणि कायदेशीर उपाय योजण्याला कोणताही काल प्रतिकूल नाहीं. 'हें चालेल, तें चालेल, ख्रिस्त्यांनीं उपदेश केला म्हणून काय झालें? ते पैशाच्या लालचीनें बाटवीत असले तर आपणही फंड उभारण्याला कंबरा बांधिल्या पाहिजेत' असल्या विचारांनीं तुम्हींच काळाला प्रतिकूलत्व आणिलें आहे. आपण उपाशीं मरत असलों आणि ख्रिस्त्यांनीं येऊन आपल्या पोटाला दिलें म्हणजे जर आपल्याला बाटविण्याचा अधिकार त्यांना येतो असें म्हटलें तर मग आपला सुरक्षित-पणा तो काय राहिला! रा. धोंडोपंत कर्वे यांना नवीन हजारों जोडीदार मिळाले तरी ख्रिस्ती राष्ट्रें इतकीं श्रीमंत आहेत कीं, त्यांच्या फंडाची बरो-बरी आपल्याच्यानें कधींही करवणार नाहीं. तेव्हां मग आपल्यांतील शेंकडों अनाथ प्राणी ख्रिस्ती लोकांच्या तावडींत सांपडले तरी आपण कांहीं बोलतां कामा नये काय? पैशानेंच लोकांचा धर्म मिशनरी लोक खरेदी करूं लागले आणि त्यांत कांहीं अन्याय होत नाहीं असें आपण मानूं लागलों तर मग हिंदुधर्माची शाश्वती ती काय राहणार? म्हणून आमचें असें म्हणणें आहे

कीं, हिंदुधर्माला हल्लीं आहे ह्याच्यापेक्षां जास्त सुरक्षितपणा मिळेल अशी कांहींतरी तजवीज सरकारानें करणें जरूर आहे.

---

# राज्य कशानें मोडकळीस येतें ? : : : ७

— १ —

हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. हा प्रश्न लोक पुरातन काळापासून विचारीत आले आहेत, तरी पण हा कधींही जुना झाला नाहीं, किंवा याचें महत्त्व कमी झालें नाहीं; आणि मागील अनुभवावरून असा संभव दिसतो कीं पुढें जगाच्या शेवटापर्यंत सुद्धां हा कधीं शिळा होणार नाहीं. कारण, आजपर्यंत लक्षावधि चांगले राजे आणि चांगले कारस्थानी पुरुष होऊन गेले, व त्यांनीं सुयंत्रित राज्यें स्थापन करण्यासाठीं व चिरकाल टिकविण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले, पण त्या प्रयत्नांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आज मितीला राम, कृष्ण, युधिष्ठिर, हरिश्चंद्र, पृथु इत्यादि चांगल्या राजांचीं राज्यें कोठें आहेत ? वेदांतील सुदास वगैरे व उपनिषदांतील जनक वगैरे ह्यांचीं राज्यें आज मितीला कोठें आहेत ? चाणक्यासारख्या धूर्त राजकारणी पुरुषानें स्थापिलेलें तें चंद्रगुप्ताचें राज्य आज कोठें आहे ? अशोक म्हणून कोणी एक राजा होता हें आज कित्येकांना ठाऊक आहे ? चालुक्य, आंध्र, पांड्य, कलचूरि इत्यादि राजघराणीं पृथ्वीच्या पाठीवर अम्मल आणि जुलूम करून गेलीं ह्याची आज कोणाला माहिती आहे ? अलेक्झँडर आणि सीझर यांचें तें समुद्रवलयांकित राज्य आज कोठें आहे ? ग्रीस आणि रोम येथील लोकसत्तात्मक राज्यांपैकीं आज मितीला काय बाकी राहिली आहे ? काबूलपासून तों कन्याकुमारी-

पर्यंत देवळें फोडून मशिदी बांधणाऱ्या मुसलमानांनीं जें राज्य उभें केलें होतें तें आज कोठें आहे ? हीं सर्व राज्यें लयाला गेलीं. राज्यें कशानें मोडकळीस येतात आणि लयाला जातात ह्यांविषयीं वाटाघाट करणारे लोक वरील शेंकडों राज्यें बुडालीं त्यांच्या आधीं नव्हते असें नाहीं. पण त्यांपासून पुढल्या राजांना फारसा उपयोग झालेला दिसत नाहीं. कारण, एकदां गादीवर आणि लोकांच्या डोक्यावर पाय देण्याचा अधिकार राजांना प्राप्त झाला म्हणजे बहुतकरून 'मागच्याला ठेंच आणि पुढचा शहाणा' ही म्हण तेथें लागू पडेनाशीच होते. आपण असें पहातों कीं, इतिहासांतून अमुक राज्य लयाला कां गेलें याच्या कारणाची बरीच लांबलचक यादी दिलेली असते. पण त्याचें अध्ययन करून कोणत्या राजानें आपलें राज्य बचाविलें आहे ? राजांना राज्यें कां बुडतात ह्याचीं कारणें समजावून सांगणारे लोक पुष्कळ असतात. परंतु त्यांच्या अंगचा उन्मत्तपणा आणि बेगुमानपणा घालविणारे लोक फार थोडे असतात. आणि हे राजांचे अंगचे दुर्गुण राजांचे गळे कापून त्यांना वाट करून दिल्यावांचून त्यांच्या मनांतून कधींही बाहेर निघत नाहींत. राजे आपल्या अनिवार सत्तेमुळें इतके मंदांध झालेले असतात कीं त्यांना विचार-शक्ति बिलकुल राहिलेली नसते. राज्याच्या लयाचीं कारणें काय काय असतात असल्या प्रश्नांचें विवेचनसुद्धां त्यांना खपत नाहीं. त्यांना वाटतें कीं हें कांहींतरी आपल्या राज्याविरुद्धच आहे. आपल्याला अनुकूल असणाऱ्या गोष्टी आपल्या विरुद्ध आहेत असें वाटूं लागणें हें दुर्दैवाच्या प्रारंभाचें आणि भावी विपत्तीचें लक्षण आहे. प्रत्येक राजानें हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं दुर्गुणांवांचून आणि आपल्या जुलमांवांचून दुसरा कोणीही आपल्याला पद-च्युत करूं शकत नाहीं. दुसरे आपलें राज्य बुडविण्याचा प्रयत्न करितात अशी शंका घेणें म्हणजे आपल्याच पायांखालीं आपण खळगा खणून ठेव-ण्यासारखें आहे. राज्य म्हणजे एकट्या राजाचेंच नव्हे. त्याच्यावर आपली एकट्याचीच सत्ता आहे असें कांहीं मूर्ख व जुलमी राजे मानतात. पण ही त्यांची चूक आहे. राज्य हें राजाचें नव्हे, प्रजेचें आहे. राज्य हें राजासाठीं नव्हे, प्रजेसाठीं आहे. राज्य एकट्याचें नव्हे, सगळ्यांचें आहे; व राज्य बुडूं लागलें तर त्यांत सगळ्यांनाच वाईट वाटण्याचा संभव आहे व तें न बुडूं देण्यासाठीं प्रयत्न करणें हें सगळ्यांचेंच कर्तव्यकर्म आहे.

ह्या मृत्युलोकांतली कोणतीच गोष्ट शाश्वत नाहीं. मग एखाद्या बलाढ्य राजाचें राज्य झालें तरी तें शाश्वत कोठून असणार ? कारण मोठा राजा झाला तरी तो माणसांतला राजा; देवांच्या घरीं तो एक यःकश्चित् क्षुद्र जंतूच. तेव्हां एखाद्या किड्याची शेणखळी आणि राजाचें राज्य हीं दोन्हीं देवाच्या घरीं सारखींच. एखाद्या माणसाच्या पायाखालीं मुंग्यांचें वारुळ ज्याप्रमाणें चिरडून जातें, त्याप्रमाणेंच राजाचें राज्यही एखाद्या बलाढ्य वीराच्या पायाखालीं कधीं तरी चुरडून जाणारच. त्याला अक्षय्य शाश्वती अशी कधीं नाहींच. हें सर्व खरें, तरी पण त्यांतल्या त्यांत जितकी अधिक शाश्वती आणतां येईल, तितकी आणण्याचा प्रयत्न करणें हें सर्वांचें कर्तव्यकर्म आहे. व त्याप्रमाणें सर्वांनीं प्रयत्न करीत असावें. तरी पण हें कोणीही विसरतां कामा नये कीं गवत उगवतें, कांहीं दिवस हिरवेंगार आणि टवटवीत दिसतें, व पुढें वाळून कुजून जातें. मोठालीं झाडेंही कांहीं दिवस फळें देतात, परंतु पुढें तीं वाळून मरून जातात. बैल आणि घोडे गाडीला जुंपले म्हणजे कांहीं दिवस भरधांव धांवतात, परंतु पुढें उठवणीस येऊन मरतात. मनुष्य कांहीं वर्षें तरणाताठा असतो, परंतु पुढें तो म्हातारा होऊन मरतो. प्रत्येकाला आयुष्यमर्यादा ही आहेच, व तशीच ती राज्यालाही आहे. माणसांची आयु-र्मर्यादा जन्मास आल्यापासून शंभर वर्षांपर्यंतची आहे. त्यांत कोणी उपजतां-क्षणीं मरतो, कोणी वर्षानें मरतो, कोणी दहा वर्षांनीं मरतो, कोणी पन्नास वर्षांनीं मरतो, कोणी शंभर वर्षांनीं मरतो; पण सगळे अखेरीस मरतातच. तीच अवस्था राज्यांची. पौराणिक राज्यांचें कालमान आपण सोडून देऊं. परंतु इतिहासावरून-ज्यांच्याविषयीं कांहीं माहिती मिळते अशा राज्यांविषयीं पाहूं गेलें तर असें दिसून येतें कीं, कांहीं राज्यें पांच दहा वर्षांतच लयाला गेलीं, कांहीं आपल्या संस्थापकांबरोबर नाशाला पावलीं, कांहीं एक दोन पिढ्यांनीं आटपलीं, कांहीं दोनदोनशें वर्षांनीं नामशेष झालीं, व पांचसातशें वर्षांच्या पुढें फार थोडीं राज्यें अस्तित्वांत राहिलीं. तेव्हां राज्यांना पण आयुष्यमर्यादा आहे इतकेंच नव्हे तर मनुष्यांप्रमाणें त्यांना बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य हीं सुद्धां आहेत. व मनुष्याच्या शरीराला पन्नाशीच्या पुढें जशा अनेक व्याधि जडतात त्याप्रमाणेंच कोणत्याही राज्याची पन्नाशी उल-टून गेली म्हणजे त्याला नाना प्रकारच्या व्याधि जडूं लागतात. मग त्या

राज्याला कायद्याच्या सुधारणेचे कितीही औषधोपचार केले तरी दिवसेंदिवस अशा वेळीं औषधोपचारांचा फारसा उपयोग होत नाहीं. मरणाराला असें वाटत असतें कीं, मीं हेमगर्भाची माला घेतली तर अजून कदाचित् ह्यांतून जगेन. पण खरी स्थिति लोकांना कळून आलेली असते. वैद्यशास्त्र शिकल्यावांचूनही रोगी केव्हां मरणार हें व राजनीतीचा अभ्यास केल्यावांचूनच हें राज्य केव्हां बुडणार हें सामान्य लोकांना ताडतां येतें. आणि हजारों रुपयांचा मुशारा खाऊन आपल्याच चैनबाजीनें डबघाईस आणलेल्या राज्याचा बचाव करण्यासाठीं मोठे मोठे मुत्सद्दी धडपड करीत असतां अगदीं वाटच्या लंगोट्यालादेखील यांची धडपड फुकट आहे असें कळून येतें. परंतु ह्या गोष्टी जरी इतरांना सहज कळतात तरी राज्य बुडण्याच्या वेळीं मुत्सद्यांच्या डोळ्यांवर असा कांहींएक प्रकारचा धूर येतो कीं त्यामुळें त्यांना त्या साध्या गोष्टीही कळत नाहींतशा होतात. अशा वेळीं वैद्यांच्या मात्रा आणि भांबावून न गेलेल्या माणसांचे विचार फार उपयोगीं पडतात.

असल्या विवेचनावर आणखी एक असा आक्षेप आहे कीं, राज्यें लयाला जाण्याच्या कारणांविषयीं विवेचन केल्यानें राज्यें अधिक खोलखोल जाण्याचा संभव आहे; पण हा आक्षेप अगदीं चुकीचा आहे. हीं कारणें म्हणजे राज्यरूपी शरिरांतील व्याधिच होत. मनुष्याच्या शरिरांतील रोगांविषयीं वैद्यशास्त्रांत विवेचन केलेलें असतें; पण त्यांवर कोणत्याही जुलमी मनुष्यानें आजपर्यंत असा आक्षेप घेतला नाहीं कीं, ह्या आयुर्वेदांतील वाटाघाटीमुळें माझ्या शरिरांत रोग उत्पन्न होऊन मी मरणोन्मुख झालों आहें. कितीही जुलमी मनुष्य असला तरी त्यानें आजपर्यंत आपल्या शरिरांत व्याधि उत्पन्न झाल्याबद्दल वाग्भट किंवा चरक ह्यांना जबाबदार धरिलेलें नाहीं, किंवा त्यांना मनुष्यद्रोही म्हणून कांहीं शिक्षा दिली नाहीं. असें जर आहे, तर मग राज्यरूपी शरिरांतच राजकीय वाटाघाटीनें व्याधि कशा उत्पन्न होतील? व कितीही जुलमी आणि मूर्ख राजा झाला तरी असल्या वादविवादांनीं माझें राज्य खोल खोल जात चाललें असें त्याला कसें म्हणतां येईल? आपलीं दुर्व्यसनें आपल्या शरिरांत आणि राज्यांत व्याधि उत्पन्न करितात, आणि तींच अखेरीस आपल्याला मारतात. हें राजांना कळलें पाहिजे. त्याबद्दल बिचाऱ्या वाग्भटांवर रागावून काय होतें? त्याचा त्यांत काय अपराध

आहे ? त्यांचा नाश करावा ह्याच हेतूनें असले ग्रंथकार आपले ग्रंथ लिहिण्याला प्रवृत्त होतात. असो. येथपर्यंत राज्याच्या नाशाच्या कांहीं सामान्य कारणांचें विवेचन झालें व ह्या विषयावरील कांहीं आक्षेपांचेंही निराकरण करण्यांत आलें. आतां विशेष कारणांचा उहापोह पुढील लेखांत करूं.

---

# राज्य कशानें मोडकळीस येतें ? : : : ८

— २ —

या प्रश्नाचें सामान्य दिग्दर्शन मागील लेखांत थोडेंबहुत करण्यांत आलेंच आहे. आतां त्याच्या विशेष कारणांचा प्रस्तुत लेखांत विचार कर्तव्य आहे. बैलाला जर ज्ञान असतें तर माणसानें त्याचें नाक दाभणानें टोंचावें आणि त्यांत वेसण ओंवावी, त्याच्या मानेवर जोंखड ठेवून त्याला गाडीला जुंपावें, आणि आपण गाडींत बसून त्याच्या पाठीवर चाबकाचे फटके मारावे ह्या गोष्टी त्यानें खरोखर कधींही चालूं दिल्या नसत्या. म्हशीला जर ज्ञान असतें तर आपल्या वासराला भुकेनें हंबरडें फोडीत ठेवून आपल्या पोटांतलें सारें दूध अधाशी माणसाला पिण्यासाठीं तिनें खास कधींही काढूं दिलें नसतें. एकाद्या गांवढळाला जर एखाद्या सुशिक्षिताइतकें ज्ञान असतें तर ह्यांचा बोजा डोकीवर घेऊन उन्हातान्हांतून तंगड्या तोडीत तो कधींही गेला नसता. त्याप्रमाणेंच लाखों लोकांना अवश्यक ज्ञान असतें तर त्यांनीं आपल्या मुंड्या एखाद्या विविक्षित व्यक्तीच्या हातीं खास कधींही दिल्या नसत्या. एकानें लक्षावधि लोकांवर राज्य करणें म्हणजे हा साऱ्या लोकांच्या अज्ञानाचा

गोंधळ आहे. व हा राजाच्या ज्ञानाचा खेळ आहे. ही एक प्रकारची आंधळी-कोशिंबीर आहे. पण लहान मुलांच्या त्या आंधळ्या कोशिंबिरींत आणि वृद्ध कोल्ह्याच्या ह्या आंधळ्या कोशिंबिरींत जरासा फरक आहे. तो असा. त्यांत सगळ्यांचे डोळे उघडे आणि एकाचे बांधलेले असतात. परंतु ह्यांत त्याच्या अगदीं उलट असतें. ह्यांत सगळ्यांचे डोळे बांधलेले आणि एकाचे उघडे. आणि असें असल्यामुळें उघड्या डोळ्यांचा माणूस बांधलेल्या डोळ्यांच्या कांहीं माणसांचे हळूच खिसे कातरून घेतो, कांहींना भिंतीवर ढकलून त्यांची डोकीं फोडतो, आणि कांहींना खड्ड्यांत ढकलून देतो. सारांश, आपले डोळे उघडे आणि दुसऱ्याचे बांधलेले असल्यामुळें उघड्या डोळ्यांच्या माणसाला हवें तें करितां येतें. असला हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आजपर्यंत कैक जुलमी राजे पृथ्वीच्या पाठीवर खेळून गेले व बाकीच्या लोकांनीं आपल्या डोळ्याला बांधलेल्या झांपण्या जर झुगारून दिल्या नाहींत तर जगाच्या शेवटपर्यंत देखील हे त्यांचे आंधळ्या कोशिंबिरीचे खेळ असेच चालू रहातील. असले खेळ खेळण्याला आपल्या अंगांत इतरांपेक्षां विशेष ज्ञान पाहिजे असतें असें बिलकूल नाहीं. सर्व मनुष्यांच्या ज्ञानाची मर्यादा थोड्या-बहुत फरकानें बहुधा सारखीच असतें. आणि दुसऱ्यावर अम्मल चालवा-वयाचा म्हणजे ज्ञानांत फरक हा पाहिजेच. तेव्हां आपल्या ज्ञानाची पुंजी इतरांपेक्षां अधिक वाढणें अशक्य आहे असें पाहून राजे लोक दुसऱ्यांचें ज्ञान कमी करण्याचा प्रयत्न करीत असतात. तेव्हां ज्ञानाच्या बाबतींत पाहिलें असतां दुसऱ्यांचें ज्ञान कमी करून आपलें ज्ञान जास्त आहे असें दाखविण्या-इतकी लुच्चेगिरी करतां आली म्हणजे राज्य सुयंत्रित चालण्याला हरकत नाहीं. सारांश, ही राज्याची इमारत लोकांच्या स्वाभाविक किंवा कृत्रिम अज्ञानाच्या पायावर सात सात मजलेपर्यंत उंच उभारलेली असते. तेव्हां अर्थात् असली इमारत ढांसळण्याला मुख्य कारण म्हटलें म्हणजे लोकांत ज्ञानाचा प्रसार होणें हें होय. एकानें लाखों लोकांवर राज्य करणें म्हणजे हा केवळ नजरबंद जादूचा खेळ आहे. ज्याप्रमाणें एखादा गारोडी जादूच्या मंत्रानें सगळ्या पहाणारांची नजर बंद करून मग त्यांना हवें तसें फसवितो, व एखाद्या फायनान्स मिनिस्टरप्रमाणें प्रसंग पडेल तशा रीतीनें एका रुपयाचे दहा रुपये आणि दहा रुपयांचा एक रुपया करून दाखवितो, त्याप्रमाणेंच

आपल्या राज्यांतील सर्व लोकांचीं नजर युक्तीप्रयुक्तीनें बंद करून घेऊन नंतर मग राजे लोकांना हवें तसें फसवितात. जगांत भोळसर लोक आहेत म्हणून भामट्यांना खिसे कातरण्याला सांपडतात आणि अज्ञानी लोक आहेत म्हणून राजांचीं राज्यें चालतात. म्हणून ज्यांना आपलें राज्य चिरकाल टिकावें असें वाटत असतें ते लोकांच्या अज्ञानाविषयीं फार काळजी घेत असतात. एखाद्या अज्ञान मुलाचें पालन करण्याकरितां नेमलेला धनलोभी ट्रस्टी ज्याप्रमाणें तो मुलगा अल्पवयांतच आणि अज्ञानांत राहील तितकें चांगलें असें म्हणत असतो, त्याप्रमाणें राजेही आपल्या लोकांनां कांहीं विवक्षित मर्यादेच्या पलीकडे अज्ञानांत राखण्याविषयीं जिवापाड प्रयत्न करीत असतात. आणि त्यांच्या हिताच्या दृष्टीनें पाहिलें असतां त्यांचें हें करणें अगदीं बरोबर आहे. कारण कोणीही गारोडी झाला तरी तो कोणाला आपल्या पोतडीजवळ कधींही येऊं देणार नाहीं. त्याच्या पोतडींत काय आहे आणि काय नाहीं हें लोकांनीं एकदां पाहिलें म्हणजे मग त्याच्यापाशीं जादूगिरी काय राहिली आहे ? म्हणून राजांना लोकांच्या अज्ञानाला फार जपावें लागतें. लोकांचें अज्ञान हेंच राजांचें अबाढव्य सैन्य, हाच त्यांचा दारूगोळा, आणि हेच त्यांचे सर करण्याला अवघड असे, डोंगरी आणि भुईकोट किल्ले. लोकांचें अज्ञान हाच लुच्चे लोकांचा गादीवर बसण्याचा हक्क, हीच त्यांची वंशपरंपरागत सत्ता व हेंच त्यांचे ताम्रपट. लोकांच्या अज्ञानासारखा शहाणा सल्लागार मंत्री आजपर्यंत कोणत्याही राजाला कधींही मिळाला नाहीं. आणि लोकांच्या अज्ञानानें जितके जुलमी राजांचे खजिने भरले तितके ‘ शिपमनी ’ किंवा ‘ झिजिया ’ ह्यांपैकीं कोणत्याही करानें भरले नाहींत. ह्यावरून एवढें सहज लक्षांत येईल कीं, लोकांचें अज्ञान हें राजांचें आदिदैवत आहे. व ह्यांचें भजन पूजन नेहमीं करीत असणें त्यांना फार जरूर आहे. हीच सारी त्यांची गुरुकिल्ली. हिच्यांत वास्तविक पाहूं गेलें तर कांहीं अर्थ नाहीं. पण ही लोकांना कळली तर मग यांचें प्रस्थ कसें टिकणार ? म्हणून अज्ञानाची अभिवृद्धि आपल्या लोकांत दिवसेंदिवस कशी होत जाईल ह्या काळजींत राजे लोक रात्रींच्यारात्री घालवितात.

हें विधान सकृत्दर्शनीं कांहींसें विसंगत वाटण्याचा संभव आहे. कारण ह्यावरील आक्षेपक असें म्हणेल कीं, लोकांना अज्ञानांत ठेवणें हें राजाला

हितावह आहे व त्यांना तो तसें ठेवितो हें अगदीं खोटें आहे. कारण राजे लोक लोकांना विद्या देण्यासाठीं लाखों रुपये खर्च करितात, विद्यालयें आणि पाठशाळा बांधतात, मोठमोठे शास्त्री आणि पंडित ह्यांना लागेल तितका तनखा देऊन शिकविण्यासाठीं आणून ठेवितात, व ज्ञानप्राप्तीचीं जीं जीं साधनें असतात तीं तीं ते लोकांच्या आटोक्यांत आणून ठेवितात. इतकें करीत असूनही ज्ञानदानाच्या बाबतींत राजांना नांवें ठेवणें बरोबर नाहीं, असा आक्षेप येणें साहाजिकच आहे. परंतु ह्यावर उत्तर असें आहे कीं, घाण्याच्या बैलाप्रमाणें डोळ्याला झांपण्या बांधलेल्या लोकांच्याकडूनच हा आक्षेप येत असतो हें लक्षांत आणलें, म्हणजेच त्यांतील बहुतेक जोर कमी झाला. गारोड्यानें एका रुपयाचे दोन रुपये करतांना आपल्या हातांतला एक घातला असा संशय येऊन आपण ओरड करूं लागतों तेव्हां तो गारोडी 'या, पहा, कोठें आहे रुपया पहा !' असें तोंडानें म्हणत असतो मात्र, परंतु आपल्याजवळ कधीं कोणाला येऊं देत नाहीं किंवा आपली खुबी दुसऱ्याच्या नजरेस पडूं देत नाहीं. हेंही असल्या आक्षेपकांनीं विसरतां कामा नये. व जो खरा धूर्त राजा आहे तो तर ज्ञानदानाचा अधिकच आव घालतो. परंतु त्यांतली खुबी अशी असते कीं, देवदैत्यांच्या पंक्तींत विष्णु-स्वरूपी मोहनी वाढीत असतां ज्याप्रमाणें दैत्यांना अमृताचा एक थेंबही मिळाला नाहीं त्याप्रमाणें घ्या घ्या म्हणून ज्ञानामृत घशांत ओतण्याच्या आग्रहाची मात्र रेलचेल; परंतु खऱ्या आणि आवश्यक लागणाऱ्या ज्ञानाचा एक थेंब घशांत पडेल तर शपथ. हा सर्व प्रकार म्हणजे गारोड्याचा नजरबंद खेळ आहे असें जें आम्हीं वर म्हटलें आहे तें यामुळेंच. व वरच्या-सारखे आक्षेप हीच गोष्ट ह्या नजरबंद खेळाची साक्ष देत आहे. अडाणी लोकांपेक्षां सज्ञान लोकांवर राज्य करण्याला सोपें, ह्यासाठीं राजानें आपल्या प्रजेला सुशिक्षित करावें असें बेकननें म्हटलें आहे खरें. पण बेकन हा तत्त्ववेत्ता होता. त्याला तत्त्वज्ञानाचीं पुस्तकें खरडावयाचीं होतीं, राज्य हांकावयाचें नव्हतें. त्याला स्वतःला राज्य करण्याचा प्रसंग आला असता तर त्यानें असें कधींही लिहून ठेवलें नसतें. मॅकिआव्हिली ह्याचें मत बेक-नच्या उलट आहे. मॅकिआव्हिलीचीं मतें अलीकडच्या राजकारस्थानी पुरु-षांना संमत नाहींत असें ते म्हणतात. ह्याचें कारण एवढेंच कीं, हे गुप्त-

पनाणें जीं कृत्यें करतात तीं केलीं असतां हरकत नाहीं असें तो आपल्या राजनीतीच्या पुस्तकांत उघड उघडपणें प्रतिपादन करितो. स्पष्टवक्तेपणा आणि सत्य भाषण हा मॅकिआव्हिलीचा राजकीय बाबतींत कदाचित् दोष असेल. परंतु आपल्याला सध्यां त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. हल्लींच्या राज्यांत- देखील विद्यादान अवश्य झालें पाहिजे असें मत प्रतिपादन करून लॉर्ड मेकॉलेसाहिबांनीं तें अमलांतही आणलें हें खरें. परंतु त्या ज्ञानप्रसाराच्या विरुद्धही अलीकडे मधून मधून कांहीं ओरड ऐकूं येते. इंग्रजी राज्याचा प्रतिनिधिसत्तात्मक राज्याकडे विशेष कल आहे, तरीसुद्धां ज्ञानप्रसाराविरुद्ध इतकी ओरड ऐकूं येते; मग एकछत्री राज्यांत काय असेल ?

असो. लोकांचें अज्ञान हें जर राजाच्या उत्कर्षाला कारणीभूत होतें तर अर्थात् लोकांचें ज्ञान हें एखादें राज्य मोडकळीस आणण्याला मोठें जबरदस्त कारण असलें पाहिजे. 'सुशिक्षित लोक हीच आमच्या राज्याची बळकटी, तुम्हाला ज्ञान देण्यांतच आमचा परमार्थ आहे.' हें सगळें झूट आहे; हीं निव्वळ वरवरचीं ठराविक बोलणीं आहेत; एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून देण्याइतकीच ह्यांचीं योग्यता. पंधरावे सोळावे शतकापर्यंत साऱ्या यूरोपखंडभर जो पोपाचा अम्मल गाजत होता तो कशानें धुळीस मिळाला ? ज्ञानानें. पोपचे सारे कायदे, म्हणजे त्याचें बायबल, हें त्या वेळीं लॅटीन भाषेंत असे. हल्लीं जशी इंग्रजी भाषा तशी त्या वेळीं लॅटीन भाषा फार झालें तर शंभरांतून दहापांच जणांना समजणार अशी स्थिति. मग काय विचारता ? लॅटीन भाषा जाणणारे दुढ्ढाचार्य जें सांगतील तें प्रमाण ! पण ज्ञानाच्या प्रसारानें हें सारें थोतांड अगदीं मोडकळीस आलें. बर्कसाहेबानीं अमेरिकेंतील वसाहती इंग्लंडच्या जोखडापासून स्वतंत्र कां झाल्या ह्याच्या- बद्दल जीं कांहीं कारणें सांगितलीं आहेत त्यांत हें एक आहे. तसेंच मि. लेकी यांनीं ह्याच अमेरिकेंतील प्रसंगाच्या संबंधानें आपल्या इतिहासात असें लिहिलें आहे:—

The rapid rise of an ambitious legal profession and the great development of the press made it certain that there soon would be abundant mouthpieces of discontent, and there was so much in the legal relations of England

to her colonies that was anomalous, unsettled, or undefined, that causes of quarrel were sure to arise. ह्या मनुष्याच्या इतिहासांतल्या गोष्टी झाल्या. पण देवाच्या इतिहासांतही त्याच गोष्टी आढळतात. व त्यामुळें ह्या सिद्धांताची सत्यता फारच दृढ होते. खिस्ती राजेच आपल्या अस्सल ज्ञानाच्या पोतडीजवळ कोणाला येऊं देत नाहींत असें नाहीं; तर त्यांच्या देवाची सुद्धां अशीच वहिवाट होती. त्याचाच कित्ता त्यांनीं उचलला आहे कीं काय कोण जाणें ? खिस्त्यांच्या देवानें अॅडमला आणि ईव्हला. सगळे ऐषआराम यथेच्छ भोगीत बसण्याची परवानगी दिली, पण ज्ञानवृक्षाच्या फळाला मात्र तुम्हीं शिवतां कामा नये असा त्यानें सक्त हुकूम देऊन ठेविला होता. आणि हीच अवस्था पृथ्वीवरील लोकांची होय. ज्ञानवृक्षाचीं फळें खाण्याची बंदी पृथ्वीवरही आहेच, व ज्यांना आपलें राज्य लवकर मोडकळीस यावें असें वाटत नसेल त्यांनीं त्या सोनेरी फळांची राखण करण्यासाठीं आपण स्वतः अगदीं तक्षकासारखें बसलें पाहिजे. वरकरणी ज्ञानासंबंधानें हव्या तेवढ्या लांब लांब गप्पा ठोकून लोकांना खुशाल फसवावें; परंतु आपली गुरुकिल्ली त्यांना कधीं कळूं देऊं नये. राज्यें कां मोडकळीस येतात व त्यांना टेंका देण्यासाठीं राजांनीं काय काय करावें याचा विचार प्रस्तुत निबंधांत आम्हांला करावयाचा आहे म्हणून राजांनीं अशा प्रसंगीं काय करावें हें सांगितलें आहे. ज्ञानप्रसाराशिवाय राज्यें मोडकळीस आणणारीं दुसरीं कारणें आहेत त्यांचा विचार पुढील लेखांत करूं.

---

# राज्य कशानें मोडकळीस येतें ? : : : १

— ३ —

ज्ञानाचा प्रसार हें राज्याच्या नाशाचें जबरदस्त कारण होय हें पूर्वी सांगितलें. ह्याच ज्ञानरूपी झाडाच्या खोडाला पुढें निरनिराळ्या फांद्या फुटतात आणि राज्याच्या वाढीला विघातक अशीं निरनिराळीं मतें लोकांत प्रचलित होऊं लागतात. आणि मन खळवळून टाकणाऱ्या त्या मतांचें विष एकदां अंगांत भिनून गेलें म्हणजे मग कितीही चांगला मंत्री असला तरी त्याच्यानें देखील त्या राज्यरूपी शरीरांतील विषाचा जोर कमी करवत नाहीं. त्यांतलीं कांहीं कांहीं मतें आज आम्हीं येथें देण्याचा विचार केला आहे.

राजाचें हित म्हणजे एका व्यक्तीचें हित, व राष्ट्राचें हित म्हणजे व्यक्तिसमुदायाचें हित. अशा प्रकारचा राजा आणि राष्ट्र ह्यांच्या हितामधील फरक ज्ञानाच्या योगानें लोकांच्या ध्यानांत येऊं लागतो. तात्त्विक दृष्टीनें पाहतां राजा किंवा राजाचें हित हा काय पदार्थ आहे हें लोकांना माहितसुद्धां असण्याचें कारण नाहीं. लोकांचें सदोदित एवढेंच पाहणें असणार कीं आपल्या राष्ट्राचें हित होतें आहे किंवा नाहीं. कारण राष्ट्रासाठीं राजा, राजासाठीं राष्ट्र नव्हे, असा दंडनीतींतील सर्वमान्य सिद्धांत आहे. तेव्हां जोंपर्यंत राजा आणि राष्ट्र या दोघांच्या हिताची व्याप्ति सारखीच असते तोंपर्यंत लोक फारशी कुरकुर करीत नाहींत. परंतु एखाद्या अधम राजाच्या अधमाधम कृतीमुळें राजा आणि राष्ट्र या दोघांत लोकांना भेद दिसूं लागतो त्या वेळेला त्या राजाच्या राज्याचा पाया ढांसळण्याला सुरवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. राजाची दृष्टि राष्ट्रहिताकडे नाहीं तर आपली स्वतःची तुमडी भरून घेण्याकडे आहे ही गोष्ट लोकांच्या मनांत बिंबूं लागली म्हणजे मग अर्थात्‌च त्यांच्या वर्तणुकींत बदल पडूं लागतो. त्या राजाच्या सैन्यांत जो शिपाई आपलें शीर हातांत घेऊन लढण्याला तयार

असतो तो काय कोणा तरी एखाद्या यःकश्चित् व्यक्तीच्या हितासाठीं तयार झालेला असतो ? नाहीं, कधींहीं नाहीं. मीं आपल्या राष्ट्रासाठीं लढेन, मी आपल्या देशासाठीं अंगांतील रक्त खर्ची घालीन, मी अनेक व्यक्तींच्या हितासाठीं धारातीर्थी आपला देह ठेवीन, असें तो शिपाई आपल्या मनांत समजत असतो.आणि त्याला जर असें कळलें कीं माझी कल्पना म्हणजे सारा भ्रम आहे,मला हा राजा निवळ फसवीत आहे.व आपल्या एकट्याच्या हितासाठीं माझे व माझ्यासारख्या आणखी लाखों शिपायांचे प्राण हा बळी देत आहे, तर तो एक क्षणभर तरी हातांत तरवार धरील काय ? असल्या आपलपोट्या आणि लबाड राजासाठीं तो एक पाऊल तरी पुढें टाकील काय ? आपल्यामधील गुप्त गोष्ट राजाला जाऊन सांगणें म्हणजे चहाडी करणें होय. व चोरी, चहाडी आणि शिंदळकी हीं तीन पातकें आहेत अशी आबालवृद्धांची समजूत आहे. राजाच्या गुप्त हेराचें काम पतकरून त्याला आपल्यांतील चुगल्या सांगणें हें वास्तविक पहातां अतिशय नीच काम आहे. तरी पण व्यक्तिसमुदायाच्या हितासाठीं ज्याप्रमाणें कांहीं लोकांनीं मांगाचें काम पतकरून उघडपणें गळे कापणें जरूर असतें, त्याप्रमाणेंच कांहीं जणानीं राजाच्या गुप्तहेराचें काम पतकरून लोकांचे गुप्तपणें गळे कापण्याचें काम करणें जरूर आहे. परंतु ह्यांपैकीं एखाद्या गुप्त हेराला जर असें कळून आलें कीं, एखाद्या विवक्षित क्षुद्र व्यक्तीनें सिंहासनावर बसावें आणि डोक्यावर सोन्याचा मुकुट घालावा ह्यासाठीं मी ह्या जगांतले अतिशय नीच मानलेलें पातक करीत आहें, त्याचें राज्य सुरळीत चालावें म्हणून मी आपल्या परलोकच्या सुखांत माती काल-वून घेत आहें, व त्याच्या राज्यांतील कांटे काढून टाकण्यासाठीं धडपडत असतां परलोकीं आपल्या अंगाला हजारों कांटे लावून घेण्याची मी तयारी करीत आहें, तर तो आपल्या हृदयांत सांठविलेल्या गुप्त बातम्यांतील एक अक्षर तरी तोंडाबाहेर काढील काय ? सारांश, हीं दोन्हीं उघडपणें आणि गुप्तपणें गळे कापण्याचीं राजाचीं कामें ताबडतोब बंद पडतात. राष्ट्राच्या हितापासून ज्या राजाचें हित भिन्न असतें त्या राजाची चाकरी करण्याची सुज्ञ लोकांना शरम वाटूं लागते. राष्ट्ररूपी गाईला कापून तिच्या अंगांतील रक्त एखाद्या राक्षसाच्या तोंडांत ओतण्याचें खाटकाचें काम त्यांच्या हातून होईनासें होतें. आणि मग जुलमी राजाची सर्वच घडी विसकटते. वर ज्या

गोष्टी सांगितल्या त्या केवळ सज्ञान लोकांच्या ठिकाणींच संभवतात. त्या अज्ञानी लोकांना लागू नाहींत. मूर्ख लोकांनीं आपण होऊन इतर राजांना बळें बळें बोलावून आणून आपल्या राष्ट्राचें अकल्याण करविल्याचीं उदाहरणें इतिहासांत शेंकडो आहेत. मूर्ख शिपायांचीही अशीच गोष्ट आहे. आपल्या पोटाची खांच भरण्याइतके पैसे मिळाले म्हणजे पाहिजे त्याच्या अंगाला पाहिजे तितक्या खांचा पाडण्याला ते तयार. ज्यांना आपला पगार हेंच आपलें राष्ट्र आणि पगार देणारा हा आपला राजा असें वाटतें, त्या अधमांच्या डोक्यांत वर निर्दिष्ट केलेल्या उच्च कल्पनांचा प्रवेश कोठून होणार ? पैसे दिले म्हणजे पाहिजे त्याची डोकीं उडविणारीं लष्करें पूर्वी असत व हल्लींही आहेत. वास्तविक पाहाता आफ्रिका खंडांतील दरवेशांनीं मद्रासच्या पलटणींतील रामय्या नायडूचें काय केलें आहे ? रामय्या नायडूच्या मनांत हा विचार येईल तर शपथ. त्याला महिना भरला कीं पगार घ्यावयाचा आणि हुकूम सुटला कीं गोळी सोडावयाची एवढें काय तें ठाऊक. इ० स० १७५७ चे पूर्वी बंगालचे लोक दुर्दैवानें म्हणजे इंग्रज सरकारच्या अंमलाखालीं येण्यापूर्वी प्लासीच्या लढाईचे वेळीं लॉर्ड क्लाइव्ह यांच्या हाताखालीं जे हिंदू शिपाई लढत होते त्यांच्या स्वप्नांत तरी कधीं आलें होतें काय, कीं आपण सुराजउद्दवल्याविरुद्ध लढत आहों, म्हणजे आपण व आपले भाऊबंद ज्या गलबतांत बसलों आहों त्याच गलबताला कुऱ्हाडीनें भोकें पाडीत आहों ! इ. स. १७७३ त जे हिंदू शिपाई काशीचा राजा चेतसिंग याला कैद करण्यासाठीं वॉरन हेस्टिंग्स बरोबर गेले त्यांना आपण काय करीत आहों याचा अर्थ समजला होता काय ? नाहीं. शिपाईच ते ! अज्ञानी शिपायांना असल्या गोष्टी कालत्रयींही समजणार नाहींत. ज्यांना ज्ञान आहे त्यांच्यासाठीं या गोष्टी आहेत. तेव्हां राजांनीं होतां होईतों ज्ञानाचा प्रसार होऊं देऊं नये हें उत्तम, व तो झालाच तर निदान स्वहित आणि राष्ट्रहित ह्यांत भिन्नभाव राखूं नये, आणि राखलाच तर तो निदान लोकांच्या नजरेस तरी पडूं देऊं नये.

आपल्यापेक्षां दुसरा अधिक श्रेष्ठ कोणी तरी कोठें तरी आहे ही कल्पनाही राजाच्या चिरस्थायित्वाला अपायकारक आहे. एका म्यानांत दोन सुऱ्या कधीं टिकावयाच्या नाहींत. त्याचप्रमाणें एखाद्या राज्यांत तेथला राजा आणि त्याच्या इतका बलाढ्य असा दुसरा कोणी असे असतील तर

तें राज्य कधीं सुयंत्रित चालणार नाहीं. ज्याला आपली सत्ता दृढ करावयाची आहे त्यानें असल्या आचरट लोकांना रसातळासच नेऊन पोचविलें पाहिजे. येथें दुसरा उपाय नाहीं. कोणी एक राजकारस्थानी पुरूष आपल्या बागेंत फिरत असतां तेथें दुसरा एक त्याच व्यवसायांत गुंतलेला मनुष्य आला, आणि नवीन जिंकलेला प्रदेश मी आपल्या ताब्यांत ठेवण्याला काय उपाय करावा म्हणून त्यानें त्याला प्रश्न केला. तेव्हां पहिल्या गृहस्थानें कांहीं एक न बोलता त्या बागेंतील जे उंच उंच रोपे होते त्यांचे शेंडे खुडून दाखविले. त्यावरून आपल्या मुलखांतील बड्या बड्या सरदारांचीं डोकीं तोडलीं पाहिजेत हा ह्यांच्या उपदेशांतील भावार्थ आहे असें तो तात्काळ समजला. ह्याच उपदेशाचा उपयोग प्रत्येक राजा प्रत्येक क्षणाला आपल्या राज्यांत करीत असतो. राज्यांत असलीं बडीं प्रस्थें माजत चाललीं ह्मणजे त्याच्या योगानें एरव्हीं अनाथ असलेल्या लोकांना मोठा जोर चढतो व ते नेहमी ह्यांच्या आश्रयाला येऊन राहतात. यूरोपखंडांतील प्रत्येक राज्यांत पोपाला पाहिजे तेव्हां ढवळाढवळ करतां येत होती व त्यामुळें राजाचें वर्चस्व त्या मानानें कमी होत असे. परंतु इंग्लंडातील आठव्या हेनरी सारख्या धूर्त राजांनीं युक्तीयुक्तीनें तो कांटा समूळ काढून टाकला. हिंदुस्थानांतही एक शतकाच्या पूर्वीं जितकीं संस्थानें होती तितकीं जर आज कायम असती तर आपल्या दयाळू राणी सरकारच्या छत्राखालीं आपण आज जो शांततेचा उपभोग घेत आहों तो आपल्याला कधींही घ्यावयाला सांपडला नसता. पण अशा उपायांनीं आपल्याहून अधिक श्रेष्ठ अशा मानवी प्राण्यांचा राजांनीं घात केला तरी लोकांना परमेश्वराचा आधार ह्मणून राहतोच. पण त्याचाही प्रतिकार राजांनीं केला पाहिजे. ह्याच्या बद्दलची युक्ती पूर्वींच्या राजांनीं अगाऊच करून ठेविलेली आहे. उपयोग मात्र योग्य वेळीं करावा म्हणजे झालें. राज्याच्या जुलमानें त्रासून जाऊन लोक ईश्वरावर हवाला ठेवूं लागले तर मीच परमेश्वर आहे असें 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या स्मृतिच्या जोरावर ठोकून देण्याला राजानें कधींही मागें पुढें पाहतां कामा नये. सारांश, दुसऱ्याचें प्रस्थ आपल्या राज्यांत माजलें म्हणजे आपलें राज्य मोडकळीस येतें हें लक्षांत आणून आपल्यांहून दुसऱ्या कोणालाही वरचढ होऊं न देण्याची तजवीज राजांनीं केली पाहिजे.

ज्याप्रमाणें आपल्यापेक्षां वरचढ दुसरा कोणी राज्यांत असतां कामा नये त्याचप्रमाणें आपण केलेल्या कायद्यापेक्षां दुसरा कायदा आपल्या लोकांना अधिक मान्य असा वाटता कामां नये. आमच्या सदसद्विवेकबुद्धिला जें चांगलें वाटेल तेच पुण्य आणि तिला जें वाईट वाटेल तेंच पाप अशा प्रकारचीं मतें ज्ञानसंपन्न लोकांत पसरलेलीं दृष्टोत्पत्तीस येतात. ह्या मतांचें प्राबल्य जसजसें वाढत जातें तसतसा राजाच्या कायद्यावर लोकांचा गैरभरंवसा अधिक अधिक होत जातो. सरकारच्या कायद्यानें जें निषिद्ध म्हणून ठरविलें तेंच सदसद्विवेकाच्या कसोटीला लावून पाहून जर कांहींच्या मतानें अनिषिद्ध ठरेल तर त्यामुळें कायद्याचा बोज कमी होतो; व हे कायदे मूर्खपणाचे आहेत आणि हे पाळण्याची मुळींच आवश्यकता नाहीं असा समज लोकांत वाढू लागतो व त्यायोगानें दुफळी होऊन राज्याच्या इमारतीचे खांब लटपटूं लागतात. या साठीं 'हम करे सो कायदा' हेंच तत्व राजांनीं नेहमीं अमलांत आणणें जरुर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

## राज्य कशानें मोडकळीस येतें ? : : : १०

— ४ —

राजाच्या कायद्यापेक्षां दुसरे अधिक वरिष्ठ कोणतेही कायदे लोकांच्या नजरेपुढें असूं नयेत ह्मणून मागील लेखांत सांगितलें आहे. परंतु असलें कायदे तर लोकांच्या मनावर आपला अम्मल प्रत्येक क्षणाला बजावीत असतात. राजकीय कायद्यांपेक्षां वरिष्ठ कायदा मुख्यत्वें म्हटला म्हणजे धर्म होय. व त्या कायद्याची अम्मलबजावणी करणारा राजा म्हटला म्हणजे

त्या त्या धर्मांतील धर्मगुरु होय. हे शंकराचार्य, पोप, लामा इत्यादि निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत.पाप कोणतें आणि पुण्य कोणतें हें ठरविण्याचें काम धर्मगुरूचें व राजांचें असें दोघांचेंही असतें. त्यांत मतभेद उत्पन्न झाला ह्मणजे अर्थात् कांहीं लोक या पक्षाला व कांहीं त्या पक्षाला मिळून तंट्याला सुरवात होते. व अशा रीतीनें राजाला एक जबर प्रतिपक्षी उत्पन्न होतो, व राजाच्या पक्षापेक्षां धर्माच्या पक्षाला नेहमीं जास्ती बळकटी असते. ज्या मानानें राजापेक्षां देव श्रेष्ठ त्या मानानें राजकीय पक्षापेक्षां धार्मिक पक्षाला जोर जास्त. म्हणून राजांनीं ह्या धार्मिक बावटळीला फार भिऊन वागलें पाहिजे, व त्यासाठीं होतां होईल तों ह्यांनां वर डोकें काढूं देतां कामा नये. मोंगल लोकांचें हिंदुस्थानांतील राज्य मोडकळीस आलें ह्याचें मुख्य कारण हें होय कीं अवरंगजेबाचे कारकीर्दींत मुसलमानांनीं हिंदूंचा धार्मिक बाबतींत फार छळ केल्यामुळें हिंदूंचीं धर्मबुद्धि जागृत झाली, हिंदूंतील साधुसंतांच्या तोंडून धर्माचें वारें सर्व लोकांच्या मनांत शिरलें, व त्या धर्माच्या एकवटलेल्या जोमाचें आविर्भवन शिवाजीच्या रूपानें होऊन साऱ्या मोंगल पाच्छाईची दाणादाण उडून गेली. यासाठीं आपल्या राज्यांतील लोकांची धर्मावर, धर्मगुरूंवर आणि देवावर जितकी श्रद्धा कमी असेल तितकी राज्याला बळकटी जास्त. म्हणून धर्माचें बंड होतां होईतों आपल्या राज्यांत कोणत्याही राजानें वाढूं देऊं नये. प्रजेंतील इतर व्यक्तीप्रमाणेंच राजा ही एक व्यक्ति आहे, व ज्या सामाजिक आणि राजकीय नियमांनीं सामान्य लोक बांधलें जातात त्याच नियमांनीं राजाही बांधला जाण्याला पात्र आहे, व इतरांप्रमाणेंच त्यानें गुन्हा केला असतां त्यालाही शिक्षा दिली पाहिजे, हें समतेचें तत्त्वही राजाच्या शक्तीला प्रतिबंध करण्याला कारण होतें. राज्याचे विभाग झाल्याचे योगानेंही पुष्कळ वेळां राज्यें मोडकळीस येतात. व्यवस्थेसाठीं विभाग जरी जरूर असले तरी त्यांचा परिणाम अखेरीस असा होतो कीं, प्रत्येक विभागांत थोडीशी शक्ती आल्याबरोबर तोच स्वतंत्र होऊं पहातो. व इसाबनीतींतील गोष्टीप्रमाणें आपलेच हातपाय आपल्या पोटाविरूद्ध बंड करूं लागतात. दक्षिणेंतील मुसलमानांच्या राज्याचे प्रथमतः पांच विभाग झाले, व अखेरीस ते सर्वच लयाला गेले.

पैशाची टंचाई हें तर कोणत्याही संस्थेप्रमाणें राज्यालाही खड्ड्यांत ढकलण्याला आणखी एक कारण आहे. राज्यांतील नोकर लोकांचे प्रंपचाची उत्तम सोय होईल तरच ते एकाग्रतेनें सरकाराची चाकरी करण्याला तत्पर होतील. नोकर लोकांना पगार पुष्कळ देणें व तो वेळच्या वेळेवर देणें हें इतर खात्यांतून तर आवश्यक आहेच, परंतु या बाबतींत लढाईतील शिपायांविषयीं तर फारच काळजी घेतली पाहिजे. हिंदुस्थानांतील अलीकडच्या दोनचारशें वर्षांतील नेटिव्ह राजांचा इतिहास आपण वाचूं लागलों तर असें आढळतें कीं सैन्यांतील शिपायांचे पगार अतिशय तुंबलेले असावयाचे, पगारासाठीं आरबांनीं आपल्या धन्याच्या वाड्याला वेढा देऊन बसावयाचें, व कोठें लढाईवर जावयाचा प्रसंग आला तर पगार नाहीं म्हणून मागें पाय घ्यावयाचा, असले प्रकार पूर्वी फार होत असत. ह्यामुळें राजे आणि राज्यें धडाधड खालीं कोसळून पडत. हल्लीच्या इंग्रजी राज्यांत घेण्यासारख्या ज्या कांहीं गोष्टी आहेत, त्यांत मुख्य ही होय कीं सैन्यांतील शिपायांचे पगार वेळच्या वेळीं चुकते करण्यांत येत असतात. लोकांवर करांचें आणि कर्जाचें कितीही ओझें पडलें तरी हरकत नाहीं, पण लष्करांतील शिपायांची मिजास काडीइतकीही कमी होऊं द्यावयाची नाहीं, हें तत्त्व खरोखरच फार शहाणपणाचें आहे. कारण, राजाचें सर्व राज्य ह्या शिपाई लोकांच्या हातीं असतें. हे लोक जसे शत्रूला मारूं शकतील तसेच बिथरले तर राजाला मारूं शकतील. कारण, हेच बिघडले म्हणजे युद्धकला, शस्त्रास्त्रें वगैरे सर्व ह्यांच्याच बाजूला; व राजाच्या बाजूला राजाच काय तो एकटा. असले दुर्धर प्रसंग शेवटच्या रोमन बादशहावर अनेक वेळां आलेले आहेत. ते टाळण्यासाठीं आपल्या लष्कराला खूष ठेवणें फार जरूरीचें आहे. व त्यासाठीं पैसाही जरूर आहे. अशा वेळीं राजाच्या स्वतःच्या तिजोरींत पैसा नसला म्हणजे त्याला दोनच मार्ग काय ते खुले असतात. रयतेपासून जबरदस्तीनें किंवा युक्तीनें पैसा घेणें किंवा शिपायांचा पगार तुंबवून ठेवणें. ह्यापैकीं कोणत्या मार्गाचें अवलंबन राजांनीं करावें हें सांगावयास नकोच. कारण रयतेच्या नाखुषीपेक्षां शिपायांच्या नाखुषीला राजांनीं जास्त भ्यालें पाहिजे हें वर सांगितलेंच आहे. शिवाय शिपायांना खूष केलें, आणि सांगितलें कीं अमक्यांचीं घरें लुटून आणा तर ते आपल्या राजाला वाटेल तितकी संपत्ति

आणून देतील. आपल्या जुन्या राजांना आपल्या रयतेला नाखुष करण्याचें जिवावर येई. म्हणून प्रसंगविशेषीं त्यांच्या शिपायांचा पगार तुंबून राही. पण ह्या चुकीमुळें ते आज आपलीं राज्यें गमावून बसले. रयतेंत जोर असला तर रयतेपासून पैसे उकळण्याचें कामही राजाला बरेंच जड जातें. इंग्लंडांतील पहिल्या चार्लस राजाची अशाच जबरदस्त रयतेशीं गांठ पडल्यामुळें अखेरीस त्याच्या प्राणावरही बारी येऊन बेतली. पण अशी रयत फार विरळा. सगळ्याच ठिकाणीं असे खट्याळ लोक नसतात. तेव्हां होतां होईल तों राजानें आपल्या शिपायांना खूष ठेवण्यासाठीं रयतेपासून लागतील तितके पैसे घ्यावे व पैशाची टंचाई आहे असें आपल्या शिपायांच्या स्वप्नांतही येऊं देऊं नये. स्वतः राजापाशी पैसा नसतां त्याच राज्यांतील एकाद्या विशिष्ट व्यक्तीपाशीं विपुल द्रव्य असणें हेंही इष्ट नव्हे. यासाठीं असल्या लोकांनाही गरीब करून सोडणें जरूर आहे.

राष्ट्राचा अवाढव्य विस्तार होणें हेंही एक त्याच्या नाशाला फार जबरदस्त कारण होतें. प्रत्येक देशाला बहुतकरून कांहींना काहीं तरी स्वाभाविक मर्यादा असतेच. मोठमोठ्या नद्या, समुद्र, डोंगराच्या ओळी किंवा पर्वतांच्या रांगा ह्यांनीं बहुधा कोणत्या देशाचा किती विस्तार असावा हें आधींच ठरवून ठेविलें आहे. पण कधीं कधीं मनुष्याची महत्त्वाकांक्षा समुद्र आणि पर्वत ह्यांच्याही आज्ञा जुमानीत नाहीं. पण समुद्र आणि पर्वत हे मोठ्या खुनशी आणि हट्टी स्वभावाचे आहेत. त्यांची आज्ञा ऐकलीच पाहिजे. ऐकली नाहीं तर ते रागावतात आणि गर्वानें फुगलेल्या मनुष्याचा ताठा नाहींसा केल्यावांचून कधींही स्वस्थ बसत नाहींत. आपल्या पुराणांत अशी एक गोष्ट आहे कीं विंध्य पर्वतानें आपलें डोकें वर उचलून प्रत्यक्ष सूर्याच्याही गतीचा अवरोध करण्याचा प्रयत्न केला होता. मग हे पर्वत मनुष्याच्या महत्त्वाकांक्षेला आळा घालण्याला कमी करतील काय ? डॅन्यूब, र्‍होन, युफ्रेटिस व टायग्रीस ह्या नद्या ‘ तुम्ही येथेंच थांबा, ह्याच्या पुढें जाऊं नका, ’ असें रोमन लोकांना बजावीत होत्या. पण त्यांनीं तें ऐकिलें नाहीं. तेव्हां मग त्या नद्यांनीं जें करावयाचें तें केलें. ॲटलाँटिक महासागर इंग्लंड मधल्या लोकांना अमेरिकेचा नाद्द सोडण्याविषयीं परोपरीनें समजावून सांगत होता. परंतु इंग्लिशांनीं तें ऐकिलें नाहीं. तेव्हां ॲटलाँटिक महासागर

रागावला आणि त्यानें इंग्लिशांचीं चहाचीं गलबतेंच्या गलबतें गट्ट करून टाकलीं. 'तुझें आमच्यावरचें राज्य आम्ही कधींहीं टिकूं देणार नाहीं,' असें पिरिनीज पर्वतावरील वाघ आणि बाल्टिक समुद्रामधील सुसरी, आल्प्स पर्वतावरील बर्फ आणि मॉस्को येथील थंडी नेपोलियनला सांगत होती. पण त्यानें त्यांचें न ऐकल्यामुळें त्याची काय दशा झाली हें इतिहास आज जगाला सांगतच आहे. हल्लींही हिंदुकुश पर्वत हिंदुस्थान सरकारला तशाच रीतीनें बजावीत आहे कीं वझीरी आणि आफ्रिडी लोकांवर मी तुमचें राज्य चालूं देणार नाहीं. व आपलें सरकार शहाणपणानें त्याचें सांगणें ऐकतील असा पुष्कळ रंग दिसत आहे. सारांश, सृष्टिजन्य मर्यादेपलीकडे समुद्राच्या लाटांवरून आणि पर्वतांच्या शिखरांवरून आपला राज्यशकट कोणी धावडवूं लागला तर ती गोष्ट सृष्टिनियमांना खपत नाहीं. ते सगळे सृष्टिनियम त्या राजाचें राज्य मोडकळीस आणण्याबद्दल गुप्तपणें खलबतें आणि कट करूं लागतात. व त्यांचा कट फुटल्यावांचून सिद्धीसही जातो. हे पर्वत आणि हे समुद्र रात्रंदिवस असल्या राजांच्या फॉरवर्ड पॉलिसीबद्दल राजद्रोहात्मक उद्गार काढीत असतात. आणि ह्यांच्या उद्गारांत विशेष वाईट असतें तें हें कीं सुधारलेल्या १२४ अच्या साहाय्यानेंसुद्धां त्यांचें पारिपत्य करितां येत नाहीं. देशाच्या स्वभावजनित सीमा हा तेथील राज्याचा पाया होय. त्या पायाच्या बाहेर अतिशय दूरवर जर वरील इमारतींचे खांब, तुळया आणि वांसे जाऊं लागले तर ती इमारत घडघडत खालीं कोसळल्यावांचून कशी बरें राहील ?

राज्यरूपी शरीराला क्षयरोग होण्याला आणखी एक कारण होत असतें तें असें कीं मनुष्याचा स्वभाव नेहमीं अनुकरणप्रिय आहे, त्यामुळें दुसऱ्या कोणत्या राष्ट्रांत राज्यक्रांति झाली म्हणजे आपणही तशीच करावी अशी इच्छा सहजच लोकांच्या मनांत उत्पन्न होते, आणि वाळलेल्या पातेऱ्यावर ठिणगी पडली म्हणजे ज्याप्रमाणें एकदम भडका उडून जातो त्याप्रमाणें जुलमानें वैतागून गेलेल्या लोकांचीं मनें स्वतंत्रता मिळविल्याच्या योगानें दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून एकदम बिथरून जातात. प्रकाशांत असा कांहीं जोर आहे कीं तो प्रत्येकाला हवा हवासा वाटतोच. व मग प्रकाशासाठीं धापा टाकणाऱ्या मनुष्याला आवरून ठेवणें फार दुर्घट होतें. ह्यासाठीं राजानें

होतां होईल तों लोकांना अंधकारांत बसवून ठेवावें हें फार चांगलें.

वर सांगितला हा दुसऱ्याच्या उदाहरणाचा परिणाम होय. पण उदाहरणें दोन प्रकारचीं असतात. कांहीं आपण प्रत्यक्ष पहातों व कांहींबद्दल कर्णोपकर्णी ऐकतों किंवा पोथ्यापुराणांतून अगर इतिहासांतून त्याबद्दल गोष्टी वाचतों. हीं जीं दुसऱ्या प्रकारचीं उदाहरणें हींसुद्धां फार भयंकर प्रकारच्या ज्वाळा उत्पन्न करतात. युरोपखंडांत जेथें जेथें लोकांनीं जुनीं राज्यें मोडकळीस आणून नवीन स्वतंत्रतेची स्थापना केली तेथें तेथें पाश्चिमात्य ग्रंथकारांचें असेंच मत आहे कीं ग्रीस आणि रोम ह्या देशांचे इतिहास वाचून त्या त्या लोकांना त्या त्या गोष्टी करण्याला स्फुरण चढलें. यासाठीं आपलें कल्याण इच्छिणाऱ्या राजानें ज्ञानाचा हा दरवाजाही घट्ट लावून टाकला पाहिजे. कारण; जो हा दरवाजा उघडा टाकतो तो आपल्या शत्रूला आपल्या घरांत बोलावतो असा अर्थ होय. येणेंप्रमाणें राज्य कशानें मोडकळीस येतें ह्याविषयीं यथाशक्ति थोडेंसें विवेचन करून आम्ही आज हा लेख संपवितों.

---

# वर्तमानपत्रांचा प्रसार : : : ११

हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचें राज्य नव्हतें तें झालें, पश्चिमेकडच्या सुधारणा पूर्वेकडे नव्हत्या त्या अमलांत आल्या, आणि जेथें चोहोंकडे ढग पसरलेले होते, व रात्रीचा निबिड अंधकार पसरला होता तेथें सूर्याचे किरण चमकूं लागले. हें सर्व खरें. आपली राज्यरूपी इमारत सहसा ढांसळून पड-

णार नाहीं इतक्या मजबूत आणि खंबीर रीतीनें पायाचा दगड बसविण्याच्या कामांतून मोकळें झाल्यानंतर इंग्रज सरकारनें हिंदुस्थानांतील लोकांना शिक्षण देण्याचा कारखाना काढला. त्या कारखान्यांतून आजपर्यंत बराच माल बाहेर पडला, हेंही खरें आहे. तरी पण मोठ्या कष्टानें असें म्हणावें लागतें कीं वळिवाच्या पावसाप्रमाणें ह्या विद्यादानानें वरवरची जमीन मात्र कोठें कोठें भिजलेली आहे, बाकी आंत सर्व कोरडें आहे. समाजांतील जे अगदीं वरवरचे थर त्यांच्यांत मात्र कोठें जरासा ओलावा मुरलेला दिसतो. पण चांगलें पीक येण्याला जमीन खोलपर्यंत भिजली पाहिजे. उन्हाळ्यांतल्या एखाद्या ओझरत्या पावसाच्या सरीनें लोकांच्या उपयोगी पडणारें धान्य कधींच पिकत नसतें. खालच्या थरांनांही पाणी पोहोंचावें अशा हेतूनें सरकाराकडून प्रयत्न झाले. मोठ्या शहरांतून सरकारनें ज्याप्रमाणें हायस्कुलें आणि कॉलेजें स्थापिलीं त्याप्रमाणेंच खेडेगांवांतून प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापिल्या. पण त्याचा व्हावा तसा उपयोग झालेला दिसत नाहीं. ह्या कामांत सरकारची खटपट निष्फळ झाली आहे. व सरकारच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं. पण जेथें सरकारची खटपट सफळ होण्याचा संभव आहे, म्हणून जेथें सरकारच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं तेथें आपल्या प्रयत्नोला यश आणून दाखविण्याकरितां लोकांनीं पुढें सरसावलें पाहिजे. कारण, सरकार जरी सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान असलें तरी कांहीं अद्भुत गोष्टी ज्या सरकारला असाध्य अशा ठरल्या आहेत त्या लोक सुसाध्य करूं शकतील. सरकाराच्या प्रयत्नांना अपयश आलें, व लोकांचे प्रयत्न यशस्वी होतील असें मानण्याला कांहीं अंतर्गत कारणेंही आहेत. सरकार हें एक यंत्र आहे. कापसाचे गठ्ठे एका टोंकाला टाकले म्हणजे दुसऱ्या टोंकाला सुताचे गठ्ठे बाहेर काढून द्यावयाचे एवढें त्या यंत्राला समजतें. तसें सरकारचें एकदां मत ठरलें कीं प्राथमिक शिक्षण द्यावयाचें. त्याप्रमाणें लगेच शिकविणारे मास्तर तयार झालें; आडगांवांतून शाळांच्या इमारती उभ्या राहिल्या; आणि हजेरीपटांतून रामजी वल्लद सख्या चांभार, सुडक्या बिन ग्यानू महार इत्यादि मुलांचीं नांवें झळकूं लागलीं; मुलांच्या वार्षिक परीक्षा होऊं लागल्या; मुलांना बक्षिसें मिळालीं, शाळांचे रिपोर्ट कनिष्ठांकडून वरिष्ठांकडे गेले; बजेटांत रकमा खर्चीं पडल्या; आणि प्राथमिक शिक्षणाची द्वाही सिमल्यापासून

वेस्टमिनिस्टर हॉलपर्यंत चोहोंकडे फिरली. तरी पण आमचा राम्या चांभार आणि सुडक्या महार हे पूर्वीच्या इतकेच अक्षरशत्रू अजूनही आहेतच. हिंदुस्थानांतील तीस कोटी प्रजेपैकीं एकही असा मनुष्य नसेल कीं ज्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें सरकाराला कर द्यावा लागत नाहीं, पण ह्यांपैकीं सरकारानें ज्यांच्या शिक्षणाची योग्य कळकळ घेतली नाहीं असे हतभाग्य प्राणी किती बरें असतील ! पण ह्यांत सरकारचा फारसा दोष नाहीं. तरी पण एवढें मात्र खास म्हणतां येईल कीं ह्या बाबतींत सरकारची दिशा चुकलेली आहे. आमच्या समाजांतील खालच्या वर्गांतील लोकांना शिक्षण मिळालें पाहिजे हें खरें. पण तें शिक्षण म्हणजे 'कुत्र्याला शेंपूट असतें,' आणि 'गाढव हा फार सोशिक आणि निरुपद्रवी प्राणी आहे,' असलें नव्हे. त्यांना वाचतां येवो किंवा न येवो, त्यांना आपल्या नांवाची सही करतां येवो किंवा न येवो. आपलें नांव लिहितां येणें आणि तें लिहिलेलें वाचतां येणें हा कांहीं या संसारांतील मोक्ष नव्हे. ज्यांना पांढऱ्यावर काळें करण्याचें कधीं जन्मांतही ठाऊक नव्हतें त्यांच्या हातून महापंडितांच्या पांडित्याला गप्प बसावयाला लावणारीं महत्कृत्यें झालेलीं आहेत. ज्यांना लिहितां येत नव्हतें ते कारकुनांनीं लिहिलेल्या आज्ञापत्रकांवर आपला हात रक्तांत बुडवून आपलें शिक्कामोर्तब करीत असत. आणि ज्यांना एक अक्षरही वाचतां येत नव्हतें ते परमेश्वराच्या गळ्यांतले ताईत होऊन राहिलेले आहेत. प्रत्येक अडाणी मनुष्याला लिहावयाला आणि वाचावयाला शिकवून नंतर त्यानें दुसऱ्याचे ग्रंथ वाचावे आणि आपले लिहावे ही गोष्ट निदान हिंदुस्थानासारख्या अवाढव्य आणि मागासलेल्या देशांत अशक्य आहे, असें सरकारच्या आजपर्यंतच्या मार्ग चुकलेल्या प्रयत्नांनीं जगाला दाखवून दिलें आहे. येथें साहजिकच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं इंग्रजांच्या पायांनीं ही भरतभूमि अलंकृत होण्याच्या पूर्वी हें खालच्या वर्गांतील लोकांच्या शिक्षणांचें काम कोणत्या रीतीनें होत होतें. त्या वेळीं धुळपाटी पुढें ठेवून बसलेल्या कांहीं मुलांना मात्र तात्या पंतोजी 'बेकं बे' आणि 'गण्या गण्या गणपति चारी कमळें झळकतीं' ह्यांचें शिक्षण देत असत. बाकीच्या लोकांना ह्याचाही बहुतेक अभावच असे. तरी पण एकंदर राष्ट्राची स्थिति वाईट नव्हती. ह्या जगांतील लोकयात्रेला निरुपयोगी अशा गोष्टी त्या

वेळेच्या लोकांना आतांच्या लोकांप्रमाणें माहीत नसतील; पण सर्व उपयोगी गोष्टी त्यांना खास कळत असल्या पाहिजेत ह्यांत संशय नाहीं. शिक्षणापासून होणारें कार्य त्या लोकांच्या ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत होतें. ह्यावरून अर्थात् त्या कार्यांचें कारणही कोणत्या तरी रूपानें त्या वेळीं अस्तित्वांत असलें पाहिजे, असें सिद्ध होतें. आतां तें रूप कोणतें होतें ह्याचा शोध करून पहाणें जरूर आहे. पूर्वी लोकशिक्षणाच्या कामीं केशवशास्त्री पुराणिक आणि गोविंदबुवा हरदास हे तात्या पंतोजीला बरीच मदत करीत असत असें दिसतें. तात्या पंतोजीच्या वर्गांतून मुलें निघालीं म्हणजे तीं बहुधा वर निर्दिष्ट केलेल्या केशवशास्त्री आणि गोविंदबुवा ह्यांच्या वर्गांत आपला विद्याभ्यास आमरणांत चालवीत असत. धार्मिक आणि राजकीय, ऐहिक आणि पारमार्थिक, शास्त्रीय आणि लौकिक, सर्व प्रकारचें शिक्षण ह्या वर्गांतून लोकांना मिळत असे. व त्या शिक्षणाच्या जोमाप्रमाणें शिष्यांच्या हातून अतिशय मर्दुमकीचीं आणि निष्काम भक्तीचीं कामें होत असत. मोठ्यापासून तों लहानांपर्यंत, श्रीमंतांपासून तों गरीबांपर्यंत, ब्रह्मवृंदापासून तों अत्यंजापर्यंत, स्त्रियांना आणि पुरुषांना सर्वांना ह्या रीतीनें अवश्य लागणारें शिक्षण मिळत असे. पूर्वींच्या स्त्रियांना पियानो वाजवितां येत असो वा नसो, त्यांना आपण आपल्या धर्माप्रमाणें वागावें, आपल्या पतीला आपलें परमपूज्य दैवत मानावें, आणि आपल्या देशावर प्रेम करावें एवढ्या अवश्य गोष्टी कळत होत्या. व त्यांनीं जरी पाश्चिमात्य इतिहासाचें परिशीलन केलेलें नव्हतें तरी आपल्या राजाचा जीव संकटांत टाकून स्वतःचा जीव बचाविण्यासाठीं घरीं पळून येणाऱ्या नवऱ्याला 'यापेक्षां मेला असतां तर काय वाईट झालें असतें ?' असें म्हणण्याचें त्यांना ज्ञान होतें. चाफाजीला आपली सही करितां येत होती किंवा नाहीं हें कोण जाणें व 'एक्या लहान काळ्या मुंगीला गवसला बहू थोर' ह्या उत्तम काव्याचा रसास्वाद त्यानें घेतला होता किंवा नाहीं हेंही कोण जाणें. तरी पण देशाभिमान आणि स्वामिभक्ति ह्या मनुष्याला अवश्य लागणाऱ्या गोष्टी त्या अडाणी कुळंबट नारायणरावाच्या हुजऱ्याला कळलेल्या होत्या. व खिस्ती लोकांचा अनुग्रह दुर्दैवानें न झाल्यामुळें हिंदुधर्माच्या अतिशय नीच जातींत असूनही रोहिदास चांभाराला प्रसंग आला तेव्हां रापीनें पोट फाडून आंतलें जानवें दाखवितां आलें. इतकें धर्मतत्त्व

मागासलेल्या जातींतील एका चांभाराच्या मनांत शिक्षणावांचून बिंबलेलें होतें. असलें शिक्षणाच्या नांवाच्या भपक्यावांचून पूर्वीचें शिक्षण होतें. पण इंग्रजांच्या अमलामुळें, सुधारकांच्या नास्तिकपणामुळें आणि दुर्दैवाच्या अवकृपेमुळें तसल्या शिक्षणाचीं साधनें हल्लीं नष्टप्राय होत चाललीं आहेत. फलद्रूप होणारीं नवीं साधनें मिळालीं नाहींत, आणि जुनीं मात्र लयाला गेलीं. पलीकडचें तीर गांठलें नाहीं आणि अलीकडच्या तीरावरचे पाय मात्र सुटून गेले. स्वर्गलोक लाधला नाहीं आणि मृत्युलोकांची वस्ती खुंटली. अशा स्थितींत लोकांनीं धीर धरून पुन्हां एकदां पुढें सरसावलें पाहिजे. सरकार लोकशिक्षणाचें काम करीत आहे पण त्याना ठेंच लागलेली पाहून आपण शहाणें झालें पाहिजे आणि त्यांच्या चुका पाहून आपण आपल्या दिशेंत बदल केला पाहिजे. असो. आतां ही दिशा कशी बदलावयाची व खालच्या वर्गांतील लोकांच्या शिक्षणासाठीं इतरांनीं काय करावयाचें ह्याचा विचार करूं.

लोकशिक्षणाच्या कामीं सरकारचे प्रयत्न आजपर्यंत बहुतेक अंशीं कसे निष्फळ झाले आहेत हें सांगितलें. आतां हेंच काम हातांत घेऊन त्यांत यश मिळविणें हें लोकांना कसें करतां येईल ह्याचा विचार करावयाचा आहे. ज्या लोकांना शाळेंत पांच पांच तासपर्यंत बसून वेळ फुकट दवडण्याला सवड नसेल त्यांना अन्य तऱ्हेनें शिक्षण देण्याला लोकांनीं इतउत्तर प्रारंभ केला पाहिजे. व जें शिक्षण शाळेच्या चार भिंतीच्या आंत लोकांना मिळूं शकत नाहीं तें चावडीवर, चवाठ्यावर, किंवा देवळांतून देण्यास सुरवात झाली पाहिजे. स्वतः पुस्तकें वाचावीं आणि शहाणें व्हावें हा हल्लींच्या शिक्षणपद्धतीचा क्रम आहे. परंतु ज्ञान मनुष्याच्या मनांत एकाच मार्गानें प्रवेश करितें असें नाहीं. डोळ्यानीं ज्ञानाचे भारेच्या भारे कोणाच्या मनांत वाहून आणून टाकले, तर कोणाचें मन उन्नत करण्याला कानही आपले दरवाजे उघडतात आणि ज्ञानाचा सारा ओघच्या ओघ हृदयांत सांठवून घेतात. ज्ञानसंपादन करण्याच्या कामांत डोळे आणि कान हीं दोन इंद्रियें इतर इंद्रियांपेक्षां मनुष्याला पुष्कळ अधिक मदत करितात. तरी पण त्यांतल्या त्यांत कानांची कामगिरी अल्प आयासाची आणि पुष्कळ फायद्याची असते. जेथें ज्ञान देण्याच्या कामीं डोळे हातपाय टेंकतात तेथें कान

पुढें सरसावून मनुष्याला ज्ञानसंपन्न करितात. डोळ्यांनीं विद्यार्जन करावयाचें म्हणजे अतिशय त्रासाचें वाटतें, पण कर्णपुटानें ज्ञानामृत पितांना मनाला एक प्रकारचा आल्हादच होत असतो. ह्या व अशाच दुसऱ्या अनेक कारणांसाठीं कानाच्या वाटेनें ज्ञानाला हृदयमंदिरांत घेणें फार सोईचें झालें आहे. डोळ्यांनीं एक पुस्तक एकटाच मनुष्य वाचूं शकतो. पण कानांच्या साधनाचा उपयोग करावयाचा असें म्हटलें तर एकाच वेळीं एकच पुस्तक हजारों लोकांनाही वाचतां येतें. हायड्रॉलिक प्रेसप्रमाणें एकपट जोर एका बाजूला खर्च केल्यास दुसऱ्या बाजूला त्याच्या किती तरी पटीनें जोर उत्पन्न होतो. असें जर हें अद्भुत यंत्र परमेश्वरानें आपल्या हातांत देऊन ठेविलें आहे तर त्याचा लोकशिक्षणाच्या कामीं उपयोग न करणें हें रास्त होईल काय? कधींही होणार नाहीं. पूर्वींचे हरदास, पुराणिक, पोवाडे गाणारे, तमासगीर, भजनी अभंग म्हणणारे साधुसंत, आणि उपदेश करणारे गुरु, हें ह्याच साधनांचा उपयोग करीत असत. तसा आपण हल्लीं कां करून घेऊं नये? ह्या जुन्या साधनांत आणखी कांहीं नवीन साधनांचीही सुदैवानें भर पडली आहे. वर्तमानपत्रें आणि व्याख्यानें ह्यांचा वर निर्दिष्ट केलेल्या दिशेनें पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याला आपलें नांव लिहितां आणि वाचतां येऊं लागलें तर चांगलें खरें. पण निदान त्याला आपण पूर्वीं कोण होतों, हल्लीं कसे आहों, आपली स्थिति काय आहे, आपला राजा कसा आहे, आपला धर्म कोठें आहे, आपला देश कशांत पडला आहे, इत्यादि गोष्टी कळणें अत्यंत जरूर आहे, व त्या त्याला हल्लींचीं वर्तमानपत्रें शिकवूं शकतील. पण तीं आडगांवांतील अशिक्षित लोकांना वाचतां येत नाहींत. हल्लींच्या वर्तमानपत्रांच्या वाचनाबद्दलची अशी स्थिति बहुधा झालेली आढळते कीं ज्यांचीं मनें त्याच त्याच गोष्टी फिरून फिरून ऐकून अगदीं निगरगट्ट बनून गेलीं आहेत त्यांच्या घरीं दररोज वर्तमानपत्रांच्या राशीच्या राशी येऊन पडतात, आणि आपल्या दुःस्थितीची हकीकत एकदां ऐकली तरी ज्यांच्या मनाची तळमळ दहा दिवसही जावयाची नाहीं अशा आडगांवांतील खालच्या प्रतीच्या लोकांच्या कानांवर त्या वर्तमानपत्रांतील एक अक्षर चुकूनदेखील पडत नाहीं ह्याला कांहीं तरी उपाय योजणें अवश्य आहे. ज्यांना वर्तमानपत्रें वाचतां येत

नाहींत त्याना तीं वाचून दाखविणारे कोणी नाहींत काय ? आजपर्यंत नसले तरी याच्या पुढें तरी निदान असे कोणी निघूं शकणार नाहींत काय ? आड-गांवांत ज्यांना पंचांगाचें ज्ञान नाहीं त्यांना 'आज पित्रें आहेत, उद्यां दिवाळी आहे, परवां संक्रांत आहे,' असें सांगणारें जोशी आढळतात. त्याचप्रमाणें त्यांची स्थिति कशी आहे हें सांगणारे जोशी कोणी निघूं नयेत काय ? हल्लींचे कांहीं कांहीं मराठी शाळेवरील मास्तर पांच पांच रुपयांवर सहा सहा तास पोरें हांकलण्याचें काम करीत असतात. त्यांनीं आपल्या लोकशिक्षणाची दिशा बदलून 'ऊठ, बस, कर, मर,' हीं उदात्त तत्त्वें आपल्या छात्रवर्गाच्या मनावर ठसविण्याचें सोडून देऊन दुसऱ्या कांहीं नवीन मार्गाचें अवलंबन केल्यास स्वतःला पांच रुपड्यांपेक्षां अधिक द्रव्य-प्राप्ति व दुसऱ्यांना 'ऊठ, बस'-पेक्षां अधिक ज्ञानप्राप्ति होणार नाहीं काय ? प्रत्येक आडगांवांतील लोकांना केव्हां तरी एकत्र जमवून त्यांना वर्तमानपत्रें ( व इतर पुस्तकेंही ) वाचून दाखविण्याचा कोणी क्रम सुरू केल्यास त्यांत तो स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही चालविणार नाहीं काय ? दिवसाचा काम-धंदा आटपल्यावर रात्रीं प्रत्यहीं दोन घटका जरी लोकांनीं ह्यांत मोडल्या तरी त्या अनाठायीं गेल्या असें कधीं होणार नाहीं. आडगांवांतील लोकांना एकत्र जमण्याला रात्रीची वेळ सोईची असते. तरी पण दिवसाही कधीं कधीं त्यांनीं एकत्र जमावें. असल्या प्रसंगाला नेहमीं धार्मिक महत्वाचे दिवस पसंत करणें इष्ट असतें. 'आपण आदित्यवारीं एकत्र जमूं,' ह्या वाक्यांत हिंदूच्या मनाला कांहीं अर्थबोध होत नाहीं. पण 'आपण एकादशीला देव-ळांत जमूं, किंवा शिवरात्रीच्या दिवशीं नदीच्या कांठावर जमूं,' ह्या वाक्यांत भाविक हिंदूच्या मनाला समजणारा असा पुष्कळ अर्थ आहे. उपवासाचे दिवस मनुष्याच्या मनाला पवित्रपणा आणीत असतात, आणि त्यांच्या उदात्त विचारांना उत्तेजन देत असतात. हजारों वर्षांची आणि लाखो लोकांची धर्मश्रद्धा ह्या पवित्र दिवसांना पाठबळ देण्याला त्यांच्या मागें उभी असते. म्हणून जेथें दररोजचा प्रसंग साधत नसेल तेथें असले तरी प्रसंग साधण्याचा अवश्य प्रयत्न केला पाहिजे. आडगांवांतील लोकांना एकत्र जमण्याला चावडी, किंवा पाटलाचें अंगण, किंवा देवळाचा सभामंडप, किंवा रानांतील एखादें प्रशस्त मैदान, ह्या जागा उत्तम होत. ह्या कामीं

लागणारा थोडाबहुत पैसा गांवकऱ्यांनीं जमवावा, परंतु ह्या कृत्याला बरीचशी मदत गांवांतील सावकारांकडूनच झाली पाहिजे. सावकार हेच आपल्या गांवचे सरकार होत. त्यांनीं जर उदार मनानें आणि सढळ हातानें गांवच्या लोकांची मनें आपणांकडे आकर्षण करून घेतलीं तर मग तें काय करूं शकणार नाहींत ? इतकें महत्व ज्यांच्यापासून आपल्याला मिळणार त्यांच्यासाठीं कांहीं पैसे खर्च करणें हें सावकारांचें कर्तव्यकर्म आहे. परंतु अशा कामीं त्यांच्या सुशिक्षित बंधूंकडूनही त्यांना पुष्कळ मदत झाली पाहिजे. जेथें गरीब, अडाणी आणि अशिक्षित अशा लोकांना वाचून दाखविण्यासाठीं वर्तमानपत्रें पाहिजे असतील तेथें तीं त्यांना फुकट मिळणें जरूर आहे. गिरणींतून मजूर सुटले, शाळांतून मुलें बाहेर पडलीं, नदीच्या कांठीं स्नानाला बायकापुरुष जमा झाले, तीर्थांच्या ठिकाणीं यात्रेकरू आले, कामधंदा आटपून शिळोप्याच्या गप्पा सांगण्याला चार लोक एके ठिकाणीं बसले, म्हणजे त्या त्या ठिकाणीं असले आखाडे असले पाहिजेत. पुष्कळ लोक चाकरी चाकरी करीत ह्या बंगल्यावरून त्या बंगल्यावर घिरट्या घालीत असतात. जर असले लोकशिक्षणाचे काम हातीं घेऊन एखाद्या गांवीं ते वास्तव्य करून राहिले तर साहेबांचे दहा रुपये आणि पन्नास शिव्या ह्यांच्यापेक्षां कांहीं जास्ती दरमहा त्यांना तेथें पडणार नाहीं काय ? प्रत्येक गांवोगांवीं अशा प्रकारच्या नद्या भरलेल्या असून व देवानें आपल्याला हात दिलेले असून आपली तहान दुसऱ्याच्या ओंजळीवर शहाण्या माणसानें काय म्हणून ठेवावी. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें पुराणिक लोक चातुर्मास्यांत एक एक गांव आपल्या ताब्यांत घेऊन तेथल्या लोकांना राजकीय, धार्मिक, सामाजिक वगैरे बाबतींत शिक्षण देत आलेले आहेत. त्या तत्त्वाचाच अंगीकार करून व त्यांत कालमानाप्रमाणें कांहीं सुधारणा करून तोच क्रम पुढें चालवावयाचा आहे. लोकशिक्षणाच्या शाळेंतील असिस्टंट मास्तर, हरिदास, पुराणिक, उपदेशक, बहुरूपी, तमासगीर, गारुडी, गाणीं ह्मणणारे भिक्षेकरी, बाळसंतोष, कानफाटे गोसावी, मनाचे श्लोक ह्मणणारे वारकरी रामदासी, अभंग म्हणणारे वारकरी वगैरे अनेक आहेत. ह्यांच्यापासूनही प्रस्तुत कार्याला पुष्कळ मदत होण्यासारखी आहे. पण त्यांचा विचार सध्यांच नको.

---

# मराठी भाषेची लेखनपद्धति : : : १२

शिरोभागीं लिहिलेल्या विषयाची अलीकडे कांहीं दिवस बरीच चर्चा होऊं लागली आहे. कित्येक वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून ह्या विषयावर कांहीं लेखही प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत रा. रा. काशिनाथ नारायण साने, रामचंद्र परशुराम गडबोले व शंकर रामचंद्र हतवळणे यांनीं १० जुलई व १० ऑगस्ट या तारखेचे दोन लेख प्रसिद्ध करून आमचेकडे अभिप्रायाला पाठविले आहेत. त्याबद्दल सुचलेले कांहीं विचार वाचकांपुढें मांडण्याचा आज आमचा मानस आहे.

मराठी भाषेची लेखनपद्धति हा विषय फार महत्वाचा आहे व त्याजकडे विद्वान् लोकांचें जितकें लक्ष जावें तितकें आजपर्यंत गेलेलें नव्हतें, हीं दोन्ही विधानें खरीं आहेत. पण हीं सर्वथैवच खरीं आहेत असें नाहीं. मराठी भाषेच्या राज्यांत आतांपर्यंत सर्वच बेबंदशाही चालली होती आणि आतां मात्र तेथें इंग्रजी राज्याची सुव्यवस्थित स्थापना होणार असें नाहीं. आजपर्यंतही लोकांनीं मराठी भाषेंत बऱ्यावाईट रीतीनें शुद्ध ग्रंथ लिहिले आहेत. परंतु जगांत बहुधां असें दिसून येतें कीं आपल्याला नवीन कांहीं गोष्ट करावयाची असली म्हणजे जुन्याला सडकून नांवें ठेविलीं पाहिजेत. इंग्रजी अम्मल लोकांना आवडता करावयाचा म्हणजे पेशवाईत न्याय नव्हता, मोंगलाईत जीवित आणि मालमत्ता ह्यांना सुरक्षितपणा नव्हता, व पूर्वींच्या कोणत्याही रियासतींत हिंदुस्थानांतील लोकांना स्वातंत्र्याची कल्पना नव्हती, असले चारगट प्रलाप काढावे लागतात. सम्मतिवयाचा कायदा पास करवून घ्यावयाचा म्हणजे बदरीकेदारापासून रामेश्वरापर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत हिंदुस्थानांतील सर्व पुरुष बारा वर्षांच्या आंतील

आपल्या कोवळ्या अबलांवर संभोगाचा कहर करण्यांतच रात्रंदिवस गर्क होऊन गेलेले असतात, असाच चोहोंकडे भपका उडवून देण्याची सचोटीची पद्धत सुदैवानें पडलेली आहे. पण जो कांहीं थोडा घोंटाळा लेखनपद्धतींत माजला असेल तो काढून टाकणें जरूर आहे असें आमचेंही मत आहे. या कामांत वर लिहिलेल्या ज्या तीन गृहस्थांनीं पुढाकार घेतला आहे त्यांचे हातून त्यांचे पुढें असलेल्या प्रश्नांचा समाधानकारक रीतीनें निकाल लागेल तर खरोखर त्यांचे आभार मानणें जरूर आहे. ता. १० जुलईच्या लेखांत सदर गृहस्थांनीं ह्या विषयांतील कांहीं मुद्यांचा तात्त्विक दृष्टीनें विचार केला आहे. परंतु त्यांत कांहीं कांहीं वादाचीं स्थलें आहेत व तेथें मतभेद होणें हें अपरिहार्य आहे. तरी त्याबद्दल वरील सभ्य गृहस्थ क्षमा करतील अशी आशा आहे.

इतर भाषाप्रमाणें मराठी भाषाही कांहीं स्वतःच्या व कांहीं दुसऱ्याच्या भांडवलावर व्यापार करणारी एक पेढी आहे. ही जिच्यावर आपली देवघेव चालवितें ती सारीच रक्कम हिच्या घरची आहे असें नव्हे. हिचा मोठा सावकार म्हटला म्हणजे संस्कृत भाषा होय. अरबी, फारशी वगैरे सावकारांपासूनही हिनें कांहीं ऐवज आणिलेला आहे. पण त्या व्यवहाराला आज दोनशें वर्षें होत आलीं. त्यानंतर त्यांजपाशीं हिनें नवीन देवघेव कांहीं केली नाहीं. हल्लीं हिला एक नवीन सावकार भेटला आहे. त्यानें बाकीच्यांना हुसकून देऊन इतर ठिकाणीं जसें आपलें वर्चस्व बसाविलें आहे तसेंच अरबी, फारशी वगैरे दुकानाची सर्व खातीं बंद करून जो लागेल तो ऐवज आपणाकडून घेऊन जाण्याविषयीं यानें मराठी भाषेवर जबरदस्ती चालू केली आहे. मराठी भाषेंत इंग्रजींतून हल्लीं पुष्कळच शब्द येत आहेत. तरी पण मराठी भाषेंत संस्कृता इतका दुसऱ्या कोणत्याहि शब्दांचा भरणा नाहीं हें निर्विवाद आहे. याप्रमाणें अनेक भाषांतून मराठी भाषेंत शब्द आलेले असल्यामुळें परकीय शब्द कसें लिहावें हा एक वादाचा प्रश्न उभा राहतो. ह्याविषयीं दोन मतें आहेत. ते शब्द मूळ भाषेंत लिहिले जात असतील तसें मराठींत लिहावें हें एक मत; व तें मराठींतील नियमांप्रमाणेंच लिहावे, हें दुसरें मत. यांपैकीं वर निर्दिष्ट केलेल्या "त्रिमूर्तींचा दुसऱ्या मताकडे विशेष ओढा दिसतो. आमचे मतें हें बरोबर नाहीं

व ते कां बरोबर नाहीं ह्याबद्दचीं कारणेंही आम्ही सांगणार आहों. त्याचे पूर्वी हें सांगितलें पाहिजे कीं आम्हीं जें कांहीं सांगणार तें फक्त संस्कृत भाषेंतील शब्दानांच अनुलक्षून होय. आम्ही इतर भाषेंतील शब्दांबद्दल कांहींच अभिप्राय देत नाहीं, म्हणून त्याबद्दल डोळे मिटून चालावयाचें असें आमचें म्हणणें आहे. ज्यांना त्या भाषांचें ज्ञान असेल त्यांनीं त्याबद्दलही चर्चा करणें जरूर आहे. ज्यांना ज्या भाषांचें अंतर्बाह्य परिपूर्ण ज्ञान नाहीं त्यांनीं त्यांतील शब्दांशीं अव्यापारेषु व्यापार करीत बसावें हें कांहीं चांगलें नव्हे. वरील त्रिमूर्तीला अरबी, फारशी वगैरे भाषांचें ज्ञान असलेलें जगाला कधीं विदित झालेलें नाहीं असें असूनही त्या भाषांतील शब्दांबद्दल त्यांनीं कांहीं ठाम मतें दिलेलीं आहेत. तसलें धाष्टर्य करण्याची आमची इच्छा नाहीं व इतरांचीही नसती तर बरें झालें असतें.

आमचें मत असें आहे कीं संस्कृतांतील शब्द मूळचे ऱ्हस्व दीर्घ जसे असतील तसेच होतां होईल तों ते राखण्याचा मराठी भाषेंतील नियमांचा प्रयत्न असावा. आम्ही हा नियम सामान्यपणें असावा असें म्हणतों. परंतु कांहीं जणांची अशी कल्पना झालेली दिसते कीं नियम म्हटला म्हणजे तो नियमच झाला पाहिजे. त्याला अपवाद येतां उपयोगीं नाहीं. याच धोरणावर ते लोक असें म्हणूं लागतात कीं ह्या नियमाप्रमाणेंच वागावयाचें असेल तर मराठींत 'आत्मा' वगैरे शब्द 'आत्मन्' ह्याप्रमाणें लिहिले पाहिजेत, ते कां लिहित नाहींत, असें ते विचारतात. परंतु ही इष्टापत्तिच आहे असें आम्हीं ह्याचें उत्तर देतों. वरील त्रिमूर्तीनीं ता. १० ऑगष्ट रोजीं जें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे त्यांत 'शब्द कसा लिहावा' हें त्यांनीं लिहून दाखविलें आहे. त्यांतून आम्ही कांहीं येथें उदाहरणें देतों. 'अंगूळ,' 'अघटीत,' 'किल्मीष,' 'गणीत,' 'गोकूळ,' 'घटीत,' 'नापीत,' 'निमीष,' 'भावीक,' 'विपूळ' व 'व्याकूळ' हे शब्द निवळ संस्कृत आहेत. व ह्या प्रत्येकांतील उपांत्य स्वर संस्कृतांमध्यें ऱ्हस्व आहे. परंतु मराठी भाषेच्या हल्लींच्या पाणिनी–कात्यायन–पतंजलि ह्या मुनित्रयांनीं केलेल्या नियमांप्रमाणें ह्या शब्दांचे उपांत्य दीर्घच असले पाहिजेत असें ठरविण्यांत आलें आहे. ता. १० जुलईच्या चोपड्यांतील तेराव्या पानावर दुसरा नियम दिलेला आहे, तो असाः—'अंत्याक्षर अकारान्त असतां उपांत्य ऱ्हस्व इ व उ ह्यांचा

उच्चार दीर्घ करण्याची प्रवृत्ति आहे. तीप्रमाणें लिहिण्याचा परिपाठ ठेवावा.' ह्या सूत्राप्रमाणें वरील शब्दांत ऱ्हस्व उपांत्य दीर्घ करण्यांत आले आहेत. त्याच पृष्ठांतील पाहिल्या नियमाच्या प्रारंभीं एक अधिकारसूत्र दिलेलें आहे तें असें:–'मराठी भाषेच्या धोरणाविषयीं सामान्यतः विचार केला असता;' ह्या अधिकारसूत्रांची अनुवृत्ति दुसऱ्या सूत्रांतही घेतली पाहिजे असा रोख दिसतो. व ह्यालाच त्यांनीं दुसरीकडे 'Genius of the language' असें म्हटलें आहे. कांहीं ठिकाणीं मराठींत उपांत्य दीर्घ होत असला तरी या ठिकाणींही झालाच पाहिजे असें म्हणणें समंजसपणाचें आहे काय ? उत्सर्गाला अपवाद असूंच नयेत काय ? पण या तीन गृहस्थांना 'सोपी व ठरीव व्यवस्था पाहिजे.' तेव्हां यच्चयावत् उपांत्य दीर्घ लिहावे असा सरसकट नियम करून टाकला म्हणजे लेखनपद्धतींत सोपेपणा आला. ठरीव व्यवस्था आम्हांसही पाहिजे आहे. पण भाषेंत सोपेपणा आणणें हें कोणाच्या हातचें काम नव्हे. सोपेपणावरच दृष्टि द्यावयाची असेल तर रांजणांत मान अडकलेल्या माणसाची 'मान कापून टाका आणि व्हा चटकन् मोकळे' ही सोपी युक्ति सांगणाऱ्या दीड शहाण्यालाच आपण कां हंसावें ? अडचणी दूर करण्याचें खूळ हल्लींच्या काळांत फारच माजलें आहे. बालविधवांना फार अडचण पडते, तर करूं द्या त्यांना पुनर्विवाह. युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांना फार अडचण पडते; बरें आहे, त्यांच्या हप्त्याहप्त्यानें परीक्षा घेऊं. मराठी शाळेंतील मुलांना शुद्ध-लेखनाची अडचण पडते. असें काय, ठीक आहे. आजपासून एकसहा सर्व उपांत्य दीर्घ लिहित चला ! हा सोपेपणा झाला खरा. पण हें शुद्धलेखन नव्हे. अशुद्धच लिहावयाचें असेल तर सोपेपणांत याहीपेक्षां प्रगति करून दाखवितां येईल. फ्रान्स देशांत राजक्रांति झाल्यानंतर देशाचे पूर्वीचे विभाग बरोबर सारखे चौकोनी आकाराचे असावेत असा त्यांनीं विचार ठरविला होता. सृष्टिनिर्मित नद्या डोंगर वगैरे गांवांच्या सीमांकडे दुर्लक्ष करून ह्या मंडळींनीं आंखणी आणि पेनासिल घेऊन फ्रान्सच्या नकाशावर भराभर रेघा ओढून सारखे चौकोन तयार केले होते. त्या वेळेलाही असल्याच सोपेपणाकडे आणि ठराविक व्यवस्थेकडे त्यांचें लक्ष होतें. पण पुढें त्यांचा परिणाम काय झाला हें कोणाला सांगितलें पाहिजे ? तुमचा संस्कृतांमधील शब्द कसाही असला तरी आमच्या येथें आला ह्मणजे त्यानें आपला

उपांत्य दीर्घ केलाच पाहिजे असें ह्मणणें बरोबर नाहीं. मराठींत शब्द आला तर त्याला विभक्तिप्रत्यय लावतांना वगैरे जे फेरफार करावयाचे ते तुह्मी करा. पण त्याच्या अंतर्गत रचनेवर अंमल चालविण्याचा तुम्हांला अधिकार नाहीं. दुसऱ्या घरची मुलगी आपल्या घरीं सून म्हणून आली तर तिनें मर्यादेनें व नम्रपणानें वागावें हा आपल्या घरचा नियम तिला लागू करा. पण आपल्या घरच्या कांहीं माणसांचे कान लांब असलेच पाहिजेत अशी खोटीच कल्पना करून त्या बिचारीचेही कान ओढून ओढून लांब करण्याचा कोणी प्रयत्न केला तर तो हास्यास्पद नव्हे काय ? 'गणीत', 'अघटीत,' ह्या शब्दांतील उपांत्य दीर्घ असावें असें ह्या मराठी मुनित्रयांनीं प्रतिपादन करावें हें मोठें आश्चर्य आहे. आमच्या मतें ह्यांना संस्कृत शब्दांतील अंतर्गत रचनेला हात लावण्याचा बिलकूल अधिकार नाहीं. इतर संस्कृत शब्दासंबंधानेंही ह्यांनीं असाच घोंटाळा उडवून दिला आहे आणि 'अजानुबाहू' ह्या संस्कृत शब्दांत 'पर्यंत' ह्या अर्थी 'आ' हा उपसर्ग असूनही त्यांचें असें ह्मणणें कीं हा शब्द 'अजानुबाहू' असा लिहावा. येथें संस्कृत शुद्ध स्वरूपाकडे दुर्लक्ष कां ? जसा उच्चार होतो तसें लिहिलें जावें हा नियम येथें लागू केला होय ? मग 'गडबोले' असाच बहुधा उच्चार होत असतां ह्या तीन गृहस्थांपैकीं एकानें ह्याच लेखावर 'गोडबोले' अशी सही कां करावी ? व व्युत्पत्तीकडे पाहून 'गोडबोले' असें जर लिहावयाचें तर मग रा. रा. शंकररावजींनीं 'हातवळणे' अशी व रा. रा. साने यानीं 'काशीनाथ' अशी सही कां करूं नये होती ? सारांश, ह्या तीन गृहस्थांच्या स्वतःच्या सह्यांच्या लेखनपद्धतींतसुद्धां तिघांचें एकमत झालेलें दिसून येत नाहीं. एक उच्चाराप्रमाणें लिहितात. ह्यावरून लेखनपद्धतींत ठरीव व्यवस्था करणें सोपें नाहीं हें तेव्हांच दिसून येईल. 'अजानुबाहू' प्रमाणेंच 'आतूर' शब्दांतील 'आ'चाही एक हात तोडण्यांत आलेला असल्यामुळें तोही बिचारा तसाच कण्हत पडलेला आहे. व 'अवाज' शब्दही आपल्या 'आ'चा हात तुटल्यामुळें दीर्घ रोदनाचा 'अवाज' काढीत बसला आहे. आमची एवढीच प्रार्थना आहे कीं, 'विद्वान् लोकांच्या अनास्थेमुळें मराठी भाषेंत बंडाळी' झालेली असेल, 'एकाचा घरबंद दुसऱ्यास' नसेल, 'ज्यानें त्यानें पाहिजे त्याप्रमाणें शब्द लिहावा, वाक्यरचना करावी व व्याकरण शिकवावें' अशी स्थिति झाली असेल. पण

विद्वान लोकांच्याच अनास्थेमुळें संस्कृत शब्दांत अशी बंडाळी न होवो व मराठींत असलेली अधिक न वाढो.

एकच शब्द अनेक रीतीनें लिहिण्यासंबंधानेंसुद्धां पुष्कळांचा मतभेद होण्याचा संभव आहे. दोन्ही शब्द जर प्रचारांत आहेत व ते शुद्ध आहेत तर त्यांतला अमुक लिहूं नका आणि अमुकच लिहित जा असें सांगण्याचा कोणाला तरी अधिकार पोंचेल काय? लोकांवर इतका जुलूम हल्लींच्या प्लेगांत किंवा पूर्वींच्या मोंगलाईमध्यें तरी कोणी कधीं केला होता काय? असल्या बाबतींत सुधारणा करीत बसणें आणि कुडाला तुंबड्या लावणें ह्यांत फरक तो काय? 'एकच शब्द लिहिण्याचे निरनिराळे प्रकार' ह्या सदराखालीं 'कल्पांतरीं' आणि 'कल्पांतीं' हे शब्द दिले आहेत. पण 'कल्पांतरीं' आणि 'कल्पांतीं' हे एक शब्द लिहिण्याचे निरानिराळे प्रकार आहेत असें कोणी समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. 'कल्पांतरीं' म्हणजे दुसऱ्या कल्पांत व 'कल्पांतीं' म्हणजे 'कल्पाचे शेवटीं.' असल्या प्रकारांनीं लेखनपद्धति शिकणारे शब्दार्थांच्या घोंटाळ्यांत मात्र पडण्याचा संभव आहे. पण 'दागदुजी' हा शब्द तर विद्यार्थ्यांची अगदींच तारांबळ उडवून टाकणार यांत शंका नाहीं. २४ पानांत 'दागदुजी' ह्याप्रमाणें शब्द लिहावा असें आहे व तेथें 'दाग-दुजी' हा रद्द झाला आहे. पण २७ पान म्हणतें कीं, 'दागदुजी' हें अगदीं शुद्ध स्वरूप आहे. 'नांव' [ पदार्थांचें ना (नां?) व ] हें स्वरूप शुद्ध ठरतें. पण त्याचपासून निघालेला शब्द 'नावाजणें' ह्यांतील 'ना' वर अनुस्वार नको हें काय गौडबंगाल आहे?

'वीणा' शब्द स्त्रीलिंगी असतांना मराठींत पुल्लिंगी समजतो, इत्यादि उदाहरणावरून व्याकरण करतांना शब्दांची पूर्वपीठिका म्हणजे लिंग,वचन वगैरे आपण पहात नाहीं. तर मग शब्द लिहितांनाच त्यांची पूर्वपीठिका आम्ही काय म्हणून पहावी असा एक १० जुलईच्या लेखांत प्रश्न आहे. पण ह्याचें उत्तर एवढेंच कीं 'वीणा' शब्द पुल्लिंगी चालवा असें एखाद्या ट्रेनिंगच्या, हायस्कूलच्या किंवा मराठी शाळेच्या मास्तरानें सांगितलें असतें तर तें कोणीही ऐकलें नसतें. तो भाषेचा प्रघात पडून गेला. म्हणून आम्हीही 'गणित' शब्द 'गणीत' असा लिहावयाचा हुकूम करूं असें कोणी म्हणेल तर तो हुकूम कोणी मानील काय? एक गोष्ट भाषेनें सिद्ध म्हणून स्वीकारलेली आहे व दुसरी तुम्ही

तिच्यावर नवीन लादीत आहां. ह्या दोहोंत फरक आहे. 'कवि,' 'वस्तु,' 'भानु' इत्यादि शब्दसुद्धां विभक्तीप्रत्यय विरहीत असतील तेव्हां मूळ संस्कृत स्वरूपाला धरूनच ऱ्हस्व लिहावे हें बरें. अनुस्वारांच्या संबंधानेंही पुष्कळ मतभेदाचीं स्थळें आहेत. परंतु स्थलसंकोचास्तव त्यांचा हल्लीं येथें उल्लेख करितां येत नाहीं. होतां होईल तों सोपेपणापेक्षां मूळ शब्दांतील शुद्ध स्वरूपाकडे लक्ष पोंचवून रा. रा. साने, गडबोले व हतवळणे हे हातीं घेतलेल्या ह्या महत् कृत्याचा योग्य निकाल लावतील तर मराठी भाषेवर त्यांचे खरोखरच फार उपकार होणार आहेत. भलभलते दुराग्रह सोडून मराठी व इतर भाषांना अनुकूल अशींच शब्दस्वरूपें लोकांपुढें मांडण्याविषयीं ते प्रयत्न करतील तर त्यांना यश आल्यावांचून राहणार नाहीं. शब्दांची व्युत्पत्ति समजली पाहिजे हें जर इष्ट आहे तर 'इयत्ता,' 'ऋण,' 'आगाऊ,' 'आरसा,' 'अळशी,' हीं संस्कृताला अधिक जवळ असणारीं व मराठींत प्रचारांत असलेलींच रूपें अधिक ग्राह्य झाली पाहिजेत. शास्त्रीय विवेचनांत हट्ट किंवा अभिमान उपयोगाचा नाहीं. तो नसला म्हणजे सत्य सिद्ध होण्याला फारसा उशीर लागत नाहीं.

---

## तरवारीचा हक्क : : : १३

राजकीय बाबतींत कांहीं वेडगळ समजुती आपल्या लोकांच्या हाडामांसांत पुष्कळ दिवसांपासून अगदीं भिनून गेलेल्या आहेत. जुनाट झाडाचीं खोल गेलेलीं पाळेंमुळें खणून काढणें फार कठिण असतें व पुष्कळ दिव-

सांचा शरीरांत खिळलेला रोग बरा करणें फार अवघड पडतें. त्यांतलीच स्थिति चुकीच्या मतांची असते. तरी पण तीं खोटीं मतें काढून टाकणें अत्यंत जरूर असतें.

युरोपियन आणि नेटिव्ह ह्यांच्यांत कोणत्याही प्रकारचा फरक दिसून आला म्हणजे गरीब नेटिव्ह आपल्या मनाशीं असा प्रश्न विचारतो कीं हा फरक काय म्हणून? नेटिव्ह बी. ए. झाला म्हणजे त्याला वशिल्यांनीं आणि शिफारशीच्या चिठ्यांनीं साठ रुपयांची मास्तरची जागा मिळते. पण तोच युरोपियन बी. ए. झाला म्हणजे इंडियांतील कोठल्या तरी कॉलेजमधील सहाशें रुपयांची प्रोफेसरची जागा त्याच्या हातधुऊन पाठीस लागते. नेटिव्ह बी. ए. होऊन हायर लोअरच्या परीक्षा पास झाला म्हणजे दहा पंधरा वर्षांनीं तो सवाशें दीडशें रुपयांचा मामलेदार बनतो. पण तोच युरोपियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास होऊन हिंदुस्थानच्या जमीनीला त्याचे पाय लागले कीं त्याची दरमहा छटाकी झडूं लागते, व थोड्याच दिवसांत तो कोठल्या तरी जिल्ह्याचा सातआठशें रुपये पगाराचा दुय्यम राजा बनतो. हायर लोअरची परीक्षा युरोपियन आणि नेटिव्ह या दोघांनाही द्यावी लागते. पण नेटिव्हाला पास होण्याला शेंकडा साठ मार्क लागतात व युरोपियनाला पंचवीस बस्स होतात. नेटिव्ह एल. एल. बी आणि युरोपियन बॅरिस्टर या दोघांनाही हायकोर्टांतून वगैरे काम करण्याची मोकळीक आहे; पण ओरिजिनल साईडकडील मोठ्या प्राप्तीच्या फिर्यादी फक्त बॅरिस्टरांनींच घ्याव्या व दाहपांच, पराकाष्ठा शेंपन्नास रुपये प्राप्तीचीं अपिलें वगैरे नेटिव्ह वकीलांनीं चालवावी असा शिरस्ता आहे. नेटिव्ह एल्. एम्. अँड. एस्. ला स्वतःच्या खर्चानें डिस्पेन्सरी काढून चरितार्थ चालवावा लागतो. पण युरोपियन डाक्तरला दरमहा हजार रुपयांची चंदी मिळते. नेटिव्ह एल. सी. ई. झाला तर त्याला पन्नास पाऊणशेंची नेटिव्ह संस्थानांतून कोठेंतरी ओव्हरसियरची जागा पहावी लागते. पण कदाचित् तितक्याच ज्ञानाचा युरोपियन इंजिनियर आला कीं तो थोड्याच अवकाशांत एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, चीफ इंजिनियर किंवा आणखी कसला तरी इंजिनियर बनतो, लष्करी खात्यांत नेटिव्ह शिपाई कितीही शूर असला तरी त्या बिचाऱ्या सरड्याची धांव कुंपणापर्यंतच. त्याला दोनतीनशेंच्या वर

पगाराचें नांव नको. पण तोच युरोपियन शूर शिपाई असेल तर तो भराभर एकेक पायरी चढत जाऊन लवकरच शिडीच्या शेंवटच्या पायरीवर जाऊन उभा राहतो. पोलिसांतील नेटिव्ह शिपाई आठदहा रुपयांवर वर्षानुवर्षे रखडत पडलेला असतो. पण साधारणपणें तितक्याच योग्यतेचा युरोपियन कान्स्टेबल दरमहा शेंपन्नास रुपये खिशांत टाकून घोड्यावर बसून दौड करीत असतो. आगगाडीच्या इंजिनवरील नेटिव्ह मजूर वीसपंचवीस रुपयांत इंजिनचे सर्व काम चालवितो. पण तोच युरोपियन ड्रायव्हर धुंद होऊन पडण्याला आणि झोंप काढण्याला दरमहा शंभर रुपये पगार मागतो. डोळ्यांत तेल घालून साऱ्या रात्रभर आपल्या डायलकडे पहात बसणारा बिचारा नेटिव्ह सिग्नलर दहा पंधरा रुपयांनीं आपल्याला कृतार्थ मानतो. पण गाडीच्या वेळीं दारावर उभें राहून तिकिटें कातणाऱ्या छोटेखानीं युरोपियन तिकेट कलेक्टरांना ऊर्फ रेल्वेतील बड्या ऑफिसराच्या लहान व उनाड नातलगांना पन्नास साठ रुपयांचा तरी दरमहा खुराक पाहिजे. पण अशीं उदाहरणें देऊं लागल्यास ती कधींच सरावयाचीं नाहींत, म्हणून थोडक्यांत इतके सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं हिंदुस्थानांत जितकीं जितकीं सरकारी किंवा युरोपियन कंपन्यांचीं ऑफिसें आहेत तितकीं तितकीं सर्व आपल्याला अशाप्रकारचीं पाहिजे तेवढीं उदाहरणें दाखवून देतील यांत शंका नाहीं. हें जें पदोपदीं वैषम्य दिसतें तें कां, असा प्रश्न प्रत्येकानें आपल्या मनाला आजपर्यंत अनेक वेळां विचारला असेल. सामान्यपणें ह्या प्रश्नाचें उत्तर असें देण्यांत येतें कीं इंग्रज लोकांनीं आपल्याला जिंकलेलें आहे, ते आपले जेते आहेत व आपण त्यांचें जित आहोंत. आपण त्यांचेंकडून जिंकले गेलेले असल्यामुळें ते हजार रुपयांच्या पगारावर चैन उडवीत असतांना आपण दहा रुपयांचा पगार मिळवून घरांत उपाशीं मरून हापिसात साहेबापुढें तरतरीत चेहरा दाखविला पाहिजे. त्यांनीं आपल्याला जिंकले म्हणून त्यांचा अधिक सुखावर हक्क आहे. हा त्यांचा तरवारीचा हक्क आहे. तेव्हां त्यांनीं तरवारीनें संपादन केलेल्या हक्काचा उपभोग घेण्याला त्यांना कोणता प्रत्यवाय आहे? ते असें करतात हा त्यांचा हक्कच आहे. असलें तर्कशास्त्र आजपर्यंत शिरस्तेदार आपल्या कारकुनांना आणि रावबहादुर आपल्या खुषमस्कऱ्यांना सांगत आले. पण हें तर्कशास्त्र खरें आहे काय?

स्वतः इंग्रज लोक, जे शहाणे आहेत तेच, हें तर्कशास्त्र कधीं पुढें आणतात काय ? असल्या तर्कशास्त्राचें आयुष्य अजून भरलें नाहीं काय ? व हीं थोतांडें जितक्या लवकर नष्ट होतील तितकी चांगलीं नव्हेत काय ?

वरील तर्कशास्त्र अगदीं चुकीचें आहे. इंग्रज लोकांनीं आपल्याला जिंकलेलें असल्यामुळें व त्यांच्याच हातून असले अत्याचार घडत असल्यामुळें वर नमूद केलेलें वैषम्य युरोपियन आणि नेटिव्ह ह्यांच्या दरम्यान राखण्याचा त्यांना त्यांच्या तरवारीनेंच हक्क दिलेला आहे असा गैरसमज होणें स्वाभाविक आहे. पण हा कार्यकारणभाव अगदीं भ्रांतिमूलक आहे हें ह्या प्रश्नाच्या थोड्याशा तात्त्विक विवेचनावरून लक्षांत येण्यासारखें आहे. तरवारीचा हक्क लढाई चालू आहे तोंपर्यंत काय तो चालतो. लढाई संपली कीं तरवारीचा हक्क संपला. 'तूं आमचें रक्षण कर आणि तुला आम्ही कर देऊं,' इत्यादि प्रकारचा करार लोकांनीं आपल्या राजापाशीं केलेला असतो. परंतु एखादे वेळीं आपमतलबी, महत्त्वाकांक्षी आणि लबाड अशा दुसऱ्या राजाला अशी इच्छा उत्पन्न होते कीं त्या राजाचा प्रदेश आपल्या ताब्यांत घ्यावा. तो त्याजवर स्वारी करतो आणि त्याला रसातळाला पोंचवतो. लोकांचा पहिला राजा जिवंत असतो तोंपर्यंत ते त्याच्यासाठीं व आपल्यासाठीं लढत असतात. परंतु आपला पहिला राजा मरून गेला व आपल्यांतलाच दुसरा राजा करणें शक्य नसलें तर अशा प्रसंगीं लोक स्वारी करणाऱ्या राजाशीं करार करतात. लोकांना कोणाला तरी कराच्या रूपानें पगार देऊन राजा या नांवाखालीं मोडणाऱ्या त्या आपल्या प्रतिष्ठित चाकराकडून आपलें काम करून घ्यावयाचें असतें. तेव्हां त्याबद्दलचे सर्व करारमदार ठरवून घेऊन लोक आपलें काम करीत जाण्याचा हुकूम कंबर बांधून तयार झालेल्या नवीन चाकराला ऊर्फ राजाला सांगतात. कांहीं करार ठरवूनच लढाई बंद होत असते. लढाईत सर्वच अनिश्चित असतें. एका लढाईत जय आला म्हणून दुसरींत येईलच अशी राजालाही खात्री नसते. म्हणून लढाई बंद होते. ती एकाच्याच फायद्यासाठीं नव्हे तर दोन्ही पक्षांच्या फायद्यासाठीं होय. असें वास्तविक असतां लढाई संपल्यानंतर एका पक्षानें दुसऱ्या पक्षावर तरवारीचा हक्क चालविणें अगदीं नामर्दपणाचें आणि बेशरमपणाचें काम आहे. जर तह झाला, शांतता झाली, राजानें लोकांची इमानें इतबारें चाकरी करण्याची

शपथ वाहिली व लोकही राजनिष्ठ आहेत व दोघांनींही आपआपल्या तरवारी खालीं ठेविल्या, तर मग राजकीय पक्षालाच तेवढा आपल्या तरवारीचा हक्क सांगण्याला काय अधिकार आहे ? जर राजा तरवारीचा हक्क सांगेल तर प्रजेलाही तरवारीचा हक्क सांगण्याला काय हरकत आहे ? उभयपक्षीं करार होऊन शांतता झाल्यावर राजा तरवारीच्या हक्काचा उपयोग करूं लागेल तर त्यानेंच शांततेचा भंग केला, त्यानेंच कराराचीं कलमें मोडलीं, व त्यानेंच गुप्तपणें लढाईला सुरवात केली असा अर्थ होणार नाहीं काय ? आणि राजानेंच जर लढाईला सुरवात केली तर मग लोक तरी स्वस्थ कसे बसतील ? जर राजाला तरवारीचा हक्क सांगण्याला अधिकार असेल तर मग लोकांनाही अधिकार कां असूं नये ? राजानें प्रजाद्रोह केला तर प्रजेला राजद्रोहापासून कोण थांबवील ? उभयपक्षीं पाळले गेले तर ते करार. नाहीं तर लुच्चे लोकाच्या हातांत तीं फसवेगिरीचीं उत्तम साधनें होतात. एखाद्या मनुष्याला त्याच्या खुषीविरुद्ध कोंडून ठेवलें तर त्याला पळून जाण्याला पूर्ण अधिकार आहे. एखादा देश किंवा तेथील लोक लढाईत जिंकले गेले हें म्हणणेंच खोटें आहे. ह्यांतील अर्थ इतकाच आहे कीं शेवटची जी लढाई झाली त्यांत हे लोक पराभव पावले व पुढें लढाई बंद झाली तर फिरून कोणत्या पक्षाला जय येईल व कोणत्या पक्षाचा पराजय होईल हें सांगणें कठिण असतें. शिवाय एखाद्या देशांतील लोकांचे आजे पणजे जिंकले गेलेले असले म्हणजे त्यांचे नातू पणतूही नेहमीं त्या अपमानाला पात्र होत जावेत असा कांहीं नियम नाहीं. ॲडमनें केलेलें पाप प्रत्येक ख्रिश्चनच्या माथीं बसलेलें असतें तशी राजकीय धर्मांत स्थिति नाहीं. सारांश, सर्व करार उभयपक्षीं सुरळितपणें पाळले जात असतां तरवारीचा हक्क सांगण्याचा हक्क जेत्यांना कधींही प्राप्त होत नाहीं. व लोकांनींही तो हक्क कधीं चालू देतां कामा नये. वंशपरंपरागत प्राप्त झालेलें राज्य व लढाईनें मिळविलेलें राज्य हीं दोन्हीं लढाई संपल्यानंतर सारखींच मानलीं पाहिजेत. एका प्रसिद्ध तत्त्ववेत्त्यानें असें म्हटलें आहे कीं, The demand of one nation more than of the other from the title of conquest, as being a conquered nation, is an act of ignorance of the rights of sovereignty. शहाणे इंग्रज लोक हिंदुस्थानांतील आपल्या राज्याला 'Goverment established

by law ' असें म्हणतात, ' by sword ' असें म्हणत नाहींत. राणी सरकारनीं १८५७ सालच्या बंडानंतर आपल्या लोकांना जे हक्क दिले आहेत त्यांत इंग्लिश व इंडियन ह्यांच्यांत आम्ही भेद करणार नाहीं असेंच अभिवचन दिलेलें आहे- ह्यावरून असें दिसून येईल कीं शांततेच्यावेळीं Right of conquest असा पदार्थ नाहीं. हा सर्व खुषमस्कऱ्या आणि तोंडपुजा लोकांनीं उभारलेला बागुलबुवा आहे. हा हुसकून लाविला पाहिजे. तत्त्व कळलें तर आज नाहीं उद्यां तरी त्याप्रमाणें वर्तन होण्याचा संभव आहे. एवढ्याच साठीं खोट्या मतांचें नाणें जें आजकाल चोहोंकडे प्रचारांत आहे त्याची टांकसाळ बंद करणें अत्यंत इष्ट आहे.

---

## चित्रें : : १४

सर्वांत पाहिला आणि अतिशय उत्तम कारागीर म्हटला म्हणजे ब्रम्हदेव होय. मूर्ति किंवा पुतळे तयार करण्याच्या कामांत अतिशय निष्णात असा पहिला सुतार ब्रम्हदेव हाच होय. मनोवेधक चित्रें तयार करणारा आणि तीं भपकेदार रंगानें खुलवून देणारा पाहिला उत्कृष्ट चितारी म्हटला म्हणजे हा ब्रम्हदेवच होय. तेव्हां मातीच्या किंवा दगडाच्या मूर्ति तयार करणें आणि कागदावर चित्रें काढणें व तीं रंगविणें या सर्व कलांचा उगम ब्रम्हदेवापासून झाला असला पाहिजे. ब्रम्हदेवानें मनुष्यांच्या मूर्ति निर्माण केल्या, ते पाहून मनुष्यापैकीं कांहीं सुतारांना आपणही अशा मूर्ति उत्पन्न कराव्या अशी महत्वाकांक्षा उत्पन्न झाली. व त्यांनीं मनुष्याची मूर्ति पाहून त्याप्रमाणें हुबेहुब

दुसरी प्रतिमा तयार करण्याचे मनांत आणले असावे. प्रथमतः मातीच्याच मूर्ति करण्याची कल्पना सुचलेली असली पाहिजे. व दगडाच्या मूर्ति करण्याची कल्पना त्याच्या पाठीमागून अस्तित्वांत आलेली असावी. प्रथम मातीच्याच मूर्ति करीत असत असें मानण्याला अनेक कारणें आहेत. मानवी शरिरांतील मार्दवाचें मातींतील मऊपणाशीं पुष्कळ साम्य आहे. खुद्द मानवी शरीर हेंहीं मातीचेच आहे अशी वेदान्तादिशास्त्रापासून प्रवृत्त झालेली समजूत लोकांत प्रचलित आहे. शिवाय मातीची मूर्ति बनविण्याला श्रम व खर्च कमी पुरतात. दगडापेक्षां माती सुलभ रीतीनें मिळूं शकते, व मातीच्या मूर्तींत कमी जास्त फेरफार करणें झाल्यास तो थोड्या मेहनतीनें करतां येतो. शिवाय दगडाच्या मूर्तीला एखादा टाकींचा ठोका जोरानें बसला व भलत्याच ठिकाणचा एखादा टवका उडाला तर ती सर्व मुर्ति फुकट जाण्याचा संभव असतो. परंतु अशा प्रकारची भिती मातीच्या चित्रांत मुळींच नसते. इत्यादि कारणांसाठीं माती हेंच उपादान द्रव्य पूर्वीच्या कारागिरांनीं प्रथमतः उपयोगांत आणलें असावें. मातीच्या मूर्ति उचलतांना किंवा इकडून तिकडे नेतांना कोणाचा हात मोडतो कोणाचा पाय मोडतो, व त्या फार दिवस टिकत नाहींत असें पाहून दुसरे कांहीं तरी उपादानद्रव्य घेऊन त्यांच्या मूर्ति घडविण्याचा विचार लोकांच्या मनांत आला असला पाहिजे. अशा वेळीं मातीच्या जागीं दगड आला; कोरण्यांच्या जागीं टाक्या आल्या; व दगडाच्या मूर्ति प्रचारांत येऊं लागल्या ही मूर्ति करण्याची कला निघाल्यापासून व त्या मूर्ति टिकाऊ होण्यासाठीं दगडानें आपला देह खर्ची घालण्याचे अंगावर घेतल्यापासून आकाशांतील देव पृथ्वीवरच्या घरांत येऊन राहूं लागले आणि राजे व बडे लोक हे मेले तरी मृत्युलोक सोडून जाईनातसे झाले व माणसांनीं मरुन आपली जागा दुसऱ्यासाठीं रिकामी करून द्यावी हा जो मृत्यु निर्माण करण्यांत परमेश्वराचा हेतु त्याला हरताळ लावून राजे आणि बडे लोक आपल्या शरिरापेक्षां आपल्या पुतळ्यांनींच पृथ्वीवरील जागा अधिक अडवूं लागले. ही दगडी मूर्ति तयार करण्याची कला वृद्धिंगत होण्याला अनेक कारणें झालेली आहेत. इटली देशांत उत्तम मूर्ति करणारे होऊन गेले व तेथें ती कला चांगलीच उदयाला आली, व पूर्वी ग्रीस आणि रोम या ठिकाणीं अनेक उत्तम मूर्ति झाल्या, या सर्वांचें एक कारण असें आहे कीं त्या प्रदेशांत

अतिशय मऊ संगमरवरी दगडाच्या पुष्कळ खाणी आहेत. धर्मभोळेपणानें देवांच्या मूर्ति करण्याला उत्तेजन दिलें स्वार्थसाधुपणा आणि तोंडपूजेपणा ह्या सद्गुणांनीं राजापासून तों कधीं कधीं तहत त्याच्या खुद्द कुत्र्यांपर्यंतही सर्वांच्या मूर्ति बनविण्याला सुरवात केली. हा मूर्तींचा थोडासा इतिहास झाला. आतां कागदांवरील चित्रांची कल्पना कशी सुचली असेल ह्याचा आपण विचार करूं.

अनुकरण करतां करतां कांहीं नवीन कल्पना सुचते असा सामान्य अनुभव आहे. त्याप्रमाणें पाहिलें असतां ब्रह्मदेवाची कृति मनुष्य झाला पाहून मूर्तींची कल्पना सुचली असावी व मूर्ति साध्य झाल्यानंतर ती कांहीं रूपांतरानें काढण्याचा विचार सुचला असावा असें दिसतें. कागदावरील चित्रें काढण्याची कल्पना सुचण्याची पुढें दिलेली कारणेंही असण्याचा संभव आहे. आपण उन्हांतून चाललो असतों म्हणजे आपली सावली रस्त्यावर पडते. आपण दिव्याजवळ बसलेलो असलों तर आपली प्रतिमा भिंतीवर उठलेली दिसते. किंवा आपण एखाद्या शांत पाण्याच्या नदीच्या कांठीं उभे असलों तर त्या नदींत आपलें प्रतिबिंब पडलेलें दिसतें. अशा वेळीं पूर्वीच्या एखाद्या धोरणी आणि कल्पक कारागिराच्या डोक्यांत कागदावर चित्र काढण्याची कल्पना उत्पन्न झाली असली पाहिजे. उन्हांत आपली जी सावली पडते ती पाहून चित्राच्या बाहेरील मर्यादेच्या रेषा चितार्‍यानें काढल्या असाव्यात, पण पाण्यांतील प्रतिबिंबांत आपलें नाक, डोळे वगैरे सर्व बारीकसारीक अवयव स्पष्ट उठलेले पाहून तसेच अवयव कागदावर काढण्याची त्याला कल्पना सुचली असली पाहिजे. हल्लींचें अगदीं हुबेहूब चित्र म्हणजे फोटोग्राफ ही सुद्धां एक प्रकारची सावलीच आहे. तेव्हां सावलीवरून कागदावरील चित्रांची कल्पना निघाली असावी असें मानण्याला कांहीं हरकत नाहीं. ह्याप्रमाणें साधें चित्र तयार झाल्यावर सृष्टींतील रंग पाहून आपल्या चित्रांतही तसले रंग भरण्याची इच्छा चितार्‍यांच्या मनांत उत्पन्न होणें अगदी साहाजिक आहे. अशा रीतीनें एकावर एक कल्पना सुचत जाऊन व एकामागून एक सुधारणा होत जाऊन अखेरीस हल्लीं आपण पहातों तशा प्रकारचीं चित्रें तयार होऊं लागलीं.

ह्या वरील विवेचनाकडे आपण लक्ष दिलें तर आपल्याला असें आढळून

येईल कीं जमिनीवर गवत उगवतें किंवा झाडाला पालवी फुटते ह्या गोष्टी जितक्या साहजिक आहेत, तितकीच पुतळे आणि चित्रें ह्यांची कल्पना लोकांच्या मनांत उभ्दवणें साहजिक आहे. परंतु जी गोष्ट, साहजिकपणेंच कां होईना, अस्तित्वांत आलेली आहे तिचा योग्य उपयोग कसा करावयाचा ह्याचा विचार सुज्ञ लोकांनीं केला पाहिजे. पुतळे आणि चित्रें हीं केवळ डोळयांना सुख देण्यासाठीं नाहींत तर तीं मनाला कांहीं तरी उपदेश करण्यांसाठींच आहेत हें तत्त्व कोणीही विसरतां कामा नये व या दृष्टीनें पाहिलें असतां कोणत्या चित्रांना कोणतें स्थळ योग्य आहे ह्या विचाराला बरेंच प्राधान्य देणें अवश्य आहे. अलीकडे एकोणिसाव्या शतकांतील अनेक अमर्याद शोधामुळें चित्रकला तर फारच स्वस्त झाली आहे. त्यामुळें साहेब लोकांचीं चित्रें पैशाला पन्नास मिळतात. कित्येक वेळां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं जुनीं इंग्रजी सचित्र वर्तमानपत्रें विकत घेऊन कित्येक अडाणी लोक त्यांतील साहेबांचीं, त्यांच्या घोड्यांचीं, त्यांच्या गाड्यांचीं, त्यांच्या खुर्च्यांचीं त्यांच्या मडमांचीं, किंवा त्यांच्या कुत्र्यांचीं चित्रें कातरून आपल्या घरांतील भिंतीला डकवून ठेवतात. कित्येक ठिकाणी खुद्द देवघरांतील भिंतीलाही साहेबांचीं आणि त्यांच्या टोप्यांचीं चित्रें डकविलेलीं दृग्गोचर होतात. लहान मुलांना रॅलीब्रदर्स कंपनीचा एखाद्या मडमेचें चित्र काढलेला कापडावरील छाप मिळाला म्हणजे ते आपल्याला स्वर्गच मिळाला असें मानतात. पण हे सर्व वेडगळपणाचें प्रकार आहेत. विशिष्ट स्थळींच विशिष्ट चित्रें असण्यांत एक प्रकारचें स्वारस्य आहे. देवळांतून देवाचीं चित्रें असावीत, पुराणांतील गोष्टींचीं चित्रें असावीत, साधुसंतांचीं चित्रें असावीत; सारांश, ज्यांच्या योगानें पाहणाराचें मन परमेश्वराकडे लागेल अशीच चित्रें तेथें असावीत. येथें साहेबांचीं चित्रें काय करावयाचीं आहेत ? देवळांत साहेब कशाला पाहिजे ? देवळांत अशा प्रकारच्या तसबिरा ठेवणें हें अरसिकपणाचें व अश्रद्धेचें लक्षण आहे. राज्याच्या दरबारांत राजाच्या सर्व पूर्वजांचीं चित्रें असावीत, त्याच्या उत्तम प्रधानांचीं चित्रें असावीत, त्याच्या शूर सेनापतींचीं चित्रें असावीत; पण तेथें एखाद्या सुंदर स्त्रीचे किंवा एखाद्या उंच साहेबांचें चित्र असण्याचें काय प्रयोजन आहे ? खाजगी रंगमहालांत ज्यांच्या योगानें कामोद्दीपन होईल अशा प्रकारचीं चित्रें असावीत. तेथें सुंदर

स्त्रियांचीं वगैरे चित्रें असणें गैरशिस्त नाहीं. परंतु कित्येक रंगमहालातून देखील सवंग सवद्याची साहिबांची चित्रें दृष्टीस पडली तर त्याला काय म्हणावें? इतका स्थानास्थान विचार नसणें हें मनुष्यजातीला शोभत नाहीं. प्रत्येक ऑफीसमध्यें तेथील साहेबांचें एक मोठे चित्र ऑफिसच्या दारांत पाऊल टाकल्याबरोबर सर्वांच्या दृष्टीस पडेल अशा ठिकाणी असणें हें अगदी रास्त आहे. पण आपल्या साहेबांचा फोंटो म्हणून प्रत्येकानें विकत घेऊन घरी आणून देवघरांत लावून ठेवणें हें सारासारविचारांच्या अभावाचें दर्शक आहे हल्लीच्या काळांत सुधारलेल्या यंत्रकलेनें चित्रें अतिशय स्वस्त करुन ठेविली आहेत, हें खरे. पण त्याच्याबरोबर कोणती चित्रे कोठे लावावी ह्याविषयींहि एक शास्त्र अस्तित्वांत आलें पाहिजे. असे सध्यांच्या स्थितिवरून दिसते. आपल्या देवळांत किवा घराच्या देवघरांत, किंवा रंगमहालांत खुद्द साहेबांनीं येणें हें जितके आपल्याला गैरशिस्त वाटेल तितकेच त्यांचे चित्र तेथें असणें हें वाटले पाहिजे. मन उदात्त करणें हा जर चित्रांचा एक उपयोग असेल तर साहेब खुर्चीवर बसलेले व आपण त्यांच्या खुर्चीमागें ऊभे राहिलेले असल्या चित्रांनीं मन उदात्त कसें होणार? मूर्ति किंवा पुतळे ह्यांच्याबद्दलही वरील प्रकारचाच न्याय लागूं पडतो सारांश चित्रे किंवा पुतळे ह्यांना योग्य स्थाने पाहून त्या ठिकाणीच त्यांची योजना करणें उचित आहे नाही तर आपण आपली विवेकशून्यता मात्र त्याच्या योगाने व्यक्त करतों असें होतें.

# राज्यापहार आणि न्याय : : : १५

राज्यापहार म्हणजे राज्याचा अपहार, व अपहार म्हणजे घेणें. परंतु अनें बपासून आपल्या गरजेकरितां दहा रुपये मागून घेतले तर तेथें अनें बच्या दहा रुपयांचा अपहार केला असें आपण ह्मणत नाहीं. पण बच्या रुपयांवर अची कोणत्याही तऱ्हेची मालकी नसून व बची परवानगी विचारल्यावांचून जेव्हां बचे दहा रुपये कोणत्या तरी साधनानें आपल्या पिशवींत येऊन पडलेले अ पाहतो व ते परत देण्याचीही अला कधीं इच्छा होत नाहीं, तेंव्हा अनें बच्या दहा रुपयांचा अपहार केला असें आपण म्हणतों. ह्यांतील सारांश थोडक्यांत सांगावयाचा म्हटलें तर साधारण व्यवहारांत आपण ज्याला चोरी म्हणून म्हणतो त्याच अर्थाचा दर्शक असा अपहार हा संस्कृतांतील एक भारदस्त, बडा आणि सभ्य शब्द आहे. एखादी भिकार जिन्नस कोणी लांबविली तर तेथें चोरी वगैरे असले हलकट शब्द चालतील. पण जेथें राज्यासारखी महत्त्वाची जिन्नस गिळंकृत करावयाची असते तेथें त्या गिळंकृत करावयाच्या वस्तूच्या योग्यतेच्या मानाप्रमाणें अपहार वगैरे सारखे सभ्य शब्दच वापरलेले पाहिजेत. नाहीं तर सभ्यपणाचा मर्यादेचा अतिक्रम केल्या सारखे होणार. म्हणून चोरीसारखें नीच आणि लांच्छनास्पद कृत्य असलें तरी तें कृत्य कोण करतो आहे इकडे लक्ष देऊन शब्दांची योजना करणें अत्यंत इष्ट नाहीं काय ? माणसांचा राजा, आणि त्या माणसांच्या घरीं बैल, टोणगे वगैरे जीं जनावरें असतील त्या जनावरांचाही पण राजा; इतकेंच नव्हे तर राजांचाही राजा आणि खुद्द खुदाचा अवतार, असा राजाधिराज जेव्हां आपली अनेक सत्कर्मे करावयाची क्षणभर बाजूला ठेवून, आपला मान अपमान क्षणभर गुंडाळून ठेवून, व वेळांत वेळ करून आणि परमेश्वरानें आपल्याला पृथ्वीच्या पाठीवर कशासाठीं धाडलें आहे हें

न स्मरून, चोरीसारख्या सर्वांनीं अगदीं टाकाऊ म्हणून ठरविलेल्या धंद्याला आपल्या स्वतःच्या पवित्र हस्तांनीं उत्तेजन देण्याला प्रवृत्त होतो तेव्हां त्या चोरीला चोरी असें कोण म्हणूं शकेल ? 'नीच रतली रायासीं। तिजला कोण म्हणे दासी ?' अशांतला प्रकार जगांत चोहोंकडे सर्वकाळ चालूच आहे. तेव्हां चोरांना शासन करणारा राजा स्वतः जी चोरी करतो तिच्यांत कांहीं तरी विशेष खुबी अर्थात् असली पाहिजे अशा कल्पनेनें या चोरीच्या धंद्याला एक प्रकारचें महत्त्व आलें आहे. आणि त्याशिवाय दुसरेंही एक कारण आहे. कोणतेंही काम करावयाचें झालें तरी तें पद्धतशीर रीतीनें करण्यांत मजा आहे. शास्त्रोक्त मार्गाचें अवलंबन करून एखादें काम ( मग तें निंद्य का असेना ) केलें तर त्यांत कोणाला बरें आनंद वाटणार नाहीं ? कोणी एका शर्विलक नांवाच्या चोरानें रात्रीं चारुदत्ताच्या घराची भिंत फोडून आंतील डबोलें लांबविलें. तेव्हां जागा झाल्यावर तो मूर्ख; अरसिक आणि अगुणग्राही विदूषक दागिने चोरीस गेले म्हणून रडत बसला. पण रसिक तो रसिक ! मार्मिकपणाची गोष्ट कोणालाही यावयाची नाहीं ! आपल्या वाड्याच्या भिंतींत एका कारागिरानें काय कुशलपणाची शिकस्त करून सोडली आहे ह्याची कल्पना त्या परान्नपुष्ट भटुरड्या विदुषकाला काय येणार ! अखेरीस एकदांचा चारुदत्त जागा झाला. त्या चोराच्या गुणाचें चीज करणारा महात्मा चारुदत्त जागा झाला आणि 'अहाहा ! काय हें कौशल्य ! हें भिंतींतील भोंक किती तरी सुरेख रीतीनें पाडलेलें आहे ! देवा, ज्यानें माझ्या घराला भोंक पाडलें त्याच्या डोक्यांत तूं किती तरी अक्कल सांठवून ठेविली असली पाहिजेस !' अशा रीतीचे उद्गार त्यानें काढले. पृथ्वीच्या पाठीवर असले चारुदत्त असल्यावांचून शर्विलकांसारख्या चोरांचें पोट भरणार कसें ? असो. आपल्याला या गोष्टींतून तात्पर्य घ्यावयाचें आहे तें एवढेंच कीं पद्धतशीर रीतीनें, अकलेचा उपयोग वाईट कामांत कां होईना जर कोणी केला, तर त्याच्या अकलेची तारीफ झाल्यावांचून कधीं राहत नाहीं. सारांश, शास्त्रोक्त पद्धतीचें अवलंबन चोरीमध्यें झालें पाहिजे. पण अलीकडच्या ह्या भुरट्या चोऱ्यांतून शास्त्रोक्त पद्धतीचा लेश तरी दिसून येतो काय ? पूर्वीं हें चोरीचें शास्त्र आपल्यामध्यें बऱ्याच प्रगल्भ दशेला येऊन पोंचलेलें असावें असें दिसतें. शर्विलकानें भिंतीला भोंक पाडण्याच्या पूर्वीं आपल्या यज्ञोपवीताची

टेप करून भोंकाचा परीघ आणि व्यास किती फूट असावा ह्याच्याबद्दल प्रत्यक्ष मेझरमेंट घेतलें होतें. इतक्या जुन्याकाळींसुद्धां शास्त्राचा किती प्रसार झाला होता पहा! प्रत्यक्ष स्कंद हे या शास्त्राचे प्रवर्तक होते व त्यांच्या मागून अनेकांनीं अनेक ग्रंथ लिहिले होते. पण त्यांचा आतां काय उपयोग? ते ग्रंथ हल्लीं कोठें आहेत? त्या ग्रंथांच्या बाबतींत सुदैवानें आम्हांला भिकारी करून दुसऱ्यांना सधन केलें आहे व आमच्यावर दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात बसण्याचा प्रसंग आणला आहे. त्यामुळें किती वाईट स्थिति येऊन पोंचली आहे पहा. आज आमच्या इकडे असा एक तरी चोर सांपडेल काय, कीं जो भोंक पाडावयाचें असेल तेथील लांबी, रुंदी, व्यास परीघ अगोदर मोजून, मग जसें भोंक पाडावयाचें असेल तसा नकाशा काढून नंतर शास्त्रीय पद्धतीनें आपल्या कामाला सुरवात करील? शास्त्रीय पद्धत सुटल्यामुळें हल्लीं कोण गोंधळ होतो! चार खिसे कापलेले जर एकत्र आणले तर एकाचा मेळ दुसऱ्याशीं बसत नाहीं. एक अगदीं वरतीं कातरलेला तर दुसरा अगदीं खालतीं कातरलेला; एक उभा तर दुसरा तिरकस. कातऱ्यांना धार बिलकुल नसावयाची व एकदां जी कोणी कातरीची आकृति ठरवून दिली आहे त्यांत प्राण गेल्यास कधीं सुधारणा व्हावयाची नाहीं. जेथें प्रत्येक क्षणाला बौद्धांच्या सिद्धांताप्रमाणें कातरीची आकृति जुनी जाऊन नवीन आली पाहिजे तेथें खापर पणजाची कातरी खापर पणतू जर तशीच वापरीत बसेल तर त्याचा कार्यभाग तो कितपत साधणार? ही एकेकट्या चोरांची अवस्था झाली व तीच चोरांच्या टोळ्यांचीही होय. एक मुख्य व बाकीचे त्याच्या हुकुमांत हा धरबंद मुळींच नाहीं. आपल्याला कोणी ओळखूं नये म्हणून तोंडाला काळा रंग लावण्याची जी पिढीजात चाल आहे ती आहे. देश-काल-वर्तमानाप्रमाणें ह्यांत फेरफार व्हावयाला नको होता काय? पांढरा रंग लावला तर त्यांत जास्त फायदा नाहीं काय? नाहीं तर पिंवळा किंवा तांबडा रंग लावावा, किंवा पाहिजे असल्यास हिरवा अथवा निळाही कां लावूं नये? आधीं हेर पाठवून टेहळणी करून ठेवून मग एकदम छापा घालावा किंवा रात्रभर रहावयाला ओसरीवर जागा मागून घेऊन रात्रीं सर्व लोक निजले म्हणजे आपल्या साथीदारांना आंत घेऊन मग हळूं हळूं पाय पसरण्याची तजवीज पहावी. हे प्रकार आपल्यामध्यें मुळीं तरी आहेत काय?

सारांश, भुरट्या चोऱ्या किंवा दरवडे कांहीं घेतलें तरी त्यांत शास्त्रीय पद्धत चुकूनसुद्धां आलेली नाहीं. याचमुळें या चोऱ्यांना कमी मान मिळतो व याच कारणासाठीं कोणत्याही खिसेकातरूला किंवा दरवडेखोराला अलीकडे लोक राजा असें म्हणण्याला धजत नाहींसे झाले आहेत. याप्रमाणें छोटे-खानी चोऱ्यांतून शास्त्रीय पद्धतीची अतिशय निराशा उत्पन्न करणारा अभाव दिसून येतो. परंतु आनंदाची गोष्ट ही आहे कीं राज्यें, संस्थानें, मुलूख, प्रदेश, समुद्र किंवा खंडें अशांसारख्या जिनसांच्या बड्या चोऱ्यांतून ह्या शास्त्रीय पद्धतीचे अवलंब परिपूर्णपणें करण्यांत येत असतें. आपल्याला ज्या जिनसाची चोरी करावयाची असेल त्याचा नकाशा आधीं तयार करावा, मग ह्या जिनसावर हात टाकण्याला वाटा कोण कोणत्या आहेत याचा शोध आणवावा, मग कांहीं तरी कुरापत काढावी व झूटा वाद आणि अर्धा लाभ अशा कांहीं युक्त्या लढवाव्या, इत्यादि मार्ग शास्त्रवेत्त्यांनीं गहन विचार करून आणि प्रत्यक्ष अनुभव घेऊन ठरविलेले आहेत. कांहीं धर्मनिष्ठ लोकांचें तर या चोरीला निघण्याला शुभ मुहूर्त कोणते व कुयोग कोणते याबद्दल-सुद्धां मोठे ग्रंथ झाले आहेत. व आपण चोरी करीत असतां दुसरा जर आपल्याला चीड येण्यासारख्या रीतीनें विनाकारण प्रतिबंध करून आपल्या कृत्यांत अडथळा आणूं लागेल तर त्याचें छाताड फोडून टाकण्याकरतां किती उंचीवरून नेमकी गोळी मारतां येईल, त्याच्या घराची राख-रांगोळी करण्याकरतां नेमका तोफेचा गोळा टाकतां यावा म्हणून कोठें मोर्चे बांधले पाहिजेत वगैरेसंबंधी सर्व शास्त्रीय विचार कायम ठरून गेलेले आहेत. आगगाडी, आगबोट, तारायंत्र, दुर्बीण, दारू, तोफ, बंदुक, टॉर-पेडो, मॅक्झिममगन वगैरे जे जे शास्त्रीय शोध शास्त्रवेत्त्यांनीं काढले ते सर्व या चोरीच्या कृत्यांत सामील झालेले आहेत. अनेक डोक्यांतील बुद्धिमत्ता खर्च होऊन या दुसऱ्याच्या डोकीवरचे पागोटें उपटून घेण्याच्या शास्त्राला आज अत्यंत महत्त्व आलें आहे. आणि या व इतर अनेक कारणामुळें या जातीच्या चोरीनें स्तोम इतकें वाढलें आहे कीं तिचे मूळचे नांव चोरी असें होतें हेंसुद्धां कित्येकांच्या लक्षांतून निघून गेलें आहे. अशा स्थितींत सभ्य आणि भारदस्त अशाच शब्दांचा प्रयोग करणें चांगलें आहे. म्हणून राज्यापहार असें सौम्य आणि गोंडस व कानाला गोड लागणारें चांगलें

नांव वाईट वस्तूला देणें गैर होणार नाहीं. वाईट वस्तूंवर पांघरूण घालून त्यांना चांगल्या नांवाच्या आश्रयाखालीं लोकापुढें आणणें एका दृष्टीनें चांगलेंच आहे. असो. एवढा वेळपर्यंत राज्यापहार हा शब्द आणि त्याचा अर्थ ह्याबद्दलचा विचार झाला. आतां याच्यासंबंधानें असा प्रश्न आहे कीं राज्यापहार न्याय्य आहे काय ? या प्रश्नाचें विवेचन झाल्यावर ज्या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे तो प्रश्न असा कीं जे राज्यापहार करतात ते लोकांना न्याय्यमार्गाला प्रवृत्त करण्याला लायक आहेत काय ? आणि राज्यापहार व न्याय यांची सांगड जमणें शक्य आहे काय ? परंतु या प्रश्नांचा विचार पुढें करू. राज्यापहार आणि न्याय असा शिरोलेख आर्टि-कलाचा असून यांत न्यायाबद्दल अजून एक अक्षरही आलें नाहीं असा एक आक्षेप येईल. पण ' महाजनो येन गतः स पंथाः ' असें पुष्कळ वेळां होतें. प्रथमतः राज्यापहाराकडे लक्ष पुरवावें व मग न्यायाचा विचार मागाहून सावकाश करतां येईल, ही प्रवृत्ति मोठ्याच्या ठिकाणीं अनेक वेळां दिसून येते व तिचें अनुकरण इतरांच्या हातून न समजतांनाही होऊन जाणें अगदी साहजिक आहे. पण सारें लक्ष राज्यापहाराकडेच द्यावयाचें आणि न्यायाकडे ढुंकूनसुद्धां कधीं पहावयाचें नाहीं असा जो एक कांहीं मोठ्यांच्या अंगीं दुर्गुण दिसून येतो त्याचें मात्र अनुकरण येथें केलें जाणार नाहीं, इतकें आश्वासन देऊन हा लेख पुरा करतो.

---

# राज्यापहार आणि न्याय : : : १६
## [ २ ]

आतां राज्यापहार न्याय्य आहे काय ? या प्रश्नाचा आपल्याला विचार कर्तव्य आहे. राज्यापहार याचा जो अर्थ मागील लेखांत ठरविला गेला आहे त्यावरून पहातां तो कधींच न्याय्य नाहीं. वंशपरंपरेनें बापापासून मुलाच्या हातीं आणि मुलापासून नातवाच्या हातीं अशा रीतीनें जी राज्यें चालत आलेली आहेत त्यांच्या न्याय्यतेबद्दल आज आपल्याला चर्चा कर्तव्य नाहीं. त्यांच्या मुळाशीं कसलें खत घातलें होतें हें आज लोक विसरून गेले आहेत. काळाच्या गतीनें त्यांना पवित्रपणा आणिला आहे. परंतु काल जो दरवडे घालीत होता तो आज राजा बनतो, आणि जो काल एका वीतभर जमिनीचा राजा होता तो आज कित्येक अवाढव्य देशाचा राजाधिराज होतो अशा रीतीनें मारुतीच्या शेंपटाप्रमाणें ज्यांची राज्यमर्यादा वाढत जाते त्यांच्या संबंधानें मुख्यत्वेंकरून हा प्रश्न आहे. वंशापरंपरागत राज्याबद्दल हा प्रश्न नव्हे, तर नवीन कमावलेल्या राज्याबद्दलचा हा प्रश्न आहे.

मनुष्यांनीं एकमेकांच्या जिवाला अपाय होईल अशा रीतीनें कधींही वागूं नये हा समाजाचा सामान्य नियम होय. पण स्वसंरक्षणासाठीं त्यानें दुसऱ्याचा जीव घेतला तरी हरकत नाहीं हा या नियमाला अपवाद आहे. हाच नियम आणि अपवाद राजांनाही लागू आहे. आपल्या राज्याच्या रक्षणासाठीं दुसऱ्याचें राज्य घेणें भाग पडलें तर तें मात्र वरच्या अपवादाप्रमाणें गैर-वाजवी होणार नाहीं. बाकी सर्व राज्यापहार हे अन्यायमूलक आहेत असें सामान्य दृष्टीनें स्पष्ट ठरतें. परंतु हा सर्व तात्त्विक विचार झाला. पण तत्त्वाचा आणि व्यवहाराचा मेळ क्वचित्‌च बसतो. सामान्य लोकांचे न्याय अन्याय निवडण्याला कोर्टें असतात. त्यामुळें अनें स्वसंरक्षणासाठीं बला मारलें किंवा

त्याच्यापाशीं असलेल्या द्रव्याच्या अभिलाषामुळें त्याचा खून करण्याला अ प्रवृत्त झाला ह्याचा निर्णय होतो. परंतु नदींतील बकऱ्याचें उष्टें पाणी उलट वरती लांडग्याकडे वहात गेलें किंवा नाहीं, किंवा तें तसें जाऊं शकत नसलें तर निदान त्या बकऱ्याच्या वाडवडिलांपैकीं कोणी तरी कधीं तरी कांहीं तरी शिव्या त्या लांडग्याला दिल्या होत्या कीं नाहीं, या गोष्टींचा निकाल करण्याला जशी कोर्टें नाहींत, तशींच राजांचीं कृत्यें तपासून पहाणारीं कोर्टें नाहींत. त्यामुळें वरील सवलतीचा फार दुरुपयोग होतो. स्वसंरक्षणाच्या नांवाखालीं लबाड राजांनीं अनेक नीच पातकें केलीं आहेत. गुजराथेंतील गरीब बिचाऱ्या सोमनाथाचें देऊळ गिझनी येथील महंमदाच्या राज्याला काय बरें घोका आणीत होतें ? तार्तरी देशांतील तैमुरलंगाचें राज्य बुडविण्याच्या कामीं दिल्ली शहरांतील पंधरा वर्षांवरील लोक जितके अपराधी तितकेच पंधरा वर्षांखालीलही नव्हते काय ? नादिरशहाचें हिंदुस्थानच्या लोकांनीं कधीं बरें पाणी गढूळ केलें होतें? गोव्याच्या लोकांनीं लिस्बन शहरांत जाऊन कधीं असा कांहीं गुप्त कट केला होता कीं ज्याच्या योगानें सर्व पोर्च्युगाल देश त्या गोवेकरांच्या हातांत येण्याच्या बेतांत आला होता ? फ्रेंच आज पॉंडेचरी बळकावून बसले आहेत त्यांचा पॉंडेचरीच्या लोकांनीं काय अपराध केला होता बरें ? अमेरिकेंतल्या तांबड्या इंडियनांनीं आणि आफ्रिकेतील काळ्या निग्रोनीं यूरोपखंडांतील कोणत्या देशांत पुंडावा माजविला होता कीं ज्यासाठीं त्यांच्या खंडांत जाऊन कांहींना ठार तर कांहींना गुलाम करणें जरूर होतें ? तार्तरी आणि चीनदेश यांनीं किंवा यांनीं नसतील तर त्यांच्या बापांनीं रशियाला शिव्या दिलेल्या कधीं कोणीं ऐकल्या होत्या काय ? नाहीं. वरील प्रत्येक प्रश्नाला कोणाकडून झालें तरी नाहीं हेंच उत्तर येणार. विजिगीषु लोकांना येऊन जाऊन आपल्या विजयाला न्यायाचें पाठबळ देण्याची काय ती स्वसंरक्षणाची सबब. पण ती देखील किती थोड्या ठिकाणीं इतिहासांतून दृष्टोत्पत्तीस येते ! आणि असें असून हा सगळा न्यायच म्हणून जगांत गणला जात आहे हें केवढें आश्चर्य आहे ! हा न्याय नव्हे, तर ढळढळीत अन्याय आहे. हें सत्य नव्हे, तर हा दिवसा ढवळ्या दरवडा आहे. हें स्वसंरक्षण नव्हे, तर हें आपली तुंबडी भरून घेण्याचें लक्षण आहे. हा कायदेशीरपणा नव्हे, तर हा जबरदस्तपणा आहे. तरी पण प्रत्येक राजा

आपल्या नवीन जिंकलेल्या प्रजेची अशी समजूत घालीत असतो कीं तुमच्या राजाला मारून तुम्हाला मी आपली प्रजा बनवीत आहे, ह्यांत रतिभरसुद्धां अन्याय मी करीत नाहीं. न्यायाच्या नांवाखालीं हा जो अन्यायाचा कहर उसळत असतो याचें मुख्य कारण हेंच होय कीं या बाबतींत जो अन्याय करील त्याला शासन करणारा कोणी नाहीं. नुसते कायदे करून ठेवले आणि त्याप्रमाणें अन्याय करणारांना शिक्षा देणारे मॅजिस्ट्रेट नेमलेले नसले तर त्या कायद्याप्रमाणें कोण वागणार आहे? हिंदुधर्मशास्त्रांतील नियम मोडणाराचें कान उपटणारा हल्लीं कोणी नसल्यामुळें कोणता धर्मलंड सुधारक त्याप्रमाणें वागतो आहे? पीनलकोड उत्तम असून काय उपयोग? जर मॅजिस्ट्रेट नसेल तर चोर चोऱ्या केल्यावांचून राहतील काय? त्याचप्रमाणें स्वराज्यसंरक्षणाखेरीज एरवीं कोणी कोणाच्या राज्याचा अपहार करूं नये असा नुसता नियम असून काय उपयोग? त्या नियमाला कोण धूप घालणार? इतका भोळा राजा कोण असणार, कीं जो या पेंढ्याच्या बाहुल्याला भिऊन पिकलेल्या शेतांतील कणसें खावयाचीं टाकून पळून जाईल? राजांनीं हा नियम पाळला नाहीं तर त्याला शासन करील असा कोण आहे? International Law हल्लीं आहे व कदाचित् कांहीं निराळ्या स्वरूपानें पूर्वीं होता असेंही मानतां येईल. पण त्या कायद्याच्या दृष्टीनें जो गुन्हेगार ठरेल त्याला शिक्षा देणारें कोर्ट कोठें आहे! असें कोर्ट नाहीं व असा मॅजिस्ट्रेट नाहीं. राजा, महाराजा, सार्वभौम राजा, अमीर, नबाब, बादशहा, कैसर, किंग, झार, एम्परर, प्रेसिडेंट अशा सारख्यांना त्यांच्या अन्यायाबद्दल योग्य शासन देणारें कोर्ट कोठेंही नाहीं. पूर्वीं अशा प्रकारचीं कोर्टें कधीं कधीं दृग्गोचर होत असत यांत शंका नाहीं. पॅरिसनें हेलनला पळवून नेऊन सर्व ग्रीस देशाच्या विरुद्ध जेव्हां एक अक्षम्य गुन्हा केला तेव्हां त्या गुन्हेगाराला शिक्षा करण्याकरतां ग्रीसमधील सर्व लहानमोठे राजे ट्रॉयच्या किनाऱ्यावर एकत्र झाले होते व त्यांनीं पॅरिसला योग्य शासन दिलें. दुर्योधनानें पांडवांचें राज्य अन्यायानें हरण केलें होतें त्याबद्दल त्याला शिक्षा करण्याकरितां द्वापारयुगाच्या शेवटीं कुरुक्षेत्राच्या मैदानावर अनेक राजांनीं एक कोर्ट भरविलें होतें व तेथें त्यांनीं त्या वेळच्या International Law च्या कलमांची पूर्ण अम्मल बजावणी केली. परंतु हीं पौराणिक उदाहरणें

आहेत, असा कदाचित् ह्यांजवर आक्षेप येण्याचा संभव आहे. पण हीं उदाहरणें केवळ पौराणिकच आहेत असें नाहीं. यांतही ऐतिहासिक सत्यतेचा बराच अंश आहे. परंतु इतिहासांतील आणि तेंही ताजें असें उदाहरण पाहिजे असल्यास नेपोलियनच्या वेळचें आहे. दुसऱ्याही कांहीं प्रसंगीं लहानमोठ्या प्रमाणावर अशीं कोर्टें भरल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत. पण हा कपिलाषष्ठीचा योग साठ वर्षांनीं येणार व राज्यापहाराचे गुन्हे तर पावलोपावलीं होत असणार. तेव्हां असले गुन्हे असल्या कोर्टांनीं बंद व्हावे कसे ? हीं कोर्टें वरचेवर न भरण्याचीं अनेक कारणें आहेत. हायकोर्टांतील जज्जाच्या जागेला रेशमी आच्छादनाची खुर्ची आणि वर चार हजार रुपये दक्षिणा मिळते. म्हणून जो तो त्या कोर्टांत घुसण्याला पहात असतो. परंतु तें सुख येथें नसल्यामुळें तेथें उमेदवाराची इतकी गर्दी होत नाहीं. आपल्या प्राणावर उदार झालेले मॅजिस्ट्रेट तेथें लागतात व तसे फार विरळा मिळूं शकतात. शिवाय दुसरी अडचण अशी असते कीं सगळ्याच राजांच्या पायाखालीं खरकटें असतें. तेव्हां सहसा कोणी दुसऱ्याच्या उठाठेवींत पडत नाहीं. कारण दुसऱ्याचें कुसळ काढायाला जावें तर आपलें मुसळ बाहेर पडणार ही प्रत्येक राजाला भीति आहेच. पण अशा अडचणी असूनही युरोपांतील राजांनीं एक तडजोडीचा मार्ग काढला आहे. कोणी कोणाच्या राज्यावर हल्ला करावयाचा नाहीं व केल्यास बाकीच्या सर्वांनीं त्याजवर चाल करून त्याला ताळ्यावर आणावें अशा प्रकारचा कांहीं संकेत त्यांच्यामध्यें आहे. अशा रीतीनें ते Balance of power होतां होईल तितकें कायम राखण्याचा प्रयत्न करीत असतात. पण ही त्यांची व्यवस्था त्यांच्या फायद्यापुरतीच आहे. सर्वांच्या फायद्यासाठीं नाहीं. कारण, आफ्रिकेंत जेथें कोणत्याही युरोपियन राष्ट्राची सत्ता नाहीं तेथें पाहिजे त्या राष्ट्रानें जाऊन तेथील सत्ता बळकाविली तर हें कोर्ट त्या अपराधाची चौकशी करण्याच्या भानगडींत पडणार नाहीं. पण असलें कोर्ट काय कामाचें ? युरोपियन राष्ट्राची सत्ता कोणी बळकाविली तर तो मात्र गुन्हा आणि आफ्रिकेंतील निग्रोंची किंवा दरवेशांची सत्ता कोणी बळकाविली तर तो कांहीं गुन्हा होत नाहीं काय ? आणि त्याचा ह्या कोर्टानें विचार करावयास नको काय ? पण हें कोर्ट मुळीं पडलें आपमतलबाचें आणि अन्यायाचें; तेव्हां यांत

न्याय कोठून होणार? वास्तविक पहातां असें एक कोर्ट असावयाला पाहिजे होतें कीं ज्याप्रमाणें एखाद्या शेताच्या मालकीचे दावे सिव्हिल कोर्टांतून चालतात त्याप्रमाणें देशांच्या आणि मुलखांच्या आणि त्यांजवरील राज्यांच्या मालकीविषयींचे दावे तेथें चालूं शकतील. एखादा नवरा आपल्या बायकोला जुलमानें वागवूं लागला तर त्याच्या जाचांतून सुटण्याबद्दल दाद मागण्यासाठीं तिला ज्याप्रमाणें सिव्हिल कोर्ट उघडें असतें, त्याप्रमाणें एखाद्या देशांतील लोकांवर जर कोणी जुलमी राजा जुलूम करूं लागला तर त्या बिचाऱ्यांची जेथें दाद लागेल असें कोणतें तरी एक ठिकाण असणें अत्यंत अवश्यक आहे. कोणी राजानें आपल्या प्रजेला हवें तसें छळावें, गांजावें, जाळावें, पोळावें आणि बाकीच्या बलाढ्य तिऱ्हाइतांनीं त्या प्रजेला जागच्या जागीं मरूं द्यावें हा त्यांचा थोरपणा आहे काय? अशा रीतीची संस्था निघेल तर मात्र ती खरी सुधारणा होय. नाहीं तर माझें तें माझें आणि लोकांचें तें माझें कसें होईल, अशा प्रकारचा विचार करणारी संस्था ही सुधारणेच्या शतकाला काळोखी लावणारी होय.

असो. याप्रमाणें राजे लोकांना दडपणारा कोणी नसल्यामुळें राज्यापहाराचे गुन्हे त्यांच्या हातून असंख्य होतात. दुसऱ्याचें राज्य घेणें हा गुन्हा आहे ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींही येत नाहीं. उलट ज्याचा परिणामीं विजय त्याच्याच पक्षाला प्रारंभीं न्याय असेंही कित्येकांचें मत झालेलें आहे. ' The end justifies the means ' वगैरे भ्रामक तत्त्वें याचीच निदर्शक आहेत. प्रसिद्ध फ्रेंच नाटककार कॉर्नेली यानें या मताचा उल्लेख आपल्या एका पात्राच्या तोंडून येणेंप्रमाणें केला आहेः—

"All those state crimes, which are committed to obtain a crown, are forgiven by heaven, when they are successful. And in the sacred rank in which the favour of heaven has placed him, the past becomes just and the future allowed. The successful can never be guilty."

यांत " राज्यापहार करणें हा वास्तविक अन्याय आहे असें जरी करणाराला प्रथम वाटत असलें तरी जर त्याचा डाव मोठ्या शिताफीनें साधला

तर त्या अन्यायाचा न्याय होण्याला कांहीं उशीर लागत नाहीं व या अन्यायाच्या कामीं खुद्द ईश्वराची त्याला मदत असते व ईश्वर त्याला त्याच्या अन्यायाबद्दल क्षमा करतो !" असेंही प्रतिपादन केलें आहे. राजे आपल्या फायद्यासाठीं आपल्या गुन्ह्यांत देवालाही साथीदार करण्यास मागेंपुढें पहात नाहींत. इतक्या पराकाष्ठेला त्यांच्या अन्यायाचा क्रम जाऊन पोंचलेला असतो. पण विजयी राजांच्या अन्यायाबद्दल देव त्यांना क्षमा करीत असतो हें अगदीं झूट आहे. त्यांना जर देवानें क्षमा केली तर मग चोरांना, दरवडेखोरांना आणि खून करणारांनाही त्यानें क्षमा कां करूं नये ? देव राजांना क्षमा करील हें स्वप्नांतसुद्धां आणावयास नको. पृथ्वीवर राजांच्या राज्यापहाराच्या गुन्ह्याबद्दल शासन करणारें कोर्ट नाहीं, म्हणून वर सांगितलें आहे. परंतु तें कोठेंच नाहीं असें मात्र नाहीं. पृथ्वीवर नसलें तरी स्वर्गांत तें खास आहे. आणि दुसऱ्याच्या राज्याचा अपहार करणाराला जरी येथें कोणी शिक्षा दिली नाहीं तरी स्वर्गांत देव त्याला शिक्षा दिल्यावांचून कधींही राहणार नाहीं. देव कधीं कधीं पृथ्वीवरही त्या राजाला त्याच्याच प्रजेकडून शिक्षा देववीत असतो अशींही उदाहरणें आहेत. तेव्हां राज्यापहार हा अन्यायच नव्हे, किंवा तो असला तरी देवाच्या घरीं त्याला मुभा आहे, असलें सिद्धांत अगदीं खोटे व निव्वळ स्वार्थासाठीं प्रचलित केलेले होत.

# राज्यापहार आणि न्याय : : : १७

[ ३ ]

या विषयासंबंधानें कांहीं प्रश्नांचा विचार होऊन गेला आहे. आतां या भागांत ज्याचा विचार करावयाचा आहे तो प्रश्न येणें प्रमाणें आहेः–अपहाराच्या योगानें राज्य संपादन करणारा राजा त्या राज्यांतील लोकांचा न्याय निवडण्याला योग्य आणि समर्थ आहे काय ? या प्रश्नाचें विवेचन करून आम्ही आज वरील विषयाची परिसमाप्ति करणार आहों.

लोकांचे न्याय अन्याय राजानें निवडून त्याप्रमाणें त्यांना यथायोग्य शासन द्यावें असा राजधर्म सांगितलेला आहे. परंतु जेथें राजाचाच हक्क डळमळीत तेथें तो लोकांचें हक्क कायमचे काय ठरवणार ? जेथें राजाच स्वतः चोर तेथें तो दुसऱ्या चोरांना शासन कोणत्या तोंडानें देणार ! व जेथें राजा स्वतः असंख्य खुनाचें पातक डोकीवर घेऊन मिरवीत फिरणार तेथें तो एखादा दुसरा खून केलेल्या गुन्हेगाराला फांसावर कोणत्या हातानें चढवण्याला धजणार! एका पाश्चिमात्य कवीनें किंचित् विनोदानें राजांच्या गुन्हेगारीबद्दल पुढील उद्गार काढिलेले आहेतः—One murder made a villain, millions a hero. Princes were privileged to kill and numbers sanctified the crime. अशा प्रकारची जेथें राजांची स्थिति असते तेथें प्रजेचा न्याय निवडण्याला ते कितपत योग्य आहेत अथवा किती अयोग्य आहेत, याची कल्पना कोणालाही सहज करतां येण्यासारखी आहे.

राजाचें काम केवळ कायद्याची अम्मलबजावणी करण्याचेंच आहे असें नाहीं. तर त्यानें मुख्यत्वेंकरून लोकांना नीति शिकविली पाहिजे. एकानें दुसऱ्याचा खून केला तर त्याबद्दल त्या खुनी मनुष्याला जो फांशीं देण्यांत येतो

त्याच्या योगानें खून केलेला मनुष्य फिरून जिवंत होतो असें मुळींच नाहीं. परंतु बाकींच्या माणसांची नीति सुधारावी या हेतूनें त्यास खुनी माणसाचा खून करण्याचा हक्क देण्यांत आलेला आहे. तेव्हां कायद्याची अम्मलबजावणी करून जेवढी नीति सुधारतां येईल तेवढी कोणताही राजा सुधारूं शकेल. पण असल्या रीतीनें लोकांच्या नीतिमत्तेला उत्तेजन देणारांत कांहीं विशेष अर्थ आहे असें कोणी समजत नाहीं. कारण, कायद्याच्या यंत्राच्या अनुरोधानें काम करणारांकडे नीति सुधारल्याचें श्रेय येऊं लागलें तर तें फांशीची शिक्षा द्यावी म्हणून ठरविणाऱ्या राजापासून तों फांशीं द्याव-याच्या माणसाच्या पायांखालची फळी ओढणाऱ्या मांगापर्यंत सर्वांना सारखें मिळालें पाहिजे. मग त्यांत पंक्तिप्रपंच करून उपयोग नाहीं. पण फळी ओढणाऱ्या मांगाची आणि एखाद्या राजाची ज्यांत बरोबरी आहे अशा नीतिला उत्तेजन देणाऱ्या कृत्यापासून राजाची नीतिमत्तेबद्दल कीर्ति कितीशी वाढणार आहे ? आणि त्यांत त्यांना वास्तविक भूषण वाटण्यासारखें काय असणार आहे ? त्यांनीं लोकांना फसविण्यासाठीं जर त्यांतच भूषण मानून घेतलें तर गोष्ट वेगळी. परंतु खरें भूषण स्वतःच्या वर्तणुकीनें आपल्या राष्ट्रांतील लोकांची नीतिमत्ता वृद्धिंगत करण्यांत आहे. पण या भूषणाला कितीजण पात्र होण्याचा संभव आहे ? निदान राज्यापहार करणारे राजे तरी या सन्मानाला पात्र नाहींत एवढें खास.

सारांश, राजाच्या कायद्यापेक्षां राजाच्या स्वतःच्या वर्तनानेंच नीति वाढते. किंबहुना ती सर्वस्वीं त्याच्या वर्तनानेंच वाढते; त्याच्या कायद्यानें मुळींच वाढत नाहीं. कायद्यांना जर राजाच्या वर्तनाचा पाठिंबा नसेल तर त्यांच्यांत कांहीं जोर रहात नाहीं. कायदे हे लोकांना फसविण्यासाठीं मात्र केले आहेत. आपलें वर्तन त्यांच्या योगानें नियंत्रित करण्यासाठीं ते केलेले नाहींत असा ग्रह त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत उत्पन्न होऊं लागतो, आणि मग त्या कायद्यांना कोणी मान देईनासा होतो. तेव्हां लोकांच्या नीतिमत्तेचा मुख्य भार राजाच्या वर्तनावर येऊन पडतो. ‘ यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः’ हें तत्त्व सर्व ठिकाणीं सारखेंच लागू पडतें. दुसऱ्यानीं खोटें बोलूं नये असें कायद्यानें जो ठरवितो त्यानें आपलीही वचनें खोटीं ठरू देतां कामा नये. चोरी करणें हें पातक आहे व त्याचे वाईट परिणाम भोगावे

लागतात असें कायद्यानें; जो शिकविणार त्यानें स्वतः तें पातक केलेलें असूनही त्याला राज्योपभोगाची चैन मारायाला सांपडते आहे, असें लोकांच्या पुढें जर ठळक उदाहरण असलें तर लोक चौर्याला प्रवृत्त होतील कां त्यापासून परावृत्त होतील ? अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें पाहिलीं असतां असेंच निष्पन्न होतें कीं राजाचें वर्तन शुद्ध असेल तरच लोक त्याचे कायदे पाळणार. वारांगनांनीं शिकविलेले पातिव्रत्याचे धडे कोणाच्या मनावर ठसणार आहेत !

पण ह्यावर असा एक आक्षेप येतो कीं तुरुंगांत अशी एक चाल असते कीं जुना कैदी झाला म्हणजे त्याच्याही हातांत कांहीं अधिकार येतो, त्याच्या हाताखालीं कैद्यांची एक टोळी देण्यांत येते, व त्यांजवर देखरेख ठेवणें, त्यांचेकडून काम करून घेणें, त्यांच्याकडून कांहीं चुकी झाल्यास त्यांना शासन करणें इत्यादि अनेक अधिकार तो स्वतः एक गुन्हेगार कैदी असूनही त्याजकडे आलेले असतात. त्याचप्रमाणें कांहीं सुधारक लोक स्वतः पुनर्विवाह करीत नसले तरी, पुनर्विवाह करावा हें चांगलें, दारू न पिण्यापासून हित आहे, वगैरे उपदेश दुसऱ्यांना नेहमीं करीत असतात. तेव्हां चांगला उपदेश करणाराचें वर्तन अवश्य चांगलें असलेंच पाहिजे असें नाहीं. पण याचें उत्तर असें आहे कीं सुधारकांचें जें वर दर्शविलेल्या रीतीचें वर्तन आहे, त्यामुळें त्यांना ‘ कोरडे पाषाण ’ ही पदवी सर्व लोक नेहमीं देत असतात. ही गोष्ट आपण लक्षांत आणली म्हणजे सामान्य लोकमताप्रमाणें आपलें स्वतःचें वर्तन, बडबडणें नव्हे, शुद्ध असण्यांतच खरा मोठेपणा आहे असें ठरतें. आतां दुसरें जें उदाहरण वर दिलें आहे तशी स्थिति आज जगांत प्रत्यक्ष चालू आहे एवढें मात्र खरें. एक गुन्हेगार आपल्या अधिकाराच्या जोरावर दुसऱ्या गुन्हेगारांच्या पाठीचीं सालडीं काढीत आहे; एक दहा वर्षांचा जुना चोर सहा महिन्याच्या नव्या चोरांकडून खडी फोडवून घेत आहे; व एक मुरलेला निब्बर मांग मान कांपण्याच्या कामांतील नवशिक्या मांगाच्या पायांखालच्या फळ्या ओढीत आहे; हें मात्र खरें आहे. पण म्हणून ही नीति नव्हे. यानें जगांतील नीतिमत्ता वाढेल असेंही नाहीं. तेव्हां फिरून पूर्वीचाच सिद्धांत कायम होतो कीं जगांत न्याय आणि नीतिमत्ता यांची समृद्धि होण्याला कायद्यांतील शुद्धपणा नव्हे, तर स्वतःच्या वर्तनांतील शुद्धपणाच कारणीभूत होतो.

परंतु जो राजा दुसऱ्याचा अपहार करण्याला प्रवृत्त होतो त्याच्या वर्तनांत शुद्धपणा कितपत राहतो ? कोणत्याही पीनलकोडाच्या प्रत्येक कलमाखालीं तो गुन्हेगार ठरूं शकेल इतके अन्याय त्याच्या हातून झालेले असतात. त्यानें तहाचीं कलमें मोडलेलीं असतात त्यामुळें करार न पाळण्याचा गुन्हा तो करतो. पूर्वीच्या राजांविरुद्ध फंदाफितुरी उत्पन्न केल्यामुळें राजद्रोहाचा अपराध त्यानें केलेला असतो. लोकांचीं घरेंदारें त्यानें लुटलेलीं आणि जाळलेलीं असतात, त्यामुळें चोरी, दरवडा, आग लावणें हे गुन्हे त्याच्या हातून झाले असतात व लढाईमध्यें विनाकारण कैक लोक त्यानें मारलेले असल्यामुळें त्यानें खुनाचा अपराध केला नाहीं असेंही कोणाला म्हणतां यावयाचें नाहीं. अशा असंख्य दुर्गुणांचा आणि अपराधांचा मूर्तिमंत पुतळा जो दुसऱ्याच्या राज्याचा अपहार करणारा राजा तो लोकांना न्याय कोणत्या तोंडानें देणार ? ज्या लोकांना अशा राजाकडून न्याय घ्यावा लागतो ते खरोखर मोठे हतभागी होत. ते रत्न म्हणून गारगोटी, अमृत म्हणून विष, आणि न्याय म्हणून शुद्ध अन्याय आपल्या पदरीं बांधून घेत आहेत, असेंच विचाराअंतीं म्हणावें लागतें त्यांच्या न्यायाच्या झऱ्याचें पाणी मुळाशींच गढूळ झालेलें आहे, त्यांच्या न्यायाची इमारत वाळूच्या पायावर उभारलेली आहे, त्यांच्या न्यायरूपी शरीरांतील रक्ताचा पहिलाच थेंब रक्तपित्तीच्या रोगानें दूषित झाला आहे, व त्याच्या न्यायरूपी वृक्षाचें बीज करपून गेलेलें आहे, असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं.

अनें बची काही जमीन घेतली असली तर ब राजाकडे फिर्याद करतो आणि राजा ती त्याला परत देण्याविषयीं अला हुकूम करतो. परंतु एखादा अ असें म्हणणारा भेटेल कीं, 'हे दुसऱ्याचा अपहार करणाऱ्या राजा, ही दीड वीत लांबी-रुंदीची जमीन ज्याची त्याला परत देण्याविषयीं तूं मला हुकूम करतोस खरा; पण हजारों एकर लांबी-रुंदीची जी जमीन तूं स्वतः दडपून बसला आहेस ती तूं ज्याची त्याला परत दिली आहेस काय ? ती तूं तशीच बळकावून ठेवावीस आणि मी मात्र ही परत द्यावी असा भेद तुझ्या न्यायांत कां बरें असावा ? तूं ती ज्याची त्याला परत देण्याला कबूल आहेस काय ? तूं कबूल असशील तर मीही कबूल होतो. पण तूं नसशील तर मी तरी कां बरें व्हावे,' असा कोणी युक्तिवाद करूं लागला तर त्याला

देण्यासारखे सरळ उत्तर त्या राजापाशीं काय बरें आहे ? अनें बचा खून केला तर अला फांशीं द्यावि असा राजा हुकूम करतो. पण यावर राज्यापहार करणाऱ्या राजाला अ असें म्हणूं शकणार नाहीं काय कीं, ‘ हे राजा जो खून करील त्याला फांशीं द्यावें हा नियम जर सर्वत्र पाळला गेला असता तर तूं आज मला फांशीं देण्याचा हुकूम करण्याला खास जिवंत राहिला नसतास; इतकेंच नव्हे, तर प्रत्येक खुनाला एकेक वेळी फांशीं हा नियम घेऊन चालावयाचें म्हटलें तर तुझ्या सर्व खुनाबद्दल शासन मिळेपर्यंत तुला किती जन्म घ्यावे लागतील हें तुला माहीत आहे काय ? मग अशी स्थिति आहे तर मला फांशीं देण्याचा हक्क तुला कसा पोंचतो ? तूं पुष्कळ खून केलें आहेस म्हणून तुला हा हक्क मिळाला आहे, असें असेल तर हा न्याय नव्हे, हा न्यायाचा भयंकर विपर्यास आहे. अनेक खून करूनही जर तूं राज्याचा उपयोग घेऊं शकतोस तर यःकश्चित् एक खून करणारा पृथ्वीच्या पाठीवर, हालविपत्तींतच कां होईना पण नुसता जिवंत राहण्यालाही योग्य नाहीं हा न्याय होईल काय ? मी खून केला आहे तर मी मरावें हें अगदीं खरें आहे; पण माझ्यापुढें तुझी स्वारी आधीं थाटानें वधस्तंभाकडे गेली पाहिजे हे खरे नाही काय? न्याय असेल तर तो सगळ्यांना सारखा लागू केला पाहिजे.’ यावर राजापाशीं उत्तर देण्याला काय आहे बरें ? अर्थात् कांहीं नाहीं. अशा रीतीनें पाहूं गेलें तर राज्यापहार करणाराला एक क्षणभरही न्यायासनावर बसतां यावयाचें नाहीं, इतकेंच नव्हे, तर एखाद्या भयंकर गुन्हेगारापेक्षां ज्यास्ती पुढें न्यायासनाकडे जाण्याचीसुद्धां त्याची लायकी नाहीं हें उघड होतें. व अशा दृष्टीनें त्या ठिकाणीं लोकांना जो कांहीं मिळत असतो तो न्याय नव्हे, व जो कोणी न्याय देण्यासाठीं म्हणून प्रमुखत्वानें बसलेला असतो तो न्यायाधीश नव्हे; तर एका बड्या गुन्हेगाराच्या हातून छोट्या गुन्हेगारांना अन्याय मिळत असतो असा याचा अर्थ निष्पन्न होतो. व हा अर्थ खरा ठरला म्हणजे जेथें राजा नाहीं व न्यायही नाहीं तेथें झोटिंगपाच्छाई आहे, अराजकता आहे असे लोक समजतात. तेव्हां राजांनीं आणि लोकांनीं असा प्रसंग होतां होईल तों टाळावा हें इष्ट आहे.

---

# तिबेट आणि नीतिशास्त्र : : : १८

What is here! Gold ? yellow, glittering precious gold ? Thus much of this will make black, white, foul, fair; wrong, right; base, noble;......What this; you gos ? Why, this will lug your priests and servants from your sides......This yellow slave will knit and break religions.— *Shakespeare.*

पापभीरू, न्यायी नीतिधर्माप्रमाणें वागणारे, आणि ज्यांच्या धर्माचा पाया केवळ नीतिवरच रचलेला आहे, अशा ख्रिस्ती धर्मानुयायांच्या तोंडाला तिबेटची संपत्ति पाहून हल्ली कसें पाणी सुटत आहे याचे कांहीं मासले आम्ही पूर्वी दिलेलेच आहेत. अलीकडे त्याच विषयावर पायोनियरमध्यें एक निनांवी पत्र प्रसिद्ध झालें आहे व सेंट जेम्स गॅझीटच्या एका बातमीदाराचा तिबेटासंबंधानें प्रसिद्धीस आलेल्या मि. सॅव्हेज लॅंडॉरपाशीं झालेला संवाद प्रसिद्ध झाला आहे. त्या दोहोंतून ख्रिश्चन नतींचे कांहीं निवडक नमुने आम्हीं आपल्या वाचकांपुढें मांडतों. दुसऱ्याचा सुतळीचा धागा घेणें म्हणजेसुद्धां ती चोरी आहे असें बायबल म्हणतें. मग दुसऱ्यांचा संबंध मुलुखच्या मुलूख घेणें हें कोणा तरी ख्रिश्चनाला बरें वाटेल काय ? पण काय करावयाचें ? 'क्षुधितास अन्न द्यावें' हीसुद्धा ईश्वराचीच आज्ञा आहे. आणि आज हिंदुस्थानांत किंवा हिंदुस्थानाच्या बाहेर किती बरे युरोपियन आणि युरेशियन गरिबीच्या स्थितींत आहेत ! त्यांना फार राहिले, पण निदान महिन्याचे शेंदोनशें रुपये तर मिळाले पाहिजेत ! म्हणून परमेश्वराची आज्ञा पाळण्यासाठीं आणि गरीब लोकांना अन्न देण्यासाठीं तिबेट घ्यावें असें म्हणावें लागतें. नाही तर दुसऱ्याच्या वस्तूला कोणी बरे हात लावला असता? शिवाय कोणतीहि गोष्ट पापकारक आहे किंवा पुण्यदायक आहे, हें ती गोष्ट करणारांच्या हेतूवर

अवलंबून असते. तिबेटांत राज्य करण्यासाठीं आणि चैन मारण्यासाठीं जर आम्हीं तिबेटचा मुलूख घ्यावा असें म्हणत असलों तर आमच्याकडे दोष आहे खरा; पण आमचा असला हलकट, आणि देवाला तिरस्करणीय वाटणारा, उद्देशच नाहीं. आम्हाला तेथें राज्य करायला थोडेंच जावयाचें आहे ! व्यापार ! व्यापार ! व्यापार हा आमचा उद्देश ! व्यापार हा आमचा स्तुत्य हेतु ! व व्यापार करू नये असें देवानें कोठेंही सांगितलें नाहीं. तेव्हां फक्त व्यापारासाठींच जर कोणी तिबेट देश लामांच्या हातांतून हिसकावून घेतला तर त्यांत परमेश्वराच्या घरीं पातक होईल काय ? नाहीं, नाहीं. अशीं पातकें होऊं लागलीं तर मग माणसांना ख्रिस्ती धर्म पाळणें फार जड जाऊं लागेल. तिबेटचें राज्य लामांच्या हातांत असलें काय, आणि हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरलच्या हातांत असलें काय, देवाला दोन्हीं सारखींच. पण गरीब युरोपियन आणि युरेशियन याचे प्राण अन्नावांचून गेले काय आणि राहिले काय, या गोष्टी मात्र देवाला सारख्याच नाहींत. कसेंही करून मनुष्यांचे जीव वांचविणें हें देवाचें पहिलें कर्तव्यकर्म आहे. आणि त्यासाठीं 'तिबेटाचें राज्य घ्या, तिबेटाचें राज्य घ्या,' असें देव कोणाच्या तरी कानांत सांगतो. सर्व कर्ता करविता परमेश्वर आहे व त्याच्या इच्छेसाठीं हा सर्व खटाटोप. नाहींतर मनुष्याला राज्य आणि त्याचा त्रास या गोष्टी करावयाच्या होत्या काय ? शिवाय, दुसरी गोष्ट अशी आहे कीं तिबेटचें राज्य घ्यावयाचें झालें तरी तें कसें घ्यावयाचें इकडे लक्ष देणें जरूर आहे. राज्य घेण्याघेण्यांत प्रकार आहेत. दिल्लीचें राज्य तैमुरलंगानें घेतलें, नादिरशहानें घेतलें, सदाशिवराव भाऊंनीं घेतलें आणि सर्वांच्या मागून इंग्लिशांनीं घेतलें. पण या चवथ्या खेपेला कधीं कोठें कत्तल झाली काय ? दिल्लींतील गल्ल्यांतून कधीं रक्ताचे पाट वाहिले काय ? किंवा प्रेतांचे ढीग कुजत पडून तेथील स्वच्छ हवा कधीं बिघडली होती काय ? किंवा तेथील तक्त फोडून त्याचें कोणी रुपये पाडले काय ? नाहीं. यांपैकीं कांहीं एकसुद्धां गोष्ट घडून आली नाहीं. पण राज्य आपलें इंग्रजांच्या ताब्यांत यावयाचें तें आलें. तेव्हां तिबेटचें राज्य घेण्यासाठीं दुर्दैवानें जर स्वारी करावी लागली तर ती स्वारीसुद्धां अशी करावयाची कीं ती अगदीं peaceful असली पाहिजे. Peaceful invasion करण्यांत फार मौज आहे. Peaceful invasion हा शब्दही अजून

कित्येकांना ठाऊक नाहीं, व कित्येक ज्ञानलवदुर्विदग्ध लोक तर peaceful invasion यामध्यें शब्दांचा परस्परविरोध आहे असें म्हणण्याचें धाडस करूं लागले आहेत. पण हें नीतिशास्त्र आहे, व्याकरणशास्त्र नव्हे, हें त्यांना अजून कळत नाहीं. ज्याच्या योगानें एका संबंध राष्ट्राचें कल्याण होणार त्या peaceful invasion मध्यें शब्ददोष काढण्याचें ज्यांना सुचतें त्यांना काय नांव द्यावें हें सांगणें कठिण आहे. पण त्याहीबद्दल कोणाचें कांहीं विशेष म्हणणें नाहीं. गरीब युरोपियन आणि युरेशियन यांच्या पोटाला अन्न मिळो, चायनीज आणि रशियन टर्किस्तानमध्यें खालावत चाललेला आमचा व्यापार तिबेटांत भरभराटीस येवो. आणि त्या व्यापाराला हरकत न येण्यासाठीं लामांच्या जागीं लॉर्ड कर्झनची स्थापना होवो, मग peaceful invasion यांतील शब्दप्रयोगाच्या चुकीबद्दल एखाद्या शाळामास्तरानें दोन छड्या मारल्या तरी चालतील. पण मास्तराच्या छडीला भिऊन देवाची इच्छा परिपूर्ण करण्याला मागेंपुढें पाहणें ठीक नाहीं. लोकांत व्याकरणाचा प्रसार कमी झाला तरी हरकत नाहीं. पण त्यांना नीतीनें कसें वागावें हें समजलें पाहिजे. आणि peaceful invasion यांत एवढा म्हणण्यासारखा शब्ददोष तरी काय आहे? असें म्हणतात कीं उंदीर जेथें डास घेतो तेथें डास घेतांना तो फुंकर घालीत असतो. सिंह, वाघ, लांडगा यांच्या तावडींत जर कोणी सावज सांपडलें तर ते त्याचे हाल हाल करून प्राण घेतात; पण अस्वलांची पद्धत अगदीं वेगळी आहे. त्याला कोणाचा प्राण घ्यावयाचा झाला तरी तेथें छळ म्हणून बिलकूल व्हावयाचा नाहीं, सर्व काम हंसून खेळून व्हावयाचें. अस्वल आपल्या सावजाला गुदगुल्या करून इतकें हंसवून सोडतो कीं तें सावज जर कोणी मनुष्य असेल तर त्याला 'हा अस्वल म्हणजे एक आपला गमतीबाज दोस्त आहे' असें वाटल्यावांचून खास राहणार नाहीं. ज्याचा प्रत्यक्ष प्राण घ्यावयाचा त्याच्याही मनांत आपल्याविषयीं इतका प्रेमभाव आणि इतकी आदरबुद्धी उत्पन्न करण्याची हातोटी साधणें म्हणजे कांहीं लहानसहान काम नव्हे. ही हातोटी जनावरांनासुद्धां साधलेली असून मनुष्यांना साधूं नये ही आश्चर्याची गोष्ट आहे. कांहीं लोकांना या कलेंत बरेंच यश आलेलें आहे हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. तरी पण ख्रिस्ती शकाला आज एकोणिसशें वर्षें होत आलीं असूनही peaceful

invasion चें लोकांना इतकें आश्चर्य वाटावें हें आश्चर्य नव्हे काय ? चावतांना फुंकर घालणें, प्राण घेतांना गुद्गुल्या करणें, किंवा एखाद्या हतभाग्य देशावर हल्ला करतांना तो शांतपणानें करणें, इतकी माणुसकी जर आपण विसरलों, इतका उदारपणा जर आपण आपल्या शत्रूवर दाखविण्याला तयार नसलों तर ख्रिस्ताचा या पृथ्वीवर अवतार फुकट झाला आणि आपण आजपर्यंत ख्रिस्तीधर्माचे पोवाडे फुकट गाइले, असें होणार नाहीं काय ? जेथें रक्त दूषित झालें असेल तेथें मात्र जळू चिकटते, बाकीच्या भागाला ती आपला दांत कधीं लावीत नाहीं, हा सद्गुण जळवांपासून मनुष्यानें शिकणें अवश्य नाहीं काय ? जर शांततेनें हल्ला करणें शक्य असेल तर मग धांगडधिंग्याचा हल्ला कशाला पाहिजे ? जर एखाद्या गोड अभिवचनानें काम होत असेल तर तोफेच्या भयंकर गर्जना आणि घोड्यांची कर्कश खिंकाळणीं कशाला पाहिजेत ? आणि अभिवचन म्हणजे कांहीं एखादा लोखंडी गज नव्हे कीं जो किती श्रम केले तरी मोडतां यावयाचा नाहीं. तर अशा धोरणावरच चालणें इष्ट आहे. जिकडे तिकडे शांतता पाहिजे. हें जग शांततेसाठीं आहे आणि शांतता ही ह्या जगासाठीं आहे हें विसरतां कामा नये. सर्व कांहीं शांततेसाठीं ! प्रत्यक्ष लढाईसुद्धां शांततेसाठींच म्हणून केली पाहिजे तरच ती खरी ख्रिश्चन शांतता होय. जगांत शांतता राखण्यासाठीं कित्येक लोकांना कष्टप्रद असें राजाचें काम करावें लागतें आणि असंख्य लोकांना गुलामगिरीच्या कोठडींत कोंडून ठेवावें लागतें. शांततेसाठीं—त्या ख्रिश्चन शांततेसाठीं—जर नसतें तर हें राज्यभार वाहण्याचें दुःख कोणी सहन केलें असतें ? तर अशा त्या शांततेसाठीं लढाई करावी लागली तर ती नको का करावयाला ? बरें त्या लढाईत थोडा फायदा असता तर एक गोष्ट वेगळी. पण फायद्याच्या अवाढव्यपणाचा अंदाज केल्यावांचून जर नुसत्या नीतिशास्त्राच्या अनुरोधानेंच कोणी या ‘ शांततेच्या लढाई ’ ला नांव ठेवूं लागले तर त्यांना काय म्हणावें बरें ? फायद्यापुढें नीतिशास्त्राची किंमत ती काय ? नीतिशास्त्र तरी कोणत्या धोरणावर रचलें आहे ? फायद्याच्याच कीं नाहीं ? तर खोटें बोलूं नयें, खरें बोलावें, असें नीतिशास्त्र कां शिकवतें ? तर खोटें बोलण्यापेक्षां खरें बोलण्यांत अधिक फायदा आहे म्हणून. तर मग नीतिशास्त्राच्या आज्ञा मानण्या-

पेक्षां मोडण्यांतच जर अधिक फायदा असेल तर नीतिशास्त्राच्या आज्ञा मोडण्याला त्याच शास्त्राची संमति आहे असें होत नाहीं काय ? तिबेटांतील लामांच्या घरांवर सोन्याचे पत्रे इतके आहेत कीं, ते काढून आणले असतां हिंदुस्थानचें सर्व कर्ज आज फिटून जाईल. देशांतील उधळपट्टीचा कारभार आणि सरहद्दीवरील अनवश्यक लढाया, मोठाले भत्ते आणि त्याहूनही मोठाले पगार, यांच्यायोगानें आज अनेक वर्षांपासून वाढत आलेले हिंदुस्थानचें सोनेरी कर्ज जर लामांच्या घरावरील सोनेरी पत्र्यांनीं एका क्षणांत फिटून जात असलें तर फायनॅन्स मिनिस्टरच्या ऑफिसापासून तों तहत कॉंग्रेसच्या मंडपापर्यंत सर्वांना अत्यानंद होणार नाहीं काय ? निदान लामांच्या घरावरचे पत्रे निघून विलायतेस गेले तरी आपलें कर्ज होतें तेवढेंच आहे, असें समजेपर्यंत तरी हिंदुस्थानाला हर्षवायूनें बेशुद्ध होण्याला काय हरकत आहे ? शिवाय, हल्लीं लामांच्या घरांवर बसून सोन्याचे पत्रे जें काम करीत आहेत तें मातीचीं कौलेंसुद्धां करणार नाहींत काय ? विलायतेच्या बँकांमधून ह्या व्यापाऱ्याच्या हातून त्या व्यापाऱ्याच्या हातीं खेळत असण्याचें सोडून देऊन या सोन्यानें मातीच्या मोलाचें काम करीत आळसात लामांच्या घरांवर पडावें, हें बरें दिसतें काय ? जगांत कोणी सोन्याचा भोक्ताच राहिला नाहीं काय कीं त्यानें या लामांच्या घरीं कौलांचें काम करावें ? जगांत हाव, तृष्णा हे पदार्थच उरले नाहींत काय कीं या सोन्यानें लामांचें ऊन आणि पाऊस यांपासून रक्षण करीत बसावें ? छे, छे ! सोन्याचा काय उपयोग आहे हें आम्ही लामांना शिकविलें पाहिजे. या गोष्टीपासून हिंदुस्थान देशाला तर फायदा आहेच. पण या देशाच्या राजालाही फायदा आहे. ब्रह्मदेश हिंदुस्थानाला ज्यानें सामील केला तो आज ड्यूक आफ् आवा म्हणून गाजतो आहे. तर मग जो महात्मा तिबेट सामील करील तो ड्यूक आफ् लामा होणार नाहीं कशावरून ? शिवाय लँडारसाहेब असें सांगतात कीं लामा काय ते विरुद्ध आहेत. बाकी सर्व तिबेटांतील लोक आपला मुलुख इंग्रजी राज्यांत कधीं सामील होतो याची वाट पहात बसले आहेत. गुलामगिरीसाठीं हपापलेल्या या चातकांच्या तोंडांतून पाण्याचे थेंब पाडणारा कृपामेघ तिबेटाकडे आतां कधीं वळेल तो वळो. सारांश, वाघाला आणि माणसाला दोघांनाही भूक लागते व दोघेही हरणाचें मांस खातात. परंतु मनुष्य हरणाचें

६६२४ ३०१

खाण्याच्या पूर्वी मी तें कां खावें याबद्दल प्रमाणें दाखवूं शकतो, व तीं वाघाला दाखवितां येत नाहींत. तेव्हां पशु आणि मनुष्य यांच्यांत अंतर पाहूं गेलें तर तें फक्त तर्कशास्त्राचें होय.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ७३६०३ दि: १०।७।६१
क्रमांक ९६०९ नों: दि: २८-२-०९

# समजूत　　:　　:　　:　　१९

समजूत हा शब्द किती गोड ! पण या गोड शब्दांत किती कडू अर्थ भरला आहे. किती भयंकर कल्पनांचा यांत समावेश झाला आहे व अंगावर शहारे आणणारीं अशीं किती अघोर कर्में यांत अंतर्भूत झालीं आहेत, याची कोणाला तरी सकृद्दर्शनीं कल्पना येईल काय ! बाहेरच्या गोजिरवाण्या आकारानें दुसऱ्याला फसवावयाचें हें काम मूळचें म्हटलें म्हणजे मनुष्याचें. पण त्याचें फसवेगिरीचें काम इतकें वारंवार दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें कीं तें पाहून कांहीं शब्दसुद्धां लोकांना फसविण्याचें काम शिकले. त्यांपैकींच ' समजूत ' हा एक लोकांना फसविणारा आणि खोटें बोलणारा शब्द आहे. ' समजून सांगणें ' हा याचा दिखाऊ अर्थ आहे. पण 'समजून सांगून कोणी समजला नाहीं तर तंबी देणें, हालअपेष्टा करणें, छळणें, शरिराला क्लेश देणें ' हा अर्थ त्याच्या आंत दडून बसलेला आहे. वरून हें गुलाबाचें फूल आहे, पण त्याच्या खालीं कांटे आहेत. बाहेरून ह्याची पाठ गुळगुळीत आहे, पण आंतून ह्याचें तोंड विषारी दांतांनीं भरलेलें आहे. बाह्यात्कारी ' समजूत ' हा फार सौम्य शब्द आहे, पण ह्याच्या खालीं राखेचा तोबरा, तापलेला तवा, मिरच्यांची धुरी, चिंचेचा फोक, लोखंडी

चाप, लांकडी खोडा, विजेची पेटी इत्यादि अतिशय उग्र पदार्थ छपून बसलेले आहेत. मराठींत जसा 'समजुत' हा शब्द तसाच इंग्रजींत Question हा शब्द आहे. दिसावयाला Question म्हणजे विचारणें, पण 'Question' आणि 'समजूत' या दोघांचाही कैद्याच्या खोलींतील अर्थ अगदीं एकच.

असो. ही वर सांगितलेल्या प्रकारची 'समजूत' देण्याचा प्रघात जो कित्येक ठिकाणीं प्रचारांत आहे त्याच्या न्यायान्याय्यतेबद्दल आपण थोडासा विचार करूं. अपराध्याच्या शरीराला क्लेश अपराध शाबीत होण्याच्या पूर्वी आणि नंतर असे दोन वेळां होत असतात. त्यांपैकीं अपराध शाबीत झाल्यानंतरचा क्लेश ही त्याच्या अपराधाबद्दल त्याला शिक्षाच असल्यामुळें ती न्याय्य आहे व त्याच्याबद्दल आपल्याला विचारही कर्तव्य नाहीं. परंतु एखाद्यानें गुन्हा केला असें सिद्ध होण्यापूर्वी त्या गुन्ह्याबद्दल त्याला क्लेश सोसावे लागतात हें न्याय्य आहे काय, हा प्रश्न आज आपलेपुढें आहे. एखाद्या आरोपीनें गुन्हा केला असला पाहिजे असा संशय येतो, परंतु आरोपी तो गुन्हा कबूल करीत नाहीं; अशी स्थिति प्राप्त झाली असतां आरोपीचे तोंडून कबुली काढून घेण्यासाठीं 'समजुती' चा उपयोग करण्यांत येतो. एकाद्यावर चोरीचा वहीम येतो व त्यानें चोरलेलें द्रव्य कोठें पुरून ठेविलें आहे तें दाखवावें म्हणून त्याला 'समजूत' देण्यांत येते. मूळचे हे प्रकार म्हटले म्हणजे दरवडेखोराचे होत. चोर एखाद्या घरावर दरवडा घालण्यासाठीं आले आणि घराचा मालक आपलें द्रव्य कोठल्या भुयारांत आहे हें सांगत नसला तर ते दरवडखोर त्याच्या मानेवर तरवार ठेवतात, त्याच्या गळ्याला फांस लावून त्यास पाण्यांत बुडवितात आणि वर काढतात, त्याच्या अंगाला चिंध्या बांधून वर तेल ओतून पेटवितात, व तो आपल्या द्रव्याची जागा सांगेपर्यंत ते दरवडेखोर त्याचे अशा रीतीनें हाल हाल करीत असतात. दरवडे घालून ज्यांनीं आपल्या धंद्याला सुरवात केलेली असते तेच पुढें आपल्या धंद्यांत नांवालौकिकाला आले म्हणजे ज्या अर्थी राजे बनतात त्या अर्थी राजाच्या गादीवर शुभ्र अस्तरावर दरवड्यांतील संवयीचे काहीं काळेकुट्ट डाग पडलेले असणें अगदीं साहजिक आहे. सारांश, छळ करून इष्ट हेतु साधण्याची ही युक्ति मूळची दरवडेखोरांची, व तिचें आज

राजे लोक अनुकरण करीत आहेत. तेव्हां दरवडेखोरांच्या कुळांत उत्पन्न होऊन राजांच्या घरीं नांदण्याकरतां आलेली ही पद्धति आपल्या माहेरचे कांहीं आनुवंशिक दुर्गुण अर्थातच बरोबर घेऊन आलेली असली पाहिजे. तर मग अशी पद्धति न्याय्य म्हणून कशी ठरणार ?

ही 'समजूत' देण्याची पद्धति मूळची कोठून कां आलेली असेना, परंतु तिच्या योगानें जर सत्य बाहेर पडत आहे तर तिचा उपयोग करण्याला कांहीं हरकत नाहीं असें कोणी म्हणेल. पण हें म्हणणें अतिशय भ्रामक आहे. कारण, न्याय करण्यासाठीं जर अन्याय करावा लागत असेल, सत्याचा जय होण्यासाठीं जर असत्य गोष्ट करावयाची असेल, किंवा एक अपराध बाहेर काढण्यासाठीं जर दुसरा अपराध करणें भाग असेल, तर अशी गोष्ट नीतितत्त्वांना कधींही संमत होणार नाहीं. सत्य बाहेर निघालें नाहीं तरी हरकत नाहीं. परंतु सत्याच्या नांवाखालीं आणखी असत्य नको, असेंच कोणी झालें तरी म्हणणार. व या 'समजुतीनें' सत्य बाहेर पडतेंच असें तरी कोठें आहे ? मार सोसण्याची शक्ति ज्याच्या अंगांत आहे तो खरा अपराधी असूनही मार सोसून निरपराधी ठरेल. आणि निरपराधी पण अशक्त असा माणूस चापाच्या आणि विजेच्या पेटीच्या वेदनांतून मुक्त होण्यासाठीं मी अपराध केला आहे असें कबूल करूं लागेल. तेव्हां या योगानें शक्तीची परीक्षा होते, सत्याची होत नाहीं. अशा योगानें सशक्त लोकांना अपराध करण्याला उत्तेजन येईल आणि अशक्त लोक विनाकारण गांजले जातील. हा सत्यशोधनाचा उपाय म्हणून मानला जातो. पण कधीं कधीं वस्तुस्थिति अशी होते कीं त्या यमयातनांच्या भीतीनें कित्येक असत्य बोलण्याला मात्र प्रवृत्त होतात कारण अपराध केलेला नसून मी केला असें म्हणणें म्हणजे खोटें बोलणेंच नव्हे काय ? पुष्कळ वेळां आरोपीनें स्वतः कबूल व्हावें किंवा दुसऱ्यांची नांवें सांगावीं अशी 'समजूत' देणारांची इच्छा असते. पण त्या बापड्याला जर कांहीं ठाऊक नसेल तर तो सांगतो काय ? व अशा ठिकाणीं त्याला गुन्हा कोणी केल्याबद्दल नव्हे, तर गुन्हा कोणी केला हें माहीत नसल्याबद्दल, चार चार दिवस उपाशीं राहून चाबकाच्या दोरीनें आंगठे बांधून घेऊन बसावें लागतें. गुन्ह्याविषयींच्या अज्ञानानें मनुष्याला शिक्षेला पात्र करावें हा न्यायाचा एक अपूर्व मासला

होय. ‘ समजूत ’ म्हणजे अपराध सिद्ध होण्याच्या आधीं शिक्षा करणें होय, आणि असला विपरीत क्रम न्यायदेवतेला कधीं तरी मान्य होईल काय ? शिवाय आरोपी आणि त्याजवर ‘ यानें अमुक गुन्हा केला ’ असा आरोप करणारा या दोन व्यक्ति नेहमीं निरनिराळ्या असतात. परंतु नुसत्या संशयावरून पकडलेल्या आरोपींच्या तोंडून ‘ समजूत ’ देऊन कबूली काढून घेणें म्हणजे आरोपीनें आपणच आपल्यावर आरोप आणणें नव्हे काय ? आणि आपण आपल्यावर आरोप आणणें ही गोष्ट स्वाभाविक आहे काय ? नाहीं. पण असें असूनही जेव्हां आरोपी आपणच आपल्यावर आरोप करून घेत आहे असें लोक पाहतात तेव्हां त्याची हाडें मऊ झालीं असलीं पाहिजेत असें अनुमान ते सहज काढतात. शिवाय ‘ समजूत ’ देण्यांत मूळचा जर कांहीं चांगला हेतू असेल तर तो हाच कीं अपराधी माणसाचा लवकर शोध लागून निरपराधी माणसांना विनाकारण त्रास होऊं नये. पण निरपराध्यांना त्रास न देणें ही गोष्ट जी टाळण्याविषयीं प्रयत्न झाला पाहिजे, ती तर येथें अवश्य घडून येते, व मूळ हेतूचा विपर्यास होतो. आतां जे लोक निरपराधी आरोपीला ‘ समजूत ’ देतात त स्वतः माल दुहेरी गुन्हेगार होतात. कारण ते खऱ्या अपराध्याला मोकळा सोडतात हा त्यांचा एक अपराध, आणि निरपराध्याला विनाकारण छळतात हा दुसरा. शिवाय आरोपीकडून अपराध कबूल करविणें म्हणजे इतर पुरावा गोळा करण्याची आपणावर जी जबाबदारी असत तिजविषयीं टाळाटाळी करणें होय. या व अशाच दुसऱ्या अनेक कारणांसाठीं ही पद्धत अतिशय गर्हणीय व सुधारणेच्या तोंडाला काळोखी लावणारी आहे. हिच्यांत न्यायाचा लेशही नाहीं. तर ही सर्व अन्यायांनीं भरून गेलेली आहे.

पूर्वीं ग्रीस व रोम या ठिकाणीं ही पद्धत प्रचारांत होती. पुढें पोपांची आणि कॅथॉलिक लोकांचीं जी राज्यें झालीं त्यांतूनही हा प्रकार मोठ्या जारीनें चालू आहे. स्पेन मधील इन्क्विझिशन ही संस्था त्या वेळच्या ‘ Torture ’ साठीं अतिशय प्रख्यातीस आलेली होती. तरी पण त्या वेळच्या ‘ समजुतींत ’ आणि आतांच्या ‘ समजुतींत ’ एक मोठा फरक आहे व तो कोणीही विसरतां कामा नये. त्यावेळची torture कायद्यानें नियंत्रित केलेली होती व आतांची कायद्यानें बंद केली आहे. पूर्वी ‘ सम-

जूत ’ कशी द्यावी याबद्दल कायद्यानें नियम केलेले होते म्हणून अतिरेक होत नसे. आतां ‘ समजूत ’ देणें अन्याय आहे असें कायद्याला वाटल्यामुळें ती बंदच झाल्यावर मग तिच्याबद्दल कायद्यांत नियम कोठून येणार ? पण याचा परिणाम असा झाला आहे कीं, कायद्यानें जरी torture बंद केली तरी ती गुप्त कृतीनें बंद केली नाहीं. त्यामुळें कायद्यांच्या नियमांचा कांहीं प्रतिबंध नसल्या कारणानें असह्य अतिरेक होतो. व torture कायद्यानें बंद करण्यापेक्षां ती कायद्यानें मान्य करून तिजविषयीं कांहीं नियम असतील तर बरें असें वाटूं लागतें. Torture चे वेळीं कोणी तरी दोघे जज्ज, किंवा सेनेटर जवळ असले पाहिजे असा पूर्वीचा नियम असे. परंतु आतां एखाद्या दीड दमडीच्या इसमाच्या लहरीवर आरोपीचा सुरक्षितपणा अवलंबून राहतो. पूर्वी स्वतंत्र रीतीनें पुरावा मिळाल्यावर मग आरोपीला कबुलीसाठीं rack वर घालीत असत. पण हल्लीं नुसत्या संशयावरून कोणाला तरी धरून आणावें व त्याला चाप लावावे आणि त्या वेदनांतून सुटण्यासाठीं तो कदाचित् निरपराधीही असलेला आरोपी ज्यांचीं ज्यांचीं नावें घेईल त्यांच्या त्यांच्याकडून पुरावा तयार करावा अशी रीत आहे. पूर्वी लहान वयाचे मुलगे व स्त्रिया यांना torture करण्याचा हुकूम नसे. पण हल्लींच्या या समतेच्या काळांत हा भेदाभेद बिलकुल नाहीं. Torture करण्याचा हुकूम झाला तर त्यावर अपील करण्याचा आरोपीला पूर्वी अधिकार असे, व अपीलाचा निकाल होईपर्यंत त्याला कोणी torture करीत नसे. पण हल्लींचे torture चें काम सर्व अंधारकोठडींत किंवा रात्रीच्या काळोखांत होत असल्यामुळें त्याला एखाद्या झरोक्यांतून येणारा प्रकाशदेखील जर सहन होत नाहीं तर मग अपीलाची वगैरे गोष्ट कशाला पाहिजे ! एकदां torture केल्यानंतर मग प्रॉसिक्युशनतर्फेची फिर्याद पूर्वी काढून घेता येत नसे. परंतु आता हा विधिनिषेध नाहीं. पूर्वी ‘Lent’ च्या चाळीस दिवसांच्या मुदतींत कोणालाही torture करीत नसत. परंतु हल्लींच्या या नास्तिक काळांत कोणताही दिवस इतका पवित्र उरला नाहीं कीं त्या दिवशीं एखाद्या अनाथाची छळणूक करण्याला कोणी मागेंपुढें पाहील. आरोपीला torture करीत असतांना आपण त्याला काहीं प्रश्न विचारावयाचे नाहींत, तर तो आपण होऊन जे कांहीं सांगेल तेवढें मात्र ऐकून घ्यावयाचें अशी पूर्वीची चाल

होती. पण आतां ' म्हणा मम आत्मनः श्रुतिस्मृति० ' हें जसें भट सांगतो आणि यजमान म्हणतो त्याप्रमाणें अधिकारी कसें बोलावयाचे तें सांगतो आणि आरोपी तसें बोलून दाखवितो, अशी स्थिति आहे. या पूर्वीच्या आणि हल्लींच्या स्थितींच्या तुलनेवरून कोणालाही वाटेल कीं पूर्वीची अनियंत्रित torture बरी. परंतु हलकट, नीच, व क्षुद्र अशा व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून राहणारी काळोखांतील गुप्त torture नको.

---

## आर्यांकरितां गाणें : : : २०

( चाल—चंद्रकांत रायाची कन्या )

नशिब जोरावर इंग्रज जिंकिति खडकीस लढाई ॥ पळूं लागले धनी पेशवे सोडुनि पेशवाई ॥ अशी खबर पसरली सर्व जन रडति धाइधाई ॥ स्तनांत पान्हां फुटुनि पाजिना बाळकास आई ॥ होति दिव्याच्या घांटामध्ये एक वृद्ध बाई ॥ तिनें पाहिलें पळतांनां श्रीमंत बाई धाई ॥ रडुनि म्हणे अहा दैवा माझा पती आज नाहीं ॥ स्वामीसाठीं फिरुनी मरण्याची संधि फुकट जाई ॥ असे म्हणूनि धावत धांवत गेलि डोंगरांत ॥ खांद्यावर घोंगडी कोयता घेऊनि हातांत ॥ पुत्र तियेचा जेथ लाकडें होता तोडीत ॥ म्हणे तोडिशी अरे माकडा काय लांकडांत ॥ तोडि शत्रुचीं डोकीं जा जा घाव लढाईंत ॥ आपल्या प्रभुला पळवुनि दिधलें झाला रे घात ॥ स्वस्थ कसा जा लढें रक्त जो आहे अंगात ॥ भिऊं नको हातास मास नऊ माझ्या उदरांत ॥ ऐकुनि लगबग पुत्र तिचा मग निघे जावयाला ॥ कांदा भाकर माय तयाच्या बांधी कमरेला ॥ हाति कोयता देऊनि म्हणे तव हाचि

बराचि भाला ।। देशकार्य बेधडक करी जा राखील प्रभु तुजला ।। असें सांगुनीं निरोप देई आई पुत्राला ।। एक मास लोटला जाऊनि पुत्र घरिं न आला ।। त्या वेळेला मात्र आईचा धीर सुटुनि गेला ।। माय निघाली अति तांतडिनें पुत्र शोधण्याला ।। सवाईशिकंदर नशीब इंग्रज लढे अष्टीवरती ।। बापु गोखले रणशूर तिथें रणांगणीं मरती ।। बाजरिाव प्रभु ब्रम्हावर्ताची नीट वाट धरती ।। अष्टयापाशीं कैक मर्द प्रभुसाठिं मरुन पडती ।। धुंडित धुंडित माय तया स्थळि प्राप्त जाहली ती ।। प्रेतें तुडावित फिरे चहूंकडे रणाभोंवाति भोंवती ।। मध्यरात्र अंधारी एकटी नाहीं मनी भीति ।। रणांगणीं सुत शोधि आईची फार कठिण प्रीति ।। अखेरीस त्या माऊलिनें निजपुत्रा ओळखिलें ।। मृत पाहुनिया त्यातें किंचित् खिन्न वदन केलें ।। निज पुत्राच्या परि कोयत्यानें कंठ कापिलेलें ।। पांच शत्रु पाहुनी तयाच्या संनिध पडलेले ।। उभी राहुनी अति हर्षानें काय वचन बोले ।। ' जन्मा येऊन करावयाचें तें कार्य तुवां केलें ।। खुशाल जा जा स्वर्गा आतां सार्थक तव झालें ।। आनंदाच्या अश्रूंनीं मम पाहि अंग न्हाले ।। तुझ्यासारिखें प्रत्येकानें पांच पांच रिपुंतें ।। वधिलें असतें तरी आज तें राज्य गेलें नसतें ।। मोठमोठे सरदार जाहले फितुर अशा वेळीं ।। आपल्या राजासाठीं देशि तूं आपले प्राण बळी ।। ह्यांताचि मजला भूषण आतां हाचि पुत्र माझा ।। नको वळुनि बघुं आईकडे सुख स्वर्गिं भोगि जा जा ।। तसा तुझा हा धन्य कोयता ठेविन मी जपुनी ।। शूर कर्म करतील पुत्र तव यातें पाहूनी'।। असें म्हणूनी घेउनियां तो माय घरा येई ।। रक्तांकित परि देव्हाऱ्यांताचि ठेवुनि त्या देई ।। कांहीं दिसांनीं त्यानंतर ती माउलि मृत झाली ।। नातू पणतू होते तिचे त्या कठिण दशा आली ।। सरकाराचें देणें देण्या कवडि नुरे गांठीं ।। लिलावांत ती विकलि कोयती दिड आण्यासाठीं ।।

तारीख २२ जुलै रोजीं कलकत्त्यास हावरा स्टेशनचें नजीक नदीचें कांठीं संध्याकाळीं ५॥ वाजण्याचे सुमारास कोणी एक युरोपियन गृहस्थ हवा खात इकडे तिकडे फिरत होते. तेथें हवा खाण्याकरितांच सुमारें बारा वर्षांचा एक लहान बंगाली मुलगा आला. त्याचे व साहेबांचे सहज बोलणें सुरू होऊन बराच वेळ संवाद चालला. त्यांत मध्येंच साहेबांनीं मुलाला असा एक प्रश्न विचारला कीं काय रे बाळा, समज, तुला एक सोजीर गोळी घालूं लागला, आणि एक पाद्री बाटवूं लागला तर त्यांपैकीं तुला जास्ती आनंद कशानें होईल ?

**मुलगा**—साहेब, हें इंग्रजी राज्य आहे; बेबंदपाच्छाई नव्हे. तुम्ही म्हणतां असें होईल कसं ? मला कोणी गोळी घालूं लागला किंवा माझ्या इच्छेविरुद्ध मला बाटवूं लागला तर राणी सरकारचे अधिकारी त्याला शासन केल्यावांचून कधीं राहणार नाहींत.

**साहेब**—हें तर मीसुद्धां समजतोंच. पण अधिकारी शिक्षा करणार अन्याय झाल्यावर. अन्याय करितांना अधिकाऱ्यांना जवळ बोलावून कोणी अन्याय करीत नसतो. म्हणून अशा प्रसंगीं तूं कोणत्या गोष्टीला कबूल होशील, हें मी तुला विचारतों.

**मुलगा**—असाच जर प्रसंग आला तर मी मोठ्या आनंदानें त्या सोजरापुढें जाऊन म्हणेन कीं तूं आपली बंदूक माझ्या अंगावर खुशाल झाड.

**साहेब**—तुला तुझ्या जिवाची कांहींच किंमत वाटत नाहीं काय ?

**मुलगा**—वाटते, अतिशय वाटते. आणि म्हणूनच पाद्याच्या हातच्या पाण्याचा थेंब माझ्या डोकीवर पडण्याचे अगोदर सोजिराच्या बंदुकींतील गोळी माझ्या डोकीवर आदळावी अशी मी त्या वेळीं परमेश्वराची प्रार्थना करीन.

**साहेब**—मुला, येवढा वेळपर्यंत तूं समंजसपणानें बोलत होतास. पण आतांचें हें तुझें बोलणें अगदीं वेडगळपणाचें दिसतें.

**मुलगा**—तुम्हांला तें वेडगळपणाचें दिसत असेल. पण मला तसें वाटण्यास कारणें आहेत.

**साहेब**—तीं काय ?

**मुलगा**—मी खिस्ती होऊन जिवंत राहिलों तर माझ्याकडे पाहून माझ्या आईबापांना अतिशय दुःख वाटेल. त्यायोगानें मी जिवंत राहीन पण मी आपल्या आईबापांना शोकानें ठार मारीन. तेव्हां पितृवध आणि मातृवध ह्यांपेक्षां आत्मवध फार चांगला. मी खिस्ती झालों तर आमच्या हिंदुधर्माचे संस्थापक वसिष्ठ, वामदेव, विश्वामित्र, व्यास, वाल्मीकि, शंकराचार्य इत्यादि थोर महात्म्यांचा मी अपमान केला असें होईल. कारण, दुसऱ्यांचीं मतें स्वीकारणें म्हणजे आपलीं पूर्वीचीं तुच्छ मानणें होय. तेव्हां शंकराचार्यप्रभृति मंडळींनां मूर्ख ठरवून आपण शहाणे होण्यापेक्षां मी मेलेला बरा. मी खिस्ती झालों तर ब्रह्मदेवानें मला नरकांत टाकण्यासाठीं वेद निर्माण केले होते, मला दगड बनविण्यासाठीं व्यासांनीं आपली ब्रह्मसूत्रें लिहिलीं होतीं, आणि माझी पापाकडे प्रवृत्ति करण्यासाठीं कृष्णानें अर्जुनाला भगवद्गीता सांगितली होती असें मानल्यासारखें होणार आहे. तेव्हां ब्रह्मदेव, व्यास, कृष्ण अशांसारख्या परमपूज्य देवतांच्या पदरीं लुचेगिरी बांधण्यापेक्षां मी मेलों तरी कांहीं हरकत नाहीं. मी खिस्ती होऊन जिवंत राहिलों तर मी पुढें लग्न करीन व त्यापासून मला जीं मुलें होतील तींहीं खिस्तीच होणार. मी एक खिस्ती होणार तर होणार आणि नवीन खिस्ती उत्पन्न करणार ! ह्या पातकाबद्दल माझा देव आणि माझा देश मला कधींही क्षमा करणार नाहींत. माझ्याबरोबर माझ्या साऱ्या वंशजांनीं आणि पोराबाळांनीं हिंदुधर्माला आंचवावें ह्यापेक्षां मीच अधम मेलेला काय वाईट ? मला सोजिरानें गोळी घालून मारलें तर लोक त्या सोजिराला नांवें ठेवतील. पण मी खिस्ती झालों तर लोक मलाच नांवें ठेवतील. सोजिरांनीं मला मारलें तर त्याचे जातभाई तो खून करणारा म्हणून त्याच्याशीं व्यवहार बंद करतील. पण मी खिस्ती झालों तर माझे जातभाई मी अधमाधम म्हणून माझें तोंड सुद्धां पाहणार नाहींत. सोजिरानें मला मारलें तर तो निदान पांच सात वर्षें तरी तुरुंगांत पडेल. पण पाद्र्यानें

ख्रिस्ती केलें तर त्याबद्दल मलाच आणि तेंही साऱ्या जन्मभर एक प्रकारच्या तुरुंगांत रहावें लागेल. मी गोळी लागून मेलों तर माझा खून करणाऱ्याला फांशीची नाहीं तर निदान कैदेची तरी शिक्षा मिळेल; पण मी बाटलों तर माझ्या बाटविणाऱ्याला तद्धर्मीयांकडून शाबासकी मिळेल. मी गोळी लागून मेलों तर माझे इष्टमित्र माझ्या आईबापांची कींव करतील, पण मी ख्रिस्ती होऊन जिवंत राहिलों तर ते माझ्या आईबापांचा तिटकारा करतील. मी गोळी लागून मरून परलोकीं गेलों तर माझ्या देशबांधवांचे इतःपर प्राण वांचविण्यासाठीं मी विष्णूची प्रार्थना करीन, आणि निरपराधी असल्यामुळें भगवान् श्रीविष्णू ती खास मान्य करील. पण ख्रिस्ती होऊन मी आपल्या विष्णूला झिडकारून दिलें तर मग त्याच्यापाशीं अशी प्रार्थना करण्याला मला काय तोंड उरणार? सोजिरानें मला गोळी घालून मारलें तर परलोकीं तो नरकांत पडेल. पण मी ख्रिस्ती झालों तर परलोकीं स्वधर्मत्यागाच्या पातकाबद्दल मला नरकांत पडावें लागेल. सोजिरानें मला गोळी घालून मारलें तर त्याला थोडी बहुत तरी शिक्षा देऊन, कायद्याप्रमाणें सरकारला त्याचें पारिपत्य करतां यतें; पण मी ख्रिस्ती झालों तर मला जो बाटवील त्याचें पारिपत्य सरकारला कायद्यानें करतां येत नाहीं. ह्या फरकामुळें लोकांचीं मनें मी आपल्या सरकाराविषयीं कलुषित करण्याला कारणीभूत होण्यापेक्षां आपण मरून जाणें हेंच बरें. आपल्या सरकारला अडचणींत घालण्यापेक्षां आपणच नाहींसें होणें फार उत्तम.

**साहेब**—मुला, तुझें हें बोलणें ऐकून मला फार आनंद होत आहे. देव आणि राणीसरकारचे कायदे हे खून आणि धर्मांतर ह्या दोहोंपासून तुझें नेहमीं रक्षण करोत. सोजिराच्या अडदांडपणाबद्दल आम्ही अलीकडे कडक नियम केलेच आहेत व धर्मांतराच्या बाबतींतही उघड उघड रीतीनें तुम्हाला जितका सुरक्षितपणा देता येईल तितका देण्यांत आला आहे, एवढ्यांत तूं संतोष मानून रहा.

ह्या सुमारास सूर्य अस्तास जाऊन थोडथोडा काळोख पडत चालला होता. इतक्यांत स्टेशनावर एक गाडी ओरडली. त्या गाडींतून साहेबांचे कोणी स्नेही यावयाचे होते. म्हणून त्यांना भेटण्यासाठीं साहेब स्टेशनाकडे गेले व तो मुलगा झालेल्या भाषणाचा विचार करीत करीत आपल्या घराकडे वळला!

---

# एका सोमयज्ञाची हकीकत : : : २२

★ लो. टिळक तुरुंगांत होते. केळकरांचें धोरण खाडिलकर, परांजपे यांना नापसंत होते. रँडच्या मागून आलेल्या अधिकाऱ्यांनीं लोकप्रियता संपादिली. प्लेग संपून ते परत निघाले तेव्हां त्यांना पानसुपाऱ्या झाल्या व आभारप्रदर्शक भाषणेंही झाली अशा एका प्रसंगावर यज्ञाचें रूपक करून परांजपे यांनीं तें आपल्या स्वभावाप्रमाणें रंगविलें व केळकरांचा प्रच्छन्न नामनिर्देश करून उपहास केला.

—गतगोष्टी, पृ. २५२-३

या समारंभाकरितां एक भव्य दिवाणखाना मागून घेण्यांत आला होता. व त्यालाच यज्ञमंडप असें नांव दिलें होतें. हंड्या, झुंबरें, शामदानें, निळ्या रंगाच्या चिमण्या, साहेबांच्या तसबिरी, बकऱ्यांचीं कातडीं, गव्याचीं शिंगें, चमत्कारिक प्राण्यांचीं अंडीं इत्यादि वस्तूंनीं यज्ञमंडपाला अतिशय शोभा आली होती. यज्ञमंडपांत जागोजागीं स्थंडिलें (टेबलें) मांडलेलीं होतीं व त्यांजवर परिस्तरणेंही (टेबलक्लॉथ) होतीं. रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारास वेदशास्त्रसंपन्न विष्णुभट हे बूट पाटलोण घालून वॉचकडे पहात पहात यज्ञमंडपांत आले, व अजून कोणी मंडळी आली नाहींत म्हणून सखेदाश्चर्य प्रदर्शित करूं लागले. इतक्यांत जिन्यांत बुटांच्या टाचांचा गोंगाट झाला आणि वेदमूर्ती श्रीपाद भटजी, बाळंभट सोमयाजी, पद्मण्णा अग्निहोत्री, राघवेंद्राचार्य, वगैरे बरीच ऋत्विज् मंडळी लगबगीनें यज्ञशरणांत (गृहांत) आली. व तेथें जीं वेत्रासनें (खुर्च्या) ठेविलेलीं होतीं त्यांवर ते विराजमान झाले व आणखी सुमारें वीस पंचवीस मिनिटांत तो यज्ञमंडप गच्च भरून गेला. यजमानांनीं उदक सोडून विष्णुभटजीस अध्वर्यूची सुपारी दिली व राघवेंद्राचार्य यांनीं ब्रह्मा व्हावें अशी केलेली योजना सर्वानुमतें पास झाली. नंतर

यज्ञमंडपांतील उत्तरवेदी जवळ एका वेत्रासनावर प्रभाकर दीक्षित हे उद्गात्याचें काम करण्यासाठीं पुढें पियानोची पेटी ठेवून बसले होते. त्यांना 'उद्गातर्गाँवस्व' अशी अध्वर्यूंनीं खूण केल्याबरोबर पेटींतून सूर निघूं लागले व 'चल ग गडे माडीवरी' या छंदांत बृहस्पति ऋषींनीं केलेल्या सूक्तांतील कांहीं मंत्र त्यांनीं गाऊन दाखविले. नंतर प्रत्यक्ष वेदोनारायण असें गोविंदशास्त्री जटिलबुवा यांना उद्देशून अध्वर्यु म्हणाले, 'प्रस्तोतर, प्रस्तुहि.' तेव्हां प्रस्तोत्याचें (तोंडपुजाचें) काम करण्यासाठीं जटिलबुवा उठले. यांनीं सर्व मस्तकावर जटा ठेविल्या आहेत. परंतु त्या पूर्वीच्या ऋषींप्रमाणें लांब लांब वाढूं न देता एक दोन बोटें लांब झाल्या कीं त्या स्वहस्तानें कातरल्या जात असल्यामुळें त्याच्यांतील कुरळेपणा व मोहकपणा फारच शिरलेला आहे म्हणून यांना जटिलशास्त्री असें म्हणतात. प्रस्तोत्यांनीं मंत्र म्हटले त्याचा सारांश असा होताः—'तुम्हाला हजार डोकीं आहेत. कारण तुम्ही आमच्यापेक्षां हजार पटीनें शहाणे आहां. तुम्हांला हजार डोळे आहेत. कारण, आम्हीं खोट्या कंड्या पिकविलेल्याही तुम्हास दिसतात. तुम्हाला हजार पाय आहेत. कारण आगगाडीच्या योगानें तुम्ही आमच्यापेक्षां हजारपट अधिक चालतां. तुम्ही ही भूमि सर्व बाजूंनीं व्यापून आणखी कोणती व्यापूं असें म्हणत दहा अंगुळें उरलाच आहा. एतावानस्य महिमा! अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम। तस्मात्कारुण्यभावेना रक्ष रक्ष परमेश्वर॥ ... ... गतं दुःखं गतं पापं गतं दारिद्र्यमेव च। आगता सुखसंपत्तिः पुण्योऽहं तव दर्शनात्॥ इ. इ.' हे मंत्र म्हणून झाल्यावर अध्वर्यूंनीं नृसिंहोपाध्याय काशीकर यांना कांहीं मंत्र म्हणण्यास सांगितलें. यांजकडे सदर यज्ञात ग्रावस्तुत्चें (दगड असला तरी त्याची स्तुति करण्याचें) काम होतें. तें त्यांनीं मनोभावानें व सरळपणानें केलें. 'हे दगडा तुझें वजन फार आहे हें मी जाणतों. तूं वाटोळा आहेस. तूं गुळगुळीत आहेस. तुझ्यामुळें आम्हांला सोमपान करण्याचे वारंवार प्रसंग येतात. ह्याबद्दल आम्ही तुझे आभार मानतों. इ. इ.' अशा रीतीनें दगडांची स्तुति झाल्यावर जगत्प्रसिद्ध वेदशास्त्रसंपन्न पिंटोभट गोंवेकर (ज्यांच्याकडे प्रतिप्रस्थातृचें काम नेमलेलें होतें) यांस अध्वर्यूंनीं नेत्रसंकेत केला. त्याबरोबर पिंटोनें दर्वी, जुहू, ध्रुवा (कांटा, चमचा वगैरे) द्रोण (कांचेचा

पेला ) इत्यादि सोमयज्ञाचीं संभारद्रव्यें प्रत्येक स्थंडिलापाशीं आणून मांडलीं. नंतर उत्तरवेदीवर ठेविलेलीं सोमरसाचीं पात्रें ( बाटल्या ) गोंवेकर भटजींनीं पुढें आणिलीं तेव्हां अध्वर्यू म्हणाले ‘ पात्राणि उत्तानानि कृत्वा ’ त्याबरोबर सर्वांनीं आपआपले ग्लास उताणे केले. नंतर अध्वर्यूंनीं दुसरा मंत्र म्हटला. तो असा ‘ आच्छादनं दूरीकृत्य. ’ त्याबरोबर पिंटोनें भराभर सर्व बूच उडविले. ‘ उत्पूताभिरद्भिस्तत्पात्रं पूरयित्वा ’ या अध्वर्यूंच्या हुकुमाबरोबर पिंटोनें सर्व ग्लासांतून सोमरस ओतला. नंतर अध्वर्यूंनीं पुढील मंत्र म्हणून तो शुद्ध केला. ‘ स्वादिष्टया मदिष्टया नित्य पुष्टां करीषिणीम्, योवः शिवतमो रसः यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके ’ इ. इ. नंतर अध्वर्यू म्हणालेः ‘ आचमने विनियोगः, ’ तेव्हां सर्वजण चमस ग्लासांत बुडवून तयार झाले. नंतर राणीचें नांव घेऊन प्रदीप्त झालेल्या जठराग्नीमध्यें सोमरसाची पहिली आहुति देण्याविषयीं अध्वर्यूंनीं सुचविलें आणि म्हणाले, ‘ जठराग्नये स्वाहा जठराग्नय इदं न मम. ’ नंतर यथेच्छ सोमपानाला सुरवात झाली. पण मध्येंच कैलासवासी नारायणमूर्ति गोकुळानंद स्वामींची अध्वर्यूंना स्मृति झाली. तेव्हां त्यांच्या स्मरणार्थ एक एक द्रोण सोमरस सर्वांनीं आणखी घ्यावा अशी शिफारस करून अध्वर्यु म्हणालेः ‘ गोकुलानंदस्वामिशर्मणे वसुरूपाय स्वधा. ’ त्याबरोबर सर्वांनीं एक एक पेला एकदम झोंकला, त्यामुळें फिरून पेले भरण्याचे कामीं पिंटोची फार तारांबळ उडाली. शेवटीं अध्वर्यूंनीं स्विष्टकृन्मंत्र म्हटला. तो येणेंप्रमाणेंः—सुधारक ऋषिः दारू देवता, अनुष्टुप् छंदः, सोमप्राशने विनियोगः—वसिष्ठ ही पि ई ३ दारू। आम्ही सोम पीतसों ॥ इत्यादि मंत्र म्हणून सर्वांनीं जठराग्नींत आणखी एक आहुति दिली. व शेवटीं सर्वांनीं उभे राहून पुढील खरी प्रार्थना म्हटली, ‘ मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर [ सुरा + ईश्वर ? ] जठरं पूरितं देव परिपूर्णं तदस्तु मे ॥ ’ व यानंतर सोमयज्ञ आटपून सर्वांना गाड्यांत घालून घरोघर पोंचते करण्यांत आले. गाडी भरधांव चालत असल्यामुळें एक ऋत्विज गाडींतून रस्त्यावर पडला. त्याला रात्रभर पोलिसांनीं आपल्या येथें ठेवून घेऊन सकाळीं घरीं पोंचते केलें. मात्र त्याची पगडी गहाळ झाली आहे. कोणास सांपडली असल्यास फारसा बोभाटा न करतां आणून देण्याची मेहेरबानी व्हावी.

**एक सदस्य**

---

## भोंवरीचें फूल : : २३

एके दिवशीं संध्याकाळीं मी रानांत फिरावयास गेलों असतां एका वेलाच्या झुडपावर बरींचशीं भोंवरीचीं फुलें माझ्या दृष्टीस पडलीं. हीं फुलें पावसाळ्याच्या दिवसांत कोंकणांत फार असतात. परंतु दुर्दैवानें मला आपल्या जन्मभूमींतून काढून हल्लीं जेथें आणून ठेविलें आहे तेथें हीं फुलें आजपर्यंत माझ्या कधींच दृष्टीस पडलीं नव्हतीं. म्हणून तीं पाहून मला फारच गहिंवर आला. माझ्यानें एक पाऊलसुद्धां पुढें टाकवेना. माझा लहानपणाचा मित्र फारा दिवसांनीं भेटला असें मला वाटलें. मला माझ्या जन्मभूमीची आठवण झाली. लहानपणचे ते सुखाचे दिवस माझ्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभे राहिले. त्या निःशब्द अरण्यांत माझ्या लहानपणच्या खेळगड्यांच्या हांका मला ऐकूं येऊं लागल्या. ते रान हेंच माझें खेडेगांव झालें आणि त्या रानांतील हिरव्यागार गवतामध्यें मला माझ्या घराचा उंबरठा दिसूं लागला. तो विदेश माझी जन्मभूमि झाला. मी मोठ्याचा लहान झालों. आणि वर्तमानकाळाची सर्व स्थिति नाहींशी होऊन पूर्वीच्या काळींचा वृत्तांत माझ्या डोळ्यापुढें प्रत्यक्षवत् भासूं लागला. माझा कंठ दाटून आला. माझे डोळे पाण्यानें भरून आले. माझें रडें मला आवरेनासें झालें, तेव्हां मी तेथील एका पावसानें धुवून स्वच्छ झालेल्या कातळावर बसलों. लहानपणीं शाळेंतून सुटून आल्यावर आम्ही सर्व मुलें मिळून हीं भोंवरीचीं फुलें गोळा करीत असों, व त्यांचा एक झेंडलोबा करून त्याच्या भोंवतीं रात्र पडेपर्यंत नाचत होतों. त्या वेळच्या त्या सुखाची आठवण होऊन माझें मन अतिशय उद्विग्न होऊन गेलें. इतक्यांत त्या फुलांपैकीं एक फुल माझ्याजवळ येऊन मला म्हणालें: ‘लहानपणीं तूं माझ्याभोंवतीं नाचत होतास तेव्हां तुला आनंद होत असें. तसाच तुला हल्लींही होत आहे ना? हे माझ्या लहान-

पणाच्या मित्रा, तुझी माझी फार वर्षांनीं गांठ पडली आहे म्हणून मी तुला कुशल प्रश्न विचारीत आहें. ' हा त्या फुलाचा प्रश्न ऐकून तर माझ्या पोटांत अगदीं कालवूं लागलें. त्या भोंवरीच्या फुलांचा झेंडलोबा करून ' झेंडलोबाच्या रे गोंडलोबा, ' हें गाणें म्हणत मी त्याच्या भोंवतीं लहानपणीं नाचत असें त्या वेळेस मला किती सुख होत असे ! आणि आतांही मी साहेबलोकांच्या भोंवतीं अक्षयीं नाचतों आहे आणि 'झेंडलोबाच्या रे गोंडलोबा, ' ह्याच्या इतकीच अर्थरहित आणि वेडगळ अशीं त्यांचीं गाणीं गात आहे. तरी पण दोहोंतल्या सुखदुःखांत केवढें तरी मोठें अंतर हें ! मनुष्य लहानपणीं आणि मोठेपणीं कोणाच्या तरी भोंवतीं नाचत असतोच. पण दोहोंत केवढा फरक ! लहानपणीं सर्व पदार्थांत आनंद भरलेला असतो. पण मोठेपणाचें ज्ञान हें त्या सर्व आनंदाची माती करून टाकतें. मी लहानपणीं आपल्या झेंडलोबाभोंवतीं नाचत होतों त्या वेळेला माझ्या हिंदुस्थानाला कोण सुख देत आहे आणि कोण दुःख देत आहे ह्याची मला काय दाद होती ! दुष्काळानें माणसें पटापट प्राण टाकीत असलीं तरी मी त्या वेळेस उड्याच मारीत होतों. त्या वेळेस मी वाऱ्याप्रमाणें स्वतंत्र होतों. प्रत्येक मैदान मला हिरवेगार दिसत होतें. प्रत्येक डोंगर मला उच वाटत होता आणि प्रत्येक पक्ष्याच्या आवाजांत माधुर्य भरलेलें आहे असें मला वाटत होतें. पण ह्या ज्ञानानें—ह्या सुखविनाशक ज्ञानानें—तो माझा भ्रम नाहींसा केला. त्यानें माझ्या अन्नांत विष कालविलें व त्यानें माझ्या अंथरुणावर सहस्रवधि कांटे पसरून ठेविले. तींच मैदानें मला उदास भासूं लागलीं. तेच डोंगर कशानेंसे खालीं वांकलेले मला दिसूं लागले. हाय, हाय ! अशा स्थितींत ज्ञानापेक्षां अज्ञान बरें. आपल्या भूमीची हालअपेष्टा पाहण्याला डोळे असण्यापेक्षां अंधळे झालेलें बरें. माझें दुःख मला सहन होईना. मी आपल्या मित्राच्या प्रश्नाला कांहीं एक उत्तर न देतां तसाच तेथून उठलों, व मनाचा निश्चय केला कीं इतःपर लोकांच्या भोंवतीं नाचणें आणि त्यांचीं गाणीं म्हणणें बस्स झालें. मी घरीं आलों आणि आपल्या चाकरीचा राजिनामा लिहून पाठविला.

---

प्रसिद्ध झाल्यापासून सर्व लोकांत याच्याबद्दल बारीक रीतीनें ताबडतोब तपास सुरू झाला. कोणा एका पूजेच्या गणपतीच्या सहीचें सुधारकांत एक पत्र प्रसिद्ध झालें आहे, ही कुणकूण लागलीच सर्व गणपतिमंडळांत व देवांत पसरली व हें काम कोणाचें असावें, अशाबद्दल चर्चा सुरू झाली तेव्हां सुधारकांच्या घरचा पूजेचा गणपति पुढें आला आणि त्यानें सर्वांच्या शंकेचें निवारण केलें. तो म्हणाला:–' मी सर्व सांगतों. मला ह्यांतली खडान् खडा माहिती आहे. कारण, खुद्द एका सुधारकाच्या घरींच मी गणेशचतुर्थींत गेलों होतों.' 'काय!' इतर सर्व देव आश्चर्यानें म्हणाले, 'काय! सुधारक आपल्या घरीं गणपति आणतात! आणि फिरून वर्तमानपत्रांतून असले लेख लिहितात! हे कोणी माणूस आहेत किंवा जमिनीवर सरपटणारे कोणी कीटक दुतोंडे आहेत?' 'ते कोणी असतील ते असोत.' गणपति म्हणाला:–'पण त्यांनीं मला आपल्या घरीं नेऊन पूजिलें हें खास; आणखी ही एका सुधारकाचीच गोष्ट नव्हे. सगळ्याही सुधारकाच्या घरांतून हाच प्रकार झाला. इतकेंच नव्हे, तर एकदां एका सुधारकाची आई आमच्या सुधारकांच्या आजीबाईकडे मी असतांना आली होती. त्यांच्या बोलण्यावरून मला असेंही कळलें कीं सुधारकांची आम्हांवर श्रद्धाही आहे. एका सुधारकाला मूल होत नाहीं म्हणून त्यानें व त्याच्या बायकोनें गणपतीला नवस केला आहे. एका सुधारकाची चाकरी निघाली आहे, ती फिरून लागावी म्हणून त्यानें स्वतःच गणपतीला नवस केला आहे. एका सुधारकाची कशानेंशी प्रकृति बिघडून मधुमेहाच्या पंथावर जाण्याच्या बेतांत होती म्हणून इतःपर मी * * ला शिवणारदेखील नाहीं अशी गणपतीची शपथ त्याच्या बायकोनें त्याजकडून वाहविली. एका पुनर्विवाह

केलेल्या जोडप्यांतील सुधारकानें आपल्या कुटुंबाकडून हरताळकेची पूजा करवून आपण स्वतः गणपतीची पूजा केली. आणखी—' 'पुरे, पुरे, !' सर्वजण म्हणाले, 'ह्या दुटप्पी लोकांच्या घरसोडीच्या वर्तनाचा हा पाढा पुरे झाला. ह्या पत्राविषयीं काय माहिती असेल ती आम्हांस पाहिजे आहे.' 'बरें तर तीच मी आतां सांगतों.' गणपति म्हणाला:—'आपल्या घरांतील बायकांच्या पुढें माना वांकविणारे हे सुधारक वर्तमानपत्रांतून मात्र लांब लांब गोष्टी सांगत असतात. सारखे सारखे फार धर्मभ्रष्ट लोक जमले म्हणजे देवाची थट्टा करावयालाही तयार आणि कांहीं संकटप्रसंग आला म्हणजे फिरून त्याचे पाय धरावयालाही तयार. सुधारकांतील पत्र कोणत्याही गणपतीनें लिहिलेलें नाहीं. हें त्याचेंच स्वतःचें काम आहे. आपण घरीं गणपतीजवळ प्रार्थना करितों काय आणि पत्रांत त्यांच्याबद्दल बनावट आणि खोटा मजकूर लिहितों काय, ह्याची शुद्ध त्यांना कशाच्या तारेंत असल्यामुळें रहात नाहीं कोण जाणें !' ही माहिती स्वर्गांतील न्यायाधिशाच्या कानावर गेली. तेव्हां सुधारकांनीं बनावट पत्र लिहिल्याबद्दलचा आरोप त्यांच्यावर ठेऊन त्यांनीं खटल्याला सुरुवात केली. तेव्हां आरोपीतर्फे कोणी वकील आहे काय म्हणून पुकारण्यांत आलें. स्वर्गांतील न्यायाधिशाचा शिपाई स्वर्गांत कोणी सुधारकांच्या तर्फे वकील आहे काय, म्हणून चौकशी करण्याला गेला. तेव्हां तेथील एकजण म्हणाला, 'कोणाचा वकील ? सुधारकांचा ? सुधारक म्हणजे किती पायाचा प्राणी असतो हें सुद्धां येथें कोणाला माहीत नाहीं. स्वर्गलोकांत त्यांना वकील कोण मिळणार ? तिकडे नरकलोकांत कोणी असल्यास पहा.' तेव्हां तो शिपाई तिकडे चौकशी करण्याकरितां गेला. तों तेथें 'सुधारकांच्या तर्फेनें वकिली मी करितों, मी करितों,' अशी एकच ओरड त्याच्या कानावर आली. त्यांतून एक म्हणाला:—'कज्जा जिंकला तर किती बाटल्या बक्षीस मिळतील ?' दुसरा ओरडला, 'मी त्यांच्यासाठीं भांडलों तर तेथें माझा पुनर्विवाह करून मिळेल काय ?' आणखीही कित्येकजण ओरडत होते. कोणी पैसे मागत, कोणी चाकरी मागत, कोणी गोमांस मागत, सगळा एकच कल्होळ चालला होता. इतक्यांत त्या सर्वांना मागें ढकलून एक तरुणपणीं वृद्ध झालेला मनुष्य खोकत खोकत पुढें आला, आणि बोलूं लागला. परंतु त्याला दमा लागलेला असल्यामुळें व कफानें त्याची सर्व छाती डबडब-

लेली असल्यामुळें त्याचा शब्द इतरांच्या घोळक्यांत कोणाला मुळींच ऐकूं येई ना. पण जरा गलबला शांत झाल्यावर तो फिरून धापा टाकीत टाकीत म्हणाला:—'आमचा पंथ अजून नवीन आहे. त्यामुळें आमचे शिष्य येथें फारसे आलेले नाहींत. परंतु लवकरच ते येथें येऊन दाखल होतील असा अजमास आहे. तरी तेथपर्यंत हा खटला तहकूब ठेवावा अशी माझी विनंति आहे' ही विनंति मान्य होणार नाहीं असें सांगून शिपाई न्यायाधिशाकडे आला. कोणी वकील मिळेना, आरोपीतर्फे मग दुसरा कोण तक्रार करणार? तेव्हां सुधारकांच्या घरच्या गणपतीच्या साक्षीवरुन बनावट कागद तयार केल्याच्या आरोपावर गुन्हा शाबीत झाला. नंतर आरोपीला शिक्षा काय द्यावी हें ठरविण्यासंबंधानें पुष्कळ भवति न भवति झाली. अखेरीस बहुमतानें असेंच ठरलें कीं कुविचार आणि कुसंगति यांच्या यातना फटके मारण्यापेक्षांही भयंकर आहेत. ह्यासाठीं सदर आरोपीच्या मनांत नेहमीं देव आणि धर्म ह्यांच्याबद्दल कुविचार चाललेले असावेत व दारूबाज, छाकट्या व देशद्रोही लोकांच्या संगतींतच त्यानें रहावें अशी शिक्षा देण्यांत आली व 'एष उ वासाधु कर्म कारयति तं यमधो निनीषते' ह्या कौषीतकिब्राम्हण ऊर्फ सार्वत्रिक पीनलकोड मधील चॅप्टर ३ सेक्शन ८ अन्वयें सदर शिक्षा सर्वानुमतें पसंत झाली.

---

## अहाहा! मला दारू पितां येत असती तर किती बरें झालें असतें! : : : २५

साऱ्या जन्माचें सार्थक झालें असतें! साऱ्या विद्येचें चीज झालें असतें! मग कोणाची फट् म्हणण्याची प्राज्ञा नव्हती. पण माझ्या दुर्दैवानें धांव

घेतली त्याला काय करावयाचें ? हाय हाय ! ती विद्या मला साध्य झाली असती तर मी बाकीच्या विद्यांची मुळींच पर्वा केली नसती. मग मला चाकरी हवी तेवढी मोठी मिळाली असती. कोठेंही पार्टी झाली तरी मला बोलावणें आले असतें. आतां येत नाहीं तें साहजिकच आहे. कारण आम्ही मुखदुर्बळ तेथें जाऊन बोलणार काय आणि खाणार काय ? आम्हाला दारूच्या जाती किती आहेत, त्यांतली कोणती कोणत्या देशांत होते, कोणती चांगली आणि कोणती वाईट हेंसुद्धां माहीत नाहीं. बड्या बड्या म्हणविणाऱ्या लोकांत ओळखदेख झाली असती. हल्लीं त्यांचें माझें रहस्य नाहीं ह्यात नवल तें काय ? माझें त्याच्याशीं सख्य व्हावें कोठून ? कारण 'समानशीलेव्यसनेषु सख्यम्' पण त्यांच्यात शील नाहीं, माझ्यांत व्यसन नाहीं मग सख्य काय वाटेवर पडले आहे ? पण सगळ्यांत मोठा जो फायदा झाला असता त्यामुळें तर मला राहून राहून फारच वाईट वाटत आहे. शिक्षेची धास्ती न बाळगता मला पाहिजे तो गुन्हा करतां आला असतां. कारण, मी शुद्धीवर नसतांना एखादा अपराध केला तर त्याबद्दल मला शिक्षा देण्याचा अन्याय कोणत्याही न्यायी मनुष्यानें खास केला नसतां. हे मदिरे, तुझें सामर्थ्य अगाध आहे ! पण त्याची खरी कल्पना कोणालाही न येऊन लोक तुला नांवें ठेवीत आहेत. इतर हलकट चोरांप्रमाणें फटके खाल्ल्यावांचून दुसऱ्यांच्या खिशांतले पैसे आपल्या हातांत आणतां येतात. एखाद्या बदमाशा-प्रमाणें खडी फोडायला लागल्यावांचून परक्या स्त्रीवर खुशाल हात टाकतां येतो. कोणा खून करणाऱ्या डांबिसाप्रमाणें फांशी न जातां पाहिजे त्याच्या प्राणाचा नाश करतां येतो. पण ह्या सगळ्या शिक्षा चुकविण्याला आपण खरोखरच मात्र अपराध करतेवेळीं दारूच्या धुंदींत असले पाहिजे. नाहींतर खोटें बोलल्याबद्दल येथें शासन झाल्यांवाचून कधीं रहाणार नाहीं. हे मदिरे, तुझें या जगांवर फार उपकार आहेत. तूं आजपर्यंत किती निरापराधी अपराध्यांचा बचाव केला आहेस व या पुढें करशील ! खरोखर तूं सद्गुणांची जननी आहेस. निरपराधी हे सद्गुणी असतीलच, पण अपराध्यांनाही तूं सद्गुणी करतेस हा तुझ्यांत विशेष आहे. रत्नें हीं चमकणारच परंतु गारगोट्याही ज्या कलेच्या योगानें चमकतात त्या कलेची धन्य आहे. हे मदिरे, तुला क्षीरसागरांतून मंथन करून ज्या देवीनें किंवा दैत्यानें काढली त्याचे पुतळे

प्रत्येक चवाठ्यावर करुन ठेविले पाहिजेत. आणि त्यांचीं जागोजाग देवळें बांधलीं पाहिजेत. त्या आंधळया शुक्राचार्यांनें दारू पिऊं नये म्हणून तुझा निषेध केला. त्याचीं फळें त्याच्या त्या बामण जातींतले कांहीं दुर्धारक अजून भोगीत आहेत. पण तुझा अव्हेर करणारांना असेंच प्रायश्चित्त पाहिजे. जा म्हणावे, खून करून खुशाल फांशीं जा. पण मी दारू प्यायलों होतों असें ह्मणूं नका हो. अहारे दुध–खुळ्यांनों! हे देवी मदिरे, तूं काय करशील? तुझा ह्यांत काय दोष आहे? 'गंगा आली आळशावरी, आळशी पाहून पळे दुरी' अशी गत झाली आहे. हे बंधमुक्त करणारे भागीरथि, तूं प्राण वांचवीत असून तुला स्पर्श करणें ह्मणजे पाप असें अशिक्षित मुर्ख मानतात ना? अथवा 'प्रबलतमसिमेवप्रायः शुभेषु हि वृत्तयः। स्रजमपि शिरस्यंधः क्षिप्तां धूनोत्यहिशंकया' असेंच म्हटलें पाहिजे. दुसरें काय? हे माते, मीही तुझी इतके दिवस उपेक्षा केली. ह्याबद्दल तूं मला क्षमा कर. मी आतां कोणा तरी वयातीत पांढऱ्या केंसाच्या, मधुमेह झालेल्या व वेळेस गटारांत बसूनही चार चार घटका समाधि लावून तुझ्या आनंदांत लीन होणाऱ्या चांगल्या अनुभवशीर राजमान्य राजश्रीकडून गुरूपदेश घेतों. इतके दिवसांत सभ्य लोकांप्रमाणें मी हतभाग्य एकदांदेखील बेशुद्ध होऊन पडलों नाहीं, हें पाहून आतां मी शुद्धीवर आलों. आणि सुशिक्षित लोकांप्रमाणें एकदांदेखील माझे डोळे धुंद झाले नाहींत हें पाहून आज माझे डोळे उघडले. असो. हे शक्तिमाते, आजपासून मी तुझा दास बनणार.

# झोपेंतील देखावा : : : २६

मी एके दिवशीं स्वप्नांत असें पाहिलें कीं एक बाई मौक्तिकरत्नजडित सुवर्ण पलंगावर रेशमी गादी टाकून पडली आहे. तिचा चेहरा प्रफुल्लित दिसत होता. तिच्या सभोंवतीं ठाकठीक पोषाख केलेलीं पण अतिशय व्रात्य व नेहमीं आनंदांत निमग्न असलेलीं बाळें होतीं, व दुसरी बाईही जवळच एका सुवर्णमय पलंगावर फाटकीशी गादी टाकून बसली होती. तिच्या फिकट व चिंतायुक्त चेहेऱ्यावरून ती मोठ्या दुर्धर प्रसंगांत असावी असें पहाणाराला वाटत होतें. तिच्या आसपास दीन मुद्रेनें पहात असलेलीं पण गंभीर स्वभावाचीं मुलें शेजारीं बसलेल्या तीव्र मुद्रेनें बघणाऱ्या मुलांचा हुकूम बजावित आहेतशीं दिसलीं. तेथें असलेल्या बंदिजनांस मी विचारलेंहे तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं ही जी बाई रत्नजडित पलंगावर बसली आ, तिचें नांव धवलकुसुमावती व जी सुवर्णमय पलंगावर बसली आहे ती हेमवती. ह्या दोघीही एकाच राजाच्या बायका आहेत. धवलकुसुमावती ही पहिली व हेमवती ही दुसरी बायको. पहिलीवर त्याचें अतिशय प्रेम आहे व तिच्या अर्ध्या वचनांत तो वागतो. दुसरीवर तो प्रीति करीत आहे असें दाखवितो इतकें ते सांगत आहेत तों ह्या दोघांमध्यें बोलण्याला सुरवात झाली. हेमवती म्हणाली, ' बाई, तुझीं मुलें मला व माझ्या मुलांना फार त्रास देतात व त्यांना बंदिवानाप्रमाणें लेखितात. आपणां दोघींचें व आपल्या मुलांचें नातें सारखें असून तुम्ही व तुमचीं मुलें आम्हाला बंदिवानाप्रमाणें वागवितां ह्याला काय म्हणावें? मी संपत्तीचें, विद्येचें, नीतीचें, सुखाचें व कलाकौशल्यादिकांचें माहेरघर अशी पुरातन कालापासून माझी ख्याति आहे. व म्हणूनच मला वरण्यासाठीं देशोदेशींचें नृपती येत व लढाया करून एकमेकांकडून मला हिसकावीत. त्यांत किती न्यायी व

किती अन्यायी होते. त्याप्रमाणें तुमच्या पतीनें मला वरण्यासाठीं दीर्घ प्रयत्न करून आपला हेतु सिद्धीस नेला आहे. पतीकडून आपणां दोघींलाही सारख्या नात्यानें वागविण्याचें आश्वासन मिळालें असून तसें कांहीं होत नाहीं. आमची बरदास्त चांगली ठेविली आहे, असें राजाजवळ खोटेंच सांगून तुझीं मुलें आमची फार अवहेलना करतात व फार त्रास देतात. माझीं मुलें राजाजवळ आपली दुःखद स्थिति सांगूं लागलीं असतां त्यांना दरडावितात व नेहमीं त्यांना जनावरांप्रमाणें लाथाबुक्यांखालीं जर्जर करितात. तें दुःख पाहून माझें काळीज तिळतिळ तुटतें. हायरे दैवा, माझ्या पोटीं जीं वीररत्नें जन्मलीं व ज्यानीं दिगंतरीं ख्याति करून माझें नांव व वैभव गाजविलें व दुसऱ्यांस माझी सेवा करावयास लाविलें, त्या मला आतां दुसऱ्याचें दासीपण करावयास लावितेंस ना ! असो. तुझ्यापुढें कोणाच्यानें जाववणार नाहीं. 'हे तिचे केविलवाणे उद्‍गार ऐकून धवलकुसुमावती व तिचीं मुलें शिवाय करून तेथें असलेल्यांच्या डोळ्यांतून खळ खळ टिपें गळूं लागलीं. पण धवलकुसुमावतीचें अंतःकरण तिळभरही वितळलें नाहींच, पण रागानें संतप्त होऊन ती ह्मणाली 'माझीं बाळें तुझ्या मुलांचा इतका मान राखीत असतां त्यांस तूं इतका दोष देतेस व नसत्या गुणांचा गर्व करितेस ! तुला व तुझ्या कारट्यांना शासनच योग्य आहे !' असें ह्मणून तिनें लगेच आपल्या मुलांना आज्ञा केली कीं 'बघतां काय. धरा रांडेला ! चोपा ! आली आहे माझ्यापुढें दिमाखानें बोलायला' व तिला मारूं लागताहेत तोंच मी मोठ्यानें ओरडलों आणि इतक्यांत जागा होऊन पाहतों, तों हें स्वप्न !

---

## पुनः प्रकाशित होणाऱ्या

# काळ–वाङ्मयाचा

# प्रभाव, पार्श्वभूमि आणि पूर्वेतिहास

**किं कवेस्तस्य काव्येन किं कांडेन धनुष्मतः**

**परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिदः**

आपल्या शत्रूला जें डोळ्यासमोर नको असेल, तें आपण अवश्य आपल्या डोळ्यांसमोर ठेवावें हा राजकारणांतील सामान्य आणि सर्वमान्य असा एक सिद्धांत आहे. 'काळांतील निवडक निबंधा'चे दहा भाग हें एक वरील कोटींत गणलें जाणारें वाङ्मय आहे. म्हणूनच १९३७ सालीं जेव्हां कॉंग्रेस सरकार सत्ताधिरूढ झालें, तेव्हां हें वाङ्मय आतां बंधमुक्त होईल अशी आशा लोकांना वाटूं लागली होती. पण कोणत्याही कारणानें कां होईना, त्यावेळीं हें वाङ्मय मोकळें होऊं शकलें नाहीं. काळ आला होता पण वेळ आली नव्हती! शरदृतूंतील त्यावेळच्या पांढऱ्या ढगांतून जलवृष्टि झाली नाहीं. फक्त एक दहावा भागच काय तो सोडण्यांत आला. तथापि, या खेपेस मात्र कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारावर येतांक्षणींच त्यांनीं मराठी भाषेचें वैभव व स्फूर्तिस्थान असें हें तेजस्वी वाङ्मय निर्बंधमुक्त करून व अशारीतीनें लोकांचें ऋण फेडून स्वतःला अभिनंदनास्पद करून घेतलें आहे, यांत बिलकुल शंका नाहीं.

## काळकर्त्यांचें संक्षिप्त चरित्र

काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म सन १८६४ च्या जून महिन्यांत महाड येथें झाला. त्यांचे वडील महादेवराव हे महाडांतले एक नाणा-

वलेले वकील होते. शिवरामपंतांचा प्राथमिक विद्याभ्यास महाडच्याच प्राथमिक शाळेंत झाला. परंतु या शाळेंत शिकत असतांना त्यांचें चित्त अभ्यासांत मुळींच नव्हतें. सारें लक्ष शाळा चुकविण्याकडे आणि हूडपणा करण्याकडे असे. हा 'सरस्वतीचा कंठमणि' त्यावेळीं उनाडांचा मेरूमणि होता! अखेर त्यांच्या वयाच्या चवदाव्या वर्षी वडिलांनीं त्यांना रत्नागिरीच्या हाय स्कुलांत शिकण्यासांठीं ठेविलें. आणि हाच शिवरामपंतांच्या आयुष्यांतला पहिला आणि महत्त्वाचा क्रान्ति बिंदू ठरला. कारण यावेळीं शाळेंत शिकवीत असणाऱ्या शिक्षकांत 'मराठीचे शिवाजी' म्हटले जाणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर होते. शास्त्रीबोवांच्या शिकवणीनें शिवरामपंतांच्या मनःसृष्टींत क्रांति घडून आली. त्यांचें लक्ष्य एव्हांपासून अभ्यासाकडे तर वळलेंच पण शिवाय त्यांच्यामध्यें तीव्र देशाभिमानाचें बीजारोपण झालें. पुढें शास्त्रीबुवांनीं पुण्यास न्यू इं. स्कूल काढल्यानंतर १८८२ सालीं त्या शाळेंत जाण्याकरिता रत्नागिरीच्या विद्यार्थ्यांनीं चळवळ केली त्यांत शिवरामपंतांनीं पुढाकार घेतला होता.

पुण्याच्या न्यू इं. स्कुलांत दाखल झाल्यामुळें शिवरामपंतांना प्रो. वामन शिवराम आपटे, लो. टिळक, आगरकर यांच्यासारखे शिक्षक लाभले. प्रो. आपटे यांनीं त्यांची एकंदर तरतरी व संस्कृतांतील तयारी पाहून यांना एकदम पांचव्या इयत्तेतून सातवींत घेतलें. सन १८८४ मध्यें शिवरामपंतांनीं जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप मिळविली. त्याच वर्षी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाल्यामुळें प्रीव्हीसच्या वर्गांत त्यांनीं आपलें नांव दाखल केलें. त्यानंतर डेक्कन-कॉलेजांत त्यांनीं आपला एम्. ए. पर्यंतचा अभ्यासक्रम पुरा केला. बी. ए. च्या परीक्षेंत त्यांचा नंबर बराच वर आल्यामुळें त्यांना दक्षिणा फेलोशिप मिळून १८९१।९२ हीं दोन वर्षें फेलो नेमण्यांत आलें होतें. याच सुमाराला त्यांचें 'अहल्या-जार' या नांवांचें खंडकाव्य आणि 'भामिनी विलासा' वरच्या इंग्रजी नोट्स प्रसिद्ध झाल्या. परंतु त्यांच्या आयुष्यांतल्या या दोन वर्षांच्या अवधीचें महत्त्व आहे तें वेगळेंच आहे. पुढें सबंध काळ-वाङ्मयांत त्यांनीं जो क्रांति-वाद पुरस्कारिला व क्रांतीचें एक तत्त्वज्ञान किंवा शास्त्र ह्मणून पुढें मांडलें, त्याची बैठक या काळांत तयार झालेली आहे. या दृष्टीनें त्यांच्या या दोन वर्षांना पूर्वतयारीचा काळ

( Formative years ) असें म्हटलें पाहिजे. या काळांत त्यांनीं आपलें लक्ष उच्च दर्जाच्या वाङ्मयाकडे लाविलें होतें. अर्वाचीन ग्रंथकारांपेक्षां प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांचें परिशीलन करण्याची त्यांना विशेष हौस असे. बहुतेक पूर्वकालीन कवि, इतिहासकार, तत्ववेत्ते व साहित्यिक यांचे ग्रंथ त्यांनीं वाचून टाकले. युरोपांतील व इतर देशांतील वाङ्मय त्यांना विशेष आवडत असे. जर्मनी, फ्रान्स, इटली, अमेरिका वगैरे देशांतील मोठमोठ्या लेखकांनीं लिहिलेल्या निरनिराळ्या भाषेंतील पुस्तकांचीं इंग्रजी भाषांतरें मुद्दाम आणवून तीं ते मोठ्या आवडीनें वाचीत असत. प्लेटो, सॉक्रेटिस, गिबन, बायरन, बर्क, होमर, कार्लाइल, शिलर, लेसिंग, रेसीनी, गीझो, गटे, रँक, शेक्सपिअर वगैरे ग्रंथकार त्यांच्या फार आवडीचे होते. शिवाय त्यांच्या वाचनांत रूसो, व्हॉल्टेअर, टॉलस्टॉय इत्यादि पुरोगामी लेखकांचीं ( Radical thinkers ) पुस्तकें आल्यामुळें त्यांच्यावर सोशॅलिस्ट मतांची बरीच छाप पडूं लागली होती. 'राज्यापहार आणि न्याय,' 'इन्कम-टॅक्स आणि सोशॅलिझम्,' 'आमच्या इंग्रजांच्या इंपीरिअॅलिझम्‌चा शेवट काय होणार ?' इत्यादि 'काळां'त लिहिलेल्या लेखांतील विचारसरणीचा उगम यावेळीं केलेल्या वाचनांत सांपडतो. **या ग्रंथमंथनांतून एक 'चवदावें रत्न' ही निघालें !** तें म्हणजे त्यांनीं नंतर प्रसृत केलेलें क्रांतीचें तत्वज्ञान. आपला हिंदुस्थान देश गुलामगिरींत सांपडलेला आहे, ही गोष्ट त्यांच्या मनाला खटकत होती. या गुलामगिरीवर रामबाण शोधून काढण्याकरितां इतर पारतंत्र्यांत सांपडलेल्या देशांनीं काय इलाज केले व त्यांनीं आपलें स्वातंत्र्य कसें संपादन केलें, याचा इतिहास त्यांनीं अभ्यासण्यास सुरवात केली व जगाच्या पाठीवर परतंत्र राष्ट्रांत जिथे जिथे म्हणून स्वातंत्र्याची क्रांती झाली त्या सगळ्या क्रांतींचे संपूर्ण इतिहास त्यांनीं पालथे घातले. आजपर्यंतच्या राज्यक्रांत्या ह्या गुप्तसंस्थांनीं असोत किंवा उघड बंडांनीं असोत, पण सशस्त्र उठावणीमुळें झालेल्या आहेत हें त्यांच्या लक्षांत आलें. अर्जविनंतींनीं कांहींएक मिळत नसतें, खणाखणी करून, लढून-झगडून गेलेलें स्वराज्य मिळवावें लागतें, हाच बोध कोणीही इतिहास वाचला तरी त्याला मिळणार ! पुढें शिवरामपंत 'काळां'तून काय किंवा व्याख्यानां-तून काय गत इतिहासांतले हेच दाखले लोकांपुढें ठेवीत असत व त्याच

उपायांचा अवलंब करण्याला लोकांनीं प्रवृत्त व्हावें. असें त्यांचें संसूचन असे. सन १८९५ मध्यें एम्. ए. च्या परीक्षेंत शिवरामपंतांचा पहिला नंबर येऊन त्यांना गोकुळदास व झाला वेदान्त अशीं नऊशें रुपयांचीं बक्षिसें मिळालीं. ह्याच वेळीं नवीन निघालेल्या 'महाराष्ट्र कॉलेज'मध्यें त्यांची संस्कृतचे प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली. परंतु " ते एखाद्या लहानशा चार भिंतींच्या शाळेमध्यें किंवा कॉलेजांत शिकविण्याला जन्माला आलेले नव्हते." हें शिवरामपंतांनीं टिळकांसबंधीं लिहिलेलें वाक्य खुद्द त्यांनाही लागू पडण्यासारखें आहे. कारण, शिवरामपंत नुसतें कॉलेजांत शिकवून स्वस्थ बसेनांत किंवा त्यांची अंतरींची ऊर्मी त्यांना गप्प बसूं देईना. त्यांनीं देवळांत व्यासपीठांवरून पुराणें सांगावयास सुरवात केली. त्यांचा सगळा थाट पुराणाचा असला तरी आंतला घाट राजकारणाचा असे. निमित्ताला एखादा श्लोक किंवा प्रसंग घ्यावा आणि त्याच्या मिषानें किंवा अनुषंगानें श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर सद्यःस्थितीचें व चालू राजकारणाचें चित्र उभें करावें, अशी त्यांची पद्धत होती. हीं पुराणें नव्हतीं, हीं त्यांची बैठीं व्याख्यानेंच होतीं. हीं त्यांचीं " राजकीय पुराणें " म्हणजेच त्यांच्या भावी वक्तृत्वाच्या भव्य इमारतीचा पाया होता, असें म्हटलें पाहिजे. वक्तृत्व-समुद्राला जाऊन मिळण्याचें तें नदीमुख होतें.

याखेरीज टिळकांनीं नवीनच सुरू केलेल्या गणेशोत्सवांत, शिवाजी-उत्सवांत व इतर चळवळींत ते भाग घेऊं लागले. सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी या नात्यानें १८९६।९७ च्या दुष्काळी आंदोलनांत त्यांचे अनेक ठिकाणीं दौरे व व्याख्यानें झालीं. शिवरामपंतांच्या कॉलेजबाहेरील ह्या हालचाली न मानवल्यामुळें 'महाराष्ट्र कॉलेज'च्या संस्थापकांना तें अवघड वाटूं लागलें. आणि अशा रीतीनें दोन वर्षांच्या आंतच शिवरामपंतांना प्रोफेसरीचा राजीनामा देऊन बाहेर पडावें लागलें !

सन १८९८ मध्यें शिवरामपंतांनीं आपलें सुप्रसिद्ध 'काळ' पत्र सुरूं केलें. वास्तविक यावेळचें वातावरण अत्यंत भीषण आणि प्रतिकूल होतें. प्लेग–जुलूम असह्य होऊन पुण्यांत रँडचा खून झालेला होता. टिळकांना केसरींतील लेखांवरून राजद्रोहाची शिक्षा देऊन तुरुंग दाखविण्यांत आलेला

होता. अशा परिस्थितींत वर्तमानपत्र काढणें धाडसाचें व धोक्याचें होतें. परंतु—

क ईप्सितार्थ स्थिरनिश्चयं मनः
पयश्चनिम्नाभिमुखं प्रतीपयेत्।

या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें दृढसंकल्प अशा मनुष्याला कोण परावृत्त करूं शकणार आहे ? देशाभिमानानें उद्दीपित झालेली त्यांची प्रतिभा देशाच्या गुलामगिरींतल्या अपमानास्पद व दुःखदायक स्थितीनें डिवचली गेली होती. आणि म्हणूनच त्यांची नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा यापुढें डोक्यांतल्या डोक्यांत घुटमळत बसेल, हें शक्यच नव्हतें. तिला वाट काढून देणें भागच होतें. शिवरामपंतांच्या स्वातंत्र्याच्या ऊर्मीनें त्यांच्यामागें टुमणें लावून 'काळ' काढविला आणि त्या काळच्या स्तंभांतून नारसिंहाप्रमाणें तिनें आपलें उग्रस्वरूप प्रकट केलें नारसिंहानें उन्मत्त व सत्ताधारी हिरण्यकशिपूच्या सगळ्या अटी पाळून आणि त्याच्या सर्व कायद्यांच्या कक्षेंत राहून त्याचें उदरविदारण केलें हें त्या अवतारांचें वैशिष्टय सुप्रसिद्धच आहे ! यावरून हेंच दिसून येणार आहे कीं, त्यांनीं काळ काढला तो अपरिहार्य म्हणून.

काळ पत्र त्याच्या संपादकाप्रमाणेंच दिवसानुदिवस अधिकाअधिक लोकप्रिय होत चाललें. सन १८९८ ते १९०८ पर्यंत शिवरामपंतांनीं काळांत लिहिलें. पण या दहावर्षांच्या अवधींत त्यानें केलेली जागृति केवळ अपूर्व अशी होती. 'कांळांतील मर्मभेदक आणि वक्रोति प्रचुर हल्लयांनीं सरकारला आणि नेमस्तपक्षाला हैराण केलें. इंग्रज लोक हे देवदूत आहेत आणि हे कल्याणकर्ते हिंदुस्थानच्या थोर नशिबानें आपल्यावर राज्यकर्ते म्हणून लाभले आहेत, असा विचार जो त्यावेळच्या मोठया मोठया लोकधुरीणांकडून प्रसृत केला जात होता त्याचे 'काळा'नें धिंडवडे काढले, ठिकऱ्या उडविल्या. काळांतील जहरी आणि जळजळित लिखाणानें तरूणांचीं मनें प्रक्षुब्ध करून सोडली, टिळकांनी असंतोष निर्माण केला; पण काळाच्याद्वारा शिवरामपंतांनीं चीड उत्पन्न केली; सर्वसामान्य जनतेचें तोंड जें सरकारकडे वळलेलें असें तें काळानें वळवून स्वातंत्र्यसन्मुख केलें. काळानें महाराष्ट्राच्या मनोभूमिकेंतच क्रांति घडवून शुद्ध स्वातंत्र्याची कल्पना प्रथम स्पष्टशब्दांत प्रदर्शित करण्याचा मान काळपत्राचा आहे.

पण काळकर्ते नुसतें काळांत लिहून स्वस्थ बसले नव्हते. लेखणीबरोबरच कदाचित अधिक प्रखर व परिणामकारक असें आपलें दुसरें अस्त्र त्यांनीं बाहेर काढलें होतें. दहा दहा हजारांचा श्रोतृसमुदाय त्यांच्या व्याख्यानांतल्या अस्खलित वाक्प्रवाहानें मुग्ध होऊन तीन तीन तासपर्यंत नागासारखा डुलत राहत असे. ते मनांत आणीत तेव्हां श्रोत्यांच्या चित्तवृत्ति थरारून सोडीत असत. हा काळ म्हणजे त्यांच्या वक्तृत्वाचा वसंतऋतु होता. या सुमारास त्यांनीं वाग्वैभवाचा विक्रमांक गांठलेला होता यांत शंका नाहीं. यामुळें वैयक्तिक दृष्ट्या यावेळीं ते लोकप्रियतेच्या शिखरावर होते. लोकमान्य टिळक एवढे सव्यसाची, तेजस्वी नेते खरे; पण शिवरामपंतांचीं सुविभूषित भव्य आकृति आणि अप्रतिम वाक्चातुर्य यांचीं कांहीं विलक्षण मोहिनी व छाप पडून शिवरामपंतांबद्दल लोकांना अधिक आकर्षण वाटत असे. त्यावेळच्या तरूणांना व शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांना तर त्यांच्या व्याख्यानाचे वेडच लागलें होतें.

अशा रीतिनें आपल्या लेखन वक्तृत्वाच्या जोडगोळीनें लोकांना चेतविणाऱ्या शिवरामपंतांना यापुढें सरकार मोकळें ठेवील, हें शक्यच नव्हते. १९०८ सालीं काळ पत्रावर खटला भरण्यांत आला. मुंबईच्या हायकोर्टांत सरकारनें युरोपियन व मुसलमानांची स्पेशल ज्युरी नेमून घेतली होती. शिवरामपंतांनीं आपला खटला स्वतःच चालविला व आपल्या मोहक व मुद्देसूद वक्तृत्वाच्या जोरावर त्यांनीं ज्युरींत फूट पाडली. पण अखेर ज. दावर यांनीं त्यांना सौम्य म्हणून १९ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली. तरी काळ पत्र चालूच होते. पुढें १९१० सालीं शिवरामपंत सुटून आल्यानंतर काळपत्राकडून जबर जामीन मागण्यांत आल्यामुळें तें बंद करणें भाग पडलें ! येवढेंच नव्हे, तर काळांतील निवडक निबंधांचीं दहांही पुस्तकें जप्त करण्यात आली ! त्याचा परिणाम म्हणून शिवरामपंतांना कित्येक दिवस स्वतःचीं पुस्तकें आपल्या हातानीं जाळावी लागली ! त्यावेळीं त्यांच्या तोंडून खालील उद्गार निघाले होते —देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देऊन सुद्धां मला जितका धक्का बसला नसता तितका सरकारनें माझा प्रतिप्राण असणारें दहावर्षांतलें वाङ्मय जप्त करून दिला व हाच माझा तरूणपणचा जिवंत मृत्यु होय !

तुरुंगांतील हालअपेष्टांनीं शिवरामपंतांच्या मूळच्या कणखर प्रकृतीवर बराच परिणाम झाला होता. शिवाय लो० टिळक तुरुंगांत गेलेलें होते. बाहेरची परिस्थिति चिघळलेली आणि सरकार स्थिरलेलें होतें. त्या काळांत कोणतीही हालचाल करणें अशक्य होतें. त्यामुळें शिवरामपंतांनीं आपलें लक्ष साहित्याकडे वळविलें १९१० ते १९२० या कालखंडांत त्यांनीं अनेक साहित्यविषयक लेख व ग्रंथ लिहिले.

सन १९२० मध्यें लो० टिळकांच्या मृत्यूनंतर म० गांधींनीं जी असहकारितेची देशव्यापी चळवळ पुकारली त्यांत ते मनोभावानें सामील झाले. याच सालीं त्यांनीं आपलें ‘स्वराज्य’ पत्र सुरू केलें व त्यांतून त्यांनीं गांधींच्या असहकारितेचा पुरस्कार केला. १९२२ सालीं मुळशी–सत्याग्रहाची चळवळ निघाली. त्यांत त्यांनीं धडाडीनें भाग घेऊन पुन्हा एकदां वयाच्या ५८ व्या वर्षीं सहा महिन्यांचा कारागृहवास पत्करला. ह्या शिक्षेंतून सुटल्यावर त्यांची प्रकृति बरीच खालावली म्हणून त्यांनीं स्वराज्य पत्रांतून आपलें अंग काढून घेतलें. त्यानंतर सायमन कमिशन बहिष्कार व नेहरू रिपोर्ट प्रचार या महत्त्वाच्या चळवळींत त्यांनीं मोठ्या नेटानें भाग घेऊन आपलें स्वभावसिद्ध प्रचारकी कौशल्य जनतेच्या निदर्शनास आणलें १९२७ सालीं मद्रास येथें पं. जवाहरलाल नेहरू, श्रीनिवास अय्यंगार व सुभाषचंद्र बोस यानीं जो स्वातंत्र्यसंघ काढला होता त्याच्या महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षस्थानीं शिवरामपंतांची योजना झाली होती. १९२८ सालीं बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र प्रां० परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते १९२९ सालच्या बेळगांवच्या साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत आलें होतें.

याच वर्षीं मधुमेहाच्या व्यथेनें त्यांची शरीरप्रकृति पोखरून निघाली होती. मनाचा उत्साह कायम असला तरी शरीर थकलें होतें. ता. २७ सप्टेंबर १९२९ च्या उगवत्या शुक्रवारीं स्वातंत्र्योपासक, मराठी भाषेंतील अद्वितीय वक्ता आणि वक्रोक्तिकुशल असामान्य लेखक अशा या थोर त्यागी आणि ज्वलज्जहाल देशभक्ताचें देहावसान झालें. शिवरामपंत दर शुक्रवारीं काळ काढीत असत, पण ह्या शुक्रवारीं काळानें दावा साधून त्यांनांच बाहेर काढलें !

## काळाची कामगिरी आणि कर्तबगारी

'काळा'चा पहिला अंक शके १८२० च्या पाडव्याला (ता. २५ मार्च १८९८) शुक्रवारीं सकाळीं बाहेर पडला. सुरुवातीला सहाशेंच वर्गणीदार होते. पण त्याचा खप झपाट्यानें वाढत जाऊन १९०४ सालीं तर तो बारा हजारांच्यापुढें गेला. शुक्रवार येतो केव्हां आणि काळ वाचतो केंव्हां अशी स्थिति झालेलें हजारों वाचक चातकाप्रमाणें अंकाची वाट पहात असत. एवढेंच नव्हे तर पुण्यांत कोनकरांच्या वाड्याच्या बाहेरच्या कट्यावर शिवरामपंतांनीं या अंकांत काय लिहिलें आहे हें वाचण्यासाठीं आतुर झालेली शेंदीडशें मंडळी तरी पहाटे पांच वाजतां अंक बाहेर पडण्याची वाट पहात बसलेली असत. या मंडळींत भालाकार भोपटकरांसारखे लोकही होते. त्यावेळच्या परिस्थितीमुळें वर्गणीदार होण्याला भिणारे लोक फुटकळ अंक घेऊन वाचीत. काळपत्र वाचण्याचे व त्यांतील लिखाणाची चर्चा करण्याचे अड्डे गांवांत स्थापन झाले होते. १९०८ सालीं तर काळाचे सोळा हजार वर्गणीदारं होऊन सुटा खप धरून बावीस हजार प्रती काढाव्या लागत असत. केसरीहून अधिक नसला तरी बरोबरीनें काळ खपत असे, असें म्हणतात. लोकमान्य टिळकांचा 'केसरी' गर्जत असतांना व झेंड्यावर असतांना पांच सात वर्षांतच काळानें इतकी लोकप्रियता संपादन केली, हें शिवरामपंतांच्या लेखनकलेला जनतेनें दिलेलें मोठें शिफारसपत्र होय, त्यांत संशय नाहीं. काळपत्रानें सर्वसामान्य जनतेचें तोंड सरकारकडे फिरलेलें होतें तें वळवून स्वातंत्र्यसन्मुख केलें. एका माणसानें फक्त आपल्या लेखणीच्या साहाय्यानें दहा वर्षांच्या अवधींत लोकांच्या मनोभूमिकेंत जी क्रांति घडवून आणली व विचारांची दिशाच अजिबात बदलून टाकली, याला मराठी पत्रांच्या इतिहासांत तरी तोड नाहीं. जगांत लेखणीचा प्रभाव केवढा असूं शकतो याचा हा प्रत्यक्ष पुरावाच आहे. लेखणीची बहादुरी व श्रेष्ठत्व अशा प्रकारच्या कामगिरींनेंच प्रस्थापित झालेले आहे. वेळ आली म्हणजे लेखणींनेंच पुढें तरवारी बनत असतात !

लोकांना खडबडून जागे करुन चेतविण्याकरितां काळकर्ते शिवरामपंत नाना तऱ्हेच्या युक्त्या शोधून काढीत असत. कधीं जुन्या ग्रीक रोमन गोष्टीच

काढतील, तर कधीं शिवाजीचे रूपक घेऊन त्याने स्वातंत्र्यस्थापना करण्यासाठीं लोक कसे जमविले, शस्त्रास्त्रें कशी मिळविलीं, व गनिमी काव्याचें युद्ध खेळून परकीय सत्ता कशी जर्जर केली याचें सूचक वर्णन करतील. ते केव्हा चालू परिस्थितीला हुबेहूब लागू पडेल असें सृष्टिचमत्काराचें रूपक करीत तर केव्हां 'थोट्या तळि कसे खाशील' अशा मासल्याची एखादी कल्पित गोष्ट रचीत. आज त्यांच्या लेखणीनें साम्राज्याच्या सामर्थ्याला पाहून विकट हास्य केलें तर उद्यां तीच लेखणी आपलें गतवैभव आणि हल्लींची हीन स्थिति यांची हृदयभेदक तुलना उपस्थित करून अंतःकरणाला पीळ पाडी. अशा तऱ्हेच्या जिवंत, उद्दीपक रसरसणाऱ्या वाङ्मयामुळें काळपत्राची एक कक्षा ( Magnetic Sphere ) तयार झाली होती. त्यांत सांपडलेल्या वाचकांना मनाचा समतोलपणा टिकाविणें कठीण होत असे. पारतंत्र्याच्या जाणिवेनें त्यांचें अंतःकरण प्रक्षुब्ध होई. तरुणांचें रक्त सळसळूं लागे. त्यांची डोकी फिरून-भणाणून जात. काळकर्त्याचे लेख वाचणारा मनुष्य कोरडा, विकार-हीन व भावनाशून्य असा राहणेंच शक्य नव्हतें. असंतोषाच्या ज्वाला निघणारा तीव्र देशाभिमानाचा हा वणवा दर शुक्रवारीं पेटविला जाई व त्याची लागण साऱ्या महाराष्ट्रभर होत असे !

## वक्रोक्ति

दिवसेंदिवस शिवरामपंतांची लेखणी काळांत अधिकाधिकच रंगू लागली. पांडित्य आणि प्रतिभा यांचा सहसा एकें ठिकाणीं न दिसणारा हृदयंगम संगम लोकांना दर शुक्रवारीं पहावयास मिळूं लागला. व्याजोक्तिचे आणि विनोदबुद्धीचे त्यांनीं देशाभिमानाशीं लग्नच लावून टाकलें. एक वक्रोक्ति-कुशल लेखक असें शिवरामपंतांचें वर्णन जरी राजवाड्यांनी केलेलें असलें तरी तें म्हणजे कांहीं नेहमींच 'शालजोडीचा' उपयोग करीत असत, असे नाहीं. कधीं वक्रोक्ति तर कधीं सडेतोड तर्कशुद्ध कोटिक्रम असा दुतर्फी मारा चालत असे. मात्र प्रतिपक्ष्याची खुसखुशीत उडवावयाची असेल आणि त्याला उपहासास्पद करून सोडावयाचा असेल तर त्यांची लेखणी वक्रोक्तीचा व उपरोधाचा आश्रय केल्याशिवाय रहात नसे. या दृष्टीनें पहातां त्यांची राजकीय मतें व स्वातंत्र्य मिळविण्याचे त्यांचे मार्ग हे जसे स्वतंत्र व इतरांपासून निराळे होते त्या प्रमाणेंच त्यांची लेखनशैलीही नवीन व

विशिष्ट अशी होती. वक्रोक्ति आणि तीही इतकी भरपूर व राबवून घेतलेली मराठी वाङ्मयांत यापूर्वी नव्हती. तिचें इतकें वक्र व मनोहर वर्तन मराठी वाचकांनीं प्रथम काळांतच उत्सुक आणि विस्फारीत नेत्रांनीं पाहिलें एकीकडे सरकारी कायद्याचे बंधन आणि दुसरीकडून सरकाराला नको पण देश-हिताला हवे ते लोकांना कळविण्याची मनाची उत्कटता अशा दोन्हींच्या दाबामुळें ही वक्रोक्तीची हिरकणी बनलेली आहे. त्यावेळीं शिवरामपंतांच्या मनोभूमीवर खालीलप्रमाणें एखादा नाट्यप्रवेश झाला असेल, अशी कल्पना करतां येईल.

मनः—हाच मार्ग ! हेंच लोकांना शिकविलें पाहिजे. तरच उद्धाराची आशा. हें माझें कर्तव्य होय.

बुद्धिः—असें लिहितां येत नाहीं. त्याला कायद्याचें बंधन आहे.

परिस्थितिः—मी प्रतिकूल आहे. तुला जखडून टाकीन.

लेखणीः—मी यांतून वाट काढीन !

या झगड्यांतून निघालेली वाट म्हणजेच वक्रोक्ति होय. अर्थात् ही वक्रोक्ति तीव्र व परिणामकारक होण्याला एक विशिष्ट मनोरचना आणि भावनेची किंवा विचारांची तीव्रता असावी लागते ती शिवरामपंतांच्या ठिकाणीं होती, यांत शंका नाहीं. शिवाय त्यावेळीं वर सांगितल्याप्रमाणें परिस्थितीची अडचण असे. म्हणजे कांहीं गोष्टी सरळ बोलण्याची चोरी या सर्व कारणांनीं मिळून ही पंतांची वक्रोक्ति सिद्ध झाली असली पाहिजे. एवढी गोष्ट मात्र खरी कीं, ही त्यांची विशिष्ट शैली जशी पूर्वी अस्तित्वांत नव्हती तशी त्याच्यानंतरही ती नाहीं. या शैलीचें अनुकरण करण्याचे कांहीं फुटकळ प्रयत्न झाले असतील, पण त्यांत शिवरामपंताचा सफाईदारपणा, मर्मभेदकपणा आणि एकानेच्या एकाने भाषा तशीच त्याच पट्टींत पेलत नेण्याचा दमदारपणा आढळावयाचा नाहीं. वक्रोक्ति आणि उपरोध हे विशेष त्यांनीं पेटंट घेतल्याप्रमाणें त्यांचेच होऊन राहिले आहेत.

या वक्र–लेखांच्या ( Satire ) अमोघ शस्त्रामुळें प्रतिपक्षीयांना एक वेळ टिळक पुरवले पण परांजपे नकोत असें होऊन जाई. या वक्रलेखनांतल्या छद्मी हल्ल्याची गोष्टच अशी असते कीं, शत्रूच्या गळ्यांत बिनतोड बाजू यावी. चार मंडळी बसली असतांना एखाद्यानें कांहीं मंत्रसिद्धीच्या

जोरावर अदृश्यरूप धारण करून यावें आणि एखाद्याची हळूंच पगडी उडवून द्यावी अशांतलाच तो प्रकार होत असतो. धरायला जावें तर धरणार कुणाला ? अशा वेळीं प्रतिपक्षाला तोंड दाबून बुक्क्याचा मार निमूटपणें सहन करावा लागतो व शिवाय प्रेक्षक पहातात-हंसतात तें वेगळेंच ! वाग्युद्ध करण्याला अत्यंत उपयुक्त असें हें भयंकर अस्त्र आहे, यांत संशय नाहीं. तथापि तें पेलणाराही तसाच जबरदस्त असावा लागतो. नाहींतर तें उचलतांना तोल जाऊन स्वतःचीच शोभा व्हायचा संभव अधिक. शिवरामपंतांनीं हें हत्यार मोठ्या कौशल्यानें वापरून त्याचा मनसोक्त व भरपूर उपयोग करून घेतला. खायचे दात वेगळे व दाखवावयाचे वेगळे ही कला किंवा क्लृप्ति, भाषा लिहिण्यांत कमालमर्यादेपर्यंत कोणी नेऊन भिडविली असेल तर ती शिवरामपंतांनींच. निर्जीव मृदंगांतून बोल काढावे त्याप्रमाणें मुक्या शब्दसमूहांकडून त्यांत न लिहिलेला अर्थ ते बोलावयाला लावीत ! शिवरामपंतांच्या राजकीय विचारसरणीप्रमाणेंच त्यांची भाषाही गुप्तीच्या काठीसारखी होती. 'त्यांच्या उपहासाच्या सपाट्यांत जी जी व्यक्ति सांपडली ती ती अंग छिन्नविच्छिन्न झाल्यावांचून कधींही सुटली नाहीं. विनोदशास्त्र त्यांच्या हातांत जितकें वीर्यशाली झालें, तितकें दुसऱ्या कोणाच्याही हातीं कधीं झालें नसेल.' सरकारापासून ते खासगी संस्थेपर्यंत व सरकारी अधिकाऱ्यापासून तों खासगी व्यक्तीपर्यंत ज्यांत ज्यांत म्हणून कांहीं वाईट, अनिष्ट देशविघातक असेल तें नेमकें हुडकून काढून शस्त्रवैद्याच्या चाकूप्रमाणें त्यांची लेखणी त्या व्यंगावर अचूक जाऊन बसत असे. यामुळें संस्था काय किंवा व्यक्ति काय—मग त्या सरकारी असोत किंवा बड्या असोत—त्या पंतांच्या उपहासानें लोकांत हास्यास्पद आणि परिणामांत फिक्या पडत.

कायद्याचा डोळा चुकवून नव्हे, डोळ्यांदेखत—पण त्याच्या टप्प्याच्या बाहेर राहून लिहिलेले हे लेख म्हणजे गद्यकाव्याचे व गनिमीकाव्याचे उत्कृष्ट नमुने आहेत ! अशा प्रकारच्या काळांतील लेखनाचा लोकमतावर फार परिणाम होत चालला आहे, हें सरकारला जाणवूं लागलें होतें. काळाचे लेख वाचून तरुणांनाच काय पण वृद्धांनाही चेव येई. मग तरुणांची डोकीं भडकून जात असलीं तर त्यांत नवल काय ? काळांतील विचारसरणीचा किंवा तत्त्वज्ञानाचा वाचकांच्या मनावर अंमल बसून त्यांत सांगितलेले मार्ग

चोखाळल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें मत बनण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति होत असे ! शिवरामपंतांनीं जरी उघड अत्याचाराचा उपदेश केला नाहीं तरी त्यांच्या लिखाणावरून काय बोध घ्यावयाचा तो लोक घेत.

## देशाभिमानाला जुंपलेली कला

पण वक्रोक्ति हें कांहीं काळपत्राचें एकच एक वैशिष्ट्य नव्हतें. काळांत वक्रोक्तीच्या मसालेदार टीकाप्रचुर लेखांप्रमाणें प्रतिभासंपन्न आणि तत्त्वगंभीर असे सात्त्विक लेखही बरोबरीनें असत. त्यांच्या सर्व लेखनाला तीव्र देशाभिमानाचें अस्तर आंतून शिवलेलें असे. प्रायः काळांतील एक ओळ अगर विचारही असा सांपडावयाचा नाहीं कीं जो स्वातंत्र्याच्या ध्येयाला पोषक नाहीं. शिवरामपंतांनीं आपल्या कालांतील लिखाणानें देशभक्तिरस या दहाव्या रसाची नव्यानें निर्मिति केली. वक्रोक्ति, प्रतिभासामर्थ्य, अलंकृत व चटकदार भाषा आणि क्रांतिप्रवण तत्त्वज्ञान या चार खंबीर खांबांवर काळ-वाङ्मयाची भव्य इमारत रचलेली आहे.

हें वाङ्मय महाराष्ट्र–वाचकांना आतां उपलब्ध होत असल्यानें मराठी-वाङ्मयाला एक अपूर्व शोभा व दीप्ती प्राप्त झाल्यासारखी तर होणारच आहे. पण शिवाय या तेजस्वी वाङ्मयाच्या परिशीलनामुळें आदर्श व आदरणीय वाङ्मय कसें असतें तें कळून येऊन जिवन्त व जिवन्त करणारें साहित्य कोणतें, आणि जिवन्त असून मृतवत् लिहिलेलें साहित्य कोणतें, टिकाऊ कोणतें व टाकाऊ कोणतें, अभ्यसनीय कोणतें आणि अननुकरणीय कोणतें या प्रश्नांचा उलगडा रसिकांनां व अभ्यासकांनां आपोआपच होणार आहे. शिवाय कलेसाठीं कला हा पक्ष जरी वादविवादांत रंगणारा असला, तरी या वाङ्मयाच्या वाचनानें कलेच्या मागें कोणत्यातरी उदात्त हेतूचा भुंगा असल्याशिवाय, जीवनाला आवश्यक अशा भावनेची कळ असल्याशिवाय उच्चकलेचा खरा व स्वैरविलास आणि मनसोक्त नर्तन कसें सुरूच होत नाहीं, याहि गोष्टीवर प्रकाश पडणार आहे. (Necessity is the mother of invention) यांतील मर्मच याहि गोष्टींत अंतर्भूत झालेलें आहे. हेतूचें डोळे नसतील तर कला ठेंचकाळत खड्ड्यांत पडेल; आणि हेतूमुळें उत्पन्न झालेल्या तीव्र भावनेचा आपला तृतीय नेत्र उघडिल्याशिवाय

कला प्रभावी होणार नाहीं. कलेला उच्च पायरीवर नेण्याकरितां तिच्यामागें हेतूचाच हांक्या पाहिजे. कोणाच्याही अंगची कला इंद्राच्या ऐरावताप्रमाणें दिव्य, देदीप्यमान आणि वैभवशाली असली तरी तिचेवर दिग्दर्शनाचा आणि प्रचोदनेचा अंकुश सदैव रोखलेला हवा. हेतु विरहित आणि ध्येयशून्य कला मुरडेल, फार तर फिकट नकली शोभिवन्तपणाही त्यांत दिसेल परंतु ती चपल आणि रसरसित दिसणार नाहीं. तींत जोम आणि जिवन्तपणा आढळणार नाहींत. ती सावलीप्रमाणें वावरेल; पण विजेप्रमाणें चमचमण्याचें आणि थैमान घालण्याचें सामर्थ्य तिच्यांत असूं शकणार नाहीं हाच काळ—वाङ्मयाचा व्यवच्छेदक विशेष (Distinguishing feature) होय.

## हे शिवरामपंताच्या आत्म्या !

कुणाला ठाऊक आत्मा अमर आहे कीं नाहीं ? पण आत्माच्या अमरत्वाची कल्पना आपल्या हिंदूच्या हाडीमाशीं खिळलेली आहे, हें खास. ह्या कल्पनेचाच उपयोग करून शिवरामपंतांनीं भासाची भवितव्यता या आपल्या लेखांत कारुण्य-जनित कल्पनाशक्तीला भरपूर वाव करून दिला आहे. भासकवीचे ग्रंथ असेच त्याच्या हयातींत नष्ट झाले होते—त्याचीं नाटकें जाळण्यांत आलीं होतीं ! मग सांगा आतां स्वतःचें वाङ्मय नष्टप्राय झालेल्या शिवरामपंतांना भासकवीखेरीज दुसरा कोणता जिव्हाळयाचा विषय सांपडण्यासारखा होता ? म्हणून त्यांनीं भासकवीला पुढें नेतला आणि त्या मिषानें, अनुषंगानें स्वतःच्याच वेदना आणि भावना वर्णन केल्या. कवीच्या मनोव्यथेचें कोण तें हृदयद्रावक वर्णन ! भासाच्या भवितव्यतेंत त्यांच्या स्वतःच्या भवितव्यतेचा भास होत होता !

पण नाश आणि निराशा यांच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या आणि करुण रसानें ओथंबलेल्या या लेखाच्या शेवटीं मात्र शिवरामपंतांनीं आशावादाची भक्कम कलाटणी दिली होती. कारण हा लेख लिहिण्याचे वेळीं भासकवीचा एकेक ग्रंथ उपलब्ध होऊं लागला होता. या उत्तेजक घटनेमुळें उल्हासित झालेले शिवरामपंत या लेखाच्या शेवटीं भासाला—त्या समानशील आणि समान—व्यसन अशा आपल्या स्नेह्याला—सहानुकंपेनें भरून आलेल्या अंतःकरणानें आणि अशावादामुळें उत्पन्न झालेल्या आत्मविश्वासानें समाश्वसित

करीत आहेत आणि धीर देत आहेत. पण आतां खुद्द शिवरामपंतांचेच ग्रंथ बंधमुक्त होत असल्यामुळें ते त्यांचे शब्द त्यांनाच उद्देशून उच्चारूं—

" पण हे भाषाच्या आत्म्या तूं निराश होऊं नको. परमेश्वर या जगांत जोंपर्यंत हयात आहे, तोपर्यंत दुष्ट लोकांनीं कितीही अपकार केले तरी कोणालाही निराश होण्याचें कारण नाहीं. ज्यानें बुडणारीं श्रुति मत्स्यरूपानें तारलीं ज्यानें ज्वाळांमध्यें प्रविष्ट झालेली सीतादेवी प्रत्यक्ष अग्नीच्याच हातून श्रीरामचंद्राच्या हातीं आणून दिली, आणि ज्यानें तुकारामाच्या अभंगांची गाथा श्रीपांडुरंगाच्या रूपानें इंद्रायणीच्या डोहांतून कोरडीच्या कोरडी वर काढून आणिली तोच परमेश्वर तुझ्याही कवितेच्या पाठीमागें उभा आहे.! तो पहा ! तो या जगांतील जरूरीची अशी कोणतीही गोष्ट नाहींशीं होऊं देणार नाहीं !"

सतरावा स्मृतिदिन
२७ सप्टेंबर १९४६
६ शुक्रवार, पुणें २.

वामन कृष्ण परांजपे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७३६०३ वि: निबंध
क्रमांक ९५९ नों: दि: २८-२-८
मराठी ग्रंथ संग्रहालय ... ६६१४ ... ६५४८८

# दि बरोडा बॅटरीज लिमिटेड
## गोया गेट, बडोदे

दुसऱ्या महायुद्धामुळें हिंदुस्थानच्या औद्योगिक वाढीस अेक मोठी जोराची चालना मिळाली. ब्रिटिश व अितर परकीय मालाची भरमसाट आयात व परकीय धार्जिणी अशी हिंदुस्थान सरकारची कृति व धोरण यामुळें स्वदेशी अुद्योगधंद्याच्या वाढीला अेक प्रकारचा कायमचा अडथळा असे. परंतु दुसऱ्या महायुद्धामुळें या परिस्थितींत आमुलाग्र फरक घडून आला. जर्मनी, जपान या देशांचा माल हिंदुस्थानांत येणें अजिबात बंद झालें व युद्धामुळें सर्वच प्रकारच्या अुद्योगधंद्यांची जरूरी सरकारला जास्तच भासूं लागली. अशा वेळीं हिंदी अुद्योगधंद्याच्या वाढीला अुत्तेजन देण्यावांचून–निदान अडवणूकीचें धोरण–तरी सोडून देण्यावांचून हिंदुस्थान सरकारला दुसरा मार्गच अुरला नाहीं. या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेअून ज्या बऱ्याच महाराष्ट्रीय धंदेवाल्यांनीं आपले आसन स्थिर केलें अशांत बडोद्याच्या बरोडा बॅटरीज लि. या मोटार, रेडिओ व अितर टॉर्चला लागणाऱ्या बॅटरीज तयार करणाऱ्या कारखान्याचा अुल्लेख करावा लागेल.

युद्धपूर्वकाळीं धंदा सर्वस्वीं जर्मन व अमेरिकन कारखानदारांच्या हातीं होता असें म्हटल्यास चालेल. परंतु युद्धाबरोबरच जर्मनीचा माल येणें बंद झालें व अुरलेल्या अमेरिकन कारखान्यांना युद्धकार्याला मदत करावी लागल्या-

# दि बरोडा बॅटरीज लिमिटेड
## गोया गेट, बडोदे

मुळें त्यांचा माल बाजारांत मिळणें अशक्य झालें. अशा वेळीं वरील प्रकारच्या बॅटरीज शास्त्रशुद्ध पद्धतीनें तयार करवून त्या बाजारांत आणण्याचें ठरवून बडोदा बॅटरीज लि. चे मॅनेजिंग अेजंटस् श्री. दाजीसाहेब पानसे यांनीं औचित्य दाखविलें यांत शंका नाहीं.

युद्धाच्या सुरुवातीसच पुण्याला श्री. दाजीसाहेब पानसे यांनीं लहान प्रमाणावर अशा प्रकारच्या बॅटरीज तयार करण्यासाठीं म्हणून कॉर्बो प्रॉडक्टस् या नांवानें अेक छोटासा कारखाना सुरू केला. परंतु लढाअीच्या तीव्रतेबरोबरच कच्च्या मालाचा पुरवठा मिळविणें कठिण होअूं लागलें व दिवसानुदिवस कारखान्याच्या वाढीच्या दृष्टीनें अडथळे येअूं लागले. यावेळीं कारखान्या पुढील वाढीच्या दृष्टीनें श्री. पानसे यांनीं हा कारखाना बडोदें येथें नेला व तेथेंच बडोदे सरकारच्या मदतीनें या कारखान्याचें **बडोदा बॅटरीज लि.** या कंपनींत रूपांतर केलें. बडोदे सरकारचें संरक्षण व प्रत्यक्ष मदत यामुळें कारखान्याच्या वाढीला चांगलीच चालना मिळून कारखाना 'बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू झाला व कंपनीचा माल ' तेज ' बॅटरीज या नांवानें सर्वत्र मिळूं लागला. आज ' तेज ' बॅटरीजनें बाजारांत चांगलीच लोकप्रियता मिळवलेली आहे. व कारखाना भक्कम पायांवर चालू आहे. अजूनही कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या बाबतींत फारशी सुधारणा नसल्यामुळें मालाचा पुरवठा मागणीप्रमाणें करतां येणें कटीण आहे.

# दि बरोडा बॅटरीज लिमिटेड
## गोया गेट, बडोदे

युद्धकाळामुळें कच्च्या मालाच्या अडचणीची जाणीव असलेमुळें शक्यतों दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागूं नये या दृष्टीनें कंपनीनें संशोधनाच्या कामाकडेही दुर्लक्ष केलेलें नाहीं. कांहीं विशिष्ट रसायनें तयार करून तीं वापरल्यास कच्च्या मालाचा पुरवठा भरपूर होऊन माल यापेक्षां स्वस्तही काढतां येईल असें वाटल्यावरून श्री. दाजीसाहेब पानसे यांनीं संशोधनांवर बराच भर दिला आहे. या बाबतींतले कांहीं प्रयोग यशस्वी झाले असून लवकरच याहीपेक्षां स्वस्त माल बाजारांत येऊं लागेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्धोत्तर मंदीच्या दृष्टीनें विचार करतां नाहि ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. युद्धकाळामध्यें बऱ्याच कारखानदारांनीं मोठमोठालीं सरकारी कामें करून कारखान्यांना आर्थिक बळकटी आणली. परंतु आतां पुन्हां परदेशांची स्पर्धा सुरू झाल्यानंतर त्यापैकीं किती कारखाने तोंड देऊन उभे राहूं शकतात हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या दृष्टीनें केवळ नफ्यावर लक्ष न ठेवतां व सरकारी कॉन्ट्रॅक्टर्सच्या मागें न लागतां आपला माल देशभर पसरलेल्या गिऱ्हाइकांना शक्य त्या प्रमाणांत का होईना पुरविण्यांत व मिळालेल्या संधीचा संपूर्णपणे व कायम दृष्टीने बाजारांत निश्चतपणें स्थान मिळविण्यांत कंपनीनें मोठेंच औचित्य व संयम दाखविला आहे यांत शंका नाहीं.

दि बडोदा बॅटरीज लि. या कंपनीचें अधिकृत भांडवल आतां दहा लक्षांचें असून त्यांपैकीं तीन लाखांचें भांडवल विक्रीस काढलें आहे.

# दि बरोडा बॅटरीज लिमिटेड
## गोया गेट, बडोदे

या तीन लाखांपैकीं दीड लाखांचे शेअर्स पूर्वींच खपलेले असून नवीन विक्रीस काढलेल्या दीड लाखांच्या शेअर्सपैकीं २५०० रुपयांचे शेअर्स बडोदें सरकारसाटीं राखून ठेवण्यांत आले आहेत व अुरलेले शेअर्स खुल्या विक्रीस काढलेले आहेत. कंपनीचे मॅनेजिंग अेजंटस् श्री. दाजी साहेब पानसे व त्यांचे बंधू श्री. बाळासाहेब पानसे यांनीं मिळून या कंपनींत स्वतःचे असे ७५०० रुपये गुंतविले आहेत. याशिवाय आपले आप्तेष्ट व मित्र मंडळी यांचेकडून वेळोवेळीं हजारों रुपयांच्या ठेवीही श्री. पानसे यांनीं मिळवून दिल्या आहेत. स्वतःचा पैसा अितक्या मोठ्या प्रमाणावर अेकट्यानें गुंतविल्याचें अेकादेंच अुदाहरण महाराष्ट्रीय कंपन्यांत सांपडेल. स्वतः मॅनेजिंग अेजंटसनीं स्वतःचा पैसा गुंतविणें हें कंपनीमध्यें जनतेचा विश्वास अुत्पन्न होणें व टिकविणें व अितर स्थैर्याच्या दृष्टीनेंही फायद्याचें असतें. तसेंच यांत मॅनेजिंग अेजंटसचा स्वतःच्या कर्तृत्वावरील विश्वासही प्रतीत होत असतो.

युद्धकालीन अवघड परिस्थितींत निर्माण होणारा कच्चा माल, वहातूक अित्यादि सर्वच अडचणींना व विशेषतः महाराष्ट्रीयांच्या आपसांतील दुहीला तोंड देअून हा कारखाना भक्कम पायांवर अुभारण्यांतील श्री. पानसे यांचे श्रम व चिकाटी खरोखरीच अभिनंदनीय आहे. वरील सर्व परिस्थितीमुळें निर्माण झालेल्या अडचणी निवारण्यांत व त्यांतून मार्ग काढण्यांत खर्च झालेल्या श्रमांत असा आणखी अेकादा कारखाना अुभारतां आला असता किंवा ह्याच कारखान्याचें स्वरूप पांच पटीनें वाढवितां आलें असतें असे अुद्गार श्री.

# दि बरोडा बॅटरीज लिमिटेड
## गोया गेट, बडोदे

पानसे यांनीं काढल्यास त्यांत कोणतीही अतिशयोक्ती होओील असें वाटत नाहीं.

अशा प्रकारें अनेक अडचणींना तोंड देअून भक्कम पायावर चालू झालेला हा कारखाना दिवसेंदिवस प्रगतीच्या मार्गावर पुढें जाअून हिंदुस्थानांतील निदान महाराष्ट्रांतील अुद्योगधंद्यांत मानाचें स्थान मिळवील अशी साधार अपेक्षा आहे व ती अपेक्षा पुरी करण्यासाठीं श्री. पानसे बंधू आपल्या श्रमांची पराकाष्ठा करतील अशी अशा वाटते.

आज हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थिति झपाट्यानें बदलत आहे. यापुढें हिंदुस्थान ब्रिटिश व अमेरिकन भांडवलदारांचे राखीव कुरण म्हणून राहूं शकणार नाहीं ही गोष्ट अुघड आहे. यापुढें हिंदुस्थान जास्तींत जास्त अुद्योग प्रधान होत आहे. अशा वेळीं अशा अुद्योगधंद्यांना जोराची चालना मिळेल व त्या दृष्टीनेंही या कारखान्याचें भवितव्य अुज्ज्वल आहे.

याप्रमाणें बॅटरी कारखान्याची प्रगति श्री. रघुनाथराव पानसे यांच्या देखरेखीखालीं सुरू असतांना ते व त्यांचे बंधु श्री. गणपतराव पानसे हे कोल्हापूर संस्थानांत दहा लाख रुपये (१०,००,०००) भांडवलाची अेक स्पिनिंग व होजिअरी मिल सुरू करण्याच्या तयारींत आहेत. श्री. गणपतराव पानसे हे पनात्रा अेजन्सी लि., मुंबअी या फर्मचे मॅ. डायरेक्टरही आहेत.

# दि बरोडा बॅटरीज लिमिटेड

## गोया गेट, बडोदे

ही फर्म देशी कारखान्यांतील मालाचा व आयात-निर्यातीचा व्यापार करीत असते. मुंबअीच्या व्यापारी क्षेत्रांत श्री. गणपतराव पानसे यांनीं अुत्तम जम बसविला असून त्यांच्या नेतृत्वाखालीं व श्री. रघुनाथराव यांच्या सहकार्यानें

नवीन निघणाऱ्या मिलचें भवितव्य यशस्वी ठरेल असा भरंवसा आहे.

सदर मिलच्या योजनेस कोल्हापूर दरबारचें साह्य मिळालें असून अनेक अनुभवी व प्रतिष्ठित व्यापारी, अुद्योगी व तज्ज्ञ मंडळी डायरेक्टर बोर्डावर येणार आहेत. या मिलबद्दल जाहीर निवेदन लौकरच प्रसिद्ध होअील.

श्री. पानसे बंधु यांची राष्ट्रीय अुद्योगधंद्यांतील कामगिरी निव्वळ-प्रशंसनीयच नव्हे तर अनुकरणीय आहे. हें सध्यांच्या परिस्थितींत विशेष लक्षांत घेण्याजोगें आहे. राष्ट्रीय सरकारच्या आर्थिक योजनांमध्यें असल्या लहानलहान पण महत्त्वाच्या धंद्यांना प्रमुख स्थान दिलें गेलें आहे. या प्रथित यश बंधूंची अधिकाधिक प्रगति होअून महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीस चालना मिळेल असा विश्वास वाटतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३६०३ दि: १२-५-६५
क्रमांक ९८८१ नों दि. ३८-२-७५

# २५ वर्षांची जुनी—




DTP.2 NINAD LTD.

## —: याशिवाय :—

पोरवाल ने … नेत्ररोगांवर अप्रतिम
पोरवाल ब … अप्रतिम

REFBK-0006694

## पोरवाल आणि कंपनी, पुणें २




BEAUTY PREPARATIONS

'आशा' फेस पॉव-
डरनें रसिक स्त्रियांत
अत्यंत मान्यतेचें
स्थान मिळविलें असून
फेस पॉवडरप्रमाणेंच
हेअर आईल्स, नख-
रंजकें इ. सौंदर्यसाधनें
लोकप्रिय आहेत.

MATCHES THE Asha WORLD'S BEST

शक्ति व उत्साहवर्धक

# हेमकिरण


सुवर्णमौक्तिक व अभ्रकयुक्त

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

तळेगांव (जी. आय्. पी.)

शास्त्रोक्त व अनुभविक औषधांचा कारखाना

पब्लिसिटी आर्टस








'पुरोहित श्वासहारी हा एकच असा दम्यावरील उपाय आहे कीं त्याची सुरुवात करतांच कफ सुटतो धाप कमी होते, शौचाची तक्रार उरत नाहीं, पचनक्रिया सुधारते, हळुहळू शक्ति भरून येऊन फुप्फुसें मजबूत होतात व दमा निखालस बरा होतो. दमा, धाप लागणें, पहांटेचा ठसका, कंठदाह करणारा खोकला वगैरेसाठीं **पुरोहित श्वासहारी प्लेन** (निळें पॅकिंग) व बद्धकोष्ठ व आम्लपित्त बळावलेल्या दमेकऱ्यासाठीं **पुरोहित श्वासहारी कंपाऊंड** (लाल पॅकिंग) वापरावें. ३, ६ व १२ औंसी बाटल्यांतून अनुक्रमें रु. ३-६ रु. ५-१२ व रु. १० किमतीस सगळीकडे मिळतें.

**दमा, श्वासविकार बरे करणारा एकच डॉक्टरी उपाय**



**पुरोहित श्वासहारी**

**डॉ. पुरोहित फार्मसी.**

# दि सेंट्रल पॉटरीज लिमिटेड

## नागपूर

बरण्या, दगडया वगैरेचे मध्यप्रान्तांतील
प्रसिद्ध कारखानदार,

या कारखान्यांत सर्व तऱ्हेच्या बरण्या, दगडया, कटोऱ्या, लोणच्याचीं भांडीं, पेचाच्या बरण्या, ॲसिड जार वगैरे तयार होतात. शिवाय कपबशाहि तयार होऊं लागल्या आहेत.

×××

मुंबईचे एजन्ट,

## मे. इंडियन ग्लासवेअर कं.

१६८ चकला स्ट्रीट, मुंबई.

सतत २५ वर्षे नावाजलेले

तयार कपड्यांचे सर्वांत मोठे व्यापारी

# महिंद्रकर ब्रदर्स

एकदां समक्ष भेटाच.

बंबखान्याजवळ
बुधवार पेठ
पुणें २

पोर्तुगीज चर्च—
ट्रामनाक्याजवळ
गिरगांव, मुंबई ४

२५ वर्षें सर्वतोमुखी असलेली

## वझे कृत डांग्या खोकल्यावर अनुभविक औषध

डांग्या खोकला, कोल्हे खोकला, माकड खोकला असें देशपरत्वें म्हणत असलेल्या खोकल्यावर व इतर सर्व प्रकारच्या खोकल्यांवर उत्तम लागू पडतें.

हें किंचित सारक व पौष्टीक असल्यामुळें लहानांस फार मानवतें व गोड असल्यामुळें आवडतें.

**वझे कफनाशक गोळ्या, ऑफिस, मुंबई नं. ४.**

# योगराज (रक्तपोषक)

## शरीरांत रक्ताची वाढ करून

## अग्नि प्रदीप्त करून अशक्तता नाहींशी करणारें

व त्यायोगें **पांडुरोग, रक्तक्षय, ॲनिमिया, शुक्रक्षीणता, मेंदूची अशक्तता,** किंवा कोणत्याही रोगानंतर आलेला फिक्कटपणा, निरुत्साह यांवर हमखास उपयोगी पडणारें व पुष्कळ दिवस घेतल्यानें **उन्माद, अपस्मार** यांवर अत्यंत उपयोगी असलेलें व

## चरक-कालापासून वैद्यांनीं अनुभविलेलें

हेंच औषध **अल्पमोली** व **बहुगुणी** आहे.

इतर ३०० चे वर औषधांसाठीं लिहा:—

**आयुर्वेदीय औषधि भांडार, २० शुक्रवार, पुणें २.**

---

# कुटुंबांतील किरकोळ दुखणीं

बरीं करण्यासाठीं डॉक्टर वैद्यांकडे नेहमीं धांव घेणें शक्य नसतें त्याची जरूरीही पण नसते. पोट दुखी, उलटी, अपचन, सर्दी, अंगांत उसण भरणें, दाढदुखी, मुलांचे शौचाचे विकार व या तऱ्हेचे अनेक किरकोळ आजार **जवेरियन जीवन मिक्श्चर** हटकून बरें करतें. कॉलरा व आमांश सारख्या सांथीच्या घातक रोगांवर याचा जादूप्रमाणें उपयोग होतो. डॉक्टरच्या गैरहजेरींत हें नेहमींच उपयुक्त होत असल्यामुळें याची एक बाटली घरांत व प्रवासांत जवळ राखणें दूरदर्शीपणाचें ठरतें. केमिस्टकडे व खेडोपाडीं वाण्यांच्या दुकानीं मिळतें.

**एम. एच. जवेरियन** आणि **कंपनी.**

देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.




कंबरेंतील उसण, लचक किंवा इतर वातविकार **नरेंद्र** एम्ब्रोकेशन चोळल्यानें त्वरित बरे होतात. वयोमानाच्या वाढीबरोबरच हवामानांतील फरकही शरीराला जाणवूं लागतात. अशा वेळीं शरिराला **नरेंद्र एम्ब्रोकेशन** रगडून गरम पाण्यानें स्नान करा. पूर्ववत् उत्साह वाटूं लागेल. केमिस्ट व वाण्यांकडे मिळतें.

**सोल एजंट,**

**हनुमान एजन्सी, परळ, मुंबई नं. १२.**

---

# ज्या वैद्यांना—

निरनिराळ्या सिद्ध औषधींचीं विशिष्ट मिश्रणें करावयाचीं असतात, परंतु तीं तयार करण्याचा व्याप परवडत नाहीं. अशा वैद्यांना त्यांच्या गरजेप्रमाणें फरकाचीं व मिश्रणाचीं औषधें आमच्याकडे तयार करून मिळतील.

वैद्य वर्गानें व घरगुती योजकांनीं पत्रव्यवहार केल्यास आस्थापूर्वक माहिती दिली जाते.

## डॉ. दीनबंधू फार्मसी

**वरळीकर बिल्डिंग, कॅनडी ब्रिजजवळ, मुंबई नं. ७.**

# खाजाव

ग्लकोज, व्हिटामिन व प्रोटीनयुक्त

खाजावचा खुराक रोज चालू ठेवा.

★

रक्तवर्धक आंबावडी

स्वादिष्ट रुचिको

****

आपल्या दुकानदाराकडे मागणी करा.

★

## फडके-प्रॉडक्टस्

पौष्टिक खाद्यपदार्थांचे कारखानदार — नागनाथपार, पुणें नं. २

## " तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचें येरे गबाळा काम नव्हे "

या उक्तीप्रमाणें स्वातंत्र्यप्राप्तीहूनही अधिक महत्त्वाच्या अशा स्वातंत्र्यरक्षणासाठीं जातिवंत पाहिजेत. सबब देशांतील प्रत्येक व्यक्तीला आयुरारोग्यसंपन्न करून एकंदर जनतेला कणखर व दीर्घायुषी बनविण्यासाठीं अहर्निश झटणारी हिंदुस्थानांतलि

# एकमेव आदर्श विमा संस्था

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
७३६०३

## टूनिटी म्यूचुअल

अॅशुअरन्स कंपनी लिमिटेड.

प्रमुख कार्यालय — कोट — मुंबई.

व म्हणूनच

नामदार श्री. दादासाहेब मावळणकर, नामदार श्री. बाळासाहेब खेर, स्वामी केवलानंद, प्रांताध्यक्ष श्री. स. का. पाटील, वीर वामनराव जोशी, सौ हंसा मेहता, सौ. लीलावती, मुनशी, वगैरे सारख्या अनेक थोरांनीं तिची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे.

मॅनेजिंग डायरेक्टर : **स. पां. नाडकर्णी,** बी. कॉम. एम्. सी. (मुंबई), ए. सी. आय. आय. (लंडन)

एकंदर चालू महर्गतेमुळें

## काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकें

जितक्या कमी किंमतींत द्यावयाची माझी इच्छा होती, तितक्या कमी किंमतींत देतां आलीं नाहींत. याकरितां काळांतील निवडक निबंधांचे पहिले भागांत एक सवलतीचें कुपन टाकलें आहे. सवलतीची समग्र माहितीही त्याच खंडांत दिली आहे. ग्राहकांनीं अवश्य वाटल्यास, त्याचा फायदा घ्यावा.

★

व्यवस्थापक :

य. गो. जोशी-प्रकाशन,

सदाशिव, पुणें २.